मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

हजेरी ८ सन १८४६

ले. डेव्हिड केपन

मराठ्यांच्यी व्यखर पूर्वाध-

भा० १ ला

मुलुखानें मोंगलांचा पक्ष स्वीकारिला. ९ बाजिरावाने पनक्ळे मेंकरून दिल्लीच्या दरवाज्या पर्यंत प्रवेश केला तो प्रकार. १० आंग्र्याची हकीगत. ११ बाजिरावानें निजामउल्मुल्कच्या लश्करास भोपाळाजवळ घेरा घालून असा उपद्रव केला की त्या सयाशीं तह करावा लागला. १२ पोर्टुगीसलोक व इंग्रजलोक यांची वर्तणूक. १३ पेशवे व रघूजीभोंसले यांचे युद्ध झाले तें. १४ दिल्लीमध्यें झारशी मुलखाचा नादरशाह नामा बादशाह आल्या मुळें मोंगललोक संकट पावले तें प्रकरण; मग थोडकेच दिवसांनीं त्याणें दिल्लीचें तक्त मोंगलांस माघारें देऊन आपण आपले मुलखीं गेला. १५ मराठ्यांनीं वसईकिल्ल्यास घेरा घातला ती कथा १६ पेशव्यांनीं दक्षिण घेतल्याचे पूर्वी माळवा व बुंदेलखंड या दोहों मुलखीं काय काय बंदोबस्त केला तो प्रकार. १७ पेशवे हिंदुस्थानांत संचार करूं लागला. १८ मराठ्यांनीं सभाजी आंग्र्यावर कोंकणांत मसलत केली होती ती बाजिरावाच्या मरणामुळें सिद्धीस न गेली. १९ हिंदुस्थान व दक्षिणदेश आदिकरून सर्व मुलखाच्या राज्यांची वर्तमानें २० बाजिरावाच्या स्वभावाचें स्वरूप कथन; व त्याचे पुत्र बाळाजी बाजीराव व रघुनाथराव व जनार्दनबाबा व समशेरबहादुर यांची गोष्ट.

भागमोळावा

संतराजी चाळिसांपासून सभाजीअंकुशवन्नामपर्यंत.

१ कान्होजी मराठ्याचा प्रवेश. २ रघूजी भोंसल्यांनें बाळाजी बाजीराव यास पेशवाई नामिक्याची त्याणें मदत घेऊन छळ उपयोग केला तो होकरामें न गेला. ३ चिमणाजी

आपा याचा मृत्यु. ४ पेशवा राजाराम्पासून गोदावरीभाषी सनद
घेतला. ५ भास्करपंत बंगाल्यांत शिरला. ६ दमाजीगाइक
वाडानें मालव्यांत स्वारी घातल्या. ७ अल्लीवेरदीखानानें भास्क
रपंतास बंगाल्यांतून काढून दिल्यावर रघूजी भोंसला यानें स्वयें स्वा
री केली. ८ तेव्हां दिल्लीच्या बादशाहानें पेशव्यांस माळव्याचा अ
धिकार व इतरलाभाची आशा दाखविली, यास्तव त्यानें अल्लीवे
रदीखानाचा पक्ष स्वीकारून रघूजीला तेथून घालविलें. ९मग
पेशवा बादशाहापासून माळव्याची सनद पावून साताऱ्यास आला
१० त्याचुडें रघूजी भोंसले आणि बाळाजीबाजीराव पेशवे यांची
कांहीं नमजूत पडली. ११ निजामउल्मुलुख याची कांहीं
गोष्ट. १२ रघूजीचाभास्करपंत व मोठे मोठे मानकरी मराठे
सरदार पुनः बंगाल्यांत गेले ते अल्लीवेरदीखानाच्या कपटानें
यानें कैदेंकरून मारिले गेले. १३ आफगाणांचा बादशाह अमेदशा
ह अबदाली याची गोष्ट; दिल्लीचे बादशाहाचा मृत्यु, आणि त्याच्या
पुत्राचें स्थापन; निजामउल्मुलुखाचा मृत्यु. १४ नासिरजंग
नेटें सैन्य घेऊन करनाटकास चालिला. १५ राजाराम राजा
कसा नकट झाला तें प्रकरण. १६ त्यानंतर साताऱ्यास सक
वारबाईची व ताराबाईची काय वर्तणूक झाली तें १७ बाळा
जीनें रुकवारबाई कोणें प्रकारें सती घालविली तो विस्तार.

भागसत्रावा

सनसत्रावेंपन्नासांपासून सत्रावें छप्पन्न पर्यंत.

१ पेशव्यानें रघूजी भोंसला व इतर सरदार वश केले.

२ पुणेशहर मराठेलोक यांची राजधानी झाली. ३ बाळाजी

पेशवा व सदाशिवराव भाऊ यांमध्यें कांहीं कलह उत्पन्न झाला, त्याचें कारण रामचंद्रबाबा शेणवी याचा उद्भव. ४ पेशव्यानें गाजीवाहन निजामउल्मुलुखाचा वडीलपुत्र त्याचा पक्ष अंगीकारिला. ५ कांशीसलोकांनीं मुजाफरजंगाचा पक्ष धरून त्यास निजामपदवी दिली; नंतर मुजाफरजंगाचा मृत्यु, व सलाबतजंगास निजामपदवीचा लाभ. ६ पेशवा गाजिवदिनाच्या कामासाठीं रुद्धेलखंडापर्यंत गेला, परंतु ताराबाई व गाइकवाड यांच्या कृत्रिमामुळें माघारा आला; आणि राजाराम मोठ्या अडचणींत दीन पडला. ७ सलाबतजंग फ्रांशीसलोकांच्या आश्रयेंकरून गांवें लुटीत पुण्याकडे गेला. ८ रघूजी भोंसल्यानें कायकाय संपादन केलें ते प्रकरण, व मीरहबीब याचा मृत्यु. ९ दिल्लीकडील कांहीं वर्तमान, व मराठे या कामांत शिरले तो विस्तार. १० गाजीवदिन शिंदा व होळकर यांच्या आश्रयेंकरून दिल्लीहून दक्षिणेस चालिला; तो आपली निजामपदवी पावेल असें सिध्द झालें अस तां आपण मृत्यु पावला. ११ सलाबतजंग निजामपदवी पावल्यावर. त्याणें पेशव्यास कायकाय दिलें तो प्रकार. १२ पेशव्यानें करनाटकीं स्वारी केली. १३ पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव गुजराथेंत पाठविला. तो तें कार्यकरून हिंदुस्थानांत गेला. १४ रघूजी भोंसल्याचा मृत्यु, व त्याच्या चौघा पुत्रांची गोष्ट. १५ पेशवा व ताराबाई यांची समजूत झाली ती कथा. १६ दिल्लीकडचें कांहीं वर्तमान; दिल्लीचा अमेदशाह बादशाह यांचे गाजीवदिनाच्या पुत्रानें डोळेकाढून त्यास कैदेंत ठेविलें; आणि जानदारशाह नांवून पूर्वीचा बादशाह त्याचा नातू तक्ताधिपति केला. १७ बाळाजी बाजीराव पेशवा याच्या स्वभावाचें वर्णन. १८ पे

रुग्यानें आंग्र्याचा मुलूख घ्यावया विषयीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें करून ते काम झाल्याचे पूर्वीच त्याला सावनूर घ्यावया करितां ति कडे जावयाचें अगत्य पडलें. १९ इंग्रेजांची लटाऊ जाहजें जाऊंन सुवर्ण दुर्ग किल्ला घेतला; तो मराठ्यांस सोंपविला. २० मराठे यांणीं आंग्र्याचा मुलूख व किल्ले घेऊन विजयदुर्गास पेरा घातला असतां त्यांचे कुमकेस इंग्रेजांचीं जहाजें जाऊन त्यांहीं मराठेलोक आपल्या लोकांत न घेतां तो किल्ला घेतला. २१ म राठेलोक जाऊन यांणीं सावनूर किल्ला घेतला; फांशीसलोक यांस दक्षिणेंतून काढावयासाठीं पेशवा व सलाबतजंग यांणीं मसलत केली ती बसीच्या युक्तीपुढें सिद्धीस गेली नाहीं. २२ पुण्यामध्यें पेशवे आणि मुंबईचे इंग्रेज यांची समजूत झा ली तो प्रकार.

मराठ्यांची बखर

पूर्वार्ध

भागपहिला

१ पूर्वी मुसलमान लोकांनीं हिंदुस्थान घेतल्यापासून अगोदर ते उगीच स्वांऱ्या घालून तें लुटीत असत, ते.सन अकराशांच्या सुमारें अटकनदीस येऊन पोंचले.

२ त्यापुढें तीनशें वर्षांनंतर, अल्लाउद्दीन खिलजी याचे नामें कोणीएक मोठा मुसलमान सरदार झाला, त्यानें आठ हजार सैन्य घेऊन नर्मदाउतरून खानदेशांतून अकस्मात् देवगडासमोर येऊन डेरा दिला. त्यावेळेस कोणी एक मराठा रामदेवराव जाधव म्हणून त्या किल्ल्याचा राजा होता, त्यानें आपलें संस्थान राखावयासाठीं कांहीं युद्ध केलें, आणि पडला; मग किल्ल्यांत जाऊन अल्लाउद्दीनाशीं तहाचें बोलणें लाविलें; तेव्हां बहूत द्रव्य दिल्यास तो आपला मुलूख सोडून जातो, असें ठरलें. इतक्यांत रामदेवरावाचा पुत्र मुलखांतून फौज जमा करून घेऊन आला, आणि बापानें तह मिळविला तह न मानितां अल्लाउद्दीनाशीं युद्ध करूं लागला. त्या प्रसंगीं राजपुत्राचा पराभव झाला; त्यामुळें ते मुसलमान लोक गर्वे करून उन्मत्त झाले; यादव राजास आपलें सर्व द्रव्य आणि इलिचपूर द्यावें लागलें. तेव्हां ते मुसलमान लोक किल्ला सोडून निघाले, तेणेंकरून अल्लाउद्दीन मोठा विख्यात झाला. आणखी त्याला दिल्लीचें तख्त सहज

प्राप्त झाले.

: लग त्याणें दक्षिणदेशीं तीन वेळां फौज पाठविली, त्या योगें करून बहुतेक दक्षिणदेश व तेलिंगण त्याचे हस्तगत झालें; आणि त्यालश्कराचे उपद्रवानें नर्मदेपासून रामेश्वरापर्यंत मुलखाची मोठी हेराणगत झाली. पुढें अल्लाउद्दीनानें बहुत दिवस राज्य केलें; शेवटीं त्याच्या रा- - ज्यांत जागोजाग बंडें उत्पन्न झालीं, आणि तो मेल्यानंतर दिल्लीचे दरबारीलोकांत कितीएक वर्षे वैमनस्य पडत गेलें, त्यासंधीत हिंदूलोकांस पुनः आपलें राज्य स्थापावयास बरें. ते एकादेवगडावांचून सर्व दक्षिणेंत संचार करूं लागले, आणि देवगडासही घेरा घालून लढूं लागले. ते- ह्यां दिल्लीमध्यें मुबारीकनामें बादशाह होता, तो सैन्य घेऊ- न आला. तेसमयीं जे लोक किल्ला स्वभोवता वेढून युद्ध क- रीत होते ते बादशाहावीं युद्धनकरितां पळूं लागले. त्यांचे पाठीस बादशाह लागला, तेव्हां एक हरपाळदेव राजा सांप- डला, त्याच्या अंगाचें कातडें काढविलें, तेणें करून तो मृ- त्यु पावला. मुबरिकानंतर दिल्लींत नश्मखनामें बादशाह झाला, त्याचें राज्य असतां सन तेरासें तेविसांत दक्षिणदेशीं पुनः बंड उत्पन्न झालें; तें मोडावयास त्याचा पुत्र जो युनास् तो सैन्यसुद्धां घेऊन त्याणें तें बंड मोडिलें; आणि तेलिंग- णांतील वारंगळनामें राजधानी घेतली; तेवेळेस त्यानगर- चे कितीएक मोठे मोठे गृहस्थ पळून गेले होते. नंतर बारावर्षां- नीं त्यांतील दोघां गृहस्थांनीं तुंगभद्रेचे तीरीं विजयानामें नू- तन नगरी वसविली; तिची कांहीं काळेंकरून कोणीएका मोठ्या राजानें राजधानी केली. मग ज्याणें एवढा मोठा पराक्रमके-

ला, असा तो चुनास त्याला सन नेमाडें पंचविसांत राज्या भिषेक करून दिल्लीचे तक्तावर बसविलें, आणि त्यांचें नांव महंमद तघलख असें ठेविले. तो बहुत विद्यांत निपुण असे, परंतु उतावळा, अविचारी, निर्दय, क्षणून राज्यास अयोग्य होता. तो राज्य करूं लागल्यापासून दोनवर्षांनीं सोनगडाक सोठी फौज घेऊन दिल्लीचे दरवाज्या जवळ येऊन पोंचले; तेव्हां बादशाहानें त्यांस बहुत द्रव्य देऊन फिरविलें. नंतर तें द्रव्य जितकें खर्चलें होतें तितकें उत्पन्न करावया करितां, धूरसमुद्रनामें एक नगर व करनाटक मुलूख द्रव्य आणिलें; तरी लाला पुरेसें झालें नाहीं. यास्तव नानाप्रकारें प्रजेस पीडा करूं लागला. तो प्रकार असा कीं, तांब्याचे पत्र्यांवर शिक्का करून ते रुपयांच्या किमतीनें चालविले; आणि देवगडाचें नांव दौलताबाद ठेवून दिल्लींत राहणारे लोकांस सांगितलें कीं, तुम्ही सर्वांनीं दौलताबादेस जाऊन राहावें; असें सांगितल्याप्रमाणें त्या लोकांस वर्तविलें; तेणेंकरून त्यांस बहुत कष्ट झाले. आणि दिल्ली ओस पडली.

४ त्यानंतर त्याचे राज्यांत किताएक जागीं बंड उत्पन्न झालीं. तीं अशीं कीं, तो बादशाह एक बंड मोडी तों दुसरा दुसरे बंडाचें वर्तमान कळे असें होऊं लागलें. शेवटीं अफगाण लोक व उत्तरेकडचे लोक, हा धणी योग्य नव्हे असें जाणून राज्यांत आपण सत्ता करूं लागले; यास्तव बादशाहानें फौज उत्तरेकडे दूर योजिली. त्या संधींत, जो पूर्वी मुसलमानांनीं जिंकि-

---

* कोणी ग्रंथांत कीं, धूरसमुद्रनगर करनाटकचे बळंदेवाची राजधानी. कोणी ग्रंथात कीं, तुंगभद्रेचे चंदरचें मोठें बादर होतें; परंतु आतां त्याचा ठिकाणा नाहीं.

रुपयानें आंग्र्याचा मुलूख घ्यावया विषयीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें
करून नें काम झाल्याचें पूर्वीच त्याला साष्टर घ्यावया करितां सि
कडे जावयाचें अगत्य पडलें. १९ इंग्रेजांचीं लढाऊ जाहजें
जाऊन सुवर्ण दुर्ग किल्ला घेतला; तो मराठ्यांस सोंपविला.
२० मराठे यांणीं आंग्र्याचा मुलूख व किल्ले घेऊन विजयदुर्गास
घेरा घातला असतां त्यांचे कुमकेस इंग्रेजांचीं जहाजें जाऊन
त्यांहीं मराठेलोक आपल्या लोकांत न घेतां तो किल्ला घेतला. २१ म
राठेलोक जाऊन यांणीं सावनूर किल्ला घेतला; फ्रांशीसलोक
यास दक्षिणेंतून काढावयासाठीं पेशवा व सलाबतजंग यांणीं
मसलत केली ती बसीच्या युक्तीपुढें सिद्धीस गेली नाहीं.
२२ पुण्यामध्यें पेशवे आणि मुंबईचे इंग्रेज यांची समजूत झा
ली तो प्रकार.

मराठ्यांचा इतिहास

पूर्वार्ध

भाग पहिला

१ पूर्वी मुसलमान लोकांनीं हिंदुस्थान घेतल्याचे अगोदर ते उगीच स्वांऱ्या घालून तें लुटीन असत, ते सन अकराशांच्या सुमारें अटक नदीस येऊन पोंचले.

२ त्यापुढें तीनशें वर्षांनंतर, अल्लाउद्दीन खिलजी या नामें कोणी एक मोठा मुसलमान सरदार झाला, त्याणें आठ हजार सैन्य घेऊन नर्मदा उतरून खानदेशांतून अकस्मात् देवगडास मोर्चे येऊन डेरा दिला. त्या वेळेस कोणी एक मराठा रामदेवराव जाधव म्हणून त्या किल्ल्याचा राजा होता, त्याणें आपलें संस्थान राखावयासाठीं कांहीं युद्ध केलें, आणि पडतला; मग किल्ल्यांत जाऊन अल्लाउद्दीनाशीं तहाचें बोलणें लाविलें; तेव्हां बहूत द्रव्य दिल्यास तो आपला मुलूख सोडून जातो, असें ठरलें. इतक्यांत रामदेवरावाचा पुत्र शंकर खानातून फौज जमा करून घेऊन आला, आणि बापानें तह केलेला तह न मानितां अल्लाउद्दीनाशीं युद्ध करूं लागला. त्या प्रसंगीं राजपुत्राचा पराभव झाला; त्यामुळें ते मुसलमान लोक गर्वे करून उन्मत्त झाले; यास्तव राजास आपलें सर्व द्रव्य आणि इलिचपूर द्यावें लागलें. तेव्हां ते मुसलमान लोक किल्ला सोडून निघाले, तेणें करून अल्लाउद्दीन मोठा विख्यात झाला; आणखी त्याला दिल्लीचें तख्त सहज

लेला तेलिंगणच्या वारंगूळ नगरचा राजा, तो मुलखांतून फौज घेऊन आला, आणि मुसलमानलोकांशीं मोठ्या युक्तीनें युद्ध करूं लागला. तेवेळेस बादशाह सपूर्ण दक्षिणेच्या बंदोबस्ता-स मोठी फौज धरूं लागला. इतक्यांत असें मोठें बंड उत्पन्न झालें कीं, नर्मदेचे दक्षिणेस जितकीं मुसलमान लोकांचीं वेग-ळीं वेगळीं संस्थानें झालीं तितक्यांचें कारण तें बंड. त्या बंडा-चें मूळ असें आहे कीं, पूर्वी गुजराथी लोकांनीं कांहीं बंड केलें, तें बादशाहानें मोडिलें, तेव्हां ते लोक बादशाहाचे भयानें पळाले ते दौलताबादकरांची पाठ निघाले. यास्तव बादशाहानें दौलता-बादकरांस पदच्युत केलें, आणि सेवकांस आज्ञा केली कीं, गुज-राथीलोकांस म्हणावें, तुम्ही निर्भयपणें हुजूर येऊन भेटावें. तें से-वकांनीं सांगितल्यावरून गुजराथीलोक विश्वासानें बादशा-हाचे भेटीस जाऊं लागले. तेसमयीं बादशाह फौजेसहित गुज-राथेंत होता म्हणून ते निकडे गेले. ते गुजराथे जवळ गेले तों, त्यांस असें वाटलें कीं, बादशाह आपणास बोलाऊन नेऊन कांहीं घात करील. याकरितां जे त्यांना नेणारे बादशाहाचे लोक त्यांचे बरोबर होते, त्यांस तेथेंच मारून बंडाचा झेंडा ला वून माघारे दौलताबादेस चालिले. तेव्हां वाटेनें जातांजातां, जे संस्थानीलोक बादशाहापासून त्रास पावले होते, ते त्यांस मिळूं लागले. तें सैन्य असें जमलें कीं, तें दौलताबाद जवळ जा-तांच त्या किल्ल्यांतल्या लोकांनीं ह्या सैन्यापुढें बादशा-हाचें कांहीं चालणार नाहीं, असें जाणून दौलताबादच्या मुख्य कारभाऱ्यास कैद केलें, आणि किल्ला बंडवाल्यांस दिला. नंतर ल्या बंडाचे लोकांस असें वाटलें कीं, ह्या एवढ्या मोठ्या सैन्यास ध-णी एक असावा; परंतु तें सैन्य एकाएकीं जमलेलें असल्यामुळें

कोणी राज्य करावयास योग्य आहे किंवा नाहीं, हें कोणास कांहीं च समजेना; यास्तव एक इस्मायल नामें एक इजार स्वारांचा सरदार होता, त्याला बादशाह करून त्याचें नाव नासरुद्दिन ठेविलें, आणि तो दौलताबादचा तक्ताधिपति केला हें वर्तमान महंमदशाह बादशाहास कळतांच, तो फौजेसुद्धां तुघलकाबादेंतून आला. तो दौलताबादेस येतां तोंतेवढ्यांत बहामनी सिद्ध होते. म्हणून त्यांचें व या बादशाहाचें तत्काळ युद्ध झालें. त्या प्रसंगीं दोघांतून एकाचाही जय झाला नाहीं, परंतु महंमदशाहाचें सैन्य ज्याजागीं लढाई झाली त्याच जागेवर होतें, आणि नासरुद्दिनाचे मागें सरलें. तेव्हां त्या बडव्यांनीं असा विचार केला कीं, नासरुद्दिनानें किल्ल्याचें रक्षण करावें, आणि सरदारांनीं फौजेच्या वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून त्यांनें मुलखांत चोंहीकडून शिरावें; आणि मोठी धुमश्चक्री करावी; नाहीं मोर लढूं नये. मग तसेंच केलें. हें वर्तमान महंमदाला कळतांच, त्यानें दौलताबादेस वेढा घातला, आणि जे सरदार मुलखांत दंगा करावयास जात होते, त्यांत एक जफीरखान नामें मुख्य होता त्याचे पाठीमागें एक आपला अंमलदार्‌ल्मुलुखटेंड्राजी नांवाचा सरदार लाविला. इकडे सभोंवतां वेढा पडल्यामुळें किल्ल्यांतल्या लोकांस अन्नपाणी मिळेनासें झालें. यासाठीं ते अन्न विचार करूं लागले कीं, आतां युद्ध करूं नये; किल्ला द्यावा. इतक्यांत दिल्लीकडे एक मोठें बंड उत्पन्न झालें, असें वर्तमान महंमदशाहास कळलें; यास्तव किल्ला घ्यावयाचें काम आपले सरदारांस सांगून आपण दिल्लीस गेला. हें वर्तमान दक्षिणीं लोकांस कळतांच, ते चोंहीकडून आले, आणि जे बादशाहाचे सरदार किल्ल्याबाहेर लुटून होते त्यांस नाना प्रकारें उपद्रव करूं लागले

तेव्हां त्यांस असें भय झालें कीं, किल्ला सोडून लवकर नर्मदा उतरून पार जावें, म्हणून पळूं लागले. तेव्हां दक्षिणीलोक त्यांचे पाठीस लागले, यास्तव त्यांना वाटेनें दक्षिणीलोकांचा उपद्रव बहूत लागला; परंतु ते तसाच सोशीत सोशीत नर्मदा पार झाले. इकडे जफीरखान पठत होता तो हें आनंदाचें वर्तमान ऐकून पाठीस लागलेल्या अंमादउल्मुलुखावर माघारा उलटला, तेव्हां तो आपले फौजेसहित बेदराजवळ ठाणें धरून राहिला. जफीरखान मोठा विचारवंत होता, त्यानें शत्रूशीं तत्काळ युद्ध न केलें; त्याचे बरोबरीचा आकारमात्र दाखविला. त्याच्या अशाआचरणानें तेलिंगणचे राजास मोठा भरंवसा वाटला; म्हणून त्यानें त्याचे कुमकेस पंधरा हजार फौज पाठविली; आणि दौलताबादेहून पांच हजार आली; आणि त्याची वीस हजार होती; अशी चाळीस हजार फौज झाली; तेव्हां तो अंमादउल्मुलुखाशीं लढूं लागला. ती लढाई फार मोठी झाली; त्यांत अंमादउल्मुलुख पडला; आणि त्याची फौज बहूत नाश पावली. मग [illegible] जागोजाग ठाणीं घालून आपण फौजेसहित [illegible] आला. त्यावेळेस नासरूद्दीन बादशाहानें, हा आपणापेक्षा मोठा पराक्रमी आणि विख्यात, असें जाणून कि म्हणून बाहेर आपण त्याला सामोरा आला, आणि भेटला. मग सर्व नायकगोलकोंस म्हणाला कीं, मजपेक्षां हा बहूत योग्य आहे, याला तक्ताचा अधिकारी करावें. अशीबादशाहाची आज्ञा होतांच त्यासर्वांहीं अवश्य म्हणून नासरूद्दिनाचे जागीं जफीरखानास बसविलें. त्याचें नाव सुलतान अलाउद्दीन हुसेन कांगो बाह्मणी असें ठेविलें.

५ बाह्मणी नाव ठेवण्याचें कारण असें आहे कीं, पूर्वी

दिल्ली मध्यें एक कांगो नामें ब्राह्मण होता, त्याणें जफीरखा नास त्याचे बाळपणांत विकत घेऊन आपल्या घरचे का मा करितां बाळगले होतें. नंतर कांहीं दिवसांनीं हा उत्तम गुणी असें जाणून कांहीं द्रव्य न घेतां त्यास ब्राह्मणानें सूद दिली; आणि त्यास आपलें कांहीं द्रव्य देऊन संतोषें कर्न न बोलिला कीं, तुला लक्ष्मी प्रसन्न असो. असे त्याचे उपकार व आशीर्वाद स्मरून जफीरखानानें आपल्या नावास कांगो ब्राह्मणी अशीं अक्षरें लाविलीं, आणखी त्या ब्राह्मणास बलावून आणून त्यास आपल्या जामदारखान्याचें काम सांगितलें; आणि आपणापासून पुढें जे आपले पुरुष झाले त्यांचें ही नाव कांगो असें चालविलें*

६ असा त्याणें त्या ब्राह्मणाचा मान केला, हें वर्तमान न तेराशें सत्तेचाळिसांत झालें. तेवेळेस महंमद तघलखनामें दिल्लीचा बादशाहा मेला; तेणेंकरून जफीरखानाचें राज्य निर्बाध-चालूं लागलें, त्यांत जे जे बादशाह झाले, ते ते आपणास ब्राह्मणीवंशा म्हणवीत असत. सुलतान अल्लाउद्दीन झमेन कांगो ब्राह्मणी बादशाह झाला तेसमयीं, दक्षिणेंत हिंदूलोकांचीं कितीएक संस्थानें होतीं त्यांतून कितीएक संस्थानीलोकांनीं आपलीं संस्थानें स्वसंतोषें त्यास दिलीं, आणि कितीएक त्याणें बलात्कारें करून घेतलीं. मग जीं घ्यावयास फार कठीण तींमात्र राहिलीं. नंतर त्याणें लोकरंजनार्थ कितीएकांस इना

---

* ही हकीगत फिरिष्ट नामें कोणी मुसलमानांचें वृत्त लिहिणारा देता, त्यांचे बखरींतून काढून घेतली. ही खरी आहे असें भासतें, कां कीं, जितके ब्राह्मण, मुसलमानांचे कांगो नामें देशपांडेपणा मालिकेचें पद आहे, त्या अधिकाराचे आहेत तितक्यांसअ-

म जमीनी दिल्या; कितीएकांस देशमुख्या व पाटिलक्या दिल्या; कितीएक सरदारांस जहागिरी देऊन फौजे सहित चाकरीस ठेविलें. या प्रमाणें त्याणें लोक प्राप्ति संपादिली; आणि आपले राज्याचे बळकटीसाठीं कितीएक मुसलमा-न लोकांस मोठमोठ्या जहागिरी देऊन हिंदूलोकांनीं मुस-लमानांचें आज्ञेंत वागावें असें केलें. त्या वेळेस बहुतेक द-क्षिणदेश व कोंकणपटी त्यांणीं घेतली; परंतु दाभोळेपा-सून रामसपर्यंत कोंकण, व घाटमाथां पुरंदर डोंगर हर-णकाशी सांवेतों बहुतेक त्यांचे स्वाधीन झालें नाहीं. अ-शीं शंभर वर्षे गेलीं, नंतर तेंही घेतलें. सुलतान अल्लाउ-द्दीन इलेन कांगो ब्राह्मणी बादशाह दाहा वर्षे होता, नंतर तेला. त्याचे जागीं त्याचा पुत्र महंमदशाह ब्राह्मणी स्थापि ला, तो सन तेराशें सत्तावन्नांत राज्य करूं लागला नंतर ए कवर्षानें तो सैन्य घेऊन मुद्दख व्यावयास करनाटकांत गे ला, तेसमयीं दौलताबादेंत सैन्य बहुत नव्हतें; आणि असेंच तेसाल आलें कीं, बादशाह करनाटकांत मेला. तें ऐकून मुस लमानांतील एक बहिरामखान नजेंडुराणी नामें सरदार होता त्याणें कोणीएक मराठा जाधव याचे मसलतीनें मोठें बंड उत्प-न्न केलें. त्या पूर्वी अकरा वर्षे मुसलमानांचे राज्यांत बंड नव्ह-तें. हें बंडाचें वर्तमान बादशाहास करनाटकांत कळलें, तेव्हां तो बहिरामखान, बादशाहाचे जातीचा मुसलमान, यास्तव बाद शाहानें त्याला बहुत युक्तीनें सांगून पाठविलें; निकरानें नि रोप पाठविला नाहीं. परंतु मराठीलोकांचे सहायास्तव त्याला तें करणें येईनासें झालें, आणि पैठणाजवळ एक बादशाहाचा कोळा सरदार होता, तेथें फौजेसहित जाऊन युद्ध करूं लागला;

आणि त्यापासून पराभव पावला. यानेरीज ब्राह्मणी वंशाचे बादशाहाचे राज्यांत दुसरें बंड झालें नाहीं. त्यांत मराठालोकही नव्हते असतील.

७ यानंतर सन तेराशें चाळीसांचे सालीं एक मोठा दुष्काळ पडला, तो इतरां दुष्काळांप्रमाणें नव्हता म्हणून त्याचें नाव दुर्गादेवी असें ठेविलें, तो बारा वर्षें होता.

८ नंतर समर्थी पाऊस पडूं लागला, परंतु बहूत दिवस दुष्काळ होता म्हणून मुलूख बहुत ओस पडले होते. याजकरितां त्या दुष्काळानंतर तीस वर्षेपर्यंत वसूल अगदीं थोडा येत होता. याशिवाय जे किल्ले मुसलमानांनीं घेतले होते ते पाळेगारांनीं बळकाविलें, आणि तेप्रजेस नाना प्रकारें दुःख देऊं लागले.

९ त्याचा सुमार सन चौदाशें एकुणतीस, त्यावेळेस हसनाम आमेदशाह ब्राह्मणी नामें बादशाह होता, त्याणें नें बंड मोडिलें; आणि लोकांस सुख व्हावें म्हणून बंदोबस्तासाठीं एक सैन्य सिद्ध करून पाठविलें; त्याचा मुख्त्यार मलिख उलटीजारनामें एक सरदार करून पाठविला; त्याज बरोबर एक मोठा शाहाणा ब्राह्मण दादूनरसू काळे यानामें पाठविला. ते कोणी पाटील व देशमूख व देशपांड्या आढळला असतां त्याला बरोबर नेऊन त्यांच जागीं त्याला स्थापावा, असें करीत चालिले. नें लश्कर जाऊन त्याणीं नें बंड मोडून बांई किल्ला घेतला, आणि बेदर घेले.

१० मुसलमानांचा बंदोबस्त दादूनरसू काळे याजकडे होता, त्याणें शोसाचे सामानें स्मरण नाहींसें पाहून सर्व हद्दी नव्या केल्या. त्यांत जे देश फारलाहान होते ते वाटविले, आणि लोकांस

पहिल्या वर्षे माफीचा कौल दिला; दुसरे वर्षे विघ्यास एक तो बरा दाण घेऊन लोक सुखी केले.

११ इतक्यांत घाटमाथ्याचे रामोशी हे लोकांस उपद्रव क ेलागले, तेव्हां बादशाहास असें वाटलें कीं, सर्व डोंगरी किल्ले घ ेत्या वांचून रयतेस सुख होणार नाहीं. यानंतर सुलतान अल्ला उद्दीन बादशाह असतां, त्याचा वजीर मियां मनउल्ला याणें असा मनसोबा केला कीं, सारे सह्याद्रीचे किल्ले व कोंकणपट्टींत जे मु लूख आपल्या हातीं आले नाहींत ते घ्यावे. असा विचार झाल्या वर एक सैन्य नवें सिद्ध करून नलिख उल्टीजार यास नेमिलें. त्याउद्दकराचा तळ चाकणेजवळ पडला; आणि जुंनराजवळ कि ल्ला बांधून राहिले; आणि तेथून फौज कोंकणांत पाठवून कि ल्लीक दुसरेजे जिंकिले.

१२ मग जुंनराहून सैन्यसुद्धां कोंकणांत जाऊन शिरकेयांचे किल्ल्यास वेढा घालून तो किल्ला घेऊन नलिख उल्टीजागनें गजां नन लोकांत आपआपले धर्म सोडून मुसलमानांचे धर्मानें चालावें म्हणून बहुत आग्रह केला, तेव्हां शिरके जातीचे अम्मल मराठ यां नीं मोठ्या युक्तीनें त्यांची आज्ञा न मोडिली असें दाखवून उत्त र दिलें कीं, सिंह गडकर आमचे जात आहेत त्यांसजिंकूनघेतल्यावें, नतर आम्ही वर्तू जर आम्ही एकटेच तुमचे धर्मानें वागूं लागलों, तर ते आमचा मुलूख घेऊन आम्हास जाती निगढे टाकितील असें ते हणाले यानाढां तो मुसलमानाचा सरदार सैन्य घेऊन सिंहगड घ्यावयास चालिला, तेसमयीं शिरके यांणीं वाटेंतच रात्रीं छापा घा लून त्या सैन्याचा बहुत नाश केला. आणि पुनः आपला मुलूख घेऊ न पहिल्या प्रमाणें सुखी राहिले त्यानंतर सोळा वर्षे त्या शिरक्यांचा

मुलूखे यौवयाबविषयीं बादशाहाचे दरबारीं उथाग झाला नाहीं.

१३ पुढें ब्राह्मणीवंशाचें राज्य बुडत चाललें, तें सन पंध रावों चोविसांत अगदीं बुडालें. असें होण्याचें कारण असें झालें कीं, त्या बादशाहानें सर्व संस्थानें घेऊन आपले राज्य अमर्याद वाढविलें; त्या मुळें मामलतदार च प्रबळ होऊन त्याची आज्ञा मानीनांत, असें झालें असतां सन चौदावें अक्याहत्तरांत, कोणी एक मोठा ब्राह्मण ख्वाजे खान् गावान् प्रधान होता, तो हा सर्व प्रकार पाहून हें राज्य याप्रकारानेंच बुडेल अशी अटकळ करून तें न बुडावें म्हणून कांहीं बुद्धीचे कल्पनेनें उपायांची योजना करूं लागला. त्यांत पडिल्यानें असें केलें कीं, कितीएक मुलखांच्या तुकड्या नव्या अधिक करून त्या त्या जागीं एक एक ब्राह्मण भाषू-स नेमिला. त्या तुकड्यांचा प्रकार असा केला कीं, दहिला कलबुर्ग्याचा मामला एक होता, त्याचे भाग दोन केले; एक विजापूर आणि दुसरा औसनाबाद. दौलताबादेचे भाग दोन केले; एक दौलताबाद आणि दुसरा जुंनर भाग. तेलिंगण जुनें त्याचे दोन केले; एक राजमंडी आणि दुसरा वारंगूळ. वराड जुनें त्याचे दोन केले; एक गावेल आणि दुसरा माहूर. याशिवाय त्यांणें अणखी कि तीएक बंदोबस्ताचे उपयोगी कल्पना केल्या होत्या, त्या कांहीं दिवस चालल्या, आणि तोही मोग वाटला. यासाठीं बहुतांचे मनांत विषम वाटून त्यांणीं त्याजवर कांहीं एक निमित्त आणून बादशाहाचे आज्ञेनें त्याला मारिलें. त्या पुढें ब्राह्मणी वंशाची बाद शाही सहजच बुडाली.

१४ जे ख्वाजेजहान् गावानास मारविणारे त्यांत एक निजामउ-

नुस्क दाखिरी सणून होता, त्यांचें मूळ असें आहे कीं, तो पाऱ्या गांवचे कुळकरण्याचा पुत्र. ज्यावेळेस दुर्गादेवीनामें मोठा दुष्काळ पडला तेसमयीं तो आपल्या बापा बरोबर करनाटक प्रांतीं गेला होता, तेथें काळक्रमणा करीत असतां, आमेदशाहा वली ब्राह्मणी बादशाहाचें लश्कर आलें, त्या लश्करीं लोकांनीं त्याला धरून नेलें. नंतर बादशाहाचे आज्ञेनें त्यास सुसलमान करून बादशाहाचे चाकरीस ठेवूंन त्याचें नांव मलिक हुसेन ठेविलें. पुढें महंमदशाहाचे राज्यांत त्याला हजार स्वारांची सरदारी दिली. नंतर तो अधिकअधिक योग्यता पावूं लागला असतां, खाजेखान् गावानाचे आश्रयानें त्याला तेलिंगणाची मामलत व या मुलखाच्या ही कितीएक जागा मिळाल्या; आणि निजामउल्मुल्क असें नांव पावला. तो असा कृतघ्न होता कीं, शेवटीं त्याणें आपला संरक्षण करणारा जो खाजेखा नगावान त्यास मारिलें.

भागदुसरा.

१ पहिल्या भागांत असें लिहिलें आहे कीं, ब्राह्मणीवंशाचें राज्य सन पंधराशें सवांसपर्यंत बुडालें नव्हतें, परंतु त्यापूर्वीच्यांचें नांव ब्राह्मणीवंशा नव्हे असे पांच मुसलमान दक्षिणेंत सत्ता करूं लागले होते. त्यांत जो विजापुरी होता त्याच्या कुळांचें नाव इदिलशाही होतें; गोवळकोंडे आणि

हैदरावाद हीं दोन्हीं एकच ,त्याजागीं जो होता त्याचे दुसरे नाव कुतुभशाही होतें; तिसरा वराडांत होता त्याचे वंशास अंमादशाही म्हणत; चवथा अहंमदनगरीं असे तो निजामशाही कुळाचा होता, पांचवा अहंमदाबाद बेदरचा राहाणारा त्याची बरीदशाही कुळी; असे पांच झाले होते. परंतु अंमादशाही आणि बरीदशाही या दोन्ही कुळ्या थोडक्याच दिवसांनीं बुडाल्या; आणि इदलशाही १. कुतुभशाही २, निजामशाही ३, या तिन्ही राहिल्या. तेसमयीं मराठीलोकांस तेज आलें, त्या योगें ते स्वतंत्रपणा करूं लागले. दुसरें, पहिले भागांत लिहिलें कीं, सन चौदाशें सत्तेहत्तरांत खाजेखानानें राज्यांतल्या पर गण्याचे नवे नवे अधिक भाग करून त्या त्या जागीं एक एक उत्तम माणूस ठेविला. त्यांत जो दौलताबादेस ठेविला तो आदिलखान् सार्वानामें मुसलमान होता, जोंपर्यंत खाजेखान् होता तोंपर्यंत तो दौलताबादेस होता. नंतर बादशाहानें त्यास विजापुरीं ठेविलें, तेथें सहज कांहीं निमित्तें घडल्यांतीं सर्व दैवयोगें त्यास अनुकूळ झालीं. तेवढीं सन चौदाशें एकुण नवदांचे सालीं तो बादशाहाचें पदरपावून सर्वराज्याचा अनुभव घेऊं लागला; असें विजापूरचे बादशाहीचें मूळ झालें. त्या दिवसापासून इदिलशाही वंश दक्षिणेंत भोगविरव्या त झाला. अहंमदनगरचे बादशाहीचें मूळ असें झालें कीं, निजामउल्मुल्क बहिरी यानामें खाजेखान् गावान वजीराचा आश्रित होता, त्यानें त्या वजीरास मारवून सुलतानाचें मन प्रसन्न करून घेतलें आणि तो मेल्यानंतर त्याचें पुत्राची वजीरी तो आपण करूं लागला; आणि खाजेखानानें दिलेल्या अ

धिकारीं मलिख आमेद नानें आपला पुत्र स्थापिला,व आप-
वी किनीएक जागा आपल्या पुत्रास देवविल्या, त्यांत जुनर
आणि दौलताबाद येथील परगणे लावून दिले होते. नंतर
निजामउल्मुल्कानें जसा आपला पोषक जो खाजेखान गाजा
न् वजीर याचा घात केला, त्याप्रकारेंच दुसऱ्या कोणी दुष्टा
नें त्यास मारविलें. त्यावेळेस त्याचा पुत्र मलिख आमेद मोठें
बंड उत्पन्न करून आला. आणि बादशाहा आपणकडे लागला.
त्यासमयीं ब्राह्मणीवंशाचा बादशाह महामुदशाह ब्राह्मणी होता,
त्याणें तें बंड मोडावयाकरितां फार उद्योग केला. परंतु उपाय
चालेना, असा अहंमदनगरचा बादशाहा झाला आणि त्याचें
नाव निजाम पडलें व त्याला वहिरी* लग्नत होते. कुतुभ्शाही बादशा-
हीचें मूळ असें आहे कीं, सन चौदाशें पंचाण्णवांत तेलिंगण
ची मामलत कुतुभउल्मुलक नामें कोणी एक मुसलमान होता
त्याला सांगितली होती, ती त्याणें सोळा वर्षेपर्यंत केली; नंतर
तो सन पंधराशें बारांत गोवळकोंड्याचे बादशाहाचें तक्तपा
वला, आणि आपलें नाव कुतुबशाह असें चालविलें. असा
च वराडचा मामलेदार वराडची बादशाही पावला. त्याचें
नाव फतउला अमाद उल्मुल्क होतें, त्याचें राज्य पंधराशें बा
रांपासून पंधराशें चौऱ्याहत्तरांपर्यंत चाललें त्यानंतर अहंम
दनगरचे बादशाहानें तें राज्य घेतलें. बरी दशाही होती तो

---

* वहिरी नाव पडावयाचें कारण असें कीं, त्याचा बाप योग्यता पा
वल्याचे पूर्वी बहिरा पक्षी यांचें संरक्षण करावयाचे काम पत करून दि-
ल्लीच्या बादशाहाकडील चाकरीस राहिला होता म्हणून असें नांव पडलें.

अंमादशाहीचे गोदरच बुडाली. तिचे खालीं बेदर व कलबुर्गी यांचे जवळचा मुलूख होता, तो विजापूरचे बादशाहानें घेतला. याप्रमाणें दोन बुडाल्यावर एक विजापूरची, दुसरी अहंमदनगरची, तिसरी गोंवळकोंड्याची, या तीन राहिल्या. त्यांत विजापूरचे बादशाहीचा हद्द, दक्षिणेस निरानदीपासून तुंगभद्रानदी पर्यंत होता, आणि तुंगभद्रेचें दक्षिणतीरीं आंदोणी परगणा व नंदीहाळ शहर होतें, तेंही विजापूरचे बादशाहीखालीं होतें. पश्चिमेस कोंकणपट्टींत बाणकोटापासून रामस पर्यंत मुलूख, मध्यंमध्यें कांहीं कांहीं ठिकाणें सोडून विजापुराकडे होता. पूर्वेकडे रायचूर परगणा व इदगी परगणा व मलकरपरगणा व बेदरपरगणा हे चार परगणे विजापुराकडे होते. यारेवरीज पूर्वेकडचे दुसरे परगणे जे राहिले ते गोंवळ कोंड्याकडे होते. उत्तरेकडे आंकलकोट व नळदुर्ग व कालीयान व सोलापूर, इतके मुलूख विजापूरचे बादशाहीखालीं होते. अहंमदनगरचे बादशाहीखालीं, वऱ्हाड संबंधीं किती एक मुलूख व औरंगाबाद सुभा व जालने परगणा व खानदेशांतील किती एक परगणे व बाणकोटापासून वसईपर्यंत कोंकणपट्टी इतके मुलूख अहंमदनगरचे बादशाहीखालीं होते. गोंवळकोंड्याची बादशाही अशी कीं, जिचे पश्चिमेचे आंगीं विजापूरकर व अहंमदनगरकर यांची राज्यें होतीं. त्यांपासून पूर्वेस समुद्रापावेतो मुलूख गोंवळकोंड्याचे बादशाहीकडे होता; परंतु राजमंडी शहर व त्याखालचा मुलूख त्याचे स्वाधीन नव्हता, तेथें दुसरा राजा होता. या तिहीं राज्यांत मुलखांची नावें ठेवण्याची रीति अशी होती कीं, मोठें सरकार, त्यामध्यें परगणा, त्याचे आंत कर्यात, तिचे पोटीं संमत, तिचे मध्यें महाल,

त्याचे आंत तालूका ; याखेरीज हिंदी नावें दोन, प्रांत आणि देश अशीं होतीं. दुसरी राज्यांत अशी रीति होती कीं, लाहान मोठा मामला मखत्यानें सांगावा ; कदाचित् कोणी मखता न केला तर बडुत करून हिंदूलोकांस द्यावा. मखत्याचा पैका घेणें व मुलखांत चौकी पाहारा इत्यादि बंदोबस्त ठेवणें व मुलखाचे सीमेसं बंधा खटले असल्यास त्याचा चौकशी करणें, या इतक्यां कामांवर बादशाहाचे दरबारांतून एके एकेजागीं आमिलनामें एक एक कार भारी ठेवीत. त्या कारभाऱ्यानें वतनसंबंधी अथवा लोकांचें भाऊबंदकीचें वगैरे दुसरें कांहीं खटले असल्यास त्याचा पंचाईत करून पंचांचे विचारानुरूप करावें, जातीनें मनास आणूंनये. विजापूरचेरा ज्यांत एक मोठा आमिल होता त्याचें नाव मोकासादार ठेविलें असे, आणि दुसरे आमिल त्याचे आतेंत वागत असत. असे किती एकमो कासादार चौसवास वर्षे कानावर होते; त्यांत कोणी मेला असतां त्या कामावर त्याचे पुत्रास ठेवावें, अशी चाल होती : कांकीं, मोकासा दारांस त्या ट्रव्याचा कांहीं विभाग होता. कितीएकवेळां एका वर्षांत मो कासादार पहिला दूर करून दुसरा ठेविला असें झालें. आणखी मोका सादारी निरंतर मुसलमानांसच द्यावी असें नव्हतें, कधीं कधीं हिंदूस ही देत होते. त्या राज्यांत मोकासादारी पेक्षां मोठा अधिकार दुसरा व्रत करून नव्हता. कधीं कधीं मुभा मोठा असे, परंतु सुभ्यानें नेहेमीं त्याजांतीं नसावें बहुधा दरबारींच असावें. त्याणें मुलखाचे वसुलाचें काम न करावें, परंतु त्याचे मुलखाचे दप्तरावर त्याचा सही घ्यावी लाग त असे.

२ ब्राह्मणी वंशाचें राज्य बुडाल्यानंतर कांहीं दिवस नवी नवी राज्ये झालीं, परंतु मराठेलोकांचे वर्तमानांत अंतर पडलें नाहीं. त्यावे

ळेचे बखरीवरून असें वाटतें कीं, दक्षुधा डोंगरी किल्ले मराठे लोकांकडे बादशाहाकडून असत; कधीं कधीं बादशाहाकडे स च असत; कधीं कधीं देशमूख व देशपांडे यांकडे असत, त्यांत कि तीएक प्रांतांतील मोठे मोठे किल्ले बादशाहा आपणाजवळच रा खी. त्या लोकांत ज्याचे स्वाधीन बहुत स्वार असा जो मोठा सर दार त्याला मोठ्या योग्यतेचें नाव मनसब् असें देत होते. तो अ धिकार व तें नाव कधीं कधीं हिंदूस देत, अशी बादशाहाची क पा हिंदुलोकांवर होती. याशिवाय हिंदूनीं फौजेसहित आप-ल्या चाकरीस असावें ह्मणून कितीएक जहागिरी, इनामें, देत असत. त्यानिमित्त चाकरी करितां हिंदूलोकांस बहूत फौज ठेवावी लागत नव्हती. त्यासमयीं फलटणदेशाचा जहागीर दार विजापूरकराकडे होता, त्यापासून बादशाह पन्नास स्वा रांची चाकरी घेत असे; आणि मराठी पेशवे यांचे वेळेस त्या जहागीरदारापासून साडेतीनशें स्वारांची चाकरी घेऊं लागले.

३ पेशवे यांचे पूर्वी इदिलशाही बादशाहींत मराठेलो-कास बर्गी असें नाव मुसलमानांनीं ठेविलें होतें, तें आतां बहू नकरून प्रसिद्ध नाहीं. असें वाटतें कीं, जसें सांप्रत बारभाई नाव हलकें आहे, तसेंच त्यावेळेस बर्गी नाव किमतीस उणें असेल. प्रायः तें नाव करनाटक प्रांतींचे बंड करणारे स्वारांस होतें. त्यांत कोणी मोठे मोठे जहागीरदार होते, असें अस तां सन पंधराशें सत्याहत्तरांत त्या बर्ग्यांतील अधिकारीयांणीं करनाटकांत मोठें बंड उत्पन्न केलें. तेव्हां विजापूरचा इदिल-शाह बादशाह याणें तें बंड मोडावयाकरितां लष्कर पाठविलें तें एक वर्षपर्यंत लढलें; परंतु उपाय चालेना. तेव्हां बादशाहा

नें कोणीएक वासूपंत नानें ब्राह्मण सहाय केला, त्याचे हा तानें त्या वर्ग्यांतील बऱ्हतेक अधिकारी आपल्या हस्तगत करून कपटानें मारिले. यानंतर ते बर्गीलोक विजापूरचा इ दिल्हशाह याचेच आश्रयानें निजामशाह बादशाहाशीं लढूं लागले. विजापूरकर व अहंमदनगरकर यांचे लश्करांत बऱ्हुत करून मराठेलोक फार होते, कांकीं त्यांची राज्यें महाराष्ट्रदेशांत होतीं. गोंवळकोंडेकर यांचे लश्करांत मराठेलोक बऱ्हुत नव्हते. विजापूरकर व अहंमदनगरकर व गोंवळकोंडेकर या तिघांजवळ मराठेलोक होते, तेपरस्परें युद्धप्रसंग पडला असतां. आपल्या जातीचा लोभ न धरितां लढत असत. भाऊबंदकी संबंधीं द्वेष पडला किंवा बापलेकांत वितुष्ट पडलें असतां भाऊबंद व बापलेक यांणीं परस्परें निकरानें लढावें, अशी एक मराठीलोकांत चाल होती. ती त्यांचे पूर्वीच्या ब्राह्मणीवंशाचे राज्यापासून चालत आली, तिचा प्रतिबंध त्या वेळच्या बादशाहानें केला नाहीं. कांकीं, जे आपल्या जातीन भाडूं लागले ते दुसऱ्याशीं काय लढतात, असें समजून मोडिली नाहीं, तशीच रक्षिली.

विजापूरकर व अहंमदनगरकर यांचे राज्यांत मराठे सरदार कोण कोण होते त्यांचा तपशील मग येईल. आधीं विजापूर व अहंमदनगर व गोंवळकोंडा या तिहीं राज्यांतकिती बादशाह झाले तो विस्तार, त्यानंतर फिरंगीलोक कोंकणांत आले तें प्रकरण, त्यापुढें मराठे सरदार यांचें वर्तमान, लिहिलें जाईल. प्रथम विजापूर व अहंमदनगर व गोंवळकोंडा या तिहीं राज्यांत बादशाह किती झाले तो प्रकार.

विजापूर.	अहंमदनगर.	गोवळकोंडा.
विजापूरचा बादशाह पहिला सुलतान यूसफ आदिलशाह तो सन चौदाशें एकुणनव्वदांत तक्ताधिपति झाला आणि सन पंधराशें दाहांत मरण पावला.	अहंमदनगरचा बादशाह पहिला मलिक अहंमद, तो निजामउल्मुल्क बहिरी असें नाव पावून सन चौदाशें सत्तेहत्तरांत राज्य करूंलागला आणि सन पंधराशें आठ सुमार तेव्हां मृत्यु पावला.	गोवळकोंड्याचा बादशाह पहिला कुतुबउल्मुल्क नामें सन पंधराशें चाराव्वांत आला, तो पंधराशें एकावन्नांत कारभाऱ्यांनीं मारिला.
त्याचा पुत्र दुसरा सुलतान इस्मायलू आदिलशाह त्याचे जागीं बसविला, तो सन पंधराशें चौपन्नांत मरण पावला.	त्याचा पुत्र दुसरा सुलतान बुराहण निजाम झाला, तो पंधराशें चौपन्नांत मरण पावला.	त्याचा पुत्र दुसरा सुलतान जमूशीद, तो सात महिने राज्य करून तेला.
त्याचा पुत्र तिसरा सुलतान मलू आदिलशाह त्याचे ठिकाणीं स्थापिला, तो सन पंधराशें पंचावन्नांत पदच्युत झाला.	त्याचा पुत्र तिसरा सुलतान इब्राहीम निजाम शाह तक्तावर बसविला तो पंधराशें छपन्नांत मृत्यु पावला.	त्याचा भाऊ तिसरा सुलतान इब्राम कुतुबशाह बादशाह झाला, तो पंधराशें एक्याऐंशीं त मृत्यु पावला.
		त्याचा पुत्रचवथा सुलतान महंमद कुली कुतुबशाह झाला तो मेल्यानंतर त्याचा भाऊ सुलतान अब्दुला कुतुबशाह झाला.

त्याचा भाऊ चवथा सुलतान इब्राहीम आदिलशाह स्थापिला, तो सन पंधराशें सत्तावन्नांत मरण पावला.

त्याचा पुत्र पांचवा सुलतान आदिलशाह झाला, तो सन पंधराशें ऐशींत कारभाऱ्यांनीं कपटानें मारिला.

त्याचा पुत्र साहावा सुलतान इब्राहीम आदिलशाह, तो त्याचे स्थानीं बसविला, त्याचे मरणाचा प्रकार तिसऱ्या भागांत येईल.

त्याचा पुत्र चवथा सुलतान मोर्तिजा निजामशाह झाला, तो त्याचे पुत्रानें सन पंधरावें सत्याहत्तरांत मारिला, आणि आपण तक्ताधिपति झाला.

त्याचें नाव सुलतान हुसेन निजामशाह बादशाह. त्याणें दोन महिनें राज्य केलेनंतर कारभाऱ्यांनीं त्यास मारिलें.

त्याचा भाऊ साहवा सुलतान इस्मायल निजामशाह झाला तो तक्ताधिपति असतां त्याला त्याचे बापानें काढून दिलें आणि आपण तेंपद घेतलें.

त्याचें नाव सुलतान बुरहाण निजामशाह. तो सातवा झाला आ-

इतकी प्रकरणें सन इसवी सनाचे सुमारापासून सोळाशें पर्यंत झालीं. याखेरीज राहिलीं तीं पुढचे भागीं येतील.

| णि सन पंधराशें चौ |
| ण्याण्णवांत मरणपा |
| वला. |

४ सन इसवी शकाचे चौदाशें अठ्याण्णवांचे पांचवे महिन्यांत फिरंगी (पोर्टुगीस्) लोक यांच्या जातीचा एक वास्को दिगामानें नांव सरदार बरोबर फिरंगी लोक घेऊन जाहाजांत बसून आला, तो कारकोळ देशांत समुद्रतीरीं एक कलिकतनामें शहर आहे तेथें उतरला, आणि युद्ध न करितां त्या देशांत आपल्या लोकां सहवर्तमान सुखवर्तमान राहिला. त्याचा बेत सुखवन्तीसच राहावें असा नव्हता, याप्रमाणें पंधराशें सातांत चौल शहराजवळ मिस्री लोक यांचे लढाऊ गलबतांची व फिरंगी लोकांचे लढाऊ गलबतांची गांठ पडतांच दु भयानक मोठ्या निकरानें लढले. नंतर निजामउल्मुल्क बहिर्री याशीं पोर्टुगीस लोकांनीं सख्य केलें, आणि समुद्रांत बहुत खांत उपद्रव करूं लागले; ते सन पंधराशें आठांत दाभोळचे खाडींतून येऊन दाभोळ लुटून गेले. तेसमयीं त्यांचे हातीं कांहींच मुलूख लागला नव्हता. नंतर तुळव्याचा तिमोजानामें एक समुद्रांतला लुटारू होता, तो पोर्टुगीस लोकांचा जो आल्बरकर्कनामें सरदार होता, त्यास मिळाला. मग त्याणें त्याचे मसलतीनें सन पंधराशें दाहांचे दुसरे महिन्याचे सत्राविसावे तारखेस छापा घालून गोवें घेतलें. तें त्यावेळेस विजापूरचे राज्यारवाल्यीं होतें, म्हणून विजापूरचा बादशाह यूसफ आदिलशाह फौजे सहित आला, आणि त्याणें लढून गोवें परत घेतलें. त्यानंतर तीन वर्षांचे दाहाचे महिन्याचे पंचवि

सावे तारखेस पुनः पोर्टुगीसलोकांनीं गोवें घेतलें, तें आजपर्यंत त्यांज कडेसच आहे. त्या पुढें सन पंधराशें बत्तिसांत ते लोक जाहाजांतून आले, ते चिंचणी नारापुरीं येऊन उतरले, आणि त्यांणां तेथपासून वसईपर्यंत मुलूख लुटला. तेवेळेस वसईचा किल्ला नवाच बांधलेला होता तो पाडिला; आणि ठाणें व मुंबई ह्या र यांची खंडणी घेतली. त्या पुढें दोनवर्षांनीं दमान घेतलें त्या समयीं गुजराथेंत सुलतान बाहादूर नामें बादशाह होता, तो दिल्लीचे बादशाहाशीं लढून केवळ वळहीन झालेला असा पाहून फिरंगीलोक त्याला ह्मणूं लागले कीं, आह्मांस वसई परगणा द्यावा, आणि काठेवाडांत दिऊ येथें किल्ला बांधावयास जागा द्यावी, आणि अरबस्यानचे जाहाजांचे जकातींत आह्मांस कांहीं विभाग असावा, ह्मणजे आह्मी दिल्लीचे बादशाहाशीं लढाईस रावयास तुमचे कुमकेला येऊं; या प्रमाणें त्याचें बोलणें मान्य करावयास सुलतानास मोठ्या अडचणी मुळें अगत्य पडलें. नंतर ते पोर्टुगीसलोक कितीएक वर्षे लोकांस उपद्रव न करितां आपल्या मुलखाचा बंदोबस्त करून राहिले होते. पुढें सन पंधराशें अठ्ठेचाळीसांत त्यांणीं समुद्रतीरचा मुलूख वाणकोटापासून गोमांतकापर्यंत लुटला, आणि जाळिला. तो मुलूख तेसमयीं विजापूरचे राज्यांत होता. त्या पुढें सन पंधराशें एकाहत्तरपर्यंत त्या लोकांचें वर्तमान विशेष लिहावें असें आलें नाहीं.

५ त्यावर्षी विजापूरचा बादशाह व अहंमदनगरचा बादशाह हे दोघे मिळून फिरंगी लोकांशीं लढाई करावयास गेले, ते गोवें आणि चौल शहर यादीं होमवेढा घालून लढूं लागले, परंतु पोर्टुगीस लोकांपुढें त्यांचें बळ चाललें नाहीं, तेआपणच पराभव पावले. आपल्या जातिस्वभाव

प्रमाणें उगेच बोलूं लागले कीं, यांचें युद्ध शौर्य युक्त नाहीं, हे कपटानें लढतात, असें भाषण करीत करीत पळून गेले.

६ आतां मराठे सरदार यांचें वर्तमान. विजापूरचे बादशाहाचे चाकरीस मुख्यत्वें मराठे सरदार होते. एक चंद्रराव मोरे, दुसरे राव नाईक निंबाळकर, ज्यांस फलटणराव ही म्हणत होते, तिसरे जुंझार राव घाटगे, चौथे राव माने, पांचवे घोरपडे, साहावे डफळे, सातवे सावंत बहादर, वाडीचे देशमुख, वगैरे विजापूरकरांकडे होते. अहंमदनगरकरांजवळ जे होते त्यांत एक राव जाधव दुसरे राव भोंसले. यांखेरीज आणखी दुसरे बहुत न्यून पदांचे होते. विजापूरवाल्यांचे चंद्रराव मोरे यांचें मूळ असें आहे कीं, पूर्वी करनाटकांत एक मोरे आडनावाचा नाईक होता, त्याला यूसफ आदिलशाह विजापूरचा बादशाह याणें हिंदवी पायदळ फौज वारा हजार देऊन निरा आणि वारणा या दोहोंमध्यांचे मधला मुलूख, जो घ्यावयास कठीण फारच डोंगराचा असा होता, तो घ्यावयाचें काम सांगितलें. ते समयीं त्या मुलखांत शिरके यांचे मूळ पुरुष होते, आणि त्यांचे सहाय गुजर, मामूलकर, माहिते, महाडीक, वगैरे होते, असें असतां मोरे यांणीं तेथें जाऊन ते शिरके व त्यांचे सहाय जिंकून तो मुलूख घेतला. एवढें काम केलें म्हणून बादशाह याणें त्याचे नावाला चंद्रराव असें पद जोडून तो जावळीचा राजा केला. ते मोरे त्या पुरुषापासून पुढें सात पुरुष पर्यंत तेथेंच होते. त्यांणीं तें राज्य उत्तम नीतीनें केलें म्हणून बहूत लोक येऊन तो मुलूख वसतीस योग्य नसतां तेथेंच राहिले. त्या बादशाहानें ठेविलेलें चंद्रराव असें नाव मोरे यांचे सातां पिढ्यांस चालिलें. ते

बादशाहाचे जाईत वागत म्हणून बादशाह त्यांचे मुलखाचा वसूल आपलें स्वामित्व मान्य राखावयास फार थोडा घेत असे. ज्यांस फलटण राव नाईक म्हणत तेच निंबाळकर, त्यांचे कुळीचें पूर्वीचें नांव पवार असें होतें. त्यांचा मूळपुरुष निंबाळी कगांवीं राहात होता, त्या गांवास आतां निंबळक म्हणतात हें कूळ मराठे लोकांत पुरातन आहे. याचे पहिल्या पुरुषांस फलटण देशाचे देशमुखीचा विभाग होता. सन सोळाशें चाळिसांचे सुमारें विजापूरचे बादशाहानें त्यांस सरदेशमुखी दिली. त्यांणीं आपलें नांव बदलून दुसरें केलें नाहीं, जें पहिलें नाईकअसें होतें तेंच चालविलें. सन सोळाशें सुमारें त्या कुळाचा एक पुरुष वेणोजी नाईक होता, त्याला लोक जगपाळ म्हणत, तो मोठी पुंडाई करीत असे. त्याची बहीण ती शिवाजी राजाची माय आजी. नलावरीचे देशमुख जुंझारराव, ते घाटगे यांचे कुळांत श्रेष्ठ होते; त्यांचें राहाणें खटावदेशीं असे. त्यांचे देशाची मर्यादा व निंबाळकर यांचे देशाची मर्यादा या दोहोंमध्यें महादेवाचा डोंगर. ते घाटगे मानपरगण्याचे देशमुख होते. त्यांचे मूळ पुरुषास ब्राह्मणीवंशाचे बादशाहानें मनसब दिली होती. ती नारीराव कोणती व बादशाह कोणें नावाचा होता नें कळत नाहीं. विजापूरचा बादशाह इब्राहीम आदिलशाह याणें

---

* मनसब म्हणजे, मोंगलाईत स्वारांचे सरदारासारिखा अधिकार होता, तो कधीं कधीं दहा हजार स्वारांचा असे. ते लोक त्याचे खर्चास माणें त्यालजागा हागीर देत असत.

घाटगे यांस सरदेशमुखी व झुंजारराव असें नाव सनसोळा शें मविसांत दिलें. पूर्वीपासून घाटगे यांचे कुळाचा स्वभाव आपल्या आपल्यांत भांडावें असा लोकांत प्रसिद्ध आहे. मोरयांचे मूळपुरुष ह्मसवडचे देशमूख होते, त्यांची जागा व घाटगे यांची जागा दोन्ही शेजारीं होत्या; ते विजापूरकरांजवळ शिलेदारी करून विख्यात झाले. घोरपडे यांचें मूळचें उपनाव भोंसले होतें, त्यांचा एक पुरुष कोंकणचा मोठा कठीण किल्ला घ्याव या करितां घोरपडीचे कमरेस व आपल्या कमरेस एक दोरी बांधून घोरपड किल्लावर चढवून त्या दोरीवरून आपण किल्लावरी गेला आणि तो किल्ला घेतला, ह्मणून त्यांचें नाव घोरपडे पडलें असें ऊने वखरे वरून वाटतें. विजापूरचे बादशाहींत त्यांचा देशमुखी होती. त्याचे कुळास दुसरीं नावें त्या नावांनच दोन होतीं, एक कापशे* आणि एक मुधोळ. कापशे वारणातीरीं होते, आणि मुधोळ घटप्रभेचे कांठीं असत. डफळे विजापुराजवळ इंटपरगणा आहे तेथचे देशमूख, यांचें पूर्वीचें उपनाव चव्हाण, हे डफळापुरीं पाटिलकी करीत ह्मणून यांचें नाव डफळे असें पडलें. विजापूर सरकारांतून त्यांस मनसब् अधिकार् मिळाला होता, तसं

---

* सरदेशमुखास विजापूरचे बादशाहींत वसुलाचा विभाग किती होता ते कळत नाहीं, परंतु शिवाजी औरंगजेब बादशाह यांचे वेळेस किती एका सरदेशमुखांना शेंकडा दोन रुपये प्रमाणें विभाग होता.

+ शिलेदार ह्मणजे जो आपल्या सत्तेच्या घोड्यावर बसून धण्याची चाकरी करितो तो, आणि जो धण्याचे घोड्यावर बसून चाकरी करितो तो बारगीर.

---

‡ कापशेयांस विजापूरचे सरकारांत नवकस हजार आणि मुधोळांस सातकस ठरून

तु दुसरें कांहीं वेगळें नाव मिळालें नाहीं. सावंत पहिले पासून वाडी चे देशमूख, त्यांणीं पोर्तुगीस लोकांशीं फार चांगली लढाई केली म्हणून बादशाहानें त्यांचे नावास बहादर् असें पद जोडिलें, त्या पासून सावंत बाहादर असें त्यांस लोक म्हणूं लागले. त्यांचें मूळचें उपनाव भोंसले. त्यांजवळ नुसती पायदळ फौज होती, आणि त्या मुलखीं दुसऱ्या फौजेचा उपयोग ही नव्हता. त्या वाडी-प्रांतास कुडाळ देश म्हणत.

७ अहंमदनगरचे राज्यांत एक मराठा सरदार. मुख्य होता त्याचें नाव जाधवराव, तो शिंदखेरचा देशमूख, त्याचा मूळपुरुष देवगडचा राजा असेल. असें वाटतें कीं, सर्व मराठ्यांचें कुळांत जाधवराव प्रमाणें दुसरा प्रतापी नव्हता. सन सत्राशांच्या सुमारें निजामशाह बादशाहाचे सरकारांतून त्याला दाहा हजार स्वारांची सरदारी सांगून त्याचे बंदोबस्तास जहागीर दिली होती. दुसरे मुख्य सरदार भोंसले ते मोठे कुलीन होते असें वाटतें कीं, त्यांची पाटिळकी बऱ्हुतां जागीं होती, परंतु त्यांचे राहावयाचें ठिकाण दवलताबादे जवळ वेरूळ म्हणून गांव आहे तें. पहिले बाबजी भोंसले यांस पुत्र दोघे, त्यांत वडील विठोजी आणि धाकटा मालोजी. त्याला जगपाळराव नाईक निंबाळकर फलटणचा देशमूख याची बहीण दिपाबाई दिली होती. तो मालोजी भोंसला पंचवीस वर्षांचा झाल्यावर आपल्या बरोबर किती एक स्वार घेऊन लुखजी जाधवाचे आश्रयानें मोर्तिजा निजामशाह बादशाह याचे चाकरीस राहिला. हेंवर्तमान सन पंधरशें सत्याहत्तरांत आलें. त्या मालोजीस पुत्र नव्हता म्हणून त्याणें मोठी देवसेवा केली, परंतु पुत्र झाला नाहीं. मग अहंमदनगरीं एक मुसलमान जानीमा

शाह सरीफ नामें मोठा अवलिया होता, त्याणें आपल्या देवा जवळ विनंती करून मालोजीन सांगितलें कीं, तुला पुत्र होईल.नंतर कांहीं दिवसांनीं त्याची स्त्री दिपाबाई गरोदर होऊन प्रसूत झाली, तों पुत्र झाला. मालोजीनें तो सिद्धाचे प्रसादेंकरून झाला असें जाणून त्या मुलाचें नाव शाहाजी ठेविलें. त्या वर दुसरे वर्षी दुसरा पुत्र झाला, त्याचें नाव सरीफजी ठेविलें. त्या शाहाजी भोंसल्याचें जन्म पंधराशें चौऱ्याण्णवांत साले. मालोजी भोंसले उत्तम प्रकारें सरकार चाकरी करून अधिकयोग्यता पावूं लागले, आणि ज्या जाधवाचे आश्रयानें चाकरी मिळविली तो लुखजी जाधवराव ही त्यावर बहूत कृपा करूं लागला. मालोजीचा पुत्र शाहाजी रूपानें फार चांगला होता. सन पंधराशें नव्याण्णवांत शिमग्यामध्यें मालोजीनें आपल्या पुत्रास लुखजी जाधवरावाकडे भेटायास नेलें. तेव्हां जाधवराव त्या मुलाचें रूप पाहून बहुत खुष होऊन त्यास जवळ बोलावून जिजाबाई त्याची कन्या मांडीवर होती तिला बोलिला कीं, हा तुला नवरा पाहिजे काय? आणि मंडळीस म्हणूं लागला कीं, हा जोडा कसा दिसतो? इतक्यांत तीं दोन्हीं मुलें एकमेकांवर गुलाल उधळून खेळूं लागलीं, तें पाहून सर्व मंडळीस चमत्कार वाटला, आणि हांसूं लागले. तेवेळस मालोजी भोंसले उभे राहून बोलिले कीं, ऐकाहो सर्व मंडळी! आजपासून जाधवराव आमचे व्याही झाले, यास तुम्ही साक्षी आहांत. तेव्हां त्या मंडळींत कोणी कोणी म्हणाले कीं, हें ठीक आहे. तें ऐकून जाधवराव खिन्न होऊन उगाच राहिला; कांहीं बोलिला नाहीं. त्यानंतर दुसरे दिवशीं जाधवानें त्या मालोजीस भोजनास बोलाविलें, तेव्हां तो म्हणाला कीं, तुम्ही व्याही व्हाल तर मी येईन,

नाहीं तर येणार नाहीं. हें ऐकून त्याणें कांहींच मान्य केलें नाहीं.आ णि त्यांच त्यास हें कळतांच राग येऊन तोही बोलिली कीं, असें भाषण विनादानहीन व्हावें, माझे कन्येचे आणि त्यांचे योग्यतेस अं तर किती आहे? त्यानंतर मालोजी आपल्या राहायाच्या ठिकाणीं निघून गेला. परंतु त्याणें तो अर्थ मनांत धरून त्याचे साधना करि तां कांहीं लढाड्या करून द्रव्य मिळविलें, तें चांभार गोंधाचा सावका र शेषाप्पा नाईक याजवळ ठेविलें, आणि लोकांत अशी प्रसिद्धि के ली कीं, भवानी आम्हाला प्रसन्न होऊन द्रव्य देऊन बोलली कीं, तुम चे कुळांत एक राजा होईल, तो संबासारिखा गुणवान् होईल,आ णि ब्राह्मणांचें पोषण फार चांगलें करील. अणखी त्यापुरुषापासू न पुढें सत्तावीस पुरुषपर्यंत त्यांचें राज्य निर्बाध चालेल. इतकें केल्या वर अणखी मोठी कीर्ति व्हावी म्हणून किल्लीएक जागीं देवालयें व त वळां बांधिलीं. आणि बहूत घोडे विकत घेतले. तेसमयीं त्या राज्याचें सामर्थ्य कमी होऊं लागलें होतें. तें समजून त्याणें त्या दरबारीलोकां स द्रव्य देऊन तेवशा केले होते, त्या योगें करून त्याला बादशाहापासू न पांच हजार स्वारांची सरदारी आणि मालोजीराजे असें नाव मिळा लें. या खेरीज शिवनेर व चाकण या दोहों किल्ल्यांची व त्यांचे खालचे मुलखाची मामलत प्राप्त झाली, आणि पुणे परगणा व सुपे परगणा त्यास जाहागीर मिळाला. एवढ्या योग्यतेस आल्यावर बादशाह या- चे आज्ञेनें त्याशीं संबंध करावयास जाधवराव सिद्ध झाले. मग जाधव रायाची कन्या जिजाबाई व मालोजीचा पुत्र शाहाजी या दोघांचें ल ग्न मोठ्या समारंभानें झालें.

८ सन पंधराशें नवदांत दिल्लीचा मोठा यशस्वी अकबर बा दशाह यानें मनांत आणिलें कीं, दक्षिणेचे अवघे बादशाह जिंकावे.

ते वेळीं ते सर्व परस्परें लढत असत, आणि आपआपसांत ऐक्य नस्यें होतां ह्मणून आकबरास बहुतेक दक्षिणेचें राज्य मिळालें. यारेखरीज खानदेश व निजामाचा मुलूख, त्यांत अहंमदनगरचा किल्ला आणि कांहीं वगडदेश हे त्याचे हस्तगत झाले. तो बाबर ह पंधरावर्षांत इतकें करून सोळाशें पांचांत मृत्यु पावला. अ हंमदनगरचा किल्ला ज्यावेळेस आकबराचे लोक मोंगलयांनी घेतला, तेसमयीं तेथचा बादशाह निजामशाह बहादर तो केव ळ बाळ होता, त्याला त्या मोंगलांनीं बंदीत ठेविलें. त्याचे पूर्व हंमदनगरचे राज्यांत दोन फळ्या झाल्या होत्या. एकाचे नुक र हिंदू होते, आणि एकाचे हपुशी, ज्यांत कितीएक अंडुस्ता न होते. त्यांत हिंदूनीं आपल्या कुमकेस आकबराच्या मोंगलांच बोलाविलें. ते त्यांची कुमक न करितां मुलूख मात्र घेते झाले, हे हिंदूचेमोठाले मानकरी यांस पश्चात्ताप झाला. मुसलमानां चा मुलूख मोंगलांनीं घेतला आणि बादशाह बंदीत ठेविला. ते आपल्या राज्याविषयीं निराश झाले नाहींत. ते आपल्या क मर्थ्यें करून श्रेष्ठत्व पावले.

९ त्यांत एक मोठा कल्पक फार शाहाणा मलिकंबर नांवें होता, तो त्या लोकांसह वर्तमान बादशाह याणें घेतलेल्या मुलख खेरीज उरलेल्या मुलखाचा बंदोबस्त राखून राहिला, आणि नवा च एक बादशाह करून त्याचें नाव दुसरा मोर्तिजा निजामशाह असें ठेविले, आणि दौलताबादेचे किल्ल्यावर बहिरी सरकारचा झेंडा लावि ला. त्यानंतर तो मलिकंबर लष्कर घेऊन अहिल्लेस भाऊ. त्यावेळेस दिल्ली चा बादशाधिपति जाहांगीर नांवें नवा झाला होता, त्याचे पुत्रानें बं डउत्पन्न केलें, त्यामुळें त्या मोंगल लोकांस मलिकंबराला उपद्रव क

रावयास अवकाश सांपडला नाहीं. इतक्यांत मलिकंबरानें आपल्या मुलखाचा बंदोबस्त चांगला केला आणि आपली प्रजा व रोजाऱ्ये संस्थानीलोक वश करून घेतले; आणि दौलताबादजवळ एक खिडकी* नामें शहर वसविलें, त्यांत मोठे मोठे माहाल बांधून नामोठी गजधानी केली. मग त्याणें कितीएक वेळां मोंगललोकांचा पराभव केला, आणि थोडकेंच दिवसांनीं अहंमदनगरचा किल्ला व कितीएक वराडचा मुलूख मोंगलांपासून घेतला. परंतु मोंगलांनीं तो मलिकंबराकडे फार दिवस टिकूं दिला नाहीं, पुनः माघारा घेतला. त्यामुलखांत पहिली रीति अशी होती कीं, जो मरत्यानें काम पतकरील त्याला मामलत सांगावी. ती रीति मलिकंबरानें मोडिली, आणि वसूलाचे कामावर मुखत्यार मुसलमान ठेवून ब्राह्मणाचे हातून काम करवीत असे. निरंतर त्याचाच जयहोत असे असें नाहीं. कितीएकवेळांमोंगललोकांनीं त्याचा पराभव केला. सन सोळाशें एकवीसांत कितीएक मराठे सरदार त्याची चाकरी सोडून मोंगलांस मिळाले, त्यांत शिंदेकरचा देशमूख लुखजी-जाधव होता, त्याचा मोंगलांनीं मोठा संमान करून त्याला मोठी मनसब दिली. त्यावरून असें वाटतें कीं, त्यावेळेस मराठे योग्यतेस येऊं लागले होते.

१० पुढें सन सोळाशें सव्वीसांत मलिकंबर मरण पावला. त्यानंतर इब्राहीम आदिलशाह विजापूरचा बादशाह तोही एकावर्षीनें मेला. त्याणें आणि मलिकंबरानें प्रजेस सुख दिलें म्हणून अद्यापि लोक त्याचे गुण आठवतात. आतां विजापूरीं मोठीं मोठीं घरें व

---

* खिडकी शहराचें नाव औरंगाबाद पडलें त्याचे कारण पुढें येईल.

देवाल्येंं मांडलेली आहेत,त्यांत इब्राहिमाची कबर केवळ नवीं वीं
घत्र्याप्रमाणें दिसते, आणि फार सुंदर आहे. इब्राहीम आदिलशाह
याचा पुत्र महंमद आदिलशाह तो बापाचे पाठीमागें तक्ताधिपति
झाला, तेव्हां त्याचें वय पंधरा वर्षांचें होतें. त्याचे जवळ शिवंदी पु
ष्कळ होती आणि त्याचे जामदारखान्यांत द्रव्य बहुत असे. आ
णखी त्याचे राज्यांत प्रजा सुखी होत्या. मलिकंबराचे पुत्र दोघे, एक
फत्तेखान दुसरा चंगेजखान.त्यांत फत्तेखान याणें आपल्या बापाचा
अधिकार जो मोर्तिजा निजामशाहापाशीं होता तो संभाळिला,आणि
मोंगलांशीं युद्धें केलीं,परंतु त्याची योग्यता मलिकंबराप्रमाणें नव्हती.
त्यामुळें तो अगदीं बुडाला असता,परंतु खानजाहानूलोदीनामें एक
मोंगलाचा मोठा सरदार मुख्य होता त्यास त्याची दया आली, म्हणून
त्याणें त्याशीं सलूख केला. पुढें मोर्तिजा निजामशाह मोठा झाल्यावर्
एकवर्षपर्यंत त्याणें फत्तेखानाचे अन्याय ध्यानांत आणून त्याला सं-
न सोळाशें एकुणनिसांत बंदींत घेविलें. त्यानंतर लुखजी जाधवराव
आपला पहिला धणी मोर्तिजा निजामशाह याजकडे यावयाविष
यीं इच्छा करूं लागला. तेव्हां त्याणें तो मोंगलास मिळाला म्हणून
त्याचें बोलणें मान्य केल्याप्रमाणें बाह्यात्कारें दाखवून मग कोणएके
दिवशीं कांहीं कामासाठीं म्हणून त्याला त्याचे सोयरे धायरे सुद्धां दो
लताबादेंत बोलावून आणून एकाएकीं दगा करून मारिलें. त्यानंत
र त्याची स्त्री भर्त्याची फौज घेऊन शिंदखेरीस गेली, आणि तिचे बं-
हिणीचा नवरा जगदेवराव जाधव याचे आश्रयानें मोंगलांचे लष्क
रांत जाऊन मिळाली. मग तिचे विनंतीवरून मोंगलांनीं जगदेव-
राव जाधव यास लुखजी जाधवाचा अधिकार व पांच हजार स्वा-
रांची मनसब दिली. तेव्हांपासून शिंदखेरच्या जाधवांचें कूळ मोंग-

लांचा अभिमान धरूंलागलें

११ दिल्लीचा बादशाह जहानगीर सन सोळाशें सत्तावन्नां न मेला. नंतर एके वर्षानें त्याचा पुत्र शाहाजहान् हा तक्ताधिपति केला. तेसमयीं महाराष्ट्र मुलूख जितका मोंगलांनीं घेतलेला होता त्याचा अधिकारी खानजहान लोदी नामें होता. त्याशीं शाहाजहान बादशाह द्वेष करीत असे. त्याणें त्यास धरावयास फौज पाठविली ते ह्मां तो पळून गेला,तो निजामशाह याचे लश्करांत जाऊन त्याचा आश्र य करून राहिला,ह्मणून शाहाजहान् बादशाह दक्षिणेंत फौज घे ऊन चालिला.तेह्मां खान् जहान् लोदी निजाम शाहास सोडून दक्षिण देशांतच अणखी पळाला. तेवेळेस त्याचा सहाय शाहाजी भोंसला होता, तो शाहाजहानाचें मोठें सामर्थ्य पाहून खानजहान लोदी या ला सोडून त्यास मिळाला. तेह्मां तो शाहाजी व त्याचे बरोबर जे दुसरे सरदार होते ते बादशाहापासून मनसब व मोठा संमान पावले.

१२ अमेंवर्तमान सन इसवी १६२९ सोळाशें एकुणत्रिसांत झाले. त्यावर्षी आणि त्याचे पुढचे वर्षी दक्षिण देशीं पर्जन्यप डला नाहीं ह्मणून मोठा दुष्काळ आणि महामारीचा रोग एकदांच प डे तेह्मां खानजहान लोदी सर्वप्रकारें निरुपाय होऊन दक्षिणेंतून निघून काबुलप्रांतीं जाऊन आफगाणलोकांस मिळावें ह्मणून निघा ला तेंव्हा वाटेनें शाहाजहान बादशाहाचे सरदार लोक भेटले, त्यांशीं त्याशीं युद्ध होऊन तो खानजहान लोदी मरण पावला. त्यानंत रला सरदारांनीं अहंमदनगरचा बादशाह निजामशाह याचे किल्ले दार सरदार व मनसबदार यांचे अधिकार व मुलूख घेऊन आपल्या ह्मणास दिले तेह्मां तो बादशाह आपलें संस्थान जाईल ह्मणून भ्याला, [illegible] वेढ्यांत पडलेला किल्ला त्यास सोडून पहिले प्रमाणें त्याला वर्जा

रीचें काम सांगितलें. अशी त्या बादशाहाची जनानि पाहून एक त्याचे लष्करचा तकरीबखान नांवे सरदार होता तो त्याची चाकरी सोडून मोंगललोकांकडे जाऊन मिळाला

१३ तेसमयीं विजापूरकर व अहंमदनगरकर हेआपापल्यामध्यें एकमत होऊन मोंगलांचा पराभव करावा.अशी इच्छा करूं लागले; आणि तो विचार शेवटास न्यावा करितांव्यांस असें दिसूं लागलें कीं,जो पूर्वी विजापूरकरांनी मोंगललोकांचा नक्ष ठरलेला होता तो कामास येईल.तो नक्ष असा कीं,विजापूरकरचमोंगललोकयादोघांनीं मिळून अहंमदनगरचें राज्य बुडवून तो मुलूख उभयतांनीं वांटून घ्यावा, त्यांत धारवाड किल्ला व अणीक कांहीं मुलूख व सोलापूर किल्ला विजापूरकरांचे वांट्यांत यावा.

१४ नंतर विजापूरकरांनीं आपले लष्कर रणदुल्लाखान सरदार बरोबर देऊन मोंगलांकडे पाठविलें,तो सरदार त्यांस बोलिला कीं, आह्मी पूर्वसंकेताप्रमाणें आलों,तुह्मी धारवाड किल्ला आमचेस्वाधीन करा, तेसमयीं ते मोंगललोकांचे सरदार त्यास किल्ला एकाएकीं देईनात,इतक्यांत अहंमदनगरकरांनीं विजापूरकरांस सोलापूर किल्ला द्यावयास कबूल केलें, त्या योगेंकरून त्या उभयतांचीं मसलत पक्की झाली असतां कांहीं दैवगतीनें मोंगललोकांचें लष्कर व विजापूरकरांचें लष्कर या दोहोंत कांहीं कलह उत्पन्न होऊन मोठें युद्ध झालें. त्यांत विजापूरकर पराभव पावले,तेव्हां तीमसलत सहजच व्यर्थ झाली; आणि तो दुष्ट फत्तेखान यानें आपल्याधन्यास कैद करून त्याचे गळ्यास दोराचा फांस घालून मारिलें,आणि मानकरी सरदार जे त्याचे इष्ट होते तेहीं मारिले.

१५ असें त्या फत्तेखानानें दुष्कर्म केल्यानंतर मोंगलांचा बादशाह शाहाजहान याजकडे आपल्या कर्माची क्षमा होण्या विषयीं विनंतीपत्र पाठविलें कीं, मी हें कर्म तुमच्या कार्याकरितां केलें आणि त्याचे स्थानीं त्याचा पुत्र तुमचें उत्तर येईतोंपर्यंत बसविला आहे. तेव्हां शाहाजहानानें अहंमदनगरचा मुलूख फारकरून घेतला होता, परंतु कितीएक अवघड किल्ले त्या फत्तेखानाकडेस च राहिले होते, म्हणून बादशाहानें त्याचें पत्र मान्य केलें सें दाखविलें, आणि उत्तर दिलें कीं, जर त्याचे जामदार खान्यांतले चांगले चांगले अलंकार व त्याचे उत्तम हत्ती अस्तोल ते आम्हाकडे पाठवाल, तर तुम्ही केलेलें आम्ही मानूं. त्या उत्तराबरोबर कितीएक जहागिरांची सनद व मोठे संमानाचे मृचक कांहीं अलंकारादिक पाठविले. त्यास देणें दिलें त्यांत पूर्वी शाहाजी भोंसल्यास दिलेला कांहीं मुलूख होता. तेसमयीं फत्तेखान निरुपाय होऊन बादशाहानें लिहिल्याप्रमाणें पाठवून देता झाला. नंतर अहंमदनगरचा बादशाह लहान म्हणूनतेरा ज्य फत्तेखानाकडेस राहिलें. हा प्रकार पाहून शाहाजी भोंसला अत्यंत खिन्न झाला, आणि महंमद आदिलशाह विजापूरचा चा दशाहं याचा आश्रय धरून चाकरीस राहिला. त्यावेळेस विजापूरचा मुख्य कारभारी मोठा मुत्सद्दी मुरारपंत नामें ब्राह्मण होता, त्यानें शाहाजीचे मसलतीनें फौज तयार करून, दौलताबादच्या बचाव पाठविली. त्यावेळेस फत्तेखान दौलताबादेंत होता, त्याणें आपलें संरक्षण करावयाकरितां मोंगलांनीं यावें म्हणून त्यांस दौलताबाद किल्ला द्यावयास केला. त्यायोगानें, मोंगलांकडे दौलताबादेस येऊन पोंचले नाहींत तोंच, विजापूरचें लष्कर दौलताबादेस येऊन पोंचलें. त्यामुळें मोंगलांचा पक्ष दुर्बल झाला.

ताबादेस आलें. तेव्हां शाहाजीचें व दौलताबादच्या लोकांचें मोठें युद्ध झालें, त्यांत शाहाजीचा पराभव होऊन मागें आठकोस हटला.

१६ नंतर हें काम पराक्रमानें होणार नाहीं असें समजून तह करणें इत्यादि युक्ति चालवावयास फत्तेखानाला निरोप पाठविला कीं, तुम्ही त्यास किल्ला दिला असतां उभयपक्षीं हित नाहीं ह्मणून मसलत कीं, दोघांनीं मिळून त्याला त्याचें पूर्वस्थान दाखवावें; आणि तुमचा व आमचा पहिला संकेत असाच होता; तें ऐकून त्यानें मान्य केलें. नंतर ते मोंगल लोक आल्यावर त्यांवर हे दोघे मिळून तोफा सोडूं लागले, तेव्हां मोंगलांचा सरदार मोठ्या बत्तखान तो क्रोधयुक्त होऊन निश्चय करिता झाला कीं, फत्तेखानाचें पारिपत्य अवश्य केलें पाहिजे. मग मोंगल मरूं लागले तेसमयीं ते किल्लेकरी मोठा पराक्रम करून अठ्ठावन दिवस पर्यंत न टिकले; नंतर त्यांची बेगमी सरली यास्तव त्यांणीं किल्ला मोंगलांस दिला. तेव्हां मोंगलांनीं फत्तेखानाला त्या अधिकारावरून काढिलें, आणि त्याचे हातचा स्यादिल्ला मुलूख ग्वालेर किल्ल्यावर वर्दीत ठेविला. पुढें फत्तेखान चेडलागून मेला.

१७ यानंतर शाहाजीचे मनांत आलें कीं, अहंमदनगरचे बादशाहाचा कारभार आपण करावा. ह्मणून निजामशाहायाचे स्थानीं दुसरा तक्ताधिपति केला; आणि कितीएक ब्राह्मण जवळ बाळगून राज्य करायास आरंभ केला; आणि फौज जमाकरून न कितीएक किल्ले हस्तगत केले; व जागोजाग नव्या बादशाहाचा अंमल बसवूं लागला. तेसमयीं शाहाजहान बादशाह यानें दक्षिणेचें सगळें राज्य आपला पुत्र अथवा दुसरा कोणी आपली

य यांचा चून निमच्याम दिले अमतां त्यापासून आपणास अपा
य होईल, असें समजून पुत्र औरंगजेब लहान यास्तव तो मोठा
होई तों पर्यंत राज्याचे विभाग दोन करून एक खान डौरान, दुस
रा खानजमान, या दोघांस ने अधिकार दिले. त्या विभागांचा प्रका
र असा, खानदेशचा जितका मुलूख पूर्वेस मोंगलांकडे होता तो,
व जालना परगणा व वरहाचा पैनघाट भाग, इतके मुलूख मिळून
एक भाग; दुसरा जो मुलूख निजामशाहा बादशाह अहंमदनगर
कर यापासून घेतला होता तो; असे दोन दोघांचे स्वाधीन करून
सांगितले की, उभयतांनी पश्चिमेचा बंदोबस्त ठेवून शाहाजीला
जिंकावयास अनुकूळ असावें.

१८ त्या वेळेस शाहाजी भोंसला मोठें सैन्य जमा करून विजा
पूर करांचे आश्रयानें मुलखांत उपद्व करीत होता, त्यासाठी शाहाज
हानास मोठा राग आला. कोंकी, दौलताबाद किल्ला जरी हस्तगत झा
ला तरी राज्याचा बंदोबस्त होईना. हणून शाहाजाहानानें मोठें सैन्य
मिळवून निश्चय केला की, अहंमदनगरचें राज्य घ्यावें, या करितां
दक्षिणेचीं राज्यें बुडालीं तरी चिंता नाहीं. पूर्वी शाहाजाहानास तें रा
ज्य बुडवावें हें योग्य दिसत नव्हतें, तें कशासाठीं तें कळत नाहीं. कोण
जाणें कांहीं राजकारणार्थ, किंवा कांहीं नीतीसाठीं. प्रथम विजापूर
करांकडे वकील पाठवून बोलणें लाविलें कीं, अहंमदनगरकरांचे किल्ले
तुम्ही घेतले आहेत ते सर्व मरंजामसुद्धां आमचे स्वाधीन करा, त्यांत
मुलूखमैदान नामें एक मोठी तोफ, जी पेंड्याहून विजापुरास
नेली ती द्यावी, याखेरीज शाहाजीचे मसलतीस लागूं नये.
याप्रमाणें बागलांकर निजामशाहींत जितका कोंकण पट्टी
मुलूख पहिल्या होता तितका व सोन्नापूर किल्ला तुम्हाला देऊं;

नाहीं तर अगदीं बुडवून टाकूं. हें बोलणें त्यांणीं मान्य केलें नाहीं. तेव्हां शाहाजहानानें फौज जमा करून त्या लढ्याचे भाग चार केले; त्यांतले दोन शाहाजी भोंसल्यावर नेमिले, आणि दोन विजापूरकरांवर याजिले. तेवेळेस नासिक व चांदोर यांजवळचे जिल्हे शाहाजीचे किल्ले होते ते मोंगलांचे सरदार यांणीं घेतले.

१९ हें वर्तमान संभाजीस पत्रिसांत झालें, त्यावेळेस पराक्रमवान मोंगलांचा सरदार विजापूरचे राज्यांत शिरला आणि त्याणें नळदुर्गपर्यंत घेतला. आणखी सोलापूर व बेदर यादोहों मध्यें मुलूख आहे तोही घेतला. मैयदखानजहान याचे सन्मुख शाहाजी लढला नाहीं, एकाएकीं छापा घालीत असे, याप्रमाणें फार दिवस लढला. तो पहिल्यानें अहंमदनगरासमीप होता. मग लढतां लढतां रोवटीं चांभारगोंदें आणि वारानती, या दोहों मुलखांचे मध्यें हटून गेला. नंतर मोंगल मोठा सामर्थ्यवान् म्हणून मिरज व कोल्हापूर, या दोहों मुलखांमध्यें राहिला. तेव्हां विजापूरचें लष्कर शाहाजीस अनुकूळ होतांच त्या खानजहानाचें सामर्थ्य चालेनासें झालें. तेव्हां मोंगलाचे दरबारांतून त्यास आज्ञा अशी झाली कीं, मिरज व कोल्हापूर व रायबाग या निहीं शाहाजीजवळचा मुलूख उद्ध्वस्त करावा. त्याणें त्याप्रमाणें करून कितीएक लोक धरून आपल्या बरोबर नेले. याशिवाय खान देशांतून लष्करसहित वाटेनें मुलखासउपद्रव करीत विजापुरास येऊन पोंचला. तो विजापूरही घेता, परंतु त्या बादशाहानें सभोंवतें दहा कोस पर्यंत अन्नपाणी मिळेनासें करून ठेविलें होतें, म्हणून विजापूर त्याचे हातीं येईना. यास्तव

ग्वान डोरानें त्याचीं मिळकेलाचीं तारीख सन मोळांशें छपन्न स. त्याम
ळ्याचा प्रकार अवश्य जाणावा. कां कीं, ज्यापासून शिवाजी म-
हाराज यांचें माहात्म्य उत्पन्न झालें. त्या मळ्याचा प्रकार असा, परिं
डा व सोलापूर व त्याखालचा मुलूख व नळदुर्गपांत व कालीया
नपरगणा व बेदर मुलूख; या शिवाय कोंकणचा कालीयानप
रगणा, आणि नीरानदी व भीमानदी या दोहों मधला मुलूख,
इतकें राज्य विजापूरकरांकडे असावें. या खेरीज शाहाजीचे किले
जिंकले असतील ते मोंगलांस दिले असतां त्यास अभय आहे;
आणखी विजापूरकरांनीं वर्षास वीस लक्ष होन मोंगलास खंड
द्यावा.

२० विजापूरकर सल्ला करितात हें वर्तमान शाहाजीला
कळलांच तो कोंकणांत जाऊन आपल्या किल्ल्यांचा बंदोबस्त
करूं लागला. तेव्हां मोंगलांनीं त्याचा त्रिंबक किल्ला आणि
शिवनेर किल्ला व कोंकणचा कितीएक मुलूख घेतला. तेसम
यीं शाहाजीनें मोंगलांचे बादशाहास विनंती केली कीं, माझे
अपराधांची क्षमा करून मला आपल्या चाकरीस ठेवावें. याची
तारीख सन सोळांशें सदतीस. बादशाहानें आपल्या चाकरीस
त्याला ठेविलें नाहीं, विजापूरकरांचे चाकरीस राहावें अशी आ-
ज्ञा दिली; त्यावरून शाहाजी विजापूरकरांचा आश्रय करून रा-
हिला. मग त्यानें म्यां पिलेल्या बादशाह लहान होता, तो मोंग-
लांचा सरदार खान जमान यानें धरून ग्वालेर किल्ल्यावर पाठ
वून दोन मुलगे होते तेथें नेऊन ठेविला. असें अहंमदनगरचें रा
ज्य ज्यांचे बादशाहवडिलांच्या बंदोबस्तांत होतें, तें बुडालें.

२१ या भागांत मनाचे अनुक्रमानें तान्ह्याकाट व ल्हाईचा प्रका

र पूर्वी असावा परंतु तसें लिहिलें नाहीं याकरितां येथें लिहिलें नाहीं. तो असा कीं, पूर्वी हिंदूंचें विजयानगरचें मोठें राज्य करनाटकांत कानडेलोक यांणीं स्थापिलेलें होतें. मग सन पंधराशें चौसष्टांत दक्षिणेचे सर्व बादशाह मिळून त्या लोकांशीं जाऊन लढले. तो युद्ध प्रसंग फार मोठा झाला, तेसमयीं तें राज्य अगदीं बुडालें. ती लढाई तालीकोटा जवळ झाली, त्या तालीकोटाचें नांव राक्षि तागंडी असें कोणी चरचरींत लिहितात.

भाग तिसरा.

सन सोळाशें सत्तेचाळीसांपासून सन सोळाशें अठ्ठेचाळीस पर्यंत झालेलीं सर्व वर्तमानें.

१ ज्या समयीं शाहाजी विजापूरकरांचे चाकरीस राहिला, तेव्हां त्याचा प्रधान मुरारपंत यानें मोठ्या संतोषानें त्याला ठेविलें, आणि सुपे परगणा व पुणे परगणा त्यास दिला. कांकीं, त्याचे गुण व चातुर्य तो मुरारपंत जाणत होता. पुणें व सुपें हें त्याचें पहिलें ठिकाण झणून त्याला दिलें. यानंतर मुरारपंतानें मीनाव निराज्या दोहोंनद्यांचे मधला जो विजापूरकरांस नवा मिळालेला मुलूख, त्याचा बंदोबस्त शाहाजीचे साहाय्यानें केला, तेणें करून शाहाजीचें चातुर्य फार प्रकट झालें. झणून मुरारपंत यानें त्यावर बहूत संतुष्ट होऊन तो जेसमयीं माघारा बादशाहापाशीं आला

तेसमयीं बादशाहाजवळ त्याची फार स्तुति केली. नंतर बादशाहानें लश्कर करनाटकांत जातेवेळेस बादशाह याणें शाहाजीला त्या लश्करचा दुसरा अधिकार दिला, आणि त्याचा मित्र रणदुल्लाखान होता तो त्या लश्कराचा मुख्य अधिकारी केला. यानंतर त्यांचा जय झाल्यावर शाहाजीला त्या मुलखांत कोल्हार, बंगलोर, उस्कटा, वाळापूर, आणि सेरा हे पांच परगणे बादशाहानें जहागीर दिले. याशिवाय कंरडु* परगण्यांत बेचिसांगांवांचे देशमुखीची सनद दिली. त्याला बादशाह याणें दोहों जागीं जहागीर देण्याचें कारण असें असेल कीं, शाहाजीनें समजावें कीं, बादशाह याच्या मुलखाचे रक्षणेंकरून माझ्या मुलखाचें संरक्षण होईल.

२ शाहाजी भोंसला याणें मोंगलांची नोकरी सोडल्यापासून त्याचे सोयरे विंदकरचे देशमुख जाधव यांचे व शाहाजीचे कडे पडले. मग जेसमयीं मोंगलांशीं शाहाजीचें युद्ध झालें तेसमयीं जगदेवराव जाधव, जो शाहाजीची स्त्री जिजाबाई इचा चुलता, तो मोंगलांकडून शाहाजीशीं लढत होता. सन सोळाशें निसांत शाहाजीनें दुसरी स्त्री मोहिते यांची कन्या केली, तेणेंकरून जिजाबाईला विषाद आला, यास्तव ती दुसरा कोणी आप्त होता त्याचे घरीं जाऊन राहिली, ती नानवंशें तेथेंच होती. नंतर मोंगलांनी त्यास धरण्यास पाठविलें, परंतु मोंगल्यांजवळ भोंसले व जाधव होते त्यांणीं तिला सोडविली. आणि शाहाजीचा कोंडाणें किल्ला होता तेथें पोंचविली.

---

* करडु शहर सोलापूरचे दक्षिणेस पंधरा कोस आहे.

३ तिचे दोघे पुत्र. त्यांत वडील संभाजी व धाकटा शिवाजी. शिवाजीचें जन्म शिवनेर किल्ल्यामध्यें सन सोळाशें सत्ताविसांत झालें. थोरल्या पुत्र संभाजी बापास फार प्रिय होता, त्याला आप ण कोठें ही गेल्या असतां बरोबर नेत असे, आणि शिवाजी आई जवळ होता, त्याला आई मोगलांचे हातीं न लागूं देत फार पुक्ती नें जपत असे. नंतर जेव्हां शाहाजी मुरारपंतादेखत विजापुरास गेला, तेव्हां शिवाजीला घेऊन जिजाबाई त्या बरोबर गेली, नेबेळे स शाहाजीनें पुत्र शिवाजी हा सातां वर्षांनीं पुनः पाहिला. त्या पु- ढें शाहाजीजवळ जिजाबाई व शिवाजी फार दिवस राहिलीं नाहीं- त. मईबाई निंबाळकरांची कन्या शिवाजीला केली, तेथ पर्यंत शाहाजीपाशीं विजापुरीं होतीं; नंतर कर्नाटकांत शहाजी जाय्या स निघाला तेवेळेस जिजाबाई व शिवाजी पुण्यास शहाबयास गेलीं.

४ शाहाजीची दुसरी स्त्री तुकाबाई मोहित्यांची कन्या, तिचा पुत्र व्यंकोजी. या शिवाय एक संताजी नामें शाहाजीचा दासीपुत्र होता.

५ जे कोणी मराठे सरदार असतात ते बहुतकरून ब्राह्मण कारकून बाळगतात. त्यांत शाहाजीजवळ ब्राह्मण बहुतच होते, त्यामध्यें दोघे अत्यंत विश्वासू एक दादोजी कोंडदेव आणि दुसरे नारोपंत हणमंते. त्यामध्यें नारोपंत हणमंते यांस कर्नाटकचे जहागिरीचा बंदोबस्त नेमिला, आणि दादोजी कोंडदेव यास पुणे प्रांतींचा व बाबको व मुलखा यांचा बंदोबस्त सांगितला. तो दादोजी कोंडदेव व मुलाचे गावांत

+ शिवनेर किल्ला पुण्याचे उत्तरेस पंचवीस कोसांवर आहे. [illegible]

निपुण होता, त्याचे हातून लागवड चांगली होऊन उत्पन्न अधिक होत असे. नंतर शहाजीच्या शौर्यावरून प्रसन्न होऊन बादशा हानें इंदापूर परगणा व बारामती परगणा व पुण्याजवळचे भाव वांतली नळवट जमीन, पुणे प्रांताचे जहागिरीस अधिक लावून दिली; तेव्हां दादोजी कोंडदेव याची ही योग्यता त्या मुलखाच्या सं रक्षणें करून वाढली.

६ त्यावेळेस गोंवळ कोंडचे दरबारीं आणि विजापूरचे दर बारीं आप आपल्या राज्याची मर्यादा करनाटकापर्यंत होती तीच वाढवावयाकरितां इच्छा करीत होते. ते दोघे जर मोंगलांशीं सावध पणें वागते, तर उपयोग होता, तें टाकून करनाटकांत आणखी आणखी मुलूख घेऊं लागले त्या दोघांत उपयोगाचें इतकेंमात्रच लेखीं, महंमद आदिलशाह जो विजापूरचा बादशाह त्याणें गो वळकोंड्याचा कुतुबशाह बादशाह याचे कन्येशीं आपलें ल ग्नकेलें.

महंमद आदिलशाह जातीनें शूर नव्हता, त्याचे लष्क रास सरदार संभाळीत होते. त्यांणें विजापूरची रचनामात्र फार चांगली केली, आणि त्या शहरांत पाण्याचे नळ बांधून आणिले, ते अद्यापि आहेत.

७ मोंगलांचा बादशाह शाहाजहान यानें दक्षिणेच्या बाद शाहाशीं सलूख केल्यावर आपले नवे घेतलेले मुलूख यांचा बंदो बस्त करूं लागला, तेव्हां पूर्वी जे दक्षिणेचे दोन भाग केलेले होते ते एकत्र करून त्याचा अधिकारी पुत्र औरंगजेब यास केलें. त्या शाहाजहानाचे राज्यांत दक्षिणदेशाचे वसुलाचे हिशेबाची रीति नवी झाली, त्याचा करणारा नोडरमल्ल नामें मोठा युक्तिवान पुरु

हिंदू होता त्यांणें उत्तम मध्यम कनिष्ठ जमीनीपाहून त्यांचे उत्पन्नाचा अर्धशिापासून सहमांशापर्यंत अंश घ्यावा असें ठरविलें. त्यांत जो हिस्सा सरकारी देणें त्याचा पैका घ्यावा असें केलें. या प्रमाणें कितीएक वर्षे गेल्यानंतर सरकारचे दप्तरांत जमीनीच्या सर्व उत्पन्नाचा आकार करून जो हिशेब ठरला त्याचा चतुर्थांश सरकारानें घ्यावा, असें करून पहाणीकरणें टाकिलें; जो चवथाई हिशेब झाला तोच सारा नेमिला. ही रीति शाहाजहानानेंभी मेंच उत्तरेच्या मुलखांतही स्थापिली, तेथें ती रीति पुरती होण्यास वीसवर्षे लागलीं. ती रीति टंकायानामें प्रसिद्ध होती. टंका असेंना घडलें यांचें कारण असें कीं, त्यापूर्वी तांब्याचा टक्का चेत होते तो चाल मोडून यापुढें टक्क्याचें रुपें घ्यावें असें करून त्यांचें नाव टंका असें ठेविलें. त्याचा सुमार सन सोळाशें अडुसष्ट. त्याच वेळेस मराठेलोकांत फमलीशाक चालू झाला.

८ दादोजी कोंडदेवयाचा मुलूख मोंगलांचे मुलखाजवळच होता, परंतु त्याणें मलिकंबरी रीति चालविली. ती अशी कीं, प्रतिवर्षी पाहणी करून गावांचे उत्पन्नाचा वसूल घ्यावा. कधीं जिनस घेतला तर त्याचा पैका घेत. असें दिसतें कीं मोंगलाचे रीतीपेक्षां दादोजी कोंडदेव यांचा रीति चोखरी यांस भारी पडे, परंतु तो मुलूख फार सुरती असे. यावरून असें वाटतें कीं, त्या मुलखाला ती रीति योग्यच होती.

९ मावळांत राहाणारे जे लोक होते ते केवळ दरिद्री, परंतु शरीरें करून सुदृढ. त्यांणीं अति मेहेनत घ्यावी, तेव्हां त्यांस उदर निर्वाह पुरतें मिळत असे. मग तो मुलूख जेव्हां दादोजीचे स्वाधीन झाला, तेव्हां त्याणें त्यालोकांची अवस्था अशी पाहिजे कीं, ते शेंप

ज्यांतून गहान, आणि ज्यांस वस्त्रें पात्रें धड नाहींत, आणि व्याघ्रादि क हिंस्र प्राणी यांपासून द्वारांचें संरक्षण झालें पाहिजे यामार्गी सर्वांनां शस्त्रें मात्र बाळगलेलीं होतीं. तेव्हां त्याणें त्या लोकांच्या पो षणाकरितां कितीएक वर्षें त्यांपासून वसूल घेतला नाहीं; आणि त्यांवरोज दुसऱ्या लोकांकडचा वसूल जमा करावयाच्या कामावर कितीएक ते मावळे लोकच चाकरीस देविले; त्या योगें करून तेस हज पोसले गेले.

१० जेसमयीं जिजाबाई व शिवाजी यांज बरोबर दादोजी कोंड देव पुण्यास गेला, तेवेळेस त्या दादोजीनें पुण्यांत एक मोठा वाडा बां धिला. आणि त्यांत जिजाबाई व शिवाजी यांस ठेवून आपण शि-वाजीला जे गुण धनीपणाचे उपयोगी ते शिकविता झाला.

ब हुधा मराठे सरदार यांस लिहितां आणि वाचतां येत नाहीं; ते असें समजतात कीं, हें काम कारकुनानें करावें. त्यांत शिवाजीला तर कधीं आपलें नावही लिहितां येतच नव्हतें, परंतु शौर्याचे उपयोगी जें धनुर्विद्यादिकौशल्य त्यांत तो प्रवीण होता. जसें त्याला घो ड्यावर बसतां येत होतें तसें कोणत्याही मराठे सरदारास येतच नव्हतें त्या शिवाजीला बाळपणीं भारतीयुद्धकथा व भागवतीयुद्धकथा अ त्यंत प्रिय असत. पुढें त्याचे मोठेपणांतही त्याणें कोठें कथा होत असें न किर्तन ऐकिलें म्हणजे जरी वाटमध्यें कोठें मोठें भय असलें तरी तें न मानितां कथेस जावें, त्याची हिंदूंचे धर्मावर प्रीति होती, आणि मु-सलमान लोकांचे धर्माचा तो लहानपणापासून तिरस्कार करी. जेव्हां त्याचें वय सोळा वर्षांचें झालें, तेव्हां त्याणें अपयोजक लोकांची संग त धरिली. यावरून तो बादशाहाची आज्ञा न मानितां आपण सर्वच बंड करील असें दिसूं लागलें.

नेहमीं दादाजी कोंडदेवानें त्या शिवाजीचें असें विपरीत लक्ष्य पाहून त्याला आपल्या युक्तीचा कांहीं चागला उपदेश वारवार केला, आणि त्याची चित्तवृत्ति मुलखाचे बंदोबस्ताकडे झाली म्हणून जहागिरीचे बंदोबस्ताचें काम त्यावर टाकूं लागला; तेणेंकरून त्याचा मान वहून आला, आणि मराठे सरदार लोक त्याचे भेटीस येऊं लागले. तोही त्यांचा संमान करी, त्या योगें ते सरदार लोक त्याचर प्रीति ठेवून होते, कांकीं, तो सर्वांशीं लीनपणानें वागत असे. असें असतांही त्याला लोक ह्मणत कीं, कोंकणांत जे दरवडे पडतात त्यांत शाहाजीचा पुत्र यांचें आंग आहे.

११ तो शिवाजी मावळे लोकांवर निरंतर प्रीति करीत असे. कांकीं, ते लोक वेडे आणि केवळ मूर्ख दिसत, परंतु त्यांचे योग्य त्यांस कांहीं काम सांगितलें असतां त्यांणीं तें काम अतिसावध पणानें करीत असावें. त्यांना मावळच्या सर्व चोरवाटा ठाऊक होत्या, ह्मणून शिवाजी त्यांस आपल्या शिकारीचे कामांत घेई; त्यांणीं त्याला सारे डोंगरी किल्ले माहीत करून दिले. त्यानंतर त्याचे असें वाटलें कीं, जर यांतून एक किल्ला आपणास मिळेल तर त्याचाभा स उपमा नाहीं.

त्या वेळेस मुसलमान लोकांचे राज्यांत डोंगरी किल्ल्यांच्या बंदोबस्ताची फारशी हुशारी नव्हती. कांकीं, ते जागे दर्जन्यकाळीं वस्तीकरणारांस रोगकारक, आणि त्या लोकांस यत्न न करितां प्राप्त झाले ह्मणून त्यांना डोंगरी किल्ल्यांचें माहात्म्य वाटत नव्हतें.

ज्या समयीं शिवाजीनें आपणास किल्ला असावा असें मनांत आणिलें, त्यावेळेस त्याचे जाहागिरींत किल्ले करी वादर

ह्या राजकडेचे होते. कोंडाणा किल्ल्यावर अधिकारी मुसलमान असे, आणि पुरंदरवर मुरारपंताचा नातवणाईत नीलकंठराव नामें ब्राह्मण होता. ते दोघे किल्लेकरी व दादाजीचें कुळ यांचा स्नेह होता. मावळांत तिघे शिवाजीचे सोबती प्रसिद्ध होते, एक एसजी कंक, दुसरा बाजी मालुसरे, तिसरा बाजी फर्जंद. तिघे तिघे.

१२ जेव्हांपासून शिवाजी लष्कर मिळवूं लागला, तेव्हांपासून तिघे पहिल्यानें त्याला मिळाले. त्यांणीं संभाळोजीबोधलेकिनांत तोरणा किल्ल्याचे लोक बरा करून. तो किल्ला शिवाजीला देवविला.

१३ त्यानंतर शिवाजीनें विजापुरास वकील पाठवून बादशा हास विनंती केली की मी किल्ला घेतला हा आपल्या राजधानीपासून फार लांब आहे, आणि येथले लोक मोठे उपद्रवी, यास्तव ही जागा प्रबलालू सैवकांचे स्वाधीन असल्यास गड्याचा बंदोबस्त उत्तम होईल. त्यावरून किल्ला त्याकडे असावा अशी आज्ञा तर झाली नाही, परंतु त्यांणें बादशाहाचे दरबारीलोक यांस लांच दिला त्यामुळें त्या दरबारी ची गोष्ट पुनः निघाली नाही, आणि किल्ला त्याकडेस च राहिला. अशी कितीएक वर्षे गेल्यावर शिवाजीनें मावळे लोक चाकरीस ठेवून किल्ल्याची डागडुजी केली.

मग कोणे एके दिवशीं त्या किल्ल्यांत खणूं लागला तों त्या ला देवयोगें करून कितीएक प्राचीनकाळचा कोणी ठेवलेला मोहोरां चा हंडा सांपडला

तेव्हां त्यांणें युक्तीनें लोकांत अशी प्रसिद्धि केली की भवा-

कोंडाणें किल्ल्यास हाही मोहरगड असेतात

नी आज्ञा प्रमन्न झाली नी द्रव्य देते, हें ऐकून लोक त्याला भजूं लागले.

१४ तेव्हां शिवाजीनें दारूगोळी व शस्त्रें इत्यादि युद्धोप योगी पदार्थ विकत घेऊन तोरणा किल्लायाचे आग्नेयी दिशेस दीड कोसावर मोरबद नामें उंच डोंगर आहे त्यावर अतिमेहेनतीनें मोठ्या खर्चे करून दुसरा किल्ला बांधिला, आणि त्याचें नाव राजगड ठेविलें. हें वर्तमान सन सोळाशें सत्तेचाळिसांत झालें.

तो किल्ला बहुतेक बांधला गेला. इतक्यांत विजापुरी बादशाहास तें वर्तमान कळलें तेव्हां त्याणें शिवाजीच्या मनाई पत्र पाठविलें, आणि कर्नाटकांत शाहाजीच्या लिहिलें कीं, हें तुझे पुत्रानें तुमचे आज्ञेवांचून केलें नसेल. यावरून त्याणें उत्तर दिलें कीं, हा अपराध मजकडे नाहीं, परंतु माझा पुत्र सरकारचा विश्वासू चाकर आहे त्याणें कांहींतरी सरकार हित पाहिल्यावांचून केलें नसेल.

जे समयीं शिवाजी किल्ला बांधावयास लागला. तेव्हांपासून दादोजी कोंडदेव याणें वारंवार हितोपदेश केला कीं, अज्ञानें सर्व कूळ बुडेल. शिवाजीनें तें ऐकून मान्य केल्याप्रमाणें दारवविलें. तेव्हां दादोजी असें समजला कीं, हा आपल्या मनांतील अर्थ सिद्धास नेईल, माझें ऐकणार नाहीं. असें त्याचे मनांत येतांच त्याला अत्यंत चिंता लागली, आणि वार्धक्यानुळें दुखणें लागलें तेणेंकरून तो आसन्न मरण झाला; तेसमयीं शिवाजीला बोलावून आणिलें, आणि बोलिला कीं, मी आपल्या धन्याचे हितविषयीं तुलाला निषेधीत होतों, परंतु आतां माझी विनंती ऐकावी; आपण स्वतंत्रपणानेंच वागावें, परंतु ब्राह्मण व प्रजा यांचा प्रतिपाळ करून मुसल्म

मानांपासून हिंदूंचीं देवस्थानें रक्षावीं, इतकें बोलून आपलीं सारीं कुटुंबाचीं माणसें शिवाजीचे हातीं देऊन प्राण सोडिला.

शिवाजीचे मनांत पूर्वीच होतें कीं, आपण स्वतंत्रपणानें सावें, त्यावर दादोजीनेंही आपल्या अंतकाळीं तसेंच सांगितलें, त्यावरून त्याचे मनांत विशेष आलें; आणि दुसरे जे त्याचे जहागिरींत अधिकारी होते तेही दादोजीनें शेवटीं सांगितलेलें ऐकून शिवाजीस अनुसरले.

असें वाटतें कीं, प्रथम शिवाजी आपलें मात्र हित इच्छित होता, तो दादोजीनें शेवटीं सांगितलें तें ऐकून आपला मुलूख बगाईब्राह्मण सुखी असावे असें मनांत आणूं लागला असेल, तेव्हांपासून त्याचा स्वभाव श्लाघ्य होऊं लागला.

दादोजी कोंडदेव याचे मरणानंतर शिवाजी आपले पित्याचे जहागिरीचा वसूल पित्याचेच नावें घेऊं लागला, परंतु शाहाजीचे ही आज्ञेंत वागूंनये असें त्याचे मनांत होतें. कांकीं, दादोजी कोंडदेव मेल्यावर त्याणें कारकून पाठवून जहागिरीचा वसूल खर्चास मागितला, तेव्हां शिवाजीनें उत्तर केलें कीं, एथचा पैसा एथेंच पुरतना ही. त्यानंतर आणखी कितीएक वेळां शाहाजीनें द्रव्य मागावयास कारकून पाठविले, परंतु शिवाजीनें दिलें नाहीं.

त्या शाहाजीचे जहागिरींत दोन अधिकारी होते. एक फिरंगोजी नरसाळा चाकणचा किल्लेकरी, दुसरा बाजी मोहिते, तुकाबाई शाहाजीची दुसरी स्त्री तिचा बंधू, तोसुपे परगण्याचा मलतदार, हे दोघे शिवाजीला अनुकूळ नव्हते. यासाठीं वकील पाठवून फिरंगोजी बरा केला, आणि चाकण किल्ला व त्या खालचे कितीएक गांव देतले; मगत्यालाच त्या मामलतीची सनद दिली.

वाजी मोहिते यांजवळ सुपे परगणा यामध्यें उत्तम स्वार तीनशें होते, तो कधींही वश्य होऊन शिवाजीला वसूल देईना, म्हणून शिवाजीनेंमावळे लोक बरोबर घेऊन रात्रीस सुप्यांत शिरून वाजी मोहिते व त्याचे मुख्य कारभारी यांस धरून कैद केलें, आणि जे चाकरी करावयास अनुकूळ झाले त्यांस चाकरीस ठेविलें; जे वश्य न झाले ते शाहाजीकडे करनाटकांत पाठविले. या प्रमाणें चाकण किल्ला व सुपे परगणा आपल्या स्वाधीन आणिला. या खेरीज कोंडाणें किल्ल्याचे मुसलमानानें बक्षीस लांच घेऊन किल्ला शिवाजीला दिला, त्याचें नाव शिवाजीनें सिंहगड असें ठेविलें. सुपे परगणा व चाकण किल्ला या दोहोंपेक्षां सिंहगड किल्ला मिळाला तो मोठा लाभ.

१७ पुरंदर किल्ल्याचा अधिकारी मुरारपंताचे हातचा ठेवणाईत नीळकंठराव, तो दादोजी कोंडदेव मृत्युपावला त्याच सुमारें मेला; त्याचे पुत्र तीन, त्यांत जो वडील त्याणें विजापूरचे आज्ञेची वाट न पाहतां आपल्या बापाचें काम संभाळिलें; तेव्हां त्याचे कनिष्ठ बंधू दोघे, त्यांणीं आपणास त्या अधिकारांत वगुरें चरावयास कुरणांत कांहीं विभाग असावा म्हणून वाद आरंभिला, तेव्हां तो देईना, यास्तव त्यांहीं शिवाजीला विनंती केली कीं, आमचे कलहाची मध्यस्थी आपण करावी. असें ते म्हणतांच त्याणें मान्य केलें, आणि त्यांस असें समजाविलें कीं, मला जाऊन पक्ष तुम्हा दोघांचा, बाहेरमात्र तिऱ्हाईतपणानें तिघे सारिखे.

त्यानंतर सुप्यास जातों असा आकार दाखवून लश्करासहित पुरंदर किल्ल्याखालीं येऊन उतरला, तेव्हां त्यांणीं त्यास बोलावणें पाठविलें, तें असें कीं, आपण थोडके शिपाई बरोबर घेऊन किल्ल्यावर

यावें. नंतर तो त्याप्रमाणेंच वर गेला, आणि रात्रीस बोलतां बोल तां त्या तिघांतला थोरला भाऊ निजावयास गेल्यावर त्याणें त्या दोघां भावांस अशी मसलत दिली कीं, याला जर बंदीस घातलें तरच हा तुमचें ऐकेल. कदाचित् त्याचे शिपाई कांहीं गडबड करितील तर मी मावळे लोक वरते आतांच बोलावून बंदोबस्त करितों. तेव्हां त्या दोघांहीं मान्य केलें, त्यावरून त्याच रात्रीत मावळे लोक किल्ल्याचे मा चास व बाले किल्ल्यावर नेऊन पहांटेस किल्ला आपण घेतला, आणि त्या तिघांचा बंदोबस्त केला. तेव्हां त्यांस असें समजलें कीं, आम्ही ति घेही बंदीवान. किल्ल्याचा धनी शिवाजी. मग शिवाजी त्यांस म्ह णाला कीं. मी आपल्या हिंदु धर्माचे रक्षणार्थ अशीं कामें करितों, तुम्ही माझे चाकरीस राहावें; तुमचे किल्ल्याचे बदल तुम्हाला किंवा एक गांवें इनाम देतों; तेंव्हा त्यांणीं तें मान्य करून त्याचे चाकरी स राहिले.

अशा युक्तीनें एकही मनुष्य न मरतां युद्ध केल्यावांचून चाक ण किल्ला व निरानदी या दोहों मधला मुलूख शिवाजीनें घेतला.

त्या वेळेस महंमद आदिलशाह विजापूरकर आपल्या नगरा ची शोभा स्वस्थपणें बसून करीत होता, त्याला शिवाजीचें कृत्य कळ लें असलें तरी तो असें मानीत असेल कीं, जों पर्यंत शाहाजी जहागीर दार आपल्या लश्करांत आहे तों पर्यंत चिंता नाहीं. इकडे शिवाजी तर केवळ व्याघ्राप्रमाणें लपून लपून जेथें जेथें कार्य साधेल तेथें तेथें युक्तीनें कार्य करून घेणारा, असा त्याचा स्वभाव बादशाहाचे ध्यानांत आला नाहीं.

भागचवथा.

सन सोळाशें अठ्ठेचाळिसां पासून सोळाशें सत्तावंनपर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ येथपर्यंत दक्षिणेच्या हद्दी व अधिकारी यांचा प्रकार लिहिला, परंतु शिवाजीनें घेतलेल्या मुलखाचे सभोंवते कोण-कोण जहागीरदार होते यांचें वृत्त लिहिल्यावांचून शिवाजीचें संपूर्ण वर्तमान कळणार नाहीं, यास्तव तें लिहिलें पाहिजे. त्याचा प्रकार असा, सन सोळाशें अठ्ठेचाळिसांत निरेचे दक्षिणतीरीं पूर्वेचे आंगीं शिरोळपर्यंत, आणि दक्षिणेस कृष्णेचे उत्तरेच्या डोंगरपर्यंत मुलूख, बंडाळनानें हरणस मावळचा देशमूख याजकडे होता; त्याखेरीज रोहिडा किल्ला त्याचे स्वाधीन असे. तो शिवाजीला कृत्रिमी जाणून नेहेमी फोज बाळगीत असे.

वाईमध्यें विजापूर सरकारचा मोकासेदार होता, त्याचे स्वाधीन किल्ला पांडवगड व कमळगड, व दुसरे कितीएक किल्ले असत.

घाटमाथा कृष्णेपासून वारणेपर्यंत मुलूख, चंद्रावमोरे जावळीचे राजे यांजकडे होता. कोल्हापूर परगणा व मोगा सुदृढ पन्हाळा किल्ला हे कोणी मराठा सरदार बादशाहयाचा ठेवणाईत होता त्याचे स्वाधीन असत.

पूर्वी विजापूरचे सरकारांत जो मुलूख होता त्यांतील कि एक स्थळें जहागीरदार व वतनदार देशमूख यांजकडे असत.

परंतु रत्नागिरी व राजपुरी व दाभोळ व अंजनवेल, वइतक्यां चे खालचा मुलूख बादशाह याचे सरदारांकडे असे. या खेरीज मुख्य सरदार वाडीचे देशमूख सांवत, ते तेथचे पुरातन वतनदार. असेच शृंगारपुरीचे वतनदार पुरातन दळवे होते.

या शिवाय पहिला अहंमदनगरचे सरकाराकडे कालीयान परगणा. त्याचे भाग दोन, एक उत्तरेस भिंवडीपासून नागोठणें पर्यंत, दुसरा दक्षिणेस. उत्तरेचा भाग व त्यांतले सारे किल्ले एक बादशाहाचा मुसलमान सरदार होता, त्याजकडे अनंत. दक्षिणेचा भाग कोणीएका शिद्याला जहागीर देऊन त्याणें लढाऊ गलबतें ठेऊन सावकारी गलबतांचें संरक्षण करावें, आणि जे मक्केस तीर्थयात्रेकरितां जाणारे त्यांस पोंचतें करावें, असें काम त्यास सांगितलें होतें. लढाऊ गलबतांची चाकरी जहागिरीसुद्धां एकास च वंशपरंपरेनें द्यावी असें नव्हते; कोणीएखादा योग्य शिद्दी पाहून त्याला देतअसत. त्या सरदारांचें राहावयाचें मूळ स्थान दंडाराजपुरी.

त्या वेळेस जो मुख्य शिद्दी सरदार होता त्याचें नाव फत्तेखान, त्याचे स्वाधीन तळें घोसाळें व रेडी वगैरे कितीएक स्थानें होतीं. या प्रमाणें शिवाजीनें घेतलेल्या मुलखाचे आसमंतात राहणारे संस्थानी होते.

२ आतां पुनः शिवाजीचें वर्तमान. तो मावळे लोक चाकरीस ठेऊन कोंकणचे लोकांचें वर्तमान आपणास कळावें व त्यांणीं वश व्हावें म्हणून कितीएक ब्राह्मण कारकून कोंकणांत पाठवीत असे. नंतर एकंदर त्याला असें समजलें कीं, कालियानीचा सुभेदार मुल्लाना आमेद, तो विजापुरास मोठा खजीना पाठवितो, तेव्हां

शिवाजीनें सुपे परगण्यांतले तीनशें घोडे घेतले होते, त्यांवर आपले विश्वासू बारगीर बसवून कितीएक मावळे लोक बरोबर घेऊन एकाएकीं वाटेंत छापा घालून तें द्रव्य त्या स्वारांजवळ चोरांसारखीं ओझीं होतसें वांटून दिलें आणि मोठ्या त्वरेनें राजगडास नेलें.

३ हें छाप्याचें वर्तमान विजापुरीं कळल्यावर शिवाजी मोठा पुंड असें लोक समजून आश्चर्य करितात, तों दुसरें वर्तमान गेलें कीं, शिवाजीनें कांगोरी, तुंग, तिकोना, भोरप, कुवारा, लोहगड, आणि राजमाची, हे सात किल्ले बळात्कारें घेतले. त्या खेरीज कोंकणांत गेले ले जे त्याचे कारकून त्यांणीं तेथले लोक वश करून तळें, घोंसाळें, आणि रेडी, हे किल्ले घेतले; आणि मावळे लोक यांणीं कितीएक मोठीं मोठीं कोंकणचीं गांवें लुटून तें द्रव्य राजगडास नेलें.

४ शिवाजीचे कारकून मंडळींत एक दादोजी कोंडदेवाचे शिक्षे चा कारकून मोठा चतुर आणि शूर आबाजी सोनदेव नामें होता, त्याणें कांहीं शिपाईलोक बरोबर घेऊन अकस्मात् कालियानीस जाऊन ते थचा सुभेदार यास कैद केलें; तेव्हां तेथचे आसमंतात् किल्ले सहज सही झाले.

शिवाजीला आपलें ऐश्वर्य इतकें वाढेल असें वाटत नव्हतें, तें हें आनंदाचें वर्तमान ऐकतांच अत्यंत हर्ष करून युक्त होत्साता, कालियानीस जाऊन त्या आबाजी सोनदेवाचा बहुत संमान करून त्या लाच त्या मुलखाचा सुभेदार केला. त्यानंतर त्या मुलखाचे वसुलाचें काम चालविलें. तें असें, शिवाजीनें पुरातन चाली कशा होत्या त्या ध्यानांत आणून त्या चालविल्या; आणि देवस्थानांचें व ब्राह्मणांस जें पूर्वीचें दिलेलें तें तसेंच चालविलें.

शिवाजीनें ज्या शिवाचे किल्ले घेतले होते तो मोठा शूर होता,म्हणून त्याचे भयानें त्या किल्ल्यांचे बंदोबस्ताकरितां, घोंसाव्माजवळ बिरवाडी किल्ला आणि रेडीजवळ लिंगाणा किल्ला,असे दोन बांधिले.

जो मुलाना सुभेदार आबाजी सोनदेवानें कैद केला होता,त्याचा शिवाजीनें मोठा संमान करून माघारा विजापुरास पाठविला. तो तेथें पोंचल्याचे पूर्वीच तें स्थान शिवाजीनें घेतल्याचें वर्तमान बादशाहास कळलें होतें, यास्तव त्याला दुसरा कांहीं अधिकार मिळाला नाहीं; बादशाहाची भेट मात्र झाली.

५ त्यावेळेस विजापुरचा महंमद आदिलशाह बादशाह याणें शिवाजीचा बाप शाहाजी याचें ऐश्वर्य करनाटकांत फार वाढविलें होतें; तो बादशाह असें समजला कीं, हें बंड शाहाजी अनुकूच सांवरून होणार नाहीं. म्हणून त्याच समयीं शिवाजीकडे फौज नयोजितां, बाजी घोरपडा मुधोळकर नामें एक मोठा सरदार शाहाजी बरोबर असे त्याला सांगून पाठविलें कीं, शाहाजीस कैद करावें; त्यावरून त्याणें त्याला भोजनास बोलावून आणून दग्यानें कैद केलें.

त्यानंतर सन सोळाशें एकुणवन्नासांत शाहाजीला विजापुरीं बादशाहजवळ नेलें,तेव्हां बादशाहानें त्याला आज्ञा केली कीं,हें बंड तूं मोडावेंस, कांकीं,हें तुजपासूनच उत्पन्न झालें. तेव्हां तो बहुतप्रकारें विनंती करून बोलिला कीं,शिवाजी माझाही बहुत उपमर्द करितो.परंतु तें बादशाह याला सत्य वाटेना,यास्तव त्याला चिरेबंदी कोठडींत घालून त्या कोठडीचें दार वारामात्र जाई असें छिद्र राखून बंद केलें; आणि सांगितलें कीं,शिवाजी अमुक दिवसांत अपराधांची क्षमा मागावयास न आल्यास हें हा छिद्र बंद होईल. हें वर्तमान शिवाजीला कळल्यावर त्याचे मनांत आलें कीं, क्षमा मागावयास जावें, परंतु त्याचा

सई बाई निंबं मसलतदिली की. विजापूरचें सरकार केवळ अविश्वासास्पद आहे, त्यास हेंच बरें कीं, आपलें महत्व वाढवायें आणि त्यांस भय प्रदर्शन करावें. तेव्हां शिवाजीनें मोंगलांचा आश्रय करून शाहाजहान दिल्लीचा बादशाह यास आपल्या बापाचे मुक्ततेविषयीं पत्र पाठविलें; त्यांत मी तुमची चाकरी करीन म्हणून लिहिलें. त्या वरून त्याणें विजापूरचे बादशाहास कांहीं सूचना लिहिली असेल, ती व मुरारपंतनामें विजापूरकरांचा मुख्यकारभारी होता त्याचेंवशि वाजीचें इष्ट न होतें तें, यादोहीं योगांहीं शाहाजीला कोठडींतून काढून किल्ल्यामध्यें बंदींत ठेविलें. अशी त्याची सुटका झाल्यावर शिवाजी मोंगलांचे चाकरीस कांहीं निमित्तें करून बोली प्रमाणें जाईना; आणि वकील पाठवून बोलणें लाविलें कीं, अहंमदनगर व जुंनर परगणायांत आमची पाहिली बाकी राहिली आहे, ती द्यावयास आज्ञा व्हावी. तेव्हां शाहाजहानाचें उत्तर गेलें कीं, तुम्ही येथें येऊन भेटल्या नंतर तुमचे देण्याचा विचार केला जाईल.* असें सन सोळाशें पंन्नासांत घडलें.

६ त्यापुढें चारवर्षे पर्यंत शाहाजी विजापुरीं कैदेंत होता. तेव्हां विजापूरकरांस असें वाटलें कीं, शाहाजीला जर उपद्रव केला नर शिवाजी मोंगलांस मुलूख देईल; शिवाजीला असें वाटलें कीं, मी जर विजापूरकरांशीं वांकडा वागेन तर बापास पीडा होईल; म्हणून त्या चोहों वर्षांत बहुत करून दंगा झाला नाहीं. परंतु एक हिंदू बाजी-शामराज नामें होता, त्याणें शिवाजीला महाडाहून धरून बादशा

---

* हें, शाहाजहानाचें उत्तरपत्र व आणखी कित्येक शाहाजहानाचीं व औरंगजेब पातशाह यांचीं पत्रें मुंबईचे किल्ल्यांत साहेबांचें पुस्तक संग्रहस्थानीं आहेत.

हाकडे न्यावयाचा बेत केला तो सिद्दीस गेला नाहीं.

शाहाजी बंदींत असतां त्याणें किती एकवेळां करनाटकांत जा वयास बादशाहाजवळ आज्ञा मागितली, परंतु बादशाहानें दिली नाहीं. शेवटीं करनाटकांत मोठें बंडउत्पन्न झालें, त्यामुळें बादशाह त्याचे बोलण्यास अनुकूळ झाला. परंतु आधीं शपथ घेतली कीं, मुधोळकर जहागीरदार यांचीं लुसें वैमनस्य नमावें. याप्रमाणें करा रठरून शाहाजीची सुटका सन सोळाशें त्रेपन्नांत झाली.

तो सुटतांच त्याणें शिवाजीला पत्र पाठविलें कीं, तूं जर माझा पुत्र खरा आहेस तर मुधोळ करांचें पारिपत्य कर. ही शाहाजीची आज्ञा शिवाजीनें मनांत राखून करण्या प्रकारें सिद्दीस नेली, तें वर्तमान पुढें लिहिण्यांत येईल.

७ मग शाहाजी करनाटकांत गेला, ते समयीं त्याणें असें पाहिलें कीं, तेथचे मांडळिक आपआपल्यांत भांडतात, त्यामुळें आपल्या जहागिरीस उपद्रव लागतो; यासाठीं त्याणें आपला थोरला पुत्र संभाजी यास एक कानिकगिरीचा किल्लेदार याचें पारिपत्य करावया स पाठविलें. तो जाऊन त्याशीं लढला, तेव्हां त्यापासून पराभव पावून संभाजी आपले बरोबरचे किती एक लोकसुद्धां मेला गेला.

त्यानंतर करनाटकांत फार दंगे झाले तेणें करून विजापूरचे दरबारांत शिवाजीचे चौकशी विषयीं अवसर झाला नाहीं.

८ तो शिवाजी बापाची मुक्तता ऐकून कोंकणांतील घेतलेल्या खेरीज उरलेलीं स्थळें व संपूर्ण घाटमाथा घ्यावयास मसलत आणखीं करूं लागला. त्यांत प्रथमतः जावळी परगणा आपल्या हातीं यावया विषयीं उद्योग केला. तो असा, त्या मुलखाची माहानगारी झाल्या करितां सुसपाहाणी करावयास एक राघो बल्लाळ नामें

व संभाजीकावाजीनामें एक शूद्र असे दोघे कारकून तेथले राजे चंद्रराव मोरे यांचे कन्येशीं आपण विवाह करणार असें निमित्त करून त्या बोलण्यासाठीं बोलून पाठविले, त्यांबरोबर पंचवीस मावळे लोक दिले. ते कारकून त्याकडे जातांच त्या राजानें त्यांचा संमान केला. ते कितीएक दिवस बोलणें करीत तेथें राहिले. शेवटीं त्या ब्राह्मणाचे मनांत आलें कीं, चंद्रराव मोरे यांस मारून टाकावयास अवघड नाहीं, हें त्या शूद्रासही ठावें कवाटलें. मग शिवाजीला याप्रमाणें लिहिलें, त्याणें उत्तर दिलें कीं, हें योग्य आहे. आम्ही तुमचे साह्याव्यास लश्कर घेऊन येतों. त्यानंतर शिवाजी राजगडाहून पुरंदरास आला, तेथून रात्री न निघून, कृष्णेचे उगमीं महाबळेश्वर आहे तेथें रानांत त्याचे लोक गुप्तरूपें राहिले होते, त्यांत जाऊन मिळाला. नंतर राघोजी ला ही सारी सिद्धता समजली. तेव्हां तो त्या कावाजीला बरोबर घेऊन मोऱ्याचे घरीं जाऊन. त्यास म्हणाला कीं. आपण व आपले बंधू उभयतांशीं एकांत करावयास आलों, त्यांहीं तें मान्य करून दोघे भाऊ त्यांशीं बोलावयास एकांत स्थळीं गेले. तेव्हां राघोजी वल्हाळ याणें त्या राजाचे काळजांत खंजीर खुपसून त्याला ठार मारिलें, आणि संभाजी कावजीनें त्याचा भाऊ मारिला. नंतर ते दोघे तेथून पळून रानांत गेले, तेथें त्यांचे सहाय्यास शिवाजीचे लोक येत होते त्यांची गांठ पडली.

इकडे जावळीमध्यें लोक राजाचे मरणाचा विस्मय करीत असतां शिवाजीचे लोकांनीं येऊन हल्ला केला, तेसमयीं हिंमतराव नामें त्याचा प्रधान व त्या राजाचे पुत्र होते, त्यांहीं त्यांशीं झुंज निकरानें सुरू केली; शेवटीं तो हिंमतराव मेला तेव्हां तेथून

मोडलें, आणि तें संस्थान शिवाजीचे हातां लागलें. यानंतर घासोटा किल्ला शिवाजीनें घेतला, तेणेंकरून जावळी मुलूख संपूर्ण शिवाजीचे स्वाधीन झाला.

शिवाजीनें दुसरा रोहिडा किल्ला घेतल्ला तो प्रकार असा; मावळेलोक बरोबर घेऊन रात्रीस जाऊन ते किल्ल्याचे लोकसा वध नसतां किल्ल्यास शिडी लावून वर चढून गेला; तेथें हरणस मावळचा देशमूख बंडाळ या उपनावाचा होता, त्याणें त्या लोकां चा तो गलबला ऐकून हत्यार घेऊन उठला आणि लढूं लागला. त्याचे बरोबर जे लोक होते तेही बहूत लढले; शेवटीं तो बंडाळ प डला तेव्हां तें युद्ध संपलें. त्यांत जावळीचा देशापांड्या बाजी पर भूनामें होता, त्याचें शौर्य पाहून शिवाजीनें त्याचा संमान केला, आणि त्याचा अधिकार त्याकडे ठेवून तो आपले जवळ चा करीस ठेविला.

१ यानंतर सन सोळाशें छप्पनांत शिवाजीचे मनांत आलें कीं, निरा व कोयना या दोहीं नद्यांचे कांठीं जो आपला मु लूख आहे तो व पारघाट याची वाट, यांचे संरक्षणार्थ एक कि- ल्ला कृष्णेचे उगमीं बांधावा.मग त्या कामावर एक आपल्या कुलेंत ला देशस्थ ब्राह्मण मोरो त्रिमळ पिंगळे नामें योजिला, त्या किल्ल्या चें नाव प्रतापगड ठेविलें. त्यावेळेस एक रघुनाथ नामें शिवा जीचा मुख्यकारभारी होता त्यास पेशवे असें पद देऊन त्याचे स्वाधीन किती एक फौजेची सरदारी ठेविली.

इतके दिवस शिवाजी विजापुरचे राज्यांतमात्र उपद्रव करीत होता, मोंगलांचे वांटस गेला नाहीं. यापुढें सन सोळाशें सत्तावन्नांत मोंगलांचा ही राज्यांत उपद्रव करूं लागला. असें त्याचें धैर्य पाहून

रीतीस विपर्यास झाला.

१० सन सोळाशें छत्तिसांत मोंगल लोकांनीं दक्षिणेच्या बादशाहाशीं स्नेह केला, त्यापासून ते दक्षिणेंत उपद्रव न करितां आपल्या राज्याची बळकटी करीत होते. त्यांचा धनी औरंगजेब, तो दिल्लीचे बादशाहाचा पुत्र होता. त्याणें व्यापाऱ्यांस कांस हितावह आणि प्रजेस सुखकारक, असे नवे कायदे केले; आणि जे मलिकंबराने वसविलेलें खिडकी शहर त्याची राजधानी केली, तिचें नाव औरंगाबाद ठेविलें. परंतु तो युद्धनिपुण होता तेणेंकरून त्याचे मनास युद्धावांचून उगेंच राहणें अवडत नव्हतें; यास्तव त्याणें संधि पाहून गोवळकोंडचे सरकाराशीं कलह आरंभिला. तो प्रकार असा, सन सोळाशें पंचावन्नांत गोवळकोंड्याचा बादशाह कुतुभशाह याशीं आणि त्याचे वजिराच्या पुत्राशीं वितुष्ट पडलें होतें; तेव्हां त्या बादशाहानें कांहीं निमित्त त्यावर आणून त्यास शिक्षा दिली, म्हणून त्या वजीरास राग आला. त्याणें औरंगजेब बादशाह याचा आश्रय केला, आणि त्याचा पिता दिल्लीचा बादशाह शाहाजहान त्याजकडे फिर्याद केली. त्यावरून शाहाजहानानें कुतुभशाह याला निषेधपत्र पाठविलें. तेणेंकरून त्याला राग आला; आणि त्याणें वजिराचे पुत्रास कैद करून त्याचे पिते त्याचे दौलतीची जप्ती केली.

त्या वजीराचें नाव मीर जुमला, त्याचा परिचय सर्व मुसलमानी दरबारांत होता, तो पहिला जोहारीपणा करीत असे यास्तव हिरे इत्यादिक जवाहीर विकावयास मोठमोठ्या दरबारीं त्याचें जाणें घडे; शेवटीं तो आपले चातुर्य व द्रव्यसंपत्ति या दोहोंचे योगांहीं कुतुभशाह याचा वजीर झाला. त्याचे पुत्राचें नाव महंम

दआर्मीन.

जेव्हां औरंगजेब यास कळलें कीं, आपला पिता दिल्लीचा बादशाह, याची कुतुभशाह याणें अमर्यादा केली, तेव्हां औरंग जेब याणें तो अमर्यादेचा प्रकार विस्तृत करून शाहाजहानास विनंतीपत्र लिहिलें; त्यावरून बादशाह याची आज्ञा आली कीं, सैन्य तयार करून मीर जुमला याचा अंगीकार करावा. तेव्हां औरंगजेब याणें आपला पुत्र सुलतान महंमद, याज बरोबर फौज देऊन हैदराबादेस लग्नाचें मिष करून पाठविला; त्या मागून आपण मोठी सेना घेऊन त्याचे पाठीपाठ निघाला.

तो कुतुभशाह असें जाणत होता कीं, हा लग्नास येतो आहे मग जेव्हां हैदराबादेच्या दरवाज्या जवळ आला तेव्हां त्याला त्याचा वैरभाव समजला; तेसमयीं कुतुभशाह याणें तो वर्जीराचा पुत्र महंमद आमीन सोडिला, आणि त्याचे बापाचे दौलतीचा जप्ती उठविली; आणि त्याच वेळेस आपले सरदार यांस युद्धाचे कुमकेस बोलावणें पाठविलें. ते सरदार येऊन पोंचले नाहींतर तो सुलतान महंमद याणें हैदराबादबाहर लुटलें आणि त्या बादशाहास पीडा करून करार करविला कीं, आपली कन्या सुलतान महंमदास द्यावी, व खंडणीचा वार्षिक एक कोटी रुपये द्यावे. हें वर्तमान दिल्लीचा बादशाह शाहाजहान यास समजल्यावर, त्याणें मान्य करून वासलक्षमाफ करून ऐशीं लक्ष घेतले.

यानंतर सन सोळाशें छपन्नांत औरंगजेब व मीर जुमला हे दोघे एकचित्त होऊन मसलत करिते झाले कीं, विजापूर व गोवळ-कोंडे हीं दोन्हीं राज्यें मोगलांनें खालसा आणावीं. नंतर कांहीं दिवसां नीं मीर जुमला यास दिल्लीचे बादशाहानें बोलावून नेलें, आणि

आपल्या वजिरीचें काम सांगितलें, त्यापासून तो बादशाहाजवळ बोलत असे कीं, हीं दोन्हीं राज्यें आपल्या सत्तेंत असतीं, नें बोलणें बादशाह मानीत नसे. पुढें महंमद आदिलशाह विजापूरचा बादशाह त्याच वर्षाचे अकरावे महिन्याचे चवथे तारखेस मेला, तेव्हां बादशाह यानें तें मान्य करून विजापुरावर लष्कर योजिलें; त्यांत मीरजुमला मुख्य करून औरंगजेब त्या स्वारीस चालला. मग ते दोघे एकचित्त होऊन तो मीरजुमला औरंगजेबाचे आज्ञेंत वागूं लागला.

इकडे विजापुरीं महंमद आदिलशाह याचा पुत्र, अल्ली आदिलशाह तक्ताधिपति झाला. त्याणें दिल्लीचे बादशाहाचें अनुमोदन घेतलें नाहीं. त्यावरून मोंगल हा त्याचा पुत्र नव्हे असें लटकेंच निमित्त करून युद्धास गेले; अनें निष्कारण युद्ध कर्ते झालें नव्हतें.

ते मोंगल विजापुरीं येतात असें समजतांच त्याणें युद्धाची सिद्धता यथाशक्ति केली, परंतु अवकाश केवळ थोडा लागून मोंगलांचीं मैदानांत युद्ध करावयाजोगी फौज मिळाली नाहीं. यास्तव आपल्या नुकसाचे मर्यादेंत आणि वाटेवर अवघड अशीं जितकीं स्थानें होतीं तितक्या जागीं फौज पाठवून बंदोबस्त देविला. आणखी जे कांहीं घोडेस्वार उरले होते त्यांचा खानमहंमद सरदार मुख्य करून व दुसरे मुसलमान सरदार होते ते त्याजबरोबर देऊन त्यांस आज्ञा केली कीं, ज्यास्थळीं युद्धप्रसंग होईल तेथें तुम्हीं कुमक करावी. त्यावेळेस विजापूरकरांचे मराठे जहागीरदारांचे सेजीराव घाटगे व बाजी घोरपडे निंबाळकर वगैरे कित्ते एक फौजेसहित चढून कुमक करिते झाले.

त औरंगजेब पूर्वेने कर्नाटक विजापूरकरांचे मुलखांत शिरला आणि तत्काळ कालिकान् किल्ला घेतला, वळ्याचा विजापूरकरांस मोठा भरवसा होता, असा जो बेदर किल्ला तोही एकादि वर्षांत घेतला, नंतर कलबुरगा किल्ला एकाएकीं हल्ला करून घेतला. असा यवेश झाल्यानें औरंगजेब यास आनंद वाटला, परंतु जे विजापूरकरांचे लांर कुमकेस फिरत असत त्यांचाउपद्रव फार लागूं लागला तेव्हां त्यांणें जो विजापूरचा मुख्य कारभारी खान महंमद नामें सरदार होता त्याला कांहीं देऊन तो आपल्याशाकी प्रमाणें लढेनासा केला. त्या मुख्यार्चा वृत्ति पालटतांच दुसरे जे सरदार होते ने त्याचे कुमकेवांचून बळहीन झाले. तेव्हां तो औरंगजेब मोठ्या लवरेनें विजापुरास गेला, त्यामुळें तेथले लोकांस त्याला दाणापाणी मिळेनासें करावयास फावलें नाहीं. त्यांणें लागलाच शहरास वेढा घातलाआणि नोबे निकरा ने चुढ आरंभिले. तेसमयीं विजापूरकर त्यांचीं बहूत आर्जवा नें मऊयाची गोष्ट बोलूं लागले, परंतु त्या औरंगजेबाचे मनांत नें राज्य अगदीं बुडावयें असें होतें, यास्तव तो ऐकेना. इतक्यांत त्याची चढाण गेयनाग बेगम होती, तिणें दिल्लीहून पत्र पाठविलें कीं बादशहानेंच शाईस्ता खान असमाधान झालें, तो लेख पाहा तांच औरंगजेबानें त्यांपासून कांहीं द्रव्य घेऊन जो त्यांचा मुलूख घेतला होता तो त्यांचे स्वाधीन करून आपले फौजेसुद्धां विजापुरहून निघून माघारा दिल्लीस आला.

दिल्लीचा बादशाह् शाहाजहान याचे पुत्र चवघे. त्यांत एक बापाशीं दारा शेखोनामें होता; एक सुलतान सुजा, तो बंगाल्या चा सुभेदार होता; एक औरंगजेब; एक सुलतान मुरद, तो गु

जराधेचा तक्ताधिपति झाला. आपल्या बापाचा अंत झाला
वळ आला असें जाणून आपणास दिल्लीचें तक्ताधिपत्य मिळा
वें ह्मणून सैन्यें सिद्ध करिते झाले. त्यांत जो दाराशेखोनामें बाद्
शाहाजवळ होता, तो बापाची राक्षिक्षीण पाहून राज्यकारभार
आपण करूंलागला; तो स्वभावेंकरून सरळ होता. औरंगजेब
मोठा कपटी, तो मुसलमानांस कांस निरंतर असें समजावीत असे
कीं, आपले वडील धर्माचे कामांत सावधपणा ठेवीत नाहींत; मी
हें राज्य अशासाठीं इच्छितों कीं, आपला धर्म उत्तम प्रकारें चालवावा.
नंतर आपला भाऊ सुलतान मुराद यासही तसेंच समजाऊन
भुलथाप दिली कीं, तुम्ही व आम्ही एक चित्त असतां मी धर्म कर्ये
मात्र चालवीन. तें त्यास खरें वाटलें आणि दोघांनीं मिळून दारा शे-
खोशीं युद्धें करून किती एकवेळां त्याचा पराभव केला. शेवटीं तो
पराभंदा खाला. नंतर औरंगजेब याचे हातीं सांपडला. त्याणें तो
मारून टाकला. इतक्यांत बाहादर खान मनांधान पावला, त्याणें वारंवार
पुत्रांस आज्ञा केली कीं, तुम्ही आपआपल्यास स्थानीं जा, परंतु तेजाई
नात. शेवटीं औरंगजेब याणें सर्व भावंड्या हातीं आणून बापास
आपले जवळ बंदींत ठेविलें; आणि सुलतान मुराद याचें लश्कर घेत
करून घेऊन त्यास ही कैद केलें. तेव्हां सन सोळाशें अठ्ठावन्नांत तो
औरंगजेब दिल्लीचा तक्ताधिपति झाला. यानंतर त्याणें दक्षिणेहून
मीर जुमला यास बोलावून आणिलें. आणि दोघे मिळून जो जो
देश सुलतान सुजानामें तिसरा भाऊ त्याचे पाठीस लागले, तो पळू
न बंगाल्याचे पलीकडे आराकानांतीं गेला, त्यास तेथें कोणी दुष्टा
नें मारिलें. याप्रकारें औरंगजेब यास कोणी प्रतिपक्षी नाहीं असा
तो दिल्लीचा तक्ताधिपति झाला.

भाग पांचवा.

सन सोळाशें सत्तावनांपासून सोळाशें बासष्ट पर्यंत शाहिस्तीं सर्व वर्तनानें.

१ औरंगजेब ज्या वेळेस विजापूरकरांशीं लढूं लागला त्या वेळेस त्याला शिवाजीनें विनंतीपत्र पाठविलें कीं. मी मोंगलांचा चाकर आहें त्यास विजापूरकरांचा जो मुलूख मी घेतलेला आहे, त्याचे संरक्षणाविषयीं मला कृपा करून सनद द्यावी; तेव्हां औरंगजेबयानें त्यास तो मुलूख दिला; आणि आज्ञा केली कीं, दाभोळ व त्याखाल चा मुलूख दिल्लीच्या सरकारचा असून तेथें विजापूरकर उगेच तसा करितात, त्यास तोही मुलूख द्यावा. नंतर शिवाजीनें औरंगजेब याचें लक्ष दूर, आणि विजापूरकरांचें साहस गुंतलें. असें जाणून आपले स्वार पुंडाई करून वादवावे असा मनसोबा करून त्यानें सन सोळाशें सत्तावन्नांत मोंगलांचीं कुरिम केलें. नें असें, राजीस फौजेसहित एकाएकीं जाऊन जुंनर शहर अगदीं लुटलें; तेथून तीन लक्ष होन व दोनशें घोडे व कितीएक सोने मोठे अलंकार व कितीएक उंच उंच वस्त्रें इत्यादि संपत्ति घेऊन पुण्यास गेला, आणि तेथें त्याचे दुसरे लोक होते, त्यांजवळ ती सर्व दौलत देऊन राजगडास पाठविली. मग आपण चोरवांटेनें जाऊन अहंमदनगरास दाखल झाला. त्याची इच्छा अशी होती कीं, त्या नगरची पेठ सगळी एकाएकीं लुटून तेथील द्रव्य न्यावें. पण तो त्याचा मनोरथ पूर्ण झाला नाहीं; तरी त्यास लाभ मोठा झाला. तो असा, सातशें घोडे व चार हत्ती सांपडले, तितकेच घेऊन तो पळाला; कां

र्का, त्या किल्यांतून स्वार आले ते त्यांचे लोकांनशार मारून गले.

२ नंतर शिवाजीनें पुण्यास येऊन किती एक बारगीर व किती एक शिलेदार चाकरीस ठेविले; त्यांत एक शिलेदार नाम णकोजी दटोदा नामें त्याचे बापाचे चोळखाचा होता, त्याला सर नोबत पद दिलें; पुढें तो मेल्यावर नें पद मोठा धागदार नेटाजी पालकर नामें होता त्यास दिले.

यानंतर मोंगलांनीं विजापूरचें राज्य बुडिवलें म्हणजे पुढें आ पणास भय होईल, असें समजून शिवाजीनें औरंगजेबास बहू न आर्जवें करून विनंती पत्र लिहिलें कीं, निश्चय मी चा पुढें तुमचे आज्ञे बाहेर वागणार नाहीं; माझे अपराधांची क्षमा असावी. या- लेखाचे बळकटीसाठीं कांहीं बोलणें करावयाकरितां शिवाजीनें आपला परम विश्वासू रघुनाथपंत नामें वकील पाठविला; नंतर मों गलांनीं विजापूरकरांशीं सलूा केला, व शाहाजहानाचे शरीरीं समा धान नाहीं, असें वर्तमान कळल्यावर दुसरा वकील कृष्णाजी भास्क रनामें पाठविला. त्यानें बोलणें लाविलें कीं, आम्ही आपल्या चाक री करितां पुष्कळ स्वार जमा केले आहेत, त्यास जेवनचीं आपण बाहेर निघनाल तेव्हां आज्ञा झाल्यास आम्ही आपल्या मुलखाचा बंदोबस्त राखूं असी। चाकरी आमचे हातून घडली असतीं आम चीं पहिली तुमचे मुलखीं देशमुखी होतीनी आम्हासच्यावी. याखेरीजदुसरें असें समजाविलें कीं, कोंकणांत आदिलखान आहे त्याची वर्तणूक नीट नाहीं, त्यास तो जर मुलूख आमचे स्वाधीन होईल तर प्रजा सुख पावेल.

त्यावेळेस औरंगजेब आपले भावांशीं कलहास गुंतला होता,

म्हणून शिवाजीचें इतकें थटाईचें बोलणें कोहीं अन्यकार्यावर लक्ष देवून मान्य केलें, त्यावरून शिवाजीनें किताएक नवे लोक चाकरीस देवून ज्यांचा बंदोबस्त चांगला नव्हता असे समुद्रतीरचे किताएक किल्ले घेतले; तेथें कोहीं गलबतें बाळगून चांचेपणा करूं लागला.

त्यानंतर औरंगजेब जानेवर विजापूरकरांनीं दूर केलेले पायदळ पठाण लोक आले ते शिवाजीनें सातवीं चाकरीस ठेविले. त्या पूर्वी त्याणें कधींही मुसलमान लोक चाकरीस ठेविले नव्हते. ज्यांणें चंद्रराव मोऱ्यास मारिलें तो राघोबल्लाळ त्यांचा मुख्य सरदार केला: मग ते लोक त्याचे फार कामास पडले.

३ औरंगजेब निघून गेल्यावर विजापुरी मानकरी लोकांत वमनस्य पडलें होतें. ते सर्व मिळून जर शिवाजीचें बंड मोडिते तर तो प्रकार बरा होता, परंतु ते तर्फेनें आपआपल्यात एकमेकाचा नाशास प्रवृत्त जाले. तेथचा मुख्य वजीर खानमहंमद. त्याणें आपले धन्याचा घात केला, म्हणून तो आम्हास म्हणजे त्याचें पारिपत्य करणें असा त्या दरबारीं निश्चय ठरला होता. त्याप्रमाणें शिक्षा तीनानें करावी तीनशी केली नाहीं, त्याला अभय देऊन बोलाविलें, तो विजापूरच्या दरबाऱ्यांशीं येतांच त्याप्रमाणेंच ओढून मारिलें. अशी अव्यवस्था होण्याचें कारण अमंकीं, तेथचा तक्काधिपति अल्पवयाचा होता, आणि कारभारी लोकांत वैमनस्यें पडलीं होतीं.

४ शिवाजीचे मनांत होतें कीं, सारी कोंकणपट्टी घ्यावी, या स्तव त्याणें आपला रामराजे पंडित हिंदीचा मुलूख आवयासपा ठविला. त्यांवेळेस फत्तेखान नामें सिद्दी होता त्याणें लढून त्या मराठ्याचा भगदीं मोडुं केला. हें वर्तमान मनसोक्ताचें एकुणवन्ना

सांत चढलें.

हा शिवाजीचे फौजेचा पहिला मोड झाला यावरून त्याची उत्साह हरा क्कि क्षीण झाली.

त्याणें रामराजपंत पेशव्यास माघारें बोलावून नेलें, आणि त्याना अधिकार मोरो त्रिंमळ पिंगळे यास दिला; आणिज्यालोकांचा मोड झाला होता त्यांचे कुमकेस दुसरी फौज पाठविली. त्या मोडाचे पूर्वी वाडाचे सांवत यांणी शिवाजीचीचांगली तयारीव विजापूरकडेवळ आळशी असें पाहून आपण शिवाजीला मिळावें अशा मसलतीनें शिवाजीकडेच कौल पाठविला. तेव्हां असें ठरलें कीं, सांवतांची देशमुखी सोडून अर्धी वसूल शिवाजीनें घेऊन त्यांचें रक्षण करावें. असें ठरल्यावर ते सांवत यांस पुढें थोडकेच दिवसांनीं असें वाटलें कीं, आपण जें केलें तें ठीक नाहीं, म्हणून ते पहिल्याप्रमाणें विजापूरकरांचीं मिळाले.

जें दुसरें लश्कर मोड झालेल्या लोकांचे कुमकेस बरोबर रघुनाथपंत देऊन पाठविलें, तें पावसाळा येईतोपर्यंत जय पावलें नाहीं; नंतर ते लोक निघून आपले मुलखीं गेले.

६ येवढीं विजापूरचे दरबारांत असतां निश्चय झाला कीं, शिवाजीचें बंड अवश्य मोडिलें पाहिजे; तेव्हां त्यांनीं सैन्य सिद्ध केलें; तें असें, पांचहजार स्वार आणि सात हजार पायदळ, व किती एक तोफा, व किती एक जेजाला, व किती एक बाण, तयार करून त्यांवर कोणी एक मोगकुलीन आफूसुलखान नामें मुसलमान मुखत्यार केला. तो बादशाहाची आज्ञा घेऊन निघते समयीं आपले जातीचे गर्विष्ठपणानें बोलिला कीं, शिवाजी केवळ क्षुद्रजीव आहे, त्यास बांधून स्वामीचे सिंहासनाचे पा-

यरावर आणून टाकीन.

७ मग पर्जन्यकाळ गेल्यावर सन सोळाशें एकुणसाठांत तें लश्कर पंढरपुरावरूनवाईस आलें; तें शिवाजीला कळतांच तो प्रतापगडीं जाऊन राहिला, आणि तेथून वकील पाठवून त्या आफ्जुलखानाशीं फार गरीबाईचें बोलणें लाविलें. तें असें की, तुज सारिखा महापराक्रमी सरदार याशी माझी लढाईची शक्ति किती. जर तुमचे योगें करून बादशाह माझे अपराधांची क्षमा करील, तर मजवर मोठे उपकार होतील. त्यास हें सिद्ध झालें म्हणजे तुम्हाला मी आपला सर्व मुलूख देईन. तो आफ्जुलखान उन्मत्तपणा नें च आपणास राजकारभाराविषयीं दक्ष असें मानित होता, त्यामुळून शिवाजीचें ज्ञान गणित नसे; त्याला पूर्वी कांहीं दिवस वांई परगण्याची मामलत सांगितलेली होती, त्यावरून त्याला असें वाटूंन होतें कीं, हा मुलूख केवळ पराक्रमें करून घ्यावयास अवघड आहे; हीं सर्व कारणें आणि शिवाजीचें गरीबीचें बोलणें मिळून त्याचें मन कांहींसें प्रसन्न झालें. तेणेंकरून त्याणें गोपीनाथपंत नामें एक कारकून कांहीं बोलणें करावयाकरितां पाठविला, तो पारगांवास पोंचल्यावर शिवाजी त्याचे भेटीसाठीं किल्ल्यावरून खालीं उतरला, तेव्हां तो ब्राह्मण शिवाजीशीं बोलिला कीं, आफ्जुलखान शाहाजीचा इष्ट आहे तेणें तुमचा नाश इच्छित नाहीं: तुम्ही लढाई न करितां जर मुलूख द्याल तर तो बादशाहाकडून क्षमा करवील; आणि तुम्हाला कांहीं जहागीर देववील. ही गोष्ट शिवाजीचे मनास आली, तेव्हां त्याणें तो वकील व त्याजबरोबर दुसरे लोक यांचे संमानार्थ जाण्याचा वगैरे बंदोबस्त केला. यांत त्या कारकुनास त्या लोकांपासून कांहीं दूर वेगळीं राहावयास जागा दिली. असें करून रात्रीस कोणाला कळूं नदेतां, त्या रा

म्हणाकडे शिवाजी येऊन बहुत नम्रतेनें दंडवत करून बोलिलाकीं, तुम्ही ब्राह्मण आम्हा क्षत्रियांचे गुरु आहांत, त्यास मी आपणास विनंति करितोंकीं, मला भवानी प्रसन्न होऊन बोलिली कीं, तूं गाईब्राह्मण यांचा प्रतिपाळ कर. यास्तव मी जें कर्म करितों तें केवळ गाईब्राह्मणांच्या पालनार्थच करितों; त्यास जर तुम्ही मना अनुकूळ व्हाल तर तुम्हास आपले भावांत व सोयऱ्यांत सुखी म्हणवून राहावयास हिंवरें गांव जहागीर करून देईन. त्यावरून तो ब्राह्मणवश होऊन त्याणें शिवाजीला निष्कपटपणाविषयीं शपथ दिली. मग ते दोघे मनमान करूं लागले कीं, सांप्रत जें भय निर्माण झालें आहे याचें निवारण कसें करावें; त्यांत त्या ब्राह्मणाचे अटकळींत असें आलें कीं. आफ सुलखान यास शिवाजीनीं एकांतांत आणावयाचें अवघडलाही तेव्हां शिवाजीनें आपला वकील कृष्णाजी भास्कर त्या गोपीनाथपंता बरोबर आफ्सुलखानाकडे पाठविला. त्यांणीं त्यास असें सांगितलें कीं. तुम्हाला शिवाजी फार भितो, कदाचित् तुम्ही जाऊन जर त्याला अभय द्याल तर, तो विश्वासें करून आपले स्वाधीन होईल, आणि युद्ध न करितां सुलूख देईल

असें त्यांचें कृत्रिमाचें बोलणें आफसुलखानानें सत्य मानिलें. आणि गैर सावधपणानें त्या गोपीनाथपंतानें सांगितल्या प्रमाणें वागूं लागला. तेव्हां विजापूर करांचें लश्कर जावळीस गेलें होतें, तेसमयीं शिवाजीनें मोरोपंत व नेताजी पालकर व पुष्कळ मावळे लोक कोंकणांतून आणून प्रतापगड व जावळी या दोहों जागीं गुप्त ठेविले.

यानंतर आफ्सुलखान भेटीची तयारी करून बरोबर दोन हजार फौजे घेऊन प्रतापगडाजवळ आला. तेव्हां गोपीनाथपंतानें शिवाजी भिईल असें समजावून फौज मागें ठेविली. आणि एकटयाच वंटबरो

वर घेऊन एकटा आफसुलखान यास त्या हत्यारबंदासह भेटी च्या संकेताचे जाग्यावर नेऊन शिवाजी येतो म्हणून वाट पाहात बसविले.

इकडे किल्ल्यात शिवाजीनें स्नान करून नित्य नियम उरकू न तोरख्या चरणावर मस्तक टेकून आशीर्वाद घेतला, आणि आंगां न चिलखत चढवून त्यावर आंगरखा घालून आपले डाव्या हातीं वाघनखें घेऊ न आपण भेटीस निघाला. त्या वेळेवर त्याचा पुरातन विश्वासू शि- वाई नानाजी मालुसरा हत्यारबंद होता. नें भेटीचें स्थान जवळ आलें तेव्हां शिवाजी दबकत दबकत येऊं लागला. तेव्हां गोपीनाथपंतानें अंमलदारांसी सांगितलें की, तो तुमचे जवळच्या हत्यारबंदास भितो. काकी, त्या ची आकृति फार सुकुमार आणि लहान आहे, याकरितां हा एकीकडे ठेवणें बरें, त्यावरून त्याला अंमळसें दूर केलें. नंतर शिवा जी व अफजुल्लखान एकमेकास भेटतां भेटतां शिवाजीनें आफजुल्ल खानचें डोकें वाघनखें खुपसलीं, तीं बळकट लागलीं. परंतु तो आ फजुल्लखान लगेच त्यापासून दूर होऊन तरवार उपसून शिवाजीवर वार करून आंत घात आहे, असें बोलिला. त्याच वेळेस शिवाजीनें त्यास आपल्या अस्तनींतला बिचवा काढून मारिला, तेव्हां तो भूमी वर पडला. त्यानें जो शिवाजीस वार केला तो त्याचे चिलखतामुळें लागू झाला नाहीं. इतकें सर्व एकाक्षणांत झालें. तों त्या आफजुलखा नाचे बरोबर आलेला हत्यारबंद मयदबंधू नामें होता. तो आपल्या धन्याजवळ आला, इतक्यांत त्याचे हातची तरवार शिवाजीनें घेतली; आणि तो नानाजी व शिवाजी हे दोघे त्या एकट्या बरोबर लढूं लाग ले. तें त्यास शिवाजीनें बोलिलें कीं, तुला जातां आतां आम्हांसीं युद्ध

देतों, परंतु त्या बोलण्याचा धिक्कार करून तो त्यांणीं लढून नेला. अशा तो आपल्या धन्याचा अभिमानी परम योग्य समजून त्याचेला वलिढिलें. तो मृत्यु पावला तेसमयीं शिवाजीचे लोकांनीं येऊन त्या आफसुलखानाचें शिर काढून किल्ल्यावर नेलें.

तें शिर किल्ल्यावर नेतांच संकेताप्रमाणें तोफेचा वार केला, तो वार होतांच एकाएकीं प्रतापगडचे व जावळीचे लोकांनीं येऊन आफसुलखानाचे लश्करावर छापा घातला. तेव्हां त्या लश्कराचा बहुत नाश जाला त्यावेळेस शिवाजीला चार हजार घोडे व कांहीं हत्ती व कांहीं उंटें आणि बहूत द्रव्य व तोफा व जेजाला वगैरे मुबलक सरंजाम सांपडला.

अशा अधर्मेकरून वैभव संपादन केलें असतांही त्याचे जवळचे लोकांनीं त्याची प्रशंसा केली, त्यांणीं धर्माधर्माचा विचार चित्तांत आणिलाच नाहीं. त्या छाप्यांत कितीएक लोक धरून नेले, त्यांतून जे कोणी गेले त्यांस दुःख नदेतां शिवाजीनें जाऊं दिलें. त्यांत एक मुसा र राव घाटगा यानामें सरदार मोठा कुलीन होता त्याचें आणि शिवा जीचें इष्टत्व होतें, त्याणें गाढावें म्हणून शिवाजीनें फार आग्रह केला, परंतु तो ऐकेना, तेव्हां त्याचा मोठा संमान करून त्याला बादशाहा कडे जाऊं दिलें.

या खेरीज त्या धरलेल्या लोकांत आफसुलखानाची स्त्री व पुत्र हीं सांपडलीं. तीं एक शिवाजीचा सरदार खंडोजी कांकडानामें असे, त्याचे स्वाधीन होतीं. त्याणें त्यांपासून कांहीं लांच घेऊन तो डून दिलीं; यास्तव शिवाजीनें त्या कांकड्याचें डोकें मारिवलें.

त्या लढाईंत जे जखमी झाले त्यांचा शिवाजीनें मोठा संमान करून त्यांस कितीएक अलंकार नवीं दिलीं. या योगेंकरून त्यांची

मोठी कीर्ति झाली, आणि त्रिपाईलोक युद्धाविषयीं तत्पर झाले.

अद्यापि शिवाजीचे पुरुष त्या आफूसुलखानाचे तरवारेस अ मे.लोकनातून फारजपतात.

तो गोपीनाथपंत दगा केलेला त्यास संकेताप्रमाणें शिवाजीनें हिंवरें गांव देऊन त्याचा मोठा संमान केला. आणि सरदारीचा अधिकार देऊन आपल्या चाकरीस ठेविला.

८ यानंतर शिवाजीनें पन्हाळ्याचा किलेदार वश करून तो किल्ला घेतला. नंतर कृष्णेचे उभय तीरची खंडणी घेत चालला; या खेरीज कोंकणचे वसया द्रोवरचे किनीएक किले त्यास लढाई न करितां त्या लोकांनीं दिले; परंतु रांगणा व खेळणा हे दोन किले युद्ध करून घेत ले; त्या वेळेस त्या खेळण्या किल्ल्याचें नाव विशाळगड पडलें, तें अद्यापि तसेंच चाललें आहे. हें वर्तमान सन सोळाशें एकुणसाठांचे बारा वे महिन्यांत विजापुरीं कळलें, तेव्हां त्या बादशाहानें आपला सरदार मिरजेस रुस्तुमजमान नामें होता त्यास आज्ञा केली कीं, कोल्हापूरचे बंदोबस्तास निघावें, तेव्हां त्याजबळ नऊन हजार स्वार आणि कांहीं तें पायदळ मात्र होतें. तो पन्हाळ्याजवळ येतांच शिवाजीनें आपले स्वार जमा करून त्याचा अगदीं पराभव केला, आणि कृष्णेच्या पार घालविला.

यानंतर पायदळ आणून शिवाजीनें विजापूर पर्यंत खंडणी घेतली, आणि अति त्वरेनें माघारा विशाळगडास गेला. असा कीं, ज्याचे पाठीस कोणी सरदार लावावयास अवकाश झाला नाहीं.

९ त्यानंतर सन सोळाशें साठांचे पहिले महिन्यांत शिवाजीनें कोंकणांत समुद्रतीरीं राजपूर व दाभोळ हीं दोन्हीं स्थानें लुटून बहुत द्रव्य राजगडास नेलें, हें मात्र शिवाजीचें कृत्य विजापुरीं कळल्यावर

नेथंचे दरबारीलोकांत जें पूर्वी वैमनस्य पडलें होतें तें मोडून सर्व एकचित्त होऊन कर्नाटकांत कर्नोळास एक जोहर नामें शिद्दी मोंगा विख्यात पुरुष होता, त्याजबरोबर आफसुलखानाचे दुप्पट फौज देऊन शिवाजीचे पारिपत्यास योजिला. तेथें असें ठरलें होतें कीं. आधीं पन्हाळा किल्ला घ्यावा, मग तो शिवाजी चे जवळ पोंचतांच दंडाराजपुरीचा फत्तेखान शिद्दी व वाडीचा सांव त या दोघांनां जोहर शिद्दीचे कुमकेस यावयास आज्ञा करावी.

इकडे शिवाजीनें कोंकणांत बंदोबस्तासाठीं राजपुरीचे शिद्दीवर रघुनाथपंत योजिला, आणि कालियानी व भिंवडीयां चे संरक्षणार्थ आवाजी सोनदेव नेमिला; आणीक वाडीच्या सांवंतावर बाजी फसलकर त्रिनोबत हा पाठविला. मोरोपंतया स देशांत सिंहगड व पुरंदर व प्रतापगड यांचे बंदुलखाचे रक्षणा र्थ आज्ञा केली. आणि पन्हाळा किल्ला हा असा मजबूद कीं, कोणा चे हातीं लागावयाचा नाहीं, असें समजून तेथें आपण मोठ्या बं दोबस्तानें राहिला.

त्या शिवाजीनें विजापूरकरांचें लश्कर येत असतां वाटेनें त्यास कांहीं उपद्रव केला नाहीं; मग जेव्हां तें अगदीं जवळ येऊन पडलें, तेव्हां नेटाजी पालकर याजबरोबर स्वार देऊन त्या लश्करा सभोंव- तालच्या मुलखास्यां या घालून लुटून ओस पाडून त्या लश्करास धा न्यादि मिळेनासें केलें; आणि रात्रीस किल्ल्यांतून मावळे लोक कुम केस पाठवून छापा घालवी. अशा प्रकारें त्या लश्कराचा फारनाश केला. शेवटीं त्या शिद्दी जोहरानें आपल्या लश्करांत अशी आज्ञा केली कीं, असें क्रूरकर्म करणारा जो तो सांपडला असतां त्याला जिवंत न देतां मारावा. आणि किल्ल्यास वेढा असा घालवा कीं, अगदीं दु

मध्याचा प्रवेश होत नव्हता. असे चार महिने राहिले, तेव्हां शिवाजी सअंत मनजे कीं, माया किल्ल्यावर राहिलों हें ठीक न केले कीं, आतां आपल्यास पळावयास वाट नाहीं, व मुलखांत काय होतें आहे तें मनजत नाहीं; त्यास आतां कसा तरी आपला जीव वांचेल अशी युक्ति करावी.

१० इकडे चार महिने झाल्यावर त्या वेढा घालणाऱ्यांस असें वाटलें कीं, आतां शिवाजी आपल्या हातीं लागला; तेणेंकरून त्यांस च ढून आनंद झाला, आणि अत्यंत सावधपणानें बंदोबस्त करूं लागले.

जो शिवाजीचा मुलूख कोंकणांत होता तेथें तेसमयीं जागोजाग युद्धें होत होतीं. फत्तेखान शिद्दीनें कितीएक वेळां रघुनाथपंताचा पराभव करून लढाऊ गलबतें बाळगून त्याचे मुलखांत जाऊन कितीए-कजागीं उपद्रव केला.

या खेरीज वाडीचे सांवतांचीं बाजीराव फत्तेलकर लढाई करीत होता; ती लढाई अद्यापि चालली कीं, दोन्हीं लष्करांचा सारखा नाश झाला, आणि दोहोंकडेचे दोघे मुख्य सांवत व फत्तेलकर हे पडले.

शिवाजीचे मनांत आलें कीं, आतां आंतच राहून मरावें हें योग्य नाहीं, कसें तरी बाहेर पडावें; म्हणून शिद्दी जोहरास निरोप पाठविला, कीं, जर माझे जिवास भय नसेल, तर मी तहाचें बोलणें करावयासयेतों. मग त्याचे अभयवचन ऐकून बरोबर थोडकीं माणसें घेऊन संध्याकाळचा थोडा दिवस असतां शिवाजी किल्ल्याखालीं उतरला, तो जेथें शिद्दी जोहरचे शिपायांनीं मोर्चा बांधिला होता, त्याजवळ त्या शिद्दी जो

---

* मराठीलोकांत अद्यापि असा विश्वास आहे कीं शिद्दीलोक वचनाचे पक्के असतात.

हरची व शिवाजीचें भेट झाली. नंतर त्या दोघांचे बोलणें झालें त्यावरून लोकांस असें वाटलें कीं, आतां शिवाजी युद्ध करीतना हीं, तो तर ओलतां बोलतां युक्तीनें बऱ्हाणेक मोठीं मोठीं कलमें बोलून कांहीं हलकीं कलमें राहिलीं तीं युक्तीनें समंपवितां आतां संध्याकाळ झाला ज्यां बोलेन असें समजावून माघारा किल्ल्यावर गेला. तेव्हां ते वेग चालणारे लोक असें समजले कीं, आतां किल्ला हस्तगत झाला, त्यास इतःपर बहुत सावधपणा राखण्याचें कारण नाहीं, त्यावरून ते असावध गाफिले.

तो त्यांची असावधता पाहून बरोबर मावळे लोक घेऊन रात्री संधारांतच निघून किल्ला उतरून त्या लोकांस कळूं न देतां रांगण्या कडे पळाला. तो बहूत दूर गेल्यावर लोकांस समजलें, तेव्हां त्याचेपाठीं लागून त्या शिद्दी जोहराचे स्वार व पायदळ लोक धांवले, त्यांणीं रांगण्याचे आलीकडे तीन कोस सुनारें एकेखिंडींत चहूंकडांना पाहिलें, तेव्हां त्याणें ही त्यांस पाहिलें. मग त्याखिंडींतच मावळे लोक ठेवून त्यांस सांगितलें कीं, मी जोंपर्यंत किल्ल्यावर जाऊन तोफांचे बार पांच करीन, तोंपर्यंत तुम्ही हे येताहेत यांचीं येथूनच लढत असावें; त्या वेळेस त्या मावळ्यांचा मुख्य बाजी परभू यास करून आपण किल्ल्यावर गेला.

नंतर त्या लोकांशीं तो परभू दोन प्रहरपर्यंत मोठ्या शौर्यें करून लढला. त्याणें कितेक वेळां त्या मोंगलांस हटविलें. शेवटीं दुसरी मोगलाई जमा झाली, तेव्हां फार मोठें युद्ध झालें. त्यांत ते मावळे लोक अर्धे पडले, आणि तो परभूही पडला. तेसमयीं त्याणें किल्ल्यावरचे तोफांचे पांच बार ऐकिले, आणि बोलिला कीं, आतां मी सुखी झालों, इतकें करून प्राण सोडिला. हें सर्व वर्तमान विजापूरचे बादशाहास कळलें

तेव्हां त्या शिद्दीजोहरा विषयीं त्याचे मनांत वांकडें येऊन तो रागें भरला. कांकीं. त्यास असें वाटलें कीं, याणें कांहीं लाच घेऊन शिवाजीला सोडून दिलें. मग संन सोळाशें एकसष्टांत नां बादशाह आपण आंगें सैन्य घेऊन कल्हाडास आला; तेथें जे कोणी सभोवतें संस्थानीलोक होते त्यांणीं त्याचे सेवेंत तत्पर असून असें समजाविलें कीं. आलान शिवाजीचा पक्ष किमपि नाहीं. तो शिद्दीजोहर बादशाहाचे भेटीस आला, त्याणें बादशाहाचे मनांतील संशय उडिवला, आणि आपण आपल्या ठिकाणीं कर्नेळास गेला.

९१ मग त्या बादशाहानें रंगणा किल्ला व विशाळगड या दोहों किल्ल्यांवरीज शिवाजीचा पन्हाळा व त्या संबंधीं कितीएक किल्ले घेतले. पुढें पर्जन्यकाळ जवळ आला तेव्हां तो फौजे सहित कृष्णेचे काठीं चिमलगें वाहरीं जाऊन राहिला. तो शिवाजी बादशाहाचे सन्मोर कधींही लढला नाहीं परंतु कांहीं मधिघाहून संन सोळाशें बासष्टांत त्याणें राजापूर लुटून तेथें कोणी इंग्रेजलोक व्यापारी राहात होते ते धरून नेऊन कैदेंत ठेविले.

९२ त्यानंतर शिवाजीनें श्रृंगारपूर युद्ध करून घेतलें. तेथें दळ वेनाचें एक पाळेगार होता तो युद्धास पडला. या प्रसंगें शिवाजीनें हिं दूचीं दोन ठिकाणें घेतलीं, एक जावळी व एक श्रृंगारपूर नें हिंदुलोकांस फार अयोग्य वाटलें; यास्तव तें लोकांचे मनांतलें जावें म्हणून शिवाजी केवळ धार्मिकपणा करूं लागला. तो भवानी, आपणास तुळजापूरचे भवानीचे दर्शनास जावयास फावेना म्हणून प्रतापगडास मोठ्या समारंभानें देवीची स्थापना केली, आणि गागराभट्ट नामें एक, महा साधु ब्राह्मण होता. तो गुरु केला. अशीं हीं दोन कारणें, आणि तिसरें कारण असें. श्रृंगारपूरचे राहाणारे सूर्वे या नांवें

मराठे होते ते यश करून घेतले. त्या मुळें जे शृंगार घूरचे गहाणारे लोक होते ते शिद्दीच्या मुलखांत राहावयास गेले नाहींत, तेथेंच राहिले.

मग करनाटकांतीकिती एकजागीं बंडें उत्पन्न झालीं, तेणें करून विजापूरचे दरबारांत असा विचार पडला कीं,आधीं शिवाजी चें पारिपत्य करावें किंवा त्या बंडाचे पारिपत्यास जावें. इतक्यांत वाडी कर सांवतांनीं लिहून पाठविलें कीं, आम्हाला तुमची कुमक असेल तर आम्ही शिवाजीला जिंकूं; त्यावरून असा निश्चय ठरला कीं,बादशाहानें फौज घेऊनकर्नाटकांत जावें,आणि बाजी घोरपडा मुधोळकर व बालोळखान मुसलमान या दोघांहीं सांवंतांचे कुमकेस असावें. तेव्हां बादशाह कर्नाटकांत चालिला, इकडे शिवाजीवर जाणारांची तयारी होऊंलागली. तेसमयीं बाजी घोरपडा आपल्या कांहीं कामानिमित्त आपले ठिकाणीं गेला, हें वर्तमान कोणी शिवाजीस सांगितलें, ते ऐकतां च तो शिवाजी कांहीं लोक बरोबर घेऊन मोठ्या त्वरेनें चोर वाटेनें जाऊन अकस्मात् मुधोळ शहरीं पोंचला. तेथें छापा घालून तो मुधोळकर व त्याचे कितीएक भाऊबंद व कितीएक शिपाई लोक ठारमारून गांव जाळून टाकिलें, आणि लवकर निघून विशाळगडीं माघारा गेला.

१३ इकडे बादशाह करनाटकांतजाऊन रायचूर व दुर्गळ हीं दोन्ही ठिकाणें घेऊंलागला, तेथें शिवाईलोक होते त्यांनीं मोठ्या शौर्यें करून लढाई केली, आणि त्या बादशाहानें ही मोठा पराक्रम करून तीं स्थानें घेतलीं. हें वर्तमान सेन सोळावें वासष्टांत घडलें, त्या शिद्दीजोहरासबा दशाहाचें भय पडलें. तें असें, तो समजला कीं,बादशाहाचे मनांत माझे विषयीं संशय आहे. त्या स्त्या चा विश्वास धरून ये. असून त्याणें बंडाचा

आश्रय केला. नंतर त्याणें अशी संधि पाहिली कीं, हुसेन राव घाटगे व फलटणचे राव नाईक निंबाळकर या दोघांचें लश्कर बादशाहाचे लश्करापासून दूर आणि त्या दोहों लश्करांमध्यें तुंगभद्रा नदी आहे, इतकें जाणून एकाएकीं जाऊन त्या लश्करावर छापा घालून मोठी धुंदी ई करून त्या लोकांस पिटून लाविलें; इतक्यांत तो बालोळखान नवें सैन्य कुमकेस घेऊन माघारां उलटला, आणि त्या शिद्दी जोहराच्या सैन्याचा नाश केला.

नंतर ते शिद्दी जोहराचे लोक आपल्या जिवाच्या रक्षणार्थ बादशाहानें क्षमा करावी म्हणून आपला धनी शिद्दी जोहर ठार मारिला, त्या योगें करून तिकडचें बंड बहुतेक मोडलें, परंतु त्याची समाप्ति व्हावयास दोन वर्षे लागलीं. तोंपर्यंत बादशाह तेथेंच होता, नंतर विजापुरीं आला, तरी त्यांतील कांहीं कामें राहिलीं.

बादशाहाचें लश्कर कर्नाटक प्रांतांत बंड मोडावयास गुंतलें तेणेंकरून शिवाजीला मोठा उपयोग साला. तो असा कीं, त्या बादशाहानें जे सरदार शिवाजीवर नेमिले होते त्यांस ही त्याला आपल्या कुमकेस बोलावून बंडाचे बंदोबस्तास न्यावें लागलें. नंतर शिवाजीनें जाऊन वाडीचे सावतांचा मुलूख घेतला. तेवेढेस सावंत पळाले, त्यांणीं गोंव्याचे पोर्तुगीस लोकांकडे जाऊन त्यांचा आश्रय केला; परंतु शिवाजीनें त्या लोकांस भय दाखवितांच त्यांणीं त्यांस हांकून दिलें. मग सावंत शिवाजीला शरण गेले, ते समयीं शिवाजीनें त्यांचे देवामुखीचें वतन त्यांस दिलें; तेव्हांपासून ते शिवाजीचे चाकर झाले.

१४ त्यानंतर शिवाजीनें रेडी व सिंधुदुर्ग ज्यास मालवण असें म्हणतात हे दोन किल्ले बांधिले आणि कुलाबा व सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हे किल्ले मारले. आणखी [illegible] गलबतें केलीं, तीं

पुष्कळ झाली, तेव्हां त्यांचें ठेवण्याचें मुख्य ठिकाण कुलाबा, जो मुंबई चे दक्षिणेस बारा कोसांवर आहे तो केला; आणि त्यांचे मुख्य सरदार दोन केले, एक दर्याविसागर आणि एक मैनाक भंडारी. ते फार चांचेपणा करीत असत, त्यांच्या उपद्रवास भिऊन गोव्याचे पोर्तुगीस लोकही त्यांस तोफा वगैरे किनीएक युद्धाचे उपयोगी पदार्थ देऊन त्यांशीं इष्टत्व राखीत. असें झाल्यावर विजापुरचे बादशाहा चा वजीर अबदुल महंमद याणें शिवाजीचीं गुप्तपणें तहाचें बोलणें लाविलें; त्यांत वारीक गोष्टी कायकाय होत्या त्या आतां समजत नाहींत; परंतु असें दिसतें कीं, त्याचा घटक शिवाजीचा बाप शाहाजी असेल; कां कीं, तेसमयीं शाहाजीनें करनाटकांतून बादशाहाचा निरोप घेऊन वरोवर पुत्र व्यंकोजी घेतला, आणि मोठ्या समारंभानें तो शिवाजीचे भेटीस आला मग दोन महिने राहून बहूत आनंद करून किनीएक अपूर्व पदार्थ शिवाजीपासून घेऊन ते त्याणें बादशाहा चे भेटीस नेले.

त्या दिवसापासून शाहाजी जीवंत होता तों पर्यंत बादशाह आणि शिवाजी यांची परस्पर प्रीति होती.

५५ शाहाजीची व शिवाजीची भेट झाली त्याच सुमारें शिवाजी राजगडाहून निघून रेडी किल्ल्यावर राहावयास गेला. त्या किल्ल्याचें नांव बदलून रायगड असें दुसरें ठेविलें; तेथें राजकारभाराचे उपयोगी होतील्या बांधिल्या, आणि मोठी मेहनत करून तो अगदी मजबूद केला कीं, कोणाचे हातीं लागूं नये.

१६ त्यावेळेस शिवाजीचे मुलखाची मर्यादा इतकी होती कीं, कल्याणी पासून गोव्या पर्यंत कोंकणपट्टी, आणि भीमेपासून पार पर्यंत घाटमाथा, त्याचे मुलखाची विशेष रुंदी मुंबापासून जंजि

या पर्यंत होती. तो पुंडाई करी लणून त्याचें थोडकें राज्य अमून त्याजवळ फौज फार असे. त्याचें पायदळ पन्नास हजार होतें, आणि सात हजार स्वार होते. असा तो शिवाजी पराक्रमी जाला, यास्तव विजापूर करांनीं त्याशीं इष्टत्व केलें, तेणेंकरून तो अंमढसा रिकामा जाला; ह्मणून त्याचे मनांत आलें कीं, आतां मोंगलांशीं युद्ध करावयाची मसलत करावी.

भागसाहावा.

सन सोळाशें बासष्टापासून सत्यासष्टपर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ शिवाजीनें मोंगलांस जिंकावया करितां मोठें सैन्य जमा केलें, त्यांत पायदळाचा सरदार मोरोपंत केला आणि नेटाजी पालकर त्यांचा सरदार केला. त्या मोरोपंतानें पर्जन्यकाळीं जुन्नरचे उत्तरेकडचे कितीएक किल्ले घेतले. मग पाऊसकाळ गेल्यानंतर मार्गशीर्ष लागल्यावर नेटाजी पालकर हा स्वारांसहित औरंगाबादेपर्यंत मोंगलांच्या मुलखांत जाऊन मोठी लुटालूट करून बहुत द्रव्य घेऊन माघारा पुण्यास गेला. तो त्या मुलखांत कोठें ही एकेठायीं वस्ती करीत नसे, वाटेनें ही सरळ मार्ग सोडून वांकडे तिकडे आडमार्गें करून भलत्या गांवाहून भलतेच गांवीं जावें असें करीत फिरत असे. तेणेंकरून मोंगलांचे सरदारांस त्याला धराव्यास अंवका ढा सांपडला नाहीं. ह्मणून तो ही सर्व लूट घेऊन स्वस्थपणें पुण्यास

पोंचला. हें वर्तमान सन सोळाशें बासष्टांत झालें.

२ त्या वेळेस दक्षिणेंत शाइस्तेखान नामें मुसलमान सुभेदार होता, त्यास दिल्लीचा नक्ताधिपति जो औरंगजेब बादशाह त्यानें आज्ञा केली कीं, शिवाजी फार अमर्याद झाला आहे, त्यास तूं त्याचे मुलखांत जाऊन तो मुलूख बलात्कारें करून घे. तेव्हां तो शाइस्तेखान मोठें सैन्य जमा करून औरंगाबादेहून निघाला. त्यानें अहंमदनगर व पेरगांव यांवरून येऊन पुणें शहर घेतलें.

३ त्यानंतर तो जुनर किल्ला घ्यावयास निघाला, त्या वाटेवर लहानसा चाकणचा किल्ला होता तो पाहून त्यास असें वाटलें कीं, हा लहान किल्ला आणि माझें येवढें मोठें सैन्य आहे, यास्तव येथले लोक भिऊन मला किल्ला देतील; परंतु तेथचा किल्लेकरी फिरंगोजी नरसाळा नामें मोठा शूर असे, तो सोळा वर्षे तेथचा अधिकार मुख्यत्वें करून करीत होता, तो किल्ला देईना. तेव्हां तो शाइस्तेखान आपल्या सैन्यासुद्धां दोन महिने त्या किल्ल्यासीं लढला, तरी किल्ला आला नाहीं. तेव्हां ईशानी दिशेचे बुरजाखालीं सुरुंग पाडून तो बुरूज उडविला. उडतांच त्या मोंगलांनीं मोठा हल्ला केला, आणि एकाएकीं धांवले; परंतु तो फिरंगोजी व त्याचे लोक मोठे पराक्रमी त्यांणीं त्या मोडक्या बुरजाचे शिखरावर चढून किती एक वेळां त्या मोंगलांस मागें हटविलें, याप्रमाणें युद्ध दिवस मावळे तोपर्यंत झालें. नंतर रात्रीस ते मोंगल लोक लुटनातून गेले, तेव्हां किल्लेकरी सहजच उगे राहिले. मग दुसरे दिवशीं फिरंगोजीनें आपल्या सोबत्यांनें किल्ला दिला. असें त्याचें शौर्य पाहून शाइस्तेखानानें त्यास आपल्या चाकरीस ठेवावयास फार आग्रह केला, परंतु तो राहीना यास्तव त्याचा मोठा सन्मान करून त्याला जाऊं दिलें. तो जाऊन शिवाजीला मिळाला, तेथें त्यानें फार

नान होऊन त्याची योग्यता वाढली.

५ त्या षाइस्तेखानाला चाकणचा किल्ला घ्यावयास इतके श्रम साले त्यावरून त्याचे मनांत आलें कीं, डोंगरी किले फारऊंच आणि मोठे कठीण, ते आमचे हातीं कसे लागतील. म्हणून त्याणें औरंगजेबास लिहून पाठविलें, त्यावरून ही त्याला तें काम मोठें कठीणसें वाटलें नाहीं; कांकीं, तो मराठी लोक कांस केवळ अप्रयोज कमानी. तथापि त्याणें जोधपूरचा राजा यशवंत सिंग रजपूत यास पाठविल्याचे कुमकेस सैन्यासुद्धां पाठविलें. तो येऊन पोहचे तों पर्यंत खानाचें लष्कर पुण्याजवळ उगेंच पडलें होतें. इतक्यांत ने ताजीखानकरानें औरंगाबादे जवळचाव अहंमदनगराचे भोंवताल का मुलूख मातवून लुटून जाकून ओस पाडला; परंतु त्याला प किल्याघ्यावयास फावलें नाहीं. कांकीं, मोंगलांनीं त्यास पिटून लाविलें, तेव्हां त्याचे कितीएक स्वार पडले आणि त्याला ही जखमा लागल्या. तें मोंगलांचें लष्कर जेव्हां समीप आलें तेव्हां शिवाजी राजगड सोडून सिंहगडास गेला; तेथें त्याजभसें वर्तमान कळलें कीं, षाइस्तेखान पुण्यामध्यें जी हवेली दादोजी कोंडदे वानें जिजाबाईस रहावयाकरितां बांधलेली आहे, तींत राहिला, तेव्हां त्याला धरून न्यावयाची मसलत करूंलागला. तो षाइस्तेखानही शि वाजी येथून जवळ आहे त्यास तो कोणेवेळेस घात करील न कळे, असा संशय धरून पुण्यामध्यें परवानगी खेरीज कोणी मराठे फुंदेत नसे. मग कांहीं निद्रा करून सन सोळाशें त्रेसष्टाचे चवथे महिन्यांत शिवाजी पंचवीस मावळे लोक बरोबर घेऊन मोठ्या युक्ती ने पुण्यांत कोणी एका मनकऱ्याचें लग्न होत होतें, त्याचे सोयऱ्यांत मिसळून शहरांत शिरला. नंतर रात्रीस हळूच जाऊन त्या हवेलीचे

माडीवर एक स्वयंपाक घर होतें त्याची एक खिडकी फोडून आंत गेला. तो फोडीत होता तेव्हां त्या षाइस्तेखानाच्या बायकांनीं ऐकिलें, त्यांहीं त्यास कळविलें. तें ऐकतांच तो षाइस्तेखान दुसऱ्या एका खिडकीला दोर लावून त्या दोरावरून उतरूं लागला. इतक्यांत शि वाजीनें तेथें जाऊन त्यास तरवारेचा वार केला, तेणें करून त्याचें एक बोट मात्र तुटलें, आणि तो वांचला गेला. मग त्याचा पुत्र अबुलफत्तेखान व त्याचे जवळचे कोणी शिपाई होते ते शिवाजीनें जिवें मारून टाकिले. तो असा नाश करून त्या मावळेलोकांसहित तेथून निघाला; त्याणें वाटेंत कितीएक शिपाई लोक ठेविले होते ते त्यास मिळाले. मग ते लोक पुण्यापासून दोन कोसांवर जाऊन आप णास मोंगलांचें भय नाहीं असें लोकांस कळवाया करितां चुऱ्या पेट वून सिंहगडावर गेले. मग दुसरे दिवशीं सकाळीं ते मोंगलांचे स्वार तरवारा चमकावीत आणि नगारा वाजवीत त्या किल्ल्याजवळ आले. त्यांस अगदीं जवळ येऊं दिलें; मग एकाएकीं किल्ल्यावरून तोफांचा भडिमार करून त्यांना फार घाबरें करून माघारें हटविलें. त्यांत एक कार्टेजी गुजरनामें शिवाजीचा सरदार होता, त्याणें फारच पाठ घेतली, आणि ते दूर पिटून घालविले.

५ या शिवाय आणखी कितीएकावेळां पराभव झाले तेणेंकरून तो षाइस्तेखान उदास चित्त होऊन त्याणें केवळ अप्रयोजकपणें औ रंगजेबास पत्र पाठविलें कीं, यशवंतसिंग फितुरी झाला आणि न- वकरीलोकांची वर्तणूक बिघडली. त्यावेळेस तो काश्मीरास जाण्या ची सिद्धता करीत होता, ते समयीं त्याला खानाचा पराभव आणि यश वंतसिंगाशीं वैमनस्य पडलें असें समजले. तेव्हां तो औरंगजेब दिल्लीस होता, त्याणें खानास मायेमनानें मसलत मानहोता

तो दक्षिणेचा सुभेदार करून पाठविला, त्याचे हाताखाली यशवंत शिंगाने वागावें असें केलें; आणि वाइस्तरखानास बंगाल्याची सुभेदारी मागितली.

त्यानंतर यशवंत शिंगाने सिंहगडास घेरा घालावयाचा थोडा सा उद्योग केला, परंतु तो डोवटास गेला नाहीं. मग ते मोंगल लोक कांहीं मोठीं मोठीं पतकें चाकणेस व जुंनरास ठेवून सारें लवकर घेऊन औरंगाबादेस गेले.

६ त्या दुष्टें शिवाजीनें कालियानीजवळ व दंडाराजपूरी पाणीलस्करें जमा करून बाह्यात्कारीं असें दाखविलें कीं, पोर्टुगीस लोकांचा वसई किल्ला व चौल घेणार; परंतु त्याच्या मनांत सुरत लुटावयाची होती. तेसमयीं तेथें बहुत संपत्ति होती, त्या योगास्तव त्याणें बहिर्जी नामें एक जासूद पाठविला होता, तो सर्व मराठे लोकांत प्रसिद्ध होता.

याप्रमाणें तयारी करून शिवाजी निघाला तो उत्तरेकडे जाऊं लागला. तेसमयीं लोकांत असें दाखविलें कीं, आपण देवदर्शनार्थ नाशिकास जातों, त्यावरून लोक कल्पना करूं लागले कीं, तो दुगाच देव दर्शनास जातो आहे. इतक्यांत एकाएकीं चार हजार स्वारासहित तो सुरतेस जाऊन दाखल झाला. तेथें कांहीं मोठ्ठा अडचण नभो गितां मक्का दिवस पर्यंत मनास येईल तसें तें शहर लुटून मावका वापणें तें द्रव्य नेऊन रायगडीं ठेविलें. तेवेळ ही नर्वाचराजधानी झाली होती. तेथें सुरतेंत किताएक मोठीं मोठीं भांडीं इंग्रज लोकांचीं व डच लोकांचीं होतीं, तेथें जे लोक होते त्यांणीं युद्ध करून तें द्रव्य रक्षिलें, त्याबरोबर आणीकही जवळचे जवळचे लोकांचीं द्रव्यें गरव झाली, नाहीं तर त्यान अनिवार्यित धन सांपडलें असतें. तो शिवाजी सुरतेस दाखल झाला हें वर्तमान सेन सोळाशें चोसष्टांचे पहि

ल्या महिन्याचे पांचवे तारखेस घडले.

७ शिवाजी जेंव्हां सुरतेहून साघारां रायगडास गेला, तेंव्हां त्याला वर्तमान कळलें कीं, जाहाजां तुंग भेंदे कांहीं बिदनूरज वळ बस्तवे पटननामें गांव आहे, तेथें शिकारीस गेला असतां देव गतीनें घोड्यावरून पडून मृत्यु पावला.

८ त्यानंतर शिवाजी आपल्या बापाची क्रिया होई तोंपर्यंत सिंहगडास होता, मग रायगडास जाऊन आपल्य राज्याचा बंदोबस्त करीत कांहीं महिने तथें राहिला. तो बंदोबस्त झाल्या वर आपल्या नावास राजा असें पद जोडून आपल्या नावाचा शिक्का चालवूं लागला.

तेव समयीं त्या शिवाजीनें आणखी कांहीं कृत्य केलें तें असें. सन सोळाशें चौसष्टांच्या आरंभा सहिन्यांत अहंमदनगरचा पेंठ लुटून औरंगाबादेचे सभोंवतालचे मुलखांतही धामधूम केली. त्यावेळेस विजापूरकरांचे दोघे सरदार फौजेसहित पन्हाळ्याजवळ गडिले होते, त्यांणीं शिवाजी फार दूर गेला असें पाहून कोंकणपट्टीची चूर्चित्यांची होती ती घ्यावया विषयीं भगीरथ प्रयत्न केला, तेंव्हां त्यांच्या हातीं कांहीं कांहीं स्थळें लागलीं, तोंअकस्मात् शिवाजी मोठें सैन्य घेऊन आला आणि मोठालढाई करून त्याणें त्यांचा पराभव केला. त्या शिवाजीचें युद्धादि प्रसंगीं जेथें जेथें प्रयोजन लागे तेथें तेथें तो अकस्मात् प्रकट होई; वास्तव त्यावेळचे लोकांत जर कोणास असें भासलें असेल कीं, शिवाजीला एक शरीर नाहीं, बहुत आहे त, तर तें आश्चर्य नव्हे. कांकीं, असाच त्या शिवाजीचा चपळपणा वसाच त्वरितपणा होता.

त्या शिवाजीच्या लढाऊ गलबतांनीं किती एक दुसरीं गल

बर्ते नेऊन त्यांत द्रव्य जना केलें होतें, आणि मोंगल लोकांच्या जहा जावर वस्तन नकेस जाणारे कितीएक द्रव्यवंत यात्रेकरू धरून नेऊन त्यांस बंदींत ठेवून त्यांपासून फार पैका घेऊन सोडून दिले होते.

१० पुढें सन सोळावें सालचे पहिल्या महिन्यांत शिवाजी ला असें समजलें कीं, मोंगलांनीं जें लढकर जुन्नरजवळ देविलें होतें तें मोठें वाढविलें; म्हणून तें आपणास बाधक आहे कीं काय, या शोधासाठीं सिद्दिगडास जाऊन राहिला. तेव्हां तें लढकर आपणास बाधक नाहीं असें जाणून दुसऱ्या कांहीं कार्याविषयीं उद्युक्त झाला. तो असा कीं, मोंगलांस जिंकावयास जातो असें दाखवून एकाएकीं फौजसहित कोंकणांत जाऊन माळवणापाशीं ती फौज जहाजांवर चढवून गोव्याचे दक्षिणेस साठ सत्तर कोसांवर बहुत द्रव्यानें भरलेलें बालशिलोर नामें शहर होतें, तेथें जाऊन तें शहर लुटून बुडद्रव्य घेऊन चारहजार फौजे सहित गोकर्ण महाबळे श्वरीं उतरला. तेथून बहुतेक जहाजें परतविलीं आणि आपण फौजेसहित त्या देवाचे दर्शनास गेला. मग त्या फौजेच्या लहान लहान टोळ्याकरून मुलखांत गांवें लुटावयास पाठविल्या. त्या मुलखीं पंधरा गांव बहुतेक होते ते लुटून फार द्रव्य आणिलें. मग पाय घाटेनें आपलें लश्कर पाठवून आपण जहाजावर बसून माघारा रायगडास चालिला. तेव्हां त्या जळमार्गांत मोंगलांचीं वारा घेऊन त्याणें तें गलबत दक्षिणेस हटविलें, तें कितीएक दिवस कडेस लागलें नाहीं, म्हणून तो फार दुःख पावून असें समजला कीं, ही माझी जळमार्गाची पहिलीच खेप, यांत मला भवानी अनुकूळ नाहीं, तिच्या कोपें करून च मी एवढ्या संकटांत पडलों.

११ त्या दोघांना शिवाजीवर समुद्रांतल्या सैन्यापेक्षां एक मोठें विघ्न आलें होतें तें असें, एक राजा जयसिंग म्हणून दुसरा दिलीरखाननानें आफगाण हे दोघे औरंगजेबानें मोठा फौज देऊन शिवाजीला जिंकावयास पाठविले.

जर कोणी म्हणेल कीं, त्याचे इतके अन्याय होईन तों पर्यंत औरंगजेबानें कां उपेक्षा केली? पारिपत्य कां केलें नाहीं? तर त्याणें असें समजावें कीं, तो औरंगजेब आपण क्षत्रियानें तक्काधिपति झालेला यास्तव त्याला आपलाच बंदोबस्त राखणें अवघड पडलें होतें. त्यावेळेस औरंगजेबानें द्वारकीलोकांचे बादशाहाशीं कांहीं बोलणें लाविलें होतें, तेंही एकनिमित्त पारिपत्यहोण्यास झालें. आणि तो औरंगजेब असें मानी कीं, आपण जेझां नजर घेऊं तेझां सगळी दक्षिण एकदांच घेऊं; आणि म्हणे कीं, शिवाजी आम्हास डोंगरांतील उंदरासारिखा आहे, त्याला धरावयास व मारावयास कांहीं अवघड नाहीं.

त्या शिवाजीनें आपणास राजा म्हणविलें आणि सुरत दुसऱ्यांदा लुटली असे कितीएक अन्याय केले असतांनेऔरंगजेबास तोडेसे वाटले नाहींत; परंतु त्याणें मक्केस जाणारे यात्रेकरू लोक लुटले, त्यावरून तो फारच क्रोधाविष्ट झाला. कां कीं, त्याणें केवळ धार्मिकपणाचें व साधुपणाचें सोंग केलें होतें, म्हणून त्याला शिवाजीच्या पारिपत्यास अवश्य उद्योग करणें लागलें.

१२ जे दोघे सरदार बरोबर फौज देऊन दक्षिणेंत शिवाजीवर नेमिले होते, ते मोंगलांत मोठे प्रबळ असत, त्याणीं पूर्वी औरंगजेबाची अवज्ञा केली होती, यास्तव त्यांस दूरचे चाकरीवर नेमिलें, आणि त्या कामास पुरेसें सैन्य दिलें नाहीं. कां कीं, त्याचा मनोदय

न्यांस वाटवायाचा नव्हता. त्याची मसलत अशी असलेमें वाटते की. दक्षिणेचें राज्य समयास आपल्या हातीं लागेल असें ठेवावे.

या पुढें औरंगजेबाचे ते दोघे सरदार लष्कर घेऊन निघाले, तेव्हां राजा जयसिंग याचा पुत्र रामसिंग नामें होता तो औरंगजेबा नें आपले जवळ ठेवून घेतला, तो वाट्यात्कारें तर स्नेहानें ठेविला, परंतु मनांत असें होतें की. त्याचे बापापासून कांहीं अपाय नव्हावा.

१३ ज्या समयीं शिवाजी जहाजावर चढला असतां गोव्याचे दक्षिणेस जाऊं लागला, तेसमयीं ते औरंगजेबाचे दोघे सरदार लष्करासहित नर्मदेस येऊन पोंचले, तें वर्तमान शिवाजीला कळ लें नाहीं. मग तो जेव्हां सुरक्षित माघारा रायगडास आला, तेव्हां त्या स समजलें की. त्या दोघां सरदारांनीं पुण्यास येऊन पुरंदर किल्ला आणि सिंहगड यांस वेढा घातला; आणि त्यांचे किती एक लोक राज गडासही येऊन पोंहचले.

तो राजा जयसिंग मोठा विख्यात आणि ज्याजवळ फौज पुष्क ळ. असा तो अकस्मात् आल्यानें शिवाजी फार घाबरा, आणि कांहीं मसलत करावया करितां आपले मोठे मोठे मानकरी लोक रायगडास बोलाविले; तेही भय पावले म्हणून एकचित्त मसलत होईना. मग लोकांमध्यें वर्तमान असें उठलें की, भवानी शिवाजीचे स्वप्नांत येऊन बोलिली की. हा जयसिंग हिंदूचा राजा आहे, यापुढें तुमचें कांहीं चालावयाचें नाहीं. मग तर कोणीच धैर्य धरून एकचित्त होईनात. असे ते गायगडचे दरबारी लोक भयाभीत झाले; परंतु पुरंदर कर किमपि भ्याले नाहींत. ते मोठ्या धैर्यानें लढत होते, त्यांत मुख्य किल्लेकरी महाड

चा देशमूख बाजी परभूनामें होता, त्याजवळ मावळे लोक व हेटकरीलोक होते, त्यांणीं फार दिवस किल्ला रक्षिला, शेवटीं दिल्लीरखानाचे मार्चाच्या बुरजाखालीं सुरुंग पाडूं लागला असतां कितीएक वेळां त्या हेटकऱ्यांनीं व मावळ्यांनीं किल्ल्या बाहेर येऊन त्यावर छापा घातला, तथापि त्या सुरुंग फोडणारांनीं आपला मनोदय सिद्धीस नेला. तेव्हां त्या किल्ल्याची मार्चा त्यांचे हातीं लागली आणि ते किल्ल्यावर जाऊं लागले, तेव्हां त्या दिल्लीरखानाचे लोकांस असें वाटलें कीं, किल्ला हस्तगत झाला; त्यावरून आपला सावधपणा टाकून निर्भयपणें लुटूं लागले. तेव्हां त्या हेटकरीलोकांनीं चरून गोळ्यांचा भडिमार असा केला कीं, त्या लोकांस आपले जिवाचे रक्षणार्थ कोठेंतरी आश्रय पहावा लागला. त्याच वेळेस मावळे लोकांचा सरदार सारे मावळे लोक जमाकरून हातीं तरवारा घेऊन त्यांवर एकदांच पडला, तेव्हां मोगलांचें जे लोक उभे राहून लढले ते मारले गेले, वरकड पळाले. तेव्हां दिल्लीरखान किल्ल्याखालीं हत्तीवर बसून आपल्या लोकांचें चातुर्य पाहात होता; मग त्याणें आपल्या मोंगल लोकांचा पराभव झाला असें पाहून आपले जवळचे पठाणाचे टोळीस बोलावून त्या पळालेल्या लोकांस धीर देऊन आपले हातचे धनुष्याचा टणत्कार करीत ते सारे लोक आपले हत्तीपुढें चालविले; तेव्हां ते जय पावलेले मावळे लोक मोठ्या धैर्यानें युक्त होत्साते असे लढले कीं, त्या पठाणांतले ही कितीएक दूर मागें हटूं लागले. त्या समयीं दि

हा बाजी परभू ज्याणें पूर्वी पन्हाळ्यावर राहिले तो नव्हे, आणिल्याचा कोणी संबंधी नव्हे हा दुसरा च

दिलीरखान यानें आपले हत्तीवरून मावळे लोकांचा सरदार नाग पराक्रमी असें पाहून त्याला तीर मारिला, तेणेंकरून तो तात्काळ मृत्यु पावला. तेव्हां ते सारे मावळे लोक पाठ दाखवून माघारे बाले-किल्ल्यावर पळून गेले. नंतर मोंगल लोक फिरून माचीवर चढले, परंतु त्यांणीं पुनः वरून गोळ्यांचा मार केला, तेव्हां ते माघारे हटले. तेसमयीं दिलीरखान असें समजला कीं, या किल्ल्याचे उत्तरे कडून लढाई करणें उपयोगीं नाहीं. मग त्या किल्ल्याचे ईशानी दिशेकडे वेगळा लहानसा वज्रगड नांवें किल्ला आहे, त्याला शिड्या लावून वर चढून तेथून त्या किल्ल्याच्या वाले किल्ल्यावर तोफांचा मार चालविला; तो कितीएक दिवसपर्यंत तसाच चालला होता, परंतु त्या किल्ल्याचा कारसा नाश झाला नाहीं; आणि पावसामुळें मोंगल लोकांचा उपाय चालेना. असें असतांही पुरंदरकरांनीं निराश होऊन शिवाजीला पत्र पाठविलें कीं, आतां आमचा उपाय नाहीं, किल्ला शत्रूस देतों. तेव्हां शिवाजीचें उत्तर आलें कीं, तूर्त देऊंनये, त्यावरून किल्ला त्यांणीं तसाच रक्षिला.

१४ जेव्हां जयसिंग शिवाजीचे मुलखांत आला तेव्हांपासून्च शिवाजीनें त्याशीं सख्याचें बोलणें लाविलें होतें; व जयसिंगही तें द्वेषापासून त्याणें पूर्वी केलेली कृत्रिमे जाणून आपले बंदोबस्तांत किमपि उणें पडूं देत नव्हता. तें पाहून शिवाजीनें मोंगलांची चाकरीचा करार केला होता त्याप्रमाणें तो मरळभावानें चालूं लागला. तो सन सोळाशें पांसष्टांचे सातवे महिन्यांत थोडके लोक बरोबर घेऊन जयसिंगाचे लवकरान पोंहचला. त्याणें त्याचा सन्मान करून भेटून आपले छावणीचा जागा दिला. मग दुसरे

दिवशीं शिवाजी पुरंदरास दिलीरखानाचे भेटीस गेला, तेव्हां जयसिंगानें शिवाजीची ममलत करण्याचा विचार खानास नेपुसता केला म्हणून त्याचे मनांत राग होता, यास्तव त्याणें शिवाजीला असें सांगितलें कीं, आम्ही किल्ला बलात्कारें करून घेऊं, आणि तेथल्या लोकांस मारून टाकूं. तेसमयीं शिवाजीनें त्याजी आर्जवाच्या गोष्टी बोलून किल्ल्याची किल्ली त्याचे स्वाधीन केली. तेव्हां असें ठरलें कीं, मोगलांचे जितके मुलूख शिवाजीकडे होते ते सारे द्यावे, आणि निजामशाई मुलखांतले बत्तीस किल्ले शिवाजीकडे होते त्यांतले वीस मोगलांस द्यावे, त्यांत पुरंदर व सिंहगड द्यावा; बाकीचे बारा उरले ते शिवाजीने दिल्ली च्या बादशाहापासून चाकरी करितां जहागीर करून घ्यावे. त्या वेळीं शिवाजीचा पुत्र संभाजी आठ वर्षांचा होता, त्यास पांच हजार स्वारांचा मनसब द्यावा असें ठरलें. तेवेळेस जो मुलूख शिवाजीकडे होता, त्याचा वसूल सुमारें एक लक्ष होन येत. तो जयसिंगाच्या आश्रयानें मोंगलांचे लष्करांत फिरत असे. अशा प्रकारें तो अनर्थ शांतीस पावला.

या शिवाय शिवाजीनें औरंगजेबास विनंतीपत्र लिहिलें कीं, विजापूरचे बादशाहाकडे जो मुलूख आहे, त्यांत मला चौदा पेकीं चौथाई आणि सरदेशमुखीचा दाहावा अंश द्यावा. हीं दोन्ही मिळून दहाबारा सुमारें पांच लक्ष होत. यास्तव शिवाजीनें औरंगजेबास मागून घेऊन त्याचा स्वामित्व वर्षास तीन लक्ष होन द्यावे, असे चाळीस लक्षपर्यंत भरणा होईतों देत असावे. असें कबूल केलें, त्यावेळेस औरंगजेबाचे मनांत होतें कीं, विजापूरचें राज्य बुडवावें, म्हणून त्याणें ने मान्य करून लिहिलें कीं. एक हात आतांच द्यावा; व विजापूरकरांचा मुलूख घेण्याविषयीं राजा जयसिंग याच फौजेच्या हिंमतीस सहाय्य करीत जावे

वार्ष शिवाजीनें जयसिंगाशीं तह केलें तेंही मान्य केलें.

मग शिवाजी आपले पहिले करारामाणें दोन हजार स्वार आणि आठ हजार पायदळ बरोबर घेऊन जयसिंगाची कुमक करीत होता. त्याणें प्रथम फलटण घेतलें, व त्याचे मावळे-लोक यांणीं तारोरा किल्ला शिडी लावून घेतला.

१५ इकडे विजापूरकर आदिलशाह याणें आपली सेनेची सिद्धता करून मोंगलांनीं आपले विजापुरीं नयावें म्हणून फार फार बोलणें केलें, आणि पूर्वीचें राहिलेलें जें स्वामित्व संबंधी देणें तेंही नक्काधिपतीला द्यावयास तो सिद्ध झाला, परंतु जयसिंग ऐकेना; तो मध्यें न खोळंबतां मंगळवेढ्यापर्यंत पोंचला. तेथें विजापूरकरांचे स्वार आले, त्यांची व यांची गांठ पडतांच ते मोठ्या शौर्यें करून लढले. त्यांत अबदुलमहंमद विजापूरचा प्रधान तो मुख्य सरदार होता, त्याचे आज्ञेंत तें लश्कर वागत असे. याखेरीज जे दुसरे सरदार होते त्यांचीं नावें, अबदुलकरीम व बाल्हो खवास खान व खवासखान व शिद्दी अजीम नामें शिद्दी जोहराचा पुत्र, हे आणि व्यंकोजी राजा भोंसला या नामें शिवाजीचा सावत्र भाऊ होता तो व रायाजी मान्या हा सर्वांचा देशमुख, या दोघांही विजापूरकरांचे फौजेंत मराठे सरदारांचें आधिपत्य स्वीकारिलें, त्यांणीं व त्यांजबरोबरचे मराठे लोकांनीं त्या लढाईंत मोठी शर्थ केली.+

शिवाजी व त्याचा सरदार नेताजी पालकर या दोघांही मोंगलांचा पक्ष स्वीकारल्यावर ते आपले पराक्रमें करून मोठे विख्यात झाले,

---

+ या सदरहून विजापूरकरांनें नेताजी नाम्यास काढून त्याचा मुलूख जहागीर [illegible] त्याचीं [illegible] यांचे बंधू पांजबरोबर [illegible]

असे कीं, ज्यांची कीर्ति औरंगजेबापाशीं गेली, ना ऐकून तो प्रसन्न झाला, आणि त्याणें शिवाजीला बहुमानाचीं वस्त्रें पाठविलीं, यावेरीज ज्या मध्यें शिवाजीची बहुत प्रकारें स्तुति असें एकपत्र त्यास पाठविलें.

१६ मग कांहीं दिवसांनीं दुसरें एकपत्र पाठविलें त्यांत असें लिहिलें कीं, तुम्ही येऊन भेटावें म्हणजे तुमचा मोठा संमान होईल; आणि तुम्हाला ज्यावेळेस दक्षिणेस जावयाचें असेल त्यावेळस कांहीं अडचण पडणार नाहीं. असा त्या पत्राचा मजकूर वअभयसिंगाचें म्हणणें यावरून शिवाजीचा निश्चय झाला कीं, दिल्लीस जावें. तेंव्हा त्याणें आपले सारे नानकरी लोक यांस सांगून पाठविले कीं, सर्वांहीं रायगडीं येऊन हजर व्हावें. मग ते सारे येऊन हजर होत तावत्कालपर्यंत त्याणें आपल्या अबघ्या किल्ल्यांचा बंदोबस्त आपण जाऊन केला.

नंतर रायगडीं येऊन त्याणें सर्व मानकरी यांचे समक्ष मोरो त्रिमळ पिंगळे व आबाजी सोनदेव व आनाजी दत्तो, या निघांजणांस आज्ञा केली कीं, मी दिल्लीस जाऊन येईन तोंपर्यंत तुम्ही मुख्यत्वें करून कारभार करावा. मग तो संभाजीनामें पुत्र यास बरोबर घेऊन संनसोळाशें सदसष्टांचे निसरे महिन्यांत दिल्लीस जावया करितां निघाला. त्याचे बरोबर पांचशें स्वार व एकहजार मावळे लोक होते. मग तो दिल्लीजवळ गेला तेव्हां औरंगजेबानें रामसिंग राजाजयसिंगाचा पुत्र व दुसरा एकलहानसा सरदार, असे दोघे त्याचे भेटीस सामोरे पाठविले; आपण किंवा आपले जवळचा कोणी मोठा माणूस गेला नाहीं. हा अपमान शिवाजी मनांत समजला, परंतु त्यावेळेस त्याचें सहन केलें. यापुढें शिवाजी

नें जहा दरबारांत बादशाहास भेटून नजरादर्ली तेव्हांपासून पांच पांचहजार स्वारांच्या ननसबदारांचे ओळींत घ्यावि. तेव्हां शिवाजीच्या मनास आदेंदेखा, यास्तव जे त्या ओळींतल्याक घ्यावयाचे होते त्यांनीं आपली किंमत समजेनें कांहीं बोलिल्या, तेव्हां त्यांहीं बादशाहास कळविलें. त्यावरून दरबारीलोक आप आपले घरीं गेल्यावर त्यांजकडे बादशाह याचा भला निरोप गेला कीं, शिवाजीनें फिरून दरबारीं येऊंनये; तेव्हां शिवाजीचे मनांत कांहीं भय उत्पन्न झालें. मग त्यांनीं औरंगजेबास विनंती केली कीं, मी त्यांची सेवा फार केली व आपले समागें निघून करा आलों तें सर्व ध्यानांत आणावें; आणि जर माझे चाकरीचें येथें प्रयोजन नसलें तर माझे मुलखीं मला नाघारें जावयास आज्ञा द्यावी, मीव माझे बंधुवर्ग लोक येथलेंचागी मानत नाहीं. त्यावर औरंगजेबानें कांहीं स्पष्ट उत्तर दिलें नाहीं; आणि बाहेरचे कोनवाल्या मनसबदारांस्तव शिवाजी ज्या देवलींत आहे तिजभोवती चवकी बसविली, आणि जर तो कोठें बाहेर बादशाहाकडे जाईल तर त्यास जाऊं देऊन नये अशा बंदोबस्त केला. त्यायोगें त्यास समजलें कीं; तेव्हां शिवाजीनें पुनः विनंती केली कीं, हा समय फार कष्टेंकरून गुदरला, त्यास जे माझे घरांकडचे लोक आहेत त्यांस तरी माघारें जावयास आज्ञा द्यावी. ही विनंती औरंगजेबानें मान्य केली, आणि लोकांस जाऊं दिलें. मग आतां शिवाजी पक्का हाती लागला असें मनांत समजून मोठा हर्षयुक्त झाला. शिवाजीनें तर आपल्या मसलती करितां नमें केलें. त्याने लोक, गेल्यावर तो तेथले दरबारी मोठे मोठे मानकरी लोक यांचे घरोघर निरनिराळे जाऊन त्यांस कितीएक पदार्थ भेटी देऊन त्यांशीं सलगी करूं लागला. मग जेव्हां बहुतेक मनुष्य झाले तेव्हां आपले शरीरासमर्थान

नाहीं असें सांगतांच थोडेंच दिवसांत केवळ मरणोन्मुख झाल्यासारिखें दाखवले. पुढें थोडेंच समाधान आल्यासारिखें न दाखवितें, आणि कितीएक ब्राह्मणांस धर्म केला; नंतर कितीएकां वैद्यांस नजर पाठविल्या; याचेरीज आपले इष्टमित्रांचे घरीं घरकितीएक देवस्थानीं व ब्राह्मण व फकीर यांसहि कितीएक गरीबलोक यांस सिधा वगैरे पदार्थ द्यावयाकरितां सेवेसी बरोबर देऊन पाठवूं लागला; असें कितीएक दिवस चालविलें. मग एके दिवशीं आपला पुत्र व आपण दोघे दोहोंपालख्यांतनिजून मागल्या कडून ते पेठेरे शहराबाहेर एकीकडे आपले संकेतस्थळीं नेवविले, आणि तेथें बाहेर निघून दोघे एका घोड्यावर बसून पळाले, ते दुसरे दिवशीं मथुरेस जाऊन पोंहचले. तेथें कोणी एका दक्षणी ब्राह्मणाचे घरीं मुक्काम देवून आपण आपले बरोबरच्या लोकांसहित गोसाव्याचा वेष धरून तीर्थे करीत करीत मथुरेहून दक्षिणेस गेला. तो शिवाजी महाराजांचे सोडल्या महिन्यांत रायगडीं पोंहचला.

१७ शिवाजी दिल्लीहून माघारा आपल्या मुलखीं रायगडास आला, तेव्हां ऐकणें पाहिजे कीं, सर्व गोष्टी आपणास अनुकूल आहेत; त्या अशा, जय सिंगानें दिलावरखान वेडा घालवला होता, तो तेथें जय पावलाच नाहीं. त्या मोंगलांनीं काबुलधिपति यास्तव गोवळकोंड्याच्या बादशाहानें आपला एक मोठा सरदार फौजसहित विजापूरकरांचे साहाय्यास पाठविला. मग तो जय सिंग पुरंदर व सिंहगड इत्यादिक किल्ल्यांतून आपले लोक देवून माघारा दिल्लीस गेला. हें वर्तमान मंत्रीलोकांनीं सदसद्विवेक चालविलें. तो जयसिंग गेल्यावर मोरो त्रिमल पिंगळे यांणीं ते मोंगलांतून

दिले, आणि शिवाजी कोंकणांत आल्यावर थोडकेच दिवसांत कालियानी परगणा बहुतेक हस्तगत झाला.

औरंगजेब शिवाजीपासून गेलासमजून फार खिन्न झाला, परंतु आपले मनांत शिवाजीचा मोठा संमान करून पाठवावयाचा होता, असें दाखवून जयसिंगाचा पुत्र रामसिंग शिवाजीला पळून जाण्यास अनुकूळ होता म्हणून त्याला दरबार मना केले, आणि त्याचा बाप जयसिंग पराभव पावला म्हणून माघारा दिल्लीस बोलाविला. नंतर या कामावर सुलतान माजुम नामें दुसरा सरदार नेमिला. तो सुलतान पूर्वी दक्षिणेस पाठविला असतां जेव्हां जयसिंग नेमिला, तेव्हां तो माघारा बोलावून नेला होता, तो जयसिंग याचा पराभव जाल्यावर पुनः पाठविला. तेव्हां जयसिंग दक्षिणेहून माघारा दिल्लीस येत असतां वाटेस च त्यास असमाधान होऊन मृत्यु पावला.

भाग सातवा.

सन सोळा शें मदमष्टांपासून सोळा शें एकुणहत्तर पर्यंत आलेलां वर्तमान.

१ सुलतान माजुमनामें सरदार तो औरंजेबानें पुनः दक्षिणेचा अधिकार केला, त्याचे बरोबर दुसरा यशवंतसिंग आल्यास पून शिवाजी आनंद पावला. कांकी, दिल्लीमध्यें त्याचें त्याजीं इष्ट च पडलें होतें. त्या यशवंतसिंगास लोक धीर कुलीन म्हणत होते,

परंतु तो लक्षण होता, तो गुण रजपूत लोकांमध्यें बहुधा असतो. तो हिंदूंचे धर्माम फार मानीत असे. औरंगजेबाचा विश्वास त्याव रफार सा नव्हता; कांकां, तो पूर्वी त्यास प्रतिकूळ होता.

सुलतान माजुम याच्या आंगीं बहुत प्रकारचे उत्तम गुण होते. पण मात्र उधळ्या आणि अत्यंत विषयी असे, तो कांहीं कार्याविषयीं चर्चा करून घ्यावयास केवळ सुलभ असे; तो चहुंपायतांवर शिंगांचें वाल्हें मानीत होता.

शिवा या दोघांचा स्वभाव पाहून शिवाजी असें समजला कीं, याना कांहीं द्रव्य दिलें असतां आपलें कार्य सिद्धीस जाईल. म्हणून त्यांणीं कांहीं द्रव्य खर्चून सुलतानमाजुमास विनंती केली कीं, दिल्लीचे बादशाहाचे चाकरीविषयीं माझें मन निष्कपट आहे; त्यास तुम्हीं मजविषयीं बादशाहास विनंती करून मजवर पहिल्याप्रमाणें त्याची कृपा होई असें करावें. तेव्हां सुलतानमाजुमानें बादशाहास कांहीं लिहिलें, त्यावरून शिवाजीला राजा असें पदग्राम झालें; आणि पुणें वचाकण वसुपें परगणा हे त्यास मिळाले. लोहगड पुरंदर वसिंहगड हे औरंगजेबानें आपल्याकडे ठेविले. या शिवाजीच पुत्र संभाजी यास पूर्वी मनसब देऊं केलेली होती. तोही दिली, आणि बगडांत एक जहागीर खेरीज दिली.

त्या औरंगजेबाची एवढी कृपा होण्याचें कारण असें दिसतें कीं शिवाजी कधीं नवी दिल्लीस येईल, मग दगा करावा; असें त्याचें मनांत असलें. कांकां, त्याचा पहिल्यापासून असा दुष्ट स्वभाव होताच.

इ. सन सोळाशें अडुसष्टांमध्यें विजापूर करांचा बंदोबस्त आपल्या हातांत घेऊन औरंगजेब आणि अल्ली आदिलशाह विजापूर कर

खांद्यावर घेऊन. इतक्यांत दुसरे दहा लोक मागून विजापूरकरांनीं औरंग जेबास सोडावा म्हणून व किल्ला यांचा वसूल एक लक्ष ऐवजी हजार होन येत होता तो देऊं केला.

४ त्याच वेळेस चव्हाण शिंगाचे आश्रयानें शिवाजी विजा पुरकरांकडे चेन व देशमुखी मागूं लागला. तेव्हां त्याचे बदल व र्षांत तीन लक्ष रुपये गुमदणी आवयास केले. हें वर्तमान लोकांत प्रसिद्ध होऊं दिलें नाहीं; कांकीं, पूर्वी मुसलमानांनीं हिंदू जिंकिले होते, त्यांस खंडणी देणें म्हणजे त्या लोकांस केवळ लाजिरवाणें होई. गोवळकोंडचा बादशाह तोही अशाच कांहीं निमित्तेंकरून शिवाजीस वर्षास पांच लक्ष रुपये देऊं लागला.

५ त्यानंतर शिवाजीचे मनांत आलें कीं, गोवें एकाएकीं काबीज करून घ्यावें परंतु ते पोर्तुगीस लोक त्याची मसलत समजून सावध झाले. मग त्यांणें जंजीरा घ्यावयाचा उद्योग केला, तो व हून युद्ध झालें तरी हातीं लागला नाहीं.

६ शिवाजी दोन वर्षे पर्यंत रिकामा होता, तेव्हां कितीएक बेफाम कल्पना करूं लागले कीं, यांणें जो एवढा लौकिक मिळविलेला आहे तो आतां व्यर्थ जाईल; कांकीं, हा अगदीं रिकामा बसला. शिवाजी तर उगाच राहिला नव्हता, तो आपले राज्याचे व लष्क राचे बंदोबस्ताचे कायदे कांहीं नवे नवे करून व कांहीं कांहीं जुने मोडून चौकशी करीत होता. त्या कायद्यांचा प्रकार लिहिल्याप्रमाणे दिसे. कांकीं, त्या पुढें जे मराठे राजे झाले ते त्या कायद्यांप्रमाणें चालत होते.

शिवाजीच्या आरंभ्यास मूळ मावळे व हेटकरी लोक, नेपायदळ, त्यांचे योगेंकरून प्रथम मोठे मोठे किल्ले घेऊन मग मुलूख लुटून

तें द्रव्य न्या घेतलेल्या किल्ल्यांचा नकशा देविले. इतक्या-
णें स्वार फारसे वाढगडे नव्हते, आणि या पूर्वी न्याचा लौकिक
ही मोठा असा नव्हता; तो यापुढें फारच वाढला.

शिवाजीचे मावळे लोक घरसाथी रहात होते. व देवकरी
कोंकणात राहात असत. ते हत्यारें वगैरे सरंजाम आपला आपला
चा बाळगीत असत, आणि दारूगोळी वगैरे सरकारचें मारूनघेत.
त्यांचीं वस्त्रें एकसारखीं नव्हतीं; बहुधा ते लोक मल्लांसारिखे मांड-
चोळणे घालून कांचे भिडवीत, आणि डोकीस पागोटें वर्वेच्या असे.
आणखी कितीएक जण अंगरखे घालीत, आणि कितीएक धोवे
पांघरत. त्यांचीं हत्यारें तरवार वढाल व बंदूक याप्रमाणें असत. यांच्या
मध्यें एक तीरकमाण बाळगी; कांकीं, रात्रीस बंदुकेच्या बारानें लो
क सावध नव्हावे याकरितां. ते हेटकरी लोक बंदुकेच्या कामांत मोठे नि-
पुण होते, परंतु त्यांस मावळे लोकांप्रमाणें तरवार घेऊन दुसऱ्या
अंगाशीं अंग भिडवून युद्ध करितां येत नव्हतें. हेटकरी लोक व मावळे
लोक यांस जसें मोठ मोठे डोंगराचे कडे चढून जातां येत होतें, तसें
इतर लोकांस येत नव्हतें. त्यामध्यें दादा लोकांस एक नाईक, पन्नास
स एक हवालदार, शंभरास एक जुमलेदार, हजारास एक हजारीलोनें
सरदार असे, त्याहून मोठा पांचहजारी असे, त्यापेक्षां सरनोबतलोनें
मुख्य असे.

त्याचे स्वारांत दोन भेद होते, एक बारगीर, एक शिलेदार, बार
गीर सरकारचे घोड्यांवर बसणारे, आणि शिलेदार आपल्या स्वतःचे
घोड्यांवर बसणारे होते. त्यांत बारगीर यांचे समुदायांस पागा अशीं
नावें देवून युद्धप्रसंगीं शिलेदारांचे वर्तणुकीच्या बंदोबस्तास त्यापागांची
नेमणूक करीत असे.

मराठे स्वार यांचीं वस्त्रें अर्धीं, चोळणा व रुंदार आंगरखा व कंबर बंध असे त्यांतच तरवार चळकट बांधीन; आणि पागोट्या चे वेढे डोकीवरून इनवटी खालून घेऊन कानसुद्धां झांकून मोठ्या बंदोबस्तानें गुंडाळीन; आणि मिशा मोठ मोठ्या राखीत. बहुतक रून त्या लोकांचें हत्यार भाला, त्या विषयीं ने बहुत कुशळ असत आणि किंतीएक ढाल तरवारवाले व किंतीएक बंदुकवाले हा होते. (त्यांत प चविसां स्वारास एक हवालदार असे, आणि सवाशें स्वारांस एक जुमले दार, पांचां जुमलेदारांस एक सुभेदार. दर सुभेदारास एक एक कारकू न हिशेब लिहिणारा व एक एक त्या हिशेबाची चौकशी करणारा दि वाजानें देवून दिलेला असे; ते लिहिणारे व चौकशी करणारे ब्राह्म ण किंवा परभू असत. दहा सुभेदारांस एक मुख्य सरदार त्याचें नाव पांच हजारी असे. त्याचे जवळ सरकारचा देवणाईत हिशेबाचीं कर्मी करणारा मुजुमदार नामें हुद्देदार असे, तो ब्राह्मण, आणि त्याचे हाताखाली आमीन नामें सरकारचा परभू असे. याखेरीज कि तीएक सरदारांजवळ किंतीएक सरकारी कारकून व किंतीएक त्या सरदारांचे खासगीचे कारकून असत. या शिवाय सर्व मोठे मोठे सरदा र यांजवळ गुप्तरूपें करून बाहेरली बातमी कळविणारे जासूद होते. शिवाजीजवळ एक बहिर्जी नामें जासूद होता तो बातमीच्या कामां त फार कुशळ होता, लोकांच्या मनांत कीं, भवानी येऊन शिवाजी ला अत्यंत गुप्त वर्तमान कळविते, त्याचें कारण तो बहिर्जी जासू द होता. सरनोबत दोन असत, एक स्वारांचा असे आणि एक पायद- ळाचा असे.

जेव्हां शिवाजी फौज देवूं लागला तेव्हां कोणी आपला जुना चाकर जामीन घेतल्या वांचून नवा देवीत नसे. कोणास कांहीं लूट किंवा जहा

चा कांहीं जिनस सांपडला असतां त्याणें तो जिन्नस सरकारांत ने ऊन द्यावा; मग त्याचे योग्यते प्रमाणेंत्यासकांहींविभागबक्षीसदेऊन त्याची प्रशंसा करावी अशी चाल होती. शिवाजीनें शत्रूस लुटावयाची मनाई केली नाहीं, परंतु गाई व शेतकरीलोक व बायका यांस उपद्रव करूंनये, आणि मुसलमान लोक व त्यांचे पक्षपातीको णी द्रव्यवंत हिंदुलोक असतील त्यांस धरून नेऊन पैका घे ऊन सोडून द्यावें अंसें केलें होतें. शिवाजीचे लश्करांतकोणी बाय को वरोबरनेऊंनये,जरकोणीनेलीतरत्याचेंडोकें मारावेंअसानेमहोता कामा शिपाईगोर्यकरून लढत असून जर त्यास वार लागला तर,त्याला नानावास चढवून कांहीं बक्षीस देत असे. तो शिवाजी बहुधा कोणास जहागीर देतनसे; कांकीं, आपल्या मुलखांत जहागीर दार फार न वाढावे असें त्याचे मनांत असे. सर्व किल्ल्यांस ब्राह्मण व रामोशी व महार व मांग हे शिबंदी खेरीज असत; त्यांना किल्ल्याचे सभोवतीं शेतजमीनी वेतनें करून दिल्या असत; त्यांणीं किल्ल्याची चौकशी राखावी असें होतें. जे ब्राह्मण होते त्यांस सबनीस म्हणत, त्यांणीं तेथील धान्यादिकाचा बंदोबस्त राखावा; आणि किल्ल्यांत राहावें. इतर जे रामोशी व महारवमांग यांस गडकरी म्हणत; त्यांणीं बाहेर राहून बाहेरची चौकशी करावी. ते गडकरी किल्ला म्हणजे केवळ आपली माता असें मानीत असत.

प्रतिवर्षी दसऱ्यास शिवाजी मोठासमारंभ करी, त्या वेळेसआपल्या सर्व लश्कराची हजीरी घेत असे, घोडें व माणूस वगैरे त्यांच्या खुणा लिहीत असे. हजीरी झाल्यावर ते लोक बहुधा स्वारीस निघत असत.

प्रतिवर्षी सरकारांत हिशोबाची चौकशी होऊन कोणाचें देणें

ठेके अमल्यास प्रांतांतील वसूल जमा करणारास त्यास पैका द्या
व्यास आज्ञा देई, परंतु गांवांस उपद्रव करीत नेम.

७ शिवाजीनें जे वसुलाचे कायदे केले होते त्यांस दृढ दादो-
जी कोंडदेवानें जो नेम दरविला होता तें. तो दरवर्षास पिकाची पहा
णी करून वसूल ठरवीत असे. असें वाटतें कीं, जमिनींचें उत्पन्न
अमल त्यांतील तीन भाग रयतेस राखून दोन भाग सरकारनें घ्यावे
असें होतें. कधीं नवा मुलूख शिवाजीचे हातीं लागला असतां लष्क
रवगैरे संबंधी खर्च द्यावयाची चाल असल्यास ती मोडी, आणि न
व्हत्यानें वसूल घेण्याचा शिरस्ता आदळला असतां तोही नाकारी.

त्याचे मुलखीं सर्व देशमुख व देशपांडे यांहीं आपला हक्क
जो घेणें तो त्यांणीं सरकारची आज्ञा झाल्यावांचून घेऊं नये अ
से होतें.

शिवाजीचे किल्लेकरी मानकरी लोक मसलत करीत कीं, लष्क
रखर्चीचा नेमणूक परभारें गांवगंना करावी, परंतु तें शिवाजी
मान्य येईना; कां कीं, ते लोक स्वयें सत्ता करूं लागतील आणि
त्यांस उपद्रव होईल. त्या शिवाजीनें विजापूरचे सुलतान अशी
अवस्था पाहिली होती, याच कारणावरून त्यांणें जेथें आपली फौज
देववावयास योग्य नाहीं, असा किल्ला अथवा भुइकोट पाहिला अस
तां खणून टाकी. त्यांणें घेतलेल्या नव्या मुलखीं जेंजें देवस्थानांकडे
पूर्वी कोणीं दिलेलें तें तें तसें चालविलें.

शिवाजीनें वसुलाचे कायदे फार सवघड केले म्हणून मराठे
लोक त्याची प्रशंसा करीत, आणि या योगेंकरून प्रजेस सुख होतें
हें खरें, परंतु त्यांचे ते कृत्य एवढें वर्णनीय नव्हतें; कां कीं,
जो स्वयें पाहाणी करावयास विकामा नव्हता, त्यामुळें त्याचे कार्य

चांगले असले तरी लोकांस सुख देणें दुर्लभ असे. त्या [illegible] मुसलमान बखर लिहिणारा होता, आणि एक इंग्रेज मुलूख पाहावया करितां गेला होता, त्या दोघांच्या लेखांवरून असें वाटतें कीं, दुसऱ्या मुलखांपेक्षां शिवाजीचे मुलखीं प्रजा बेजार होती; आणखी त्या मुसलमानाचे लिहिण्यांत असें कीं, शिवाजी लोभा नाश करी. त्या शिवाजीच्याहातीं जे विजापूरचे मुलूख लागले होते त्यांतील पहिली मखत्याची चाल मोडून प्रतिवर्षी पहाणी करून व सूल घेत असे, त्या मुळें तेथले रयेस मात्र हितावह पडले असेल.

शिवाजीच्या राज्यांत जमीन संबंधें किंवा द्रव्य संबंधें, फिर्यादेची पंचाईत चौघां ब्राह्मणांचे विचारें करीत, इतन्याय बहुधा शास्त्ररीति पाहून करीत; आणि पूर्वी मुसलमानांनी आपले कुराणांतली जी रीति स्थापिली होती तीही थोडी घेऊन मनसोबी करीत. या दिवसांत हिंदूच्या शास्त्रांत आणि मराठेलोकांच्या रीतीस अंतर दिसतें यांचे कारण हे असेल.

८ शिवाजीनें आपला राज्यकारभार चालवाया करितां आठ प्रधान केले होते, त्यांचीं नावें आणि कामें यांचा तपशील असा. पहिला प्रधान पेशवा, तो सर्वांमध्यें श्रेष्ठ, त्याणें सर्व चौकशी करावी. दुसरा मजूमदार, त्याणें सर्व जमाबंदी करून खर्चाची चौकशी करावी. तिसरा सुरनीस, त्याणें दप्तराचें रक्षण करावें, आणि स्मरणार्थसर्व सनदांच्यावगैरेनकला सरकारचे दप्तरीं लिहाव्या. चवथा वाकनीस, त्याणें खासगी शिबंदी व खासगीचा सर यांचा सर्व बंदोबस्त राखावा. पांचवा सरनोबत, तोलश्करांत

मुख्य त्याणें मुख्यपणानें लश्कराचा बंदोबस्त राखावा साहावा डबीर त्याणें परराज्याची चौकशी करीत असावें, आणि परकीराज्यांशीं बोलण्याचें कांहीं कामपडलें असतां त्याणें करावें; व कोणी बाहेरचा वकील आलातर त्याशींही बोलणें त्याणेंच करावें सातवा न्यायाधीश तो न्याय करणारा. आठवा न्यायशास्त्री, त्याणें शास्त्रार्थसंबंधी कामें करावीं. शिवाजीचे वेळीं हे आठ प्रधान कोण कोण होते त्यांचीं नावें; पेशवे मोरो त्रिंमळ पिंगळे; मजूमदार आवाजी सोनदेव, कालियानी परगण्याचा सुभेदार; सुरनीस अनाजी दत्तो; चांकनीस दत्ताजी पंत; सर नोबत दोघे, एक स्वारांचा प्रतापगव गुजर, दुसरा पायदळाचा येसजी कंक; डबीर सोमनाथ पंत; न्यायाधीश दोघे, एक निराजी रावजी, दुसरा गोमाजी नाईक; न्यायशास्त्री शंभुपाध्ये ते पहिले. आणि त्यांचे पाठी मागून रघुनाथ पंत झाले. या अष्टप्रधानांतले न्यायाधीश व न्यायशास्त्री या दोघांवांचून बरकडांस शिवाजीच्या लश्करांत अधिकार होते, त्या मुळें त्यांस बहुधा आपआपले प्रधानकीचे अधिकार संभाळावयास फावत नव्हतें; यास्तव ते आपआपला एकेक कारकून ठेवून कामें चालवीत होते; त्यांत ज्याला मोतबर ठेवावयाची आज्ञा होती त्याला मुतालिक ह्मणत. त्यांचीं व्यवहारी नावें अन्नाजी, कारभारी व दिवाण, फडनीस, खजिनीस, कारखाननीस, चिटनीस, जामदार, पोतनीस त्यांत फडणीस याणें खर्चाची चौकशी करावी; सबनीस याणें दप्तराची चौकशी राखावी; कारखाननीस याणें किल्ल्याचे व लश्कराचे उपयोगी अन्नादि सर्व पदार्थांचा बंदोबस्त राखावा. चिटनीस यांणीं कागदपत्र आलेले व कोणें पाठवावयाचे याचा बंदोबस्त राखावा; जामदार याणें नाण्यावांचून सर्वप्रकारचें जवाहीर व अस्त-

कार संभाळावे; पोतनीस याणें पैका संभाळावा.

शिवाजी फडनीस वजानदार व चिटनीस व फारशी कागद पत्र वाचणारा फारसनीस, अमे आपल्याजवळ निरंतर ठेवीत असे. त्यांत जो चिटनीस तो बाळाजी अनाजी नामें परभू होता. त्याला शिवाजीनें एकवेळ मुंबईस कांही कामासाठीं इंग्रेजी सरकारांत पाठविलें होतें, तेव्हां तो साहेबलोकांस मोठा चतुर असा वाटला.

फडनीस बाळकृष्णपंत हणमंते, तो शाहाजीच्या मुख्य कारभाऱ्याचा भाऊबंद होता.

शेषापानाईक पुंडे चांभारगोदेंकर, ज्याजवळ शाहाजीच्या लग्नाचे पूर्वी माळोजी भोंसल्याचा पैका होता, त्याचा नातू तो शिवाजीचे जवळचा जामदार.

भाग आठवा.

सन सोळाशें सत्तरापासून सत्याहत्तरपर्यंत.

मालेळीं वर्तमानें.

१ सन सोळाशें सत्तरचे सुमारें असें दिसत होते कीं द्रव्य व दक्षिणेत बहुत दिवस गडबड होणार नाहीं. कां कीं, विजापूरकर व मोगल याचा लढा झाला, आणि शिवाजीस जें मिळालें आहे तितक्या नेंच तो खुष होऊन स्वस्थ राहील, हा एक सुमार. असें असतां औरंगजेबास समजलें कीं, आपला पुत्र सुलतान माजुम जो दक्षिणेचा मुख्य अधिकारी केला तो व यशवंतसिंग हे शिवाजीपासून कांहीं पैका

घेतात. यास --- शिवाजी कांहीं घाट करिल, असें समजून त्यांणीं पुष्कळ लिहिलें कीं, शिवाजी व त्याचे कित्येक सरदार व मुख्य कारभारी धरून अवश्य कैद करावे.

२ तेव्हां शिवाजी औरंगजेबाचा दीर्घद्वेष समजून पुनः पहिल्याप्रमाणें सावधपणानें वागूं लागला. तेसमयीं त्याचे मनांत आलें कीं, पहिल्यानें पुरंदर आणि सिंहगड हे दोन्ही किल्ले घ्यावे; कां कीं, पुण्यास आणि चाकणास आंपली येण्या जाण्याची सोय नाहीं. त्यावेळेस सिंहगडचा सरदार उदेभान नामें होता. त्याचे हाताखालीं निवडक रजपूत लोक होते, आणि तो मोठा विद्वान शूर होता, आणखी तो किल्ला फार अवघड; म्हणून लोक असें समजत कीं, या किल्ल्याच्या घेण्याचा उद्योग व्यर्थ आहे. परंतु तो किल्ला घ्यावयास सुलभ होण्याचें कारण हेच आलें कीं. किल्ला सुदृढ म्हणून त्या भरंवशावर ते किल्लेकरी फार ही सावधगिरी ठेवीत नसते. यावरून शिवाजीनें तानाजी मालुसरा सरदार यासीं मसलत केली कीं, छापा घालून किल्ला घ्यावा. तेव्हां असें ठरलें कीं, तानाजी मालुसरा यानें आपला कनिष्ठबंधू सूर्याजी व मावळे लोक बरोबर घेऊन त्या कामाला जावें.

तो सिंहगड सह्याद्रिपर्वताच्या पूर्वेचे आंगीं पुरंदर किल्ल्याचे दोनशें टोक लागलें आहे तेथें आहे; त्याचे दक्षिणेस वउत्तरेस सह्याद्रीचा संबंध नाहीं; त्याचा अर्ध अर्ध कोस उंच कडा तुटलेला आहे; त्याच पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे मोठे मोठे पर्वत यांच्या थोड्या थोड्या टेकड्या लागलेल्या आहेत; तो अर्धकोस चढून गेल्यावर केवळ भिंतीप्रमाणें सभोंवता सात्या तीस तीस हात उंच असा मोठा दगड आहे; त्यावर चिरेबंदी नट आणिजागो

जाग बुरूज आहेत; याचे आंत किल्ल्यावरचा जागा त्रिकोणाकृत आहे; सभोंवता तटाचा घेर कोचा सवा कोस सुमारें आहे, अद्याप वघड किल्ल्यांत दरवाज्या वांचून प्रवेश करावयाचा नाहीं मेंदिसतें. त्या किल्ल्यावरून पूर्वकडे पहावें तों, तेथें एक लहानसें खणजो हे, त्यांतून नागनदी चालते, तें टिकाण पाहून मनास आनंद वाटतो. उत्तरेकडे मोठें मैदान आहे, तिकडे सखूर दुर्ग गहर दिसतें; तें पुणें पूर्वी लहानसें गांव होतें, परंतु त्या स्थानचा योग असा होता कीं, काळें करून ती मोठ्या राजांची राजधानी झाली. त्या सिंहगडचे दक्षिणेस आणि पश्चिमेस दूर मोठे मोठे पर्वत आकाशास लागल्या सारिखे उंच दिसतात; त्या लगत्या सच राजगड आहे.

त्या रायगडाहून तानाजी मालुसरा माघकृष्ण नवमीस एक हजार मावळे लोक बरोबर घेऊन चोरवाटेनें रात्रीस सिंहगडाजवळ येऊन पोंहचतांच त्याणें त्या हजार लोकांचे दोन भाग करून एका भागाचे लोक पुढें चालविले, ते जेथें मिर्झासाहिबा काकाद्दन डतीस तीस हात उंचीचा आहे तेथें जाऊन पोंहचले, आणि दुसऱ्या भागाचे अंमळसे मागून चालविले, ते कांहीं मोगं गाहिले. जे पुढें जाऊन पोंहचले त्यांतील कोणीएक शूर आणि चतुर माणूस होता त्याणें काय केलें कीं, आपले कमरेस दोरीची चिडी बांधून घेऊन वर चढला, मग त्या चिडीवरून एक एक माणूस जसजसा तो तीनशें लोक वर चढले आणि लपून राहिले. आणखी लोक चढत होते तों किल्ल्यांत कांहीं तयारीची गडबड होत आहे, असें समजून ते मावळे लोक हळूच सुपाया घेत होते तों कोणी एक माणूस आपल्या कडे येतो आहे असें दृष्टीस पडतांच तत्क्षण

आपल्या लोकांस कांहीं शब्दादि खुणेनें वर्तमान कळवायास वेळ न सांपडूं देतां त्यांणीं तत्काळ त्यास मारिलें. असें असताही किल्ले करी अधिक तयारी करीत आहेत असें मावळ्यांस वाटलें, तेव्हांजे जवळजवळ मावळे लोक होते ते घेऊन तानाजी मालुसरा जिकडे ती गडबड होत होती तिकडे चालला, तो कांहींसा पुढें गेला तों त्या किल्लेकऱ्यांनीं अकस्मात् हिल्लोंचा व चुडींचा मोगउजेडकेला. तेव्हां तेर जपूतलोक तयार होऊन येतात, व कितीएक कंबरा बांधितात, व मावळे त्यांवर चालून जातात, तें सारें एकसमयावच्छेदें करून परस्पर दृष्टीस पडलें. तेव्हां त्यांचें तें युद्ध मोठ्या निकराचें झालें; त्यांत मावळ्यांपेक्षां रजपूत फार होते, तरी मावळ्यांचा जय होईलसें दिसूं लागलें. इतक्यांत तानाजी मालुसरा पडला, तेव्हां मावळे लोक जिकडे दोरीची शिडी होती तिकडे पळून गेले. नेत्या भिंतीवांजाऊन पोंहचतांच तों सुर्याजी मालुसरा तानाजीचा भऊ बाकीचे मावळे लोकांसहित येऊन पोंहचला. तों हे लोक पळतात. असें पाहून मोठ्यानें ओरडून निषेधकरून बोलिला कीं, तुमच्या बापाचें प्रेत सहार नेऊन असंगळजागीं टाकितील, त्या दोषाचे अधिकारी मात्र तुम्ही व्हाल; आम्ही तर दोरीची शिडी तोडितो, आतां मोंगल तुम्हास मारितील किंवा तुम्ही त्यांस माराल, असें म्हणून आपल्या बरोबरचे लोकांसहित त्या लोकांस पुनः युद्धास नेलें. तेव्हां ते लोक एकदांच हरहर महादेव म्हणून चालून जाऊन मोंगलांचा पराभव करिते झाले; अशाप्रकारें तो किल्ला घेतला. मग दिवसउगवत्यावर असा ठिकाणा लागला कीं, मावळे लोक तीनशें पडले, रजपूत पांचशें पडले. या खेरीज दोन तीनशें गुमारें रजपूत जीव घेऊन पळाले. ते किल्लेवाले मिंनीवरून कांहीं उड्या टाकून मृत्यु

पावले.

त्या मावळे लोकांचा असा नेम होता कीं, जय झाला म्हणजे घर किंवा दुसरें कांहीं आग घालून पेटवून जय झाल्याची खूण करावी, त्याप्रमाणें त्यांणीं तेथें एक मोठें छपरी घर होतें तें जाळिलें. तेव्हां शिवाजी आपल्या लोकांचा जय झाला असें समजून न बहुत आनंद पावला, परंतु नानाजी पडला असें ऐकिल्यावर कष्टी होऊन बोलिला कीं, गड सांपडला पण सिंह गेला. नंतर त्याणें सर्व मावळे लोकांस एकेक रुप्याचें कडें दिलें; व सुर्याजीस किल्लेदार केलें.

३ यानंतर एका महिन्यानें सुर्याजीला पाठवून छापा घालून पुरंदर किल्ला घेतला; तेथें फारसें युद्ध करावें लागलें नाहीं. कोकणांत माहुली किल्ला घ्यावयास बरोबर फौज देऊन मोरोपंत पाठविला; त्याला तेथें दोन महिने युद्ध करावें लागलें; त्या युद्धांत मोरोपंताचें एक हजार माणूस मेलें; नंतर किल्ला हस्तगत झाला.

४ त्यानंतर करनाळा किल्ला घेतला. आणि त्या वर्षाच्या सहाव्या महिन्यापर्यंत कालियानीचा संपूर्ण परगणा हस्तगत केला. त्याच वर्षांत शिवाजीनें लोहगड ही घेतला, आणि जंजीरा घ्यावयास तोफोज घेऊन चालिला. त्या पूर्वी त्याणें नऊवेळां मोर्चा लावून त्यांतील किल्ल्यांशीं युद्ध चालविलें होतेंच; परंतु यावेळेस जितकें सामर्थ्य असेल तितकें खर्चून किल्ला घ्यावयाचाच असा निश्चय केला. आणि तेथें जाऊन युद्ध चालविलें. तेव्हां तेथें शिद्दींचा फत्तेखान मुख्य होता, तो किल्ला चांगला तयार झाला. परंतु दुसरे तेथें निघेजण मोठे मोठे शिद्दी होते, ते असें समजले कीं, यांणीं किल्ला दिला म्हणजे धणी आम्हास ठार मारील; यास्तव त्यांणीं आपले जातीचे लोक बहुत घेतले

आणि फलेखानास कैद करून किल्ला घेतला नाही; आणि मुरंबदेव मोगलाचा सरदार होता त्याला लिहिले की, आमचे कुमकेस यावे तर आम्हाकडे विजापूरकरांचा मुलूख आहे हा, आणि जिनकी लढाऊ गरुवेनें आम्हाजवळ आहेत तीं तुम्हाला देऊं. नें त्यांनें मान्य करून कुमक केली; तेव्हां किल्ला हातामनयेतां शिवाजी उठून गेला. त्या निघां शिद्दीचीं नावें, एक शिद्दी सं भोळ, एक शिद्दी याकूट. एक शिद्दी खैरू.

१०. त्याच वर्षी पर्जन्यकाळ पुर्ता गेलानाहीं तोंच, शिवाजीपं धरा हजार फौज घेऊन सुरतेस आला; त्यावेळेस नेथें फौज नव्हती म्हणून तीन दिवस सावकाशपणें शहर लुटून मनास येईल तसें पु कळ द्रव्य जमा केलें. चवथे दिवशीं ब्राह्मण पुरुन त्याला कांहीं लिहिले आलें, त्यावरून आपली सारी फौज घेऊन सान्हेर किल्ल्यासं वेढा आलेल्या मोगलांचा मुलूख मारीत चालला. तो सुरतेतून निघताना नेथल्या लो कांस एक पत्र देऊन निघाला, त्यांत असें लिहिलें होतें कीं, तुम्ही मनि चंदी बाळगूं नये रक्षणी घालतां मजपासून तुम्हाला उपद्रव होणार नाहीं.

शिवाजी लष्कर सुद्धां चांदोर घाटेतीं पोंहचला तेव्हां त्यास समज लें कीं, एक मोगलांकडचा पांच हजार स्वारांचा सरदार आपल्या पाठी मागें लागला आहे: यास्तवरोज समोर एक मोठी फौज नाशिकाचेवाटेवर दिसूं लागली. त्या घाटावरी येऊन वाट पाहात बसली आहे. तेसमयीं शिवाजी ने आपल्या फौजेच्या चार टोळ्या करून एकीस नें सारें द्रव्य संभाळून न्यावयाचें सोपविलें: इतरांस त्या सरदारावर जावयाचें काम नेमिलें; त्या निद्दीं टोळ्या निघोन जाऊन मोगलांशीं युद्ध करूं लागल्या. इ तक्यात त्या एका टोळीनें द्रव्य नेऊन कोंकणांत पोंहचविलें. नंतर

शिवाजीने मोरोपंतांच्या आणि [illegible] दुसऱ्या सरदारांना निरनि
कोंकणात गेला. त्या मोंगलांकडील मराठी फौजेची दाणा होती,
ती मध्ये मुख्य माडुरच्या देशमुखाची स्त्री असे, तिचा भतार दुर्वर्त
वर्तन झाला होता, शिवाजीने त्या बाईचा संमान करून तिला नि
च्या मुलखी पाठविले.

६ यानंतर शिवाजीनें आपला सरदार प्रतापराव गुजर याज
बरोबर फौज देऊन खानदेश लुटावया करितां पाठविला. तेथेंही मो
गलांचें लष्कर नष्ट करून त्यांणी यथेच्छ लूट केली. यांनीं कांहीं मा
ण्यात विश्वासघात कीं, यांणीं जाताना गांवोगांव लोकांपासून लिहून
घेतलें कीं, आम्ही शिवाजीस व शिवाजीच्या सरदारांस वचनाची च
थाई देऊं; आणि आपण लिहून दिलें कीं, जे चवथाई देतील त्यांस दुस
कोणी उपद्रव करील तर त्यापासून संरक्षण करूं. आणि चवथाई दि
ल्याची पावती देत जाऊं. त्यापुढें मराठेलोक मोंगलांचे मुलखीं चवथा
ई घेत होते, परंतु त्याचा आरंभ नोव्हेंबर.

सन सोळाशें एकाहत्तरीचे प्रारंभीं मोरोपंतानें किल्ले सिंधुदुर्ग
घेतले. त्यांत ओंडा पाडा आणि मालवण हे तीन श्रेष्ठ होते.

७ अशा शिवाजीचा जय होत चालिला असतां मोंगललोक कसे
से उगे राहिले? असें कोणी म्हणेल तर त्याचें कारण असें समजावें कीं,
शिवाजी आणि सुलतान माजूम यांची मैत्री आहे असें लोकांस दिस
त होतें: आणखी यशवंतसिंग शिवाजीचा हितकर्ता होता. तें सर्वलोक
जाणत असत. तो सुलतानास मसलत देई कीं. दिलीहून कुमकेस फौ
ज मागावी; कुमकेस दुसरी फौज आल्यावांचून युद्ध करूं नये; आणि
तो पक्का जाणत होता कीं, मागितली असतांही आपल्या घराच्या रीकें
नें औरंगजेब फौज देणार नाहीं. त्या सुलतान माजुमानें [illegible] याची मसलत

न ऐकिलें; त्यावरून लोकांस असें वाटूं लागलें कीं, शिवाजीनीं मिळून बापाशीं युद्ध करून स्वतंत्रपणानें असावें, असें सुलतानाचें मनांत आहे. हें खरें असेल कीं नसेल हें समजत नाहीं, परंतु इतकें खरें असेल कीं, बाप मेल्यावर आपण तक्ताधिपति नव्हालों तर, दुसरा होईल तो आपल्यास मारील, ही एक शंका त्याच्या मनांत होती यास्तव शिवाजीचें बंड उपयोगीं पडेल असें वाटून तसेंच रक्षिलें; आणि त्याचें पारिपत्या चे मिषें करून आपले जवळ पुष्कळ फौज असावी; कांकीं, समयीं आपल्या कामावर पडेल; असा मनसोबा केला. हा मनसोबा त्याला शेवटास न्यावयास अवकाश पडला नाहीं; कांकीं, थोडकेच दिवसांत औरंगजेबानें यशवंत सिंगास आपल्या जवळ बोलावून नेलें; आणि मोहोबतखान नामें दुसरा एक सरदार चाळीस हजार फौज बरोबर देऊन दक्षिणेंत पाठविला. तो सुलतान माजुमास विशेष मानींत नसे.

८ त्या मोहबतखानानें दक्षिणेंत येतांच ओंडा पाटा हे किल्ले घेतले. मग पर्जन्यकाळ गेल्यावर दिलीरखान बरोबर अर्धे लश्कर देऊन तो चाकणचा किल्ला घ्यावयास पाठविला; आणि आपण अर्धे लश्कर घेऊन साल्हेर किल्ल्यास वेढा घातला. हें वर्तमान सन सोळाशें बाहात्तरांत घडलें. तेव्हां शिवाजीनें मोरोपंत व प्रतापराव गुजर यांजबरोबर बारा हजार स्वार देऊन आज्ञा केली कीं, मोंगलांस हांकून द्यावें. ही बातमी मोहोबतखानास कळल्यावर, त्यानें आपल्याबरोबरचे एक आपल्या जवळ थोडकेसे ठेवून बहुतेक युद्धास पाठविले. त्या दोहों लश्करांची साल्हेर किल्ल्याजवळ गांठ पडली. तेसमयीं प्रतापराव पुढें होता. त्यानें आपल्या लोकांस आज्ञा केली कीं, मोंगलांनीं हल्ला केला असतां आपण मोडल्याप्रमाणें कांहींसें पळाल्यासा दिखाव करून त्यांस आंगावर घेऊन त्यांचा बंदोबस्त मोडण्यासा ठाला

म्हणजे आपण हल्ला करावा, मग त्यालोकांनी तसेंच केलें, ते णेंकरून मोंगलांचा फार नाश झाला. तेव्हां मोंगल आपला मोडलेला बंदोबस्त नीट करीत करीत मोठ्या शौर्यें फरून न-टले, परंतु उपाय चालेना. त्या युद्धांत यांचे मोठे मोठे सरदार बेवीस मेले, आणि कितीएक जखमी झाले व कितीएक सांप-डले गेले. मराठ्यांकडील एक सरदावकांकडे नामें पांच हजार स्वारांचा सरदार पडला, आणि पांचशें लोक मेले. त्या लढाईचा शे-वट असा झालाकीं, साल्हेर किल्ल्यासभोंवतीं जो मोंगलांचे लष्क-राचा वेढा होता तो काढून मोंगललोक पिटून लावितले, ते औ-रंगाबादेस पळून गेले. त्या पूर्वी कधींही मोंगलांशीं मराठेलोक असे झटून लढले नव्हते, म्हणून त्या युद्धापासून मराठे मोठे हि-म्मतवान झाले.

जे लोक शिवाजीचे हातीं सांपडले ते रायगडास नेऊन दे विले; मग त्यांच्या जखमा बऱ्या झाल्यावर जे चाकरीस राहिले ते ठेविले, आणि जे नराहीत त्यांस मोठ्या संमानानें आपले ठिकाणीं जाऊं दिलें. त्या दिवसापासून विजापूरकरांचे फरारी लोक, आणि मोंगलांचे लष्करी लोक त्यांची चाकरी सोडून शिवाजीस भेटून त्याचे चाकरीस राहूं लागले.

९ यानंतर शिवाजी पोर्टुगीसलोकांपाशीं खंडणी मागूं गेला, तेव्हां त्यांणीं मान्य न केलें म्हणून वसईजवळच्या खाडी-च्या मुखांत घोडबंदर किल्ला आहे तो घ्यावयास गेला, परंतु तोफे-चे हातीं लागला नाहीं; त्यालोकांनी त्यास मागें हटविलें. त्या वेळेस खंबायतमध्यें इंग्रजलोक इतका जवळ शिवाजी आला म्हणून भि-ऊन आपल्या किल्ल्याचा बंदोबस्त करूं लागले. इतके दिवस इंग्रजे

जांचें व शिवाजीचें कधीं युद्धसालें नव्हतें; कांकीं, परस्परें दोघांस एकमेकाची गरज होती. ती अशी, मुंबईचे लोक धान्य आणि जळण शिवाजीच्या मुलखांतून आणीत असत; आणि मराठे लोकांस त्यापासून असा उपयोग होई कीं, ते लोक मोंगलांचीं लढाऊ गलबतें मुंबईवरून खुद्द शिवाजीच्या मुलखाकडे जाऊं देत नसत; म्हणून त्यांचा शिवाजीचा सल्ला होता. यामागें एक वेळ सन सोळाशें एकसष्ट शिवाजीनें राजापूर लुटलें, तेव्हां इंग्रेजांचें द्रव्य सुमारें दहा हजार होन गेलें होतें, ते परत घ्यावया करितां त्यांणीं उद्योगकितीएक वेळां केला, परंतु त्यांणें दिलें नाहीं. मग यावेळेस त्याजीं बहु करून पेका घ्यावयाचा नवा उद्योग केला. तेव्हां त्यांस शिवाजी म्हणाला कीं, आम्हाला जंजीरा घ्यांवयास तुम्हीं कुमक करावी तर तुमचें होऊन परत देईन, हें जर मजीं मनयेईल तर राजापुरीं फिरून कोठीकरून पहिल्या प्रमाणें व्यापार चालवावा म्हणजे होऊन देतों. त्यावर इंग्रेजांनीं उत्तर केलें कीं, आम्ही व्यापार करावयास येथें आलों, जो आमचें वाटेस जातो त्यावर नाहीं आम्ही शस्त्र धरितों, निष्कारण उपद्रव करावा असें आमच्या धर्मांत नाहीं. आतां आम्ही राजापुरीं व्यापार चालवूं, परंतु इतःपर उपद्रव होणार नाहीं असा पक्का जामीन पाहिजे, नेव्हांती गोष्ट नवीच राहिली.

१० इतक्यांत मोंगलांचे मुलखांत कांहीं विशेष बंदोबस्त झाला. तो असा, औरंगजेबानें सुलतान माजूम व मोहोबतखान यांस आपल्याजवळ बोलावून नेलें, आणि गुजराथेचा अधिकारी खानजहान बहादूर होता तो दक्षिणेचा अधिकारी करून पाठविला. तो दक्षिणेस येऊन असें समजला कीं, शिवाजीच्या वाटेस

जावयाजोगें आपल्याजवळ सैन्य नाहीं, यास्तव आपल्या मुलखा
चें मात्र संरक्षण करावें. ह्मणून त्याणें किताएक देवांत जावया
च्या घाटांच्या वाटा बंद केल्या. तेव्हां शिवाजी दुसरी नवीच वाट का
ढून फौजेसहित घाटावरजाऊन अहंमदनगर व औरंगाबाद
यांचे आसमंतात लुटूं लागला, तेव्हां त्याचे पारिपत्या करितां शा
नजहानानें चवूंकडे लोक पाठविले, परंतु त्याची कोठेंही गांठ पड
नाहीं. मग पर्जन्यकाळ जवळ आला ह्मणून भीमेचे कांठीं पेडगां
वापाशीं छावणीकरून राहिला; तेथें एक किल्ला बांधून त्याचें
नाव बहादरगड ठेविले. तो मोंगलांचा सरदार किल्लाबांधीत
असतां शिवाजी गुप्तपें लश्करसहित गोवळ कोंड्यांत शि
रला, आणि तेथून पुष्कळ खंडणी घेऊन स्वस्थपणें रायगडा
स गेला. यानंतर मोंगलांच्याही मुलखांत शिवाजीनें स्वार पाठवि
ले, त्यांणीं जेथें बळ चालेल तेथें लुटावें. आणि मोंगलांचे ल
श्करची गांठ पडली असतां तीव्र बरोवर [illegible] पळावें. या
तच त्यालोकांस पुरुषार्थआहे असें वाटत असे.

शिवाजी गोवळकोंड्यांत होता, इतक्यांत समुद्रतीरच्या त्या
च्या गांवांचा फारनाश झाला; तो असा, सुरतेचीं आणि जंजीरा
चीं लढाऊ गलबतें येऊन त्यांणीं तेगांव लुटले, परंतु तेणें करू
न त्याचें बळ किमपि उणें झालें नाहीं; कांकीं, त्या हानीपेक्षां गो
वळकोंड्यांत लाभ विशेष झाला.

११ सन सोळाशें बहात्तरांच्या बाराव्या महिन्याचे पंधरावे
तारिखेस विजापूरचा बादशाह अल्लीआदिलशाह याचे घरी
रास वायूचाउपद्रव होऊन एकाएकीं हातपाय गेले; तेव्हां तो
आपल्या राज्याचा कांहीं बंदोबस्त करून मग थोडकेच दिवसां

नीं मरण पावला. त्याला पुत्र एकच पांच वर्षांचा सुलतान शिकंदर नामें होता, आणि एक कन्या होती. त्या वेळेस त्याचा वजीर अबदुल महंमद् तो मोठा कुलीन आणि सुज्ञ होता, परंतु त्याका काप्रमाणें त्यामध्यें सामर्थ्य नव्हतें. दुसरे मोठे तिघे मुत्सद्दी होते, एक खवासखान, दुसरा अब्दुलकरीम, त्यालाच बालोळखान म्हणत, तिसरा मजाफेरखान. हे तिघेही सरकारचें हित न पाहतां आपलेंच प्राबल्य असावें असें इच्छीत होते. तो वजीर अल्पसामर्थ्य होता यामुळें त्याला त्या तिघांस आळेंन घालवावयाची शक्ति होईना; आणि ते तर आपलें माहात्म्य वाढवावें म्हणून अति स्वतंत्र झाले, तेणेंकरून आंतल्या आंत वैमनस्यें पडलीं; यास्तव त्या राज्याची दशा अशी झाली कीं, छत्रपति शिवाजी आणि मोंगल तें राज्य घ्यावयास टपलेले, आणि जो तो क्रूर झालेला. यावरून असें दिसूं लागलें कीं, हें राज्य आतां लोकर बुडेल. असें असतां अबदुल्महंमद् याणें बादशाह मरतेसमयीं ममलत दिलीकीं, सुलतानशिकंदर प्रौढ होईतोंपर्यंत खवासखान मुख्य कारभारी करावा, आणि जे दुसरे दोघे मुख्य राहिले त्यांस व मला मुलखांमध्यें जागोजाग वेगळा वेगळा अधिकार द्यावा. तेव्हां बादशाहानें निरुपाय होऊन तेंमान्य केलें; आणि खवासखानाला जवळ बोलावून त्याचे हातांत पुत्राचा हात दिला, आणि वजीरानें ममलत दिली होती त्या प्रमाणें वागावयाची आज्ञा दिली. मग बादशाह मृत्यु पावल्यावर तो खवासखान मुख्य झाला, त्याणें तिघां मुख्यांतील एक मजाफेरखान यास मात्र करनाटकांत पाठविलें; दुसरे दोघे मोंगलांचे आश्रयाला गेले. पुढें जवळ होतील अशा भयानें ते आपल्या जव

क ठेविले. त्या चोपांजवळ ब्राह्मण आश्रित होते, त्या योगेंकरून तेथचें बारीक वर्तमान शिवाजीला कळत असे. त्या शिवाजीला विजापुराची अशी अवस्था समजतांच त्याणें असें मनांत आणिलें कीं, पूर्वी जो अबदुलमहंमद यानीं तह ठरविला होता तो बादशाह याचें मरणापर्यंत झाला, आतां आपला लाभ साधावा हेंच मुख्य.

१२ या प्रमाणें निश्चय करून संन सोळाशें त्र्याहात्तरांच्या तिसऱ्या महिन्यांत शिवाजीनें विशाळगडास मोठें सैन्य जमा केलें, त्यांतून कितीएक लोक पाठवून पन्हाळ किल्ला छापा घालून घेतला; परंतु त्याचे मनांत हुबळीनामें मोठें शहर, ज्यांत धें व्यापार मोठा चालतो आहे, तें लुटावयास फार अगत्य होतें. तें काम त्याणें आनाजीदत्तो यास सांगितलें; त्याणें तेथें जाऊन तें शहर लुटून असें द्रव्य जमा केलें कीं, ज्याचा अजमास करितां येत नाहीं. मग ते लोक निघून गेल्यावर तेथें संरक्षणार्थ पूर्वी पासून राहिलेले जे विजापूरकरांचे लोक होते त्यांनीं जें बाष राहिलें द्रव्य तें सर्व नेलें. या खेरीज शिवाजीनें विजापूरकरांचा समुद्राचे तीरचा मुलूख लुटावयास लढाऊ गलबतें पाठविलीं, आणि गांवोगांव देशमुख आदिकरून अधिकाऱ्यांस मसलत दिली कीं, विजापूरकरांचे लोकांस हांकून तुर्क लवलवपणानें द्यावें. त्या वेळेस चंदनूरचा राणा याणें डुबळी शहरची ती दशा पाहून शिवाजीला शरण जाऊन खंडणी घ्यावयास कबूल करून अभय मागितलें.

त्यावर दिड महिन्यानें मावळे लोक पाठवून [illegible] पन्हाळा किल्ला घेतला. त्यानंतर सातारा किल्ला, ज्यास [illegible] स-

रक्षणचा बंदोबस्त असे, त्यास घेरा घातला. तो चार महिने लढला, मग शिवाजीचे हातीं लागला. त्या किल्ल्याचा एक विशेष आहे, तो असा, ज्या पासून फितूर इत्यादिक अन्याय झाले असा जो सरकारचा मोठा अपराधी तो मोनाऱ्यावर बंदींत ठेवावा, अशी चाल किती एक पिढ्या विजापूरकरांची होती, ती आदिलशाई वंशापासून किंवा त्याचे अगोधरपासून चालत आली. तो किल्ला त्याणें घेतला आणि मोठा हर्ष पावला, परंतु त्याचे वंशाचे पुरुष त्यांत पुढें बंदीस पडतील हें त्याला समजलें नाहीं.

या वर्षी पर्जन्यकाळा मध्येंच चंदन, वंदन, पांडवगड, नांदगिरी, आणि तारोरा हे पांच किले शिवाजीचे हस्तगत झाले.

१३ इकडे विजापुरांत सुलतान शिकंदर बादशाह लहान असून जो मुख्य केलेला खवासखान होता, त्याणें शिवाजीचें असें सामर्थ्य जाणून एक फौज पाठविली. त्यालोकांनीं जाऊन पन्हाल्या किल्ल्याचे आसमंतात् मुलूख घेतला. इतक्यांत शिवाजी कडचा प्रतापराव गुजर विजापुराचे सभोंवता लुटूं लागला, आणि मोठा उपद्रव करूंलागला, तेव्हां विजापूरकरानें आपलें लश्कर माघारें बोलाविलें. प्रतापरावयाणें त्या लश्कराची वाटच बंद केली, आणि त्यास दाणापाणी मिळेना असें नानाप्रकारें दर्शविलें. तेव्हां त्या विजापूरकरांच्या लश्करांत मोठा सरदार अब्दुलकरीम होता, तो त्या प्रतापरावाशीं आर्जवाच्या गोष्टी बोलून आपलें लश्कर वांचवून विजापुरीं गेला. त्यावरून शिवाजीला

+ अपराधी लोकांस बंदींत ठेवावयाचा जमा सातारा विजापूर कर्‍हाड, नसाव पूर्वी लोहगड अहंमदनगर करांचा होता.

भोंठा राग येऊन त्याणं त्यास निर्भर्त्सना करून लिहिले तेणें करून प्रतापराव फार खिन्न होऊन शिवाजीची आज्ञा मानतां त्याणें वराडांतील पैन घाटचे मुलखांत सैन्य चालविलें.

१४ त्या पुढें अबदुलकरीम प्रतापराव दूर गेला असें समजून सन सोळाशें चौऱ्याहत्तरांच्या दुसऱ्या महिन्यांत पुनः सैन्य घेऊन पन्हाळा किल्ला घ्यावयास चालला. तो त्या किल्ल्याचे जवळ जाऊन पोंहचला तों प्रतापराव पुष्कळ सैन्य सहित तेथें त्याचे दृष्टीस पडला. त्यास त्यापूर्वी शिवाजीचा निरोप आला होता कीं, अगा अन्यायी जनू तू तो विजापूरकरांचें लश्कर लुटल्यावांचून मला तोंड दाखवूं नको, या सव तैसें करून तो आपला बंदोबस्त पाहातां एकाएकीं त्या लश्करावर उडी घालून आपण मरूनगेला, मग त्याचे सैन्याची दुर्दशा झाली.

१५ ते लोक पळाले ते पन्हाळ्याचे तोफखालीं गेले, तेव्हां त्यांस आश्रय सांपडला. तेवेळेस एक मराठा हंसाजी मोहिता नामें पांच हजार स्वारांचा सरदार होता तो अकस्मात् आला. त्याणें विजापूरकरांचे लोक मराठे लोकांचे पाठीस लागलेले, आणि त्यांनवं दाद्यन नाहीं असें पाहून त्यावर आपण हल्ला केला. मग त्यांचा मोड झालासा पाहून मराठे लोकांनीं माघारें उलटून आपल्या पाठी स लागणारांस पळविलें. तेसमयीं विजापूरकरांचा सरदार मोठ्या लज्जेनें माघारा विजापुरीं गेला.

त्या हंसाजी मोहित्याचे लोकांत दोन सरदार मोठ्या शौर्यें करून लढले, ते एक संताजी घोरपडा आणि दुसरा धनाजी जाधव. त्या पुढें ते दोघे अद्या आचरणें करून मोठे विख्यात झाले

नेंजें हंसाजी मोहित्यानें कार्य केलें तेंतें शिवाजीला मोठें हर्षास्पद झाले. तेणें करून त्याणें त्याचें हंबीरराव असें नवें नाव ज्या

पून लष्कराचे सरनोबतकीचा अधिकार त्यास दिला. त्या प्रतापराव गुजरानें ही पूर्वी मोठीं मोठीं कामें केलीं होतीं आणि या वेळेस तरतोमरूनच गेला; यास्तव त्याची फारफार प्रशंसा करून शिवाजीनें त्याचे सोयरे धायरे सुद्धां त्याच्या मुलां माणसांचें पोषण केलें; आणखी त्याची कन्या व आपला पुत्र राजाराम यांचा विवाह केला.

तो प्रतापराव मृत्यु पावला त्याच सुमारें आबाजी सोनदेव याचा काळ झाला, त्याचा पुत्र रामचंद्रपंत तो मुजूमदार केला. त्या शिवाजीची चाल अशी होती कीं, गुणी असल्या वांचून पुत्रास बापाचा अधिकार देऊंनये.

१६ शिवाजी फार दिवस आपणास राजा महाराज असें म्हणवीत असे; आणि आपले राज्यांत त्याणें नव्या टंकसाळा घातल्या होत्या; आणखी तो ब्राह्मणांस म्हणूं लागला कीं तुला मला राज्याभिषेक करून ज्या दिवशीं मी तख्ताधिपति होईन तो दिवस वर्षारंभ करावा. त्यावेळेस काशीहून एक गागाभट्ट नामें मोठा विद्वान ब्राह्मण आला होता, त्यास तें काम सांगितलें, मग त्याणें शास्त्रार्थ बहुत पाहून संवत सोळाशें चौऱ्याहत्तरांचे साहावे महिन्याचे साहावे तारखेस, शके पंधराशें चौऱ्यांणवांचे ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीचे दिवशीं मुहूर्तीं रायगडीं शिवाजीस यथाविधि राज्याभिषेक केला*.

पूर्वी कारभारी यांचीं अधिकारसंबंधीं नावें फारशी शास्त्रांचीं होतीं, मग शिवाजीला राज्याभिषेक झाल्यावर तीं बदलून नवीं

---

* त्या पुढें पंधरा दिवसांनीं शिवाजीची आई जिजाबाई मेली, म्हणून त्यास पुनः राज्याभिषेक केला, परंतु वर्षारंभ दिवस जो पहिला राज्याभिषेक झाला तोच ठेविला, दुसरा नंकला.

संस्कृत ठेविलीं. तीं नावें शिवाजी जीवंत होता तों पर्यंत चालत होतीं, त्या पुढें अष्टप्रधानांचीं मात्र राहिलीं; त्या नावांचा तपशील आणि त्या अधिकाऱ्यांचीं नावें अशीं.

फारशी	संस्कृत.	मूळचीं नावें.
पेशवा.	मुख्यप्रधान,	मोरोपंत पिंगळे.
मुजूमदार,	पंतअमात्य,	रामचंद्रपंत बावडेकर.
सुरनीस,	पंतसचिव.	अण्णाजी दत्तो.
वाकनीस,	मंत्री,	दत्ताजीपंत.
सरनोबत.	सेनापति,	हंबीरराव मोहिते.
डबीर,	सुमंत,	जनार्दनपंत हणमंते.
न्यायाधीश,	न्यायाधीश,	बाळाजीपंत.
न्यायशास्त्री,	पंडितराव,	रघुनाथपंत.

यानंतर शिवाजीनें आपली सुवर्णाची तुला केली. आणि मोठी विपि करवून आपणास उत्तम रजपूत म्हणविलें; आणखी नानागुणांनीं युक्त महत्वाचे सूचक जे श्रीमंत छत्रपति इत्यादि शब्द ते जोडून आपलें नाव लिहावयाची चाल केली.

१७ पूर्वी शिवाजी सतरासोळाशें व्यहात्तरांत जेव्हां विजापूरच्या गोष्टी युद्ध करूं लागला, तेव्हांपासून त्याणें मोंगल लोकांशीं तह केला होता म्हणून ते लोक त्यास उपद्रव करीत नव्हते; परंतु सतरासोळा-

---

* रायगडीं शिवाजीचा राज्याभिषेक झाला, ते समयीं [illegible] लोकांशीं शिवाजीचीं नवीं [illegible] कानास मंजूर होऊन एक सोन्याचें [illegible] त्याणें शिवाजीचे [illegible] मोठा उत्सव करून लागलेले पाहिले.

शें पंचेहत्तरांत मोंगलांचा दिलीरखान नामें सरदार याणें शिवाजीच्या मुलखास उपद्रव केला, तेंच तह मोडावयास शिवाजीला निमित्त झा ले. त्याणें मोरोपंतास पाठवून पुनः ओंडा,पाटा,हे किल्ले घेतले; आणि हंबीरराव सेनापति याणें सुरतेजवळच्या घाटावर जाऊन आपल्या फौजेच्या वेगळ्या वेगळ्या गोळ्या करून व झाडपूर पांवेतों मुलूख लुटला; तेथून पुढें नाशिक पर्यंत ही लुटीत गेला; त्यांतल्याच एका टोळीनें जा ऊन भडोंच परगणा लुटला. त्या पूर्वी कोणी मराठा नर्मदा उतरू न पलीकडे गेला नव्हता. त्या शिवाजीनें आपण आंगें जाऊन प न्हाळा व तादोरा यांमध्यें ठाणें वसवून कोंकणांत पोंडा किल्ला यान घेरा घातला. तो शिवाजी फौजे सहित कोंकणांत गेला अ सें पाहून विजापूरकरांकडचें सरदार निंबाळकर व घाटगे व फलटणचा मलावरीचे देशमूख यांणीं शिवाजीनें वसविलेलें ठाणें उठवून त्या संबंधी मुलूख घेतला.

हंबीरराव गोदावरी उतरून माघारा आल्यावर दिलीरखा न मोठ्या निकरानें त्याचे पाठीस लागला, परंतु त्याणें जी लूट मिळ विली होती ती मोठ्या कष्टानें वांचवून रायगडास नेली. त्या समयीं मोंगलांनीं कालीयानी परगणा लुटला. शिवाजीनें पोंडा किल्ल्या-चा बुरूज सुरुंगानें उडवून तो किल्ला घेतला. त्यानंतर त्याणें द क्षिण कोंकणांत जाऊन कितीएक ठिकाणें लुटून कितीएकां जा गची खंडणी घेऊन घाटावर जाऊन मुंडाप्रांतांतील द्रव्य घेऊन रायगडीं फिरून आला.

विजापुरांत जो मुख्य झालेला खवासखान होता, तो शिवा-जीच्या भयानें राज्याच्या रक्षणाचें अगत्य सोडून केवळ आपल्या ना शितालाच [illegible]

कीं, इतःपर आम्ही तुमचे स्वराज्यास राहूं, आणि मुलखाचा बादशाह याची बहीण पादशाह बिबी औरंगजेबाच्या पुत्रास देऊं. हें वर्तमान विजापूर कराचे नानकरी सरदार लोक यांस समजतांच त्यांणीं मोरकरी घालून त्या खवासखानास मारून टाकिलें. नंतर अबदुल करीम कारभार चालवूं लागला, त्याणें मुलखाच्या रक्षणाविषयीं आज्ञा केलेली सरदारलोक खवासखानाच्या आज्ञेपेक्षां विशेष मानीत होते. नंतर जेव्हां दिलीरखान विजापुरचे मुलखांत गेला तेव्हां अबदुल करीम लष्कर सुद्धां युद्धास सिद्ध न होतां, मग त्याची आणि याची किनीएक वेळां लढाई झाली, आणि विजापूरकरांचा कांहींसा जय झाला, तेव्हां दिलीरखान नही, तो अबदुल करीम त्याचे जातीचा म्हणून, त्यास कांहीं अनुकूल झाला, तेणकरून त्यास नष्ट करण मुलभ पडल.

१८ संनसोळाशें शाहात्तरांत ताटोरा व पन्हाळा यांचे मधला मुलूख शिवाजीनें निमऱ्याने घेतला; आणि विजापुरच्या जहागीरदारांचा उपद्रव नलागावा म्हणून किल्ले बांधिले, त्यांचीं नावें:-वर्धनगड, भूषणगड, सदाशिवगड, सछिद्रगड. हे चार किल्ले फार मोठे नव्हते. परंतु मुलखाचे रक्षणास मोठे उपयोगी पडत असा जागीं बांधिले होते; आणि त्यांचे संबंधी जे मुलूख त्यांचा वसूल पुष्कळ उत्पन्न होत असे. असा बंदोबस्त करीत असतां त्यांचे बाजीच्या शरीरीं समाधान नाहींसें झालें, तेणें करून तो सातारच्यास कांहीं महिने पडला होता. तेव्हां त्याणें बहुत देवाची सेवा व अनुष्ठानें करविलीं; आणि त्या दुरवस्थेतच त्याणें करनाटक प्रांतीं जाऊन जिंजीच्या आवतीची अशी मोठी मसलत केली कीं त्या पूर्वी कधीं केलीच नव्हती. ती मसलत करावयास त्याणें कायकाय कामें करून

शाहदाम न्यायासन उद्योग केला, नें पुर्ते पणें समजावया करितां पूर्वी लिहिलेल्या वर्तमानांतील कांहीं प्रकरणांची सूचना लिहिली पाहिजे, नी या भागाचे पुढच्या भागीं लिहिण्यांत येईल.

भागनववा

संन सोळाशें शहात्तरां पासून ऐंशीपर्यंत झालेली वर्तमानें.

१ पूर्वी औरंगजेबानें आपल्या मनांत निश्चय केला कीं, सर्व दक्षिणेचें राज्य आपल्या स्वाधीन ठेवावें. मग तो आपलें राज्य सांभाळून असतां काहीं करून नें विसरला असें मनजूंनये. पहिल्या पासून त्याची मसलत अशी होती कीं, दक्षिणचे अधिकारी व राजे हे आप आपल्यांत कलह करून निर्बळ झालेले नसेच राखावे, नंतर जेव्हां आपले चित्तास येईल तेव्हां आपण जाऊन त्यांचें राज्य घेतां येईल. नें काम त्याला दुस्त्यास सांगतां येईना; कांकीं, त्याचे हातीं नें राज्य लागल्नें तोच सबळ होईल अशी मनांत शंका होती. यास्तव समजनें कीं, शिवाजीनें एकदां गनिमधूम केली असतां मोंगलांनीं त्यास नेलाळ बुडविलें नाहीं. शिवाजी गोवळकोंडे करांचीं आणि विजापूरकरांशीं कलहकरी त्यांनही औरंगजेब आपलें हितच जाणत असें; आणि या कामासाठीं त्याचा उद्योगही असाच होता कीं, आपले वर्कील गुप्तीनें पाठवून कांहीं युक्तीनें वैमनस्यें पाडावीं. त्याला असें वाटे कीं, अशाच भानगडी करून आपलें काम होईल,

परंतु येणें करूनच आपलें अहित आहे असें न समजतां कार्यी, दुष्कर्मे अंगीकारलीं असतां कोणेकेसमयीं तींच त्या करणास साधक होतात, शेवटीं त्यांचीच कुकर्मे त्याला घातक होतात. यावरून अर्थ असादिसतो की, उत्तम आचरण केवळ एकाचेच उपयोगीं पडतें असें नाहीं, माऱ्या बादशाहापासून गरीब रयते पर्यंत सर्वांचें उपयोगीं सारखें पडतें.

विजापुरीं अब्दुलकरीम यानें मोंगलांशीं आणि आपणाशीं सला रारखला होता, परंतु त्यांशीं बऱ्हुनकाळपर्यंत तशीच नेटीट चावी असें त्याचे मनांत नव्हतें; कार्यी, त्यानें आपलें हितचिंतक वेगळ्याच कल्पिल्या होत्या. त्याचे लोक व मोंगलांचे लोक एकाजा तीचे होते, त्यानें मोंगलांशीं सला केला यांचे कारणच असेच; नाहींतर तो आपल्या शहाणपणानें शिवाजीशीं तह करिता; कीं, शिवाजीच्या हितांचें आणि त्याच्या हितांचें कारण एकच होतें; आणखी मोंगल त्यास बुडवावयास पहात होते

गोवळकोंडें येथील मानकरी लोक बऱ्हुनांदिवसांपासून मोंगलांसमवेत झालेले होते. ज्यासमयीं कुतुबशाह मेला त्यासमयीं औरंगजेब सनजला कीं, आतां आपलें हित होईल; कांकीं तेथला नवा धिपति होणारा जो कुतुबशाहाचा जांवई अबूहुसेन तो केवळ विषयीं होता, परंतु बादशाह झाल्यावर तो आपले सर्व दुर्गुण टाकून उत्तम प्रकारें राज्यकारभार चालवूं लागला. तेव्हां औरंगजेबाची निराशा झाली. त्या अबूहुसेनास जवळ मसलत देणारे ब्राह्मण दोघे भाऊ होते. एक अकण्णा पंत, एक मादण्णा पंत. यांत मादण्णापंत फारच चतुर होता, परंतु त्याचा स्वभाव ब्राह्मणाचे जातिस्वभावासच शोभणारा असे. त्या दोघांचे मसलतीनेंच तो अबूहुसेन बऱ्हुपर वागे.

...नाणें दक्षिणेचा ...कर्नाटक वर्णनु की आल्या. त्या चक्रनेक लिहि ...; आतां शिवाजी कर्नाटकांत गेला तें प्रकरण.

सन सोळाशें शहाऐंशीचे अखेरीस शिवाजी तीस हजार स्वार आणि चाळीस हजार पायदळ बरोबर घेऊन गोवळकोंड्यास ...ऊन पोंहचल्यावर तेथल्या बादशाहाशीं मादण्णापंताचे योगें करून तह केला; आणि त्यापासून नोफा वगैरे सरंजाम घेऊन सन सोळाशें सत्याहत्तरांच्या तिसऱ्या महिन्यांत तेथून निघून कृष्णेचे पलीकडे उतरून गेला. तिकडे जातांना त्या वाटेच्या एके बाजूस श्रीशैलनामें देवस्थान आहे, तिकडे आपण लष्कर सोडून एकटा देवदर्शन करावया करितां गेला, तेथें तो बारा दिवस पर्यंत मोठें दुर्घट तप करून शेवटीं तरवार काढून प्राण देऊं लागला, ते समयीं भवानी प्रत्यक्ष येऊन त्याचें निवारणकरून बोलिली कीं, तुजा प्राण देणें योग्य नाहीं, कांकीं, तुझ्या हातून अद्यापि हिंदुधर्म वाढवायाचा आहे; आतां ऊठ तुझा जय होईल असे सांगून ती गुप्त झाली. असें त्यावेळचे लोक बोलत होते. इकडे इनक्यांत तेलंगकर्नाटकच्या पेनगोटचे मुलखांत पोंहचले होते, तेथें शिवाजी जाऊन त्याम मिळाला. नगजिंजी नामें विजापूरकरांचा किल्ला होता तेथल्या सरदारानें विजापुरच्या मुख्याचे आज्ञेवरून किल्ला दिला. तेथें कांगी मावळा सरदार शिवाजीनें ठेविला; आणि आपल्या देशाच्या कायद्या प्रमाणेंच तेथें वसूल वगैरे याची रीति चालविली, त्या कामावर ब्राह्मण ठेविला होता.

२ यानंतर विजापूरकरांचा एकपांच हजार स्वारांचा सरदार होता तो शिवाजीच्या निवारणाचा उद्योग करूं लागला, तेव्हां शिवाजीनें त्याचा पराभव करून त्याचे घोडे घेतले तो शिवाजी दाभत्या

[illegible] काही सैन्य ठेवून आपण पुढे आला होता, त्यांच्यांनी जाऊन त्रिंबोरा किल्ला सहज घालवला; आणि शिवाजी सरदारांस न कळतां करावयाचा यत्न करीत होता, त्याणें आपला सावत्र भाऊ व्यंकोजी यास नंजोराहून त्रिवादें येथें भेटावयास बोलाविलें. कीं, तुम्ही एथें येऊन भेटावें, म्हणजे वडिलांचे मुलखाचा निमा ग करून घेऊं. तेव्हां तो निरुपाय होऊन आला, त्यास शिवाजी मोठ्या समारंभानें भेटला, आणि त्याजवळ मुलखाची अर्धवाट णी मागितली; परंतु तो ऐकेना तेव्हां शिवाजीचे मनांत आलें कीं, बलात्कारावांचून मसलत सिद्धीस जात नाहीं. तथापि तो आपले संतोषें करून भेटीस आला म्हणून शिवाजीनें त्यास माघारें नंजोरास जाऊं दिलें; परंतु मनांत असा निश्चय धरिला कीं, एक नंजोर न घेतां जितका शाहाजीचा जहागिरीचा मुलूख आहे तो सारा घेऊं त्या बेतास त्याणें व्यंकोजीस पत्र पाठविलें कीं, माझे जवळ मुलूख पुष्कळ आहे, आणखी मुलखाची इच्छा नाहीं, परंतु माझी वडलो ची [illegible] जर मी न घेतली तर मला योग्य नव्हे, त्यास कलह न करितां तंजोराचा अर्धा भाग व आरणी किल्ला व वरकड किल्ले व मुलूख यांतील अर्धा भाग बखेर द्यावा.

यानंतर शिवाजी त्रिंबोरास आला, आणि थोडकेच दिवस त्याणें तीन किल्ले घेतले. आणखी एक वेदोभास्कर नामें ब्राह्मण आरणी किल्ल्याचा अधिकारी शाहाजीपासून होता, तो स्वतां येऊन शिवाजीस किल्ला देऊन आपण त्याचे चाकरीस राहिला. मग त्याच वर्षी शाहाजीचे जहागीर संबंधी कोल्हार व बंगलोर व उसकोटा व चाळापूर व शेरा हे परगणे सर्व घेतले; आणि त्यांचेसा र सरहा नाटक प्रांतांत जाऊन विजापूरकरांच्या मुलखावी सर-

दक्षमुखी व दोंथ या निमित्तें करून लुटले झाले.

२ शिवाजी या मोहिमेस निघाल्याचे पूर्वी त्याणें खानजहा न नामें मोंगलांचा सरदार होता त्याशीं स्नेहाचा तह केला होता. हें न होतें वर्तमान औरंगजेबास कळलें तेव्हां तें त्यास बरें वाट-लें नाहीं. त्यावेळेस त्याचा दिलीरखान नामें दुसरा सरदार याणें मसलत केली कीं, आदिलाला विजापूरकरांचें लश्कर सहाय झालें असतां आदिलशाही गोवळकोंड्यावें राज्य अगदीं बुडवून टाकूं. तेव्हां औ रंगजेबानें त्या खानजहानास बोलावून घेऊन त्याचे जागीं दिल्ली खानास पाठविलें. याप्रमाणें मोगल आणि विजापूरकर मिळू न गोवळकोंडेकरांचा द्वेष करूं लागले, याचें कारण असें, गोवळ कोंडेकरांनीं शिवाजीशीं स्नेह केला होता, व त्यांच्या माहण्णापंता नें हीं दोन्हीं लश्करें एकदांच येऊन मोठा अनर्थ करितील असें समजून आपण मोठें सैन्य जमा केलें होतें. मग तीं दोन्हीं लश्करें आलीं तेव्हां, त्याणें आपल्या सैन्याच्या सामर्थ्यें करून त्या दोहींल श्करांचा एकमेकांत भेद केला; त्यांत विजापूरकरांचा असा नाश झाला कीं, त्यांतले कितीएक लोक लश्कर सोडून पळाले, आणि जे राहि ले ते रोजमुरा मिळेना त्यणून युद्धास झटेनासे झाले. या खेरीज अ बदुलकरीम याचे शरीरीं समाधान नाहीं सें होऊन सतरासोळाशें अ ठ्याहात्तरांचे पहिले महिन्यांत तो मरण पावला. तेव्हां दिलीरखा नाच्या योगें करून शिर्दीजाहजाचा जांवई मसाउदखान शिर्दी ता अबदुलकरीमाचा अधिकार चालवूं लागला; नंतर दिलीरखान पेडगांवीं लश्कर सुध्दां गेला.

४ हें सर्व वर्तमान शिवाजीला कळल्यावर तो आपल्या मु खरवाकडे जाऊं लागला, तेसमयीं आपला भाऊ संभाजी नांवा जो

शहाजीचा दासीपुत्र यास आणि रघुनाथनारायण यहंबीरराव मे
नापति यांसनें कर्नाटकचें काम सोंपवून आपण मापारा चा
लिला, तो बिलारी जवळ येऊन पोंहचला. तेथचा अधिकारी दे
साई तो गन झाला होता. आणि त्याचीच्ची तें स्थान संभाळून असे.
तेथें त्या शिवाजीच्या लश्करचें बुणगें मागिलेंगेलें, तेव्हां शिवाजी
नें तिला नें वर्तमान कळविलें, परंतु तिणें मनासच आणिलें नाहीं,
यास्तव शिवाजीनें त्या किल्यास घेरा घालून सत्तावीस दिवस यु
द्ध करून तो घेतला. नंतर कोपाळ नामें दुसरा किल्ला आणि व
हादुर बेंडा हे घेतले; आणि जनार्दनपंतसुमंत यास तेथचा बं
दोबस्त राखावयास सांगून पुढें चालिला. तो तुर्गल शहरीं
पोंहचल्यावर व्यंकोजीनें पाठीमागें राहिलेल्या लश्करावर छा
पा घातला आणि आपणच पराभव पावला. असें वर्तमान शि
वाजीला कळलें तेव्हां त्याणें त्यास लिहिलें कीं, तुमच्या अशा यो
ग्यतेस्तव मला बलात्कारें करून मुलूख द्यावा लागला; आणि
आतां तुमच्या दांडगाईमुळें माझ्या सरदारांस ही तुमचें पारिपत्य
करावें लागलें. आतां तुम्हीं सावधपणानें विचार केलात तर, तुम
चा आणि माझा स्नेह अमावा येणेंकरूनच कल्याण असें तुम
चे ध्यानांत येईल. आझून मी तुमाशीं स्नेह करावयास सिद्ध आ
हें, परंतु तुमाकडे वडिलांचा जितका मुलूख आहे तितका सर्व
माझे स्वाधीन करावा लागेल; मग मी तुमास योग्य असा दुसरा
कांहीं मुलूख देईन. त्यानंतर व्यंकोजीनें रघुनाथनारायणाचे
योगें करून वडिलांचे वेळच्या जिनगीचा आणि मुलखाचा अ
र्धाभाग करून दिला, आणि कांहीं द्रव्य देऊन शिवाजीस चला केलें.
तेव्हां त्याणें तंजोर आणि दुसरा संपूर्ण वडिलांचे परगण्यांतील

करनाटकचा मुलूख त्याकडे राखिला; नतर शिवाजी राजगडीं आगोदीस पोंहचला. इतकें काम करावयास त्याला दीड वर्ष लाग लें होतें.

५ तिकडे करनाटकांत हंबीरराव व जनार्दनपंत यांणीं वि जापूरकरांचे लश्कर तुंगभद्रा व कृष्णा या दोहीं मध्यें होतें तें थेंजा ऊन छापा घातला, आणि पांचशें घोडे व पांच हत्ती आणिले. त्यांक डील कोपाळ व बिलारी यांचे सभोंवते मोठे मोठे मबळजे दंगा करणारे देसाई व देशमूख होते ते शिवाजीनें वश करून घेतले.

शिवाजी करनाटकांत होता ते वेळस मोरो त्रिंमळ पेशवेया जकडे जो मुलूख सोंपविला होता तो युक्तीनें संभाळून जंजीऱ्या च्या शिद्दीशीं मोठ्या निकरानें लढत होता. त्या शिद्दीस मोंगलां चा आश्रय असे. ते समयीं त्याठिकाणीं शिद्दी संभोळ होता, तो औरंगजेबानें दूर करून त्याच्याजागीं शिद्दी कासीम नामें दुसराठे विला, आणि त्याचे नावास याकूट खान असें पद जोडिलें. तें पूर्वी शिद्दी संभोळ याचे ही नावास होतें.

६ त्या वेळेस विजापूरकरांनीं रजा दिलेले स्वार मोरोपंत ठे वूं लागला, कांकीं, त्यास दिलीरखान येऊन छापा घालील असें भ य होतें; परंतु दिलीरखानानें जो दक्षिणेचा बंदोबस्त केला होता, तो औरंगजेबाचे मनास न येऊन त्याणें त्याचा तो अधिकार काढून सुलतान माजुमास दिला, आणि मातब्यानें तो दक्षिणेंत पाठवि ला; परंतु युद्धादिकांचीं कामें दिलीरखानाकडेस च राखिली होतीं. त्या वेळेस विजापूरचे मानकरी लोकांत वैमनस्यें पडलीं होतीं, ते लोक आपल्या मुख्यजोमसा उदखान याचीं वांकडे होते, आणि मोंगला शीं सरकारचद्वेष करीत असत. असें असतां औरंजेबयात' वर्ती

ल [illegible] होता, तो मसाउदखानास [illegible] केला होता त्या प्रमाणें बादशाह विजी अर्थात् आदिलशाह याची क न्या मागूं लागला, आणि बोलला कीं, नघाल तर आमचें लश्कर येऊन राज्य घेईल. तेव्हां तो मसाउदखान नें मान्य करीना, यास्तव औरंजेबाचें लश्कर विजापुरावर येऊं लागलें. इतक्यांत ती बादशाह विजी आयत्या सुशीलनें करून मनांत समजली कीं, मी जर संतोषानें मोंगलांसजाऊन मिळालें तर माझे भावाचे जिवास आणि राज्यास भय नाहीं, म्हणून दिलीरखान-औरंगजेबाचें लश्कर घेऊन येत होता त्यांत जाऊन मिळाली. हें वर्तमान संनसोळा शें एकुण दृशींत घडलें. या प्रमाणें तिणें अनर्थाचे शमा विषयीं यत्न केला, परंतु तो उपयोगीं पडला नाहीं. कांकीं, त्या दिलीरखानानें तिच्या बरोबर कांहीं लोक देऊन तिला औरंगाबादेस पाठवून आपण पुढें चालिला

७ अशा संकट समयीं त्या मसाउदखानानें शिवाजीस मदत मागीतली, तेव्हां त्याणें मान्यकरून पन्हाळ्यास पुष्कळ स्वार जमा करून विजापुराकडे चालकेली. तोजवळ येऊन पोंचला तेव्हां त्यास समजलें कीं, मोंगलांचें लश्कर बहुत मोठें आणि त्यांत पठाण फार आहेत, त्यांपुढें एकाएकीं युद्ध करावयाचा उपाय नाहीं. यास्तव तो भीमा उतरून पलीकडे जाऊन मोंगलांचे मुलखांत दंगा करूं लागला. मगपुढें जाऊन त्याणें गोदावरीचे उत्तरेस जालनें शहर लुटलें. त्या शिवाजीला त्याचे जासुदांनीं जेथेंजे थें द्रव्य हो तें त्याचा ठिकाणा लावून कळविलें होतेंच, त्यावरून त्यासमयीं त्याणें द्रव्या विषयीं पिरांचीं ही स्थानें सोडिलीं नाहींत, असें तीन दिवस झालें सुलतान माजूम तेसमयीं औरंगाबादेस होता, त्या

णें तेव्हांच त्याचें पारिपत्य करावं, परंतु तें घडलें नाहीं. मग तो शिवाजी तें द्रव्य घेऊन रायगडास जाऊं लागला असतां संगमनेरास पोंचला, तेसमयीं त्याचे पाठीमागें मोंगलांचें सैन्य आलें, तेथें मोठें युद्ध झालें. त्यांत मराठे लोकांचा पराभवच झाला, इतक्यांत शिवाजीनें अत्यंत शौर्यें करून झटून युद्ध केलें आणि त्यांस मागें हटवून आपण वाट चालूं लागला. तो फार सा दूर गेला नाहीं तों आणखी मोंगलांचें लश्कर आलें, त्या पुढें त्याचा उपाय चालेना. तेसमयीं त्याचे जासुदांनीं मोंगलांच्या लश्करास सांपडे नानशाहो रवाद्यांनीं नेऊन त्या शिवाजीचें लश्कर वांचविलें, तें पाटा किल्ल्या स सुस्थपणें पोंचलें. मग मोंगलांचें सैन्य औरंगाबादेस माघारें परतलें. त्यानंतर शिवाजीनें चांगला समय पाहून पाट्याचे जवळ आसमंतात किल्ले होते ते घ्यावयाचा उद्योग केला, तें काम मागेंपुढें ताकडे नेमिलें.

८ शिवाजी पाटा किल्ल्यावर असतां मसाउदखानानें त्याला बहुत आर्जवाचें पत्र लिहिलें कीं, तुम्ही या समयीं कृपा करून मला कुमक केलीत तरच माझें राज्य राहील, नाहींतर मोंगलांचें कार्य शेवटास जाईल, अवकाश राहिला नाहीं. तेव्हां शिवाजी लश्कर मुधां उठून विजापुरीं जाऊं लागला, तेव्हां त्याला वाटेनें असें वर्तमान समजलें कीं, आपला वडील पुत्र संभाजी, ज्याणें ब्राह्मणाची स्त्री बळात्कारें भोगिली म्हणून जो पन्हाळा किल्ल्यावर बंदींत ठेविला होता, तो तेथून पळून जाऊन दिलीरखानास मिळाला. यास्तव शिवाजीनें विजापुरीं जावयाचें काम हंबीरराव यास सांगितलें, आणि आपण संभाजीला माघारा आणावया करितां पन्हाळ्याकडे गेला.

या संभाजी दिलीरखानानें मोठ्या प्रीतीनें संभाळिला, आणि

औरंगजेबास पत्रीं लिहिलें कीं, हा संभाजी आपल्या हातीं लागला आहे, यानें खूळ माजविलें असतां हे दोघे पितापुत्र युद्धें करून रसातळास जाऊन मराठे लोक सहज निस्तेज होतील. ही कल्पना औरंगजेबाचे मनास आली नाहीं. त्याणें उत्तर पाठविलें कीं, असें केलें असतां बंडमात्र वाढेल, तें कामाचें नाहीं.

याउत्तरावरून असें दिसतें कीं, औरंगजेब पहिल्यापेक्षां शहाणा झाला; परंतु पूर्वी बंडकरणारे मराठे लोक सबळ झाले नव्हते तेव्हांच त्याणें आपल्या मुसलमान लोकांचीं राज्यें बुडून तींच्ये मुलखांचे वाटे दिलीं नसतीं तर मराठे लोक इतके सामर्थ्यवंत झालेच नसते. शेवटीं तो औरंगजेब त्याबंडाच्या प्राबल्यें करूनच नाडला पावला.

त्या दिलीरखानानें औरंगजेबाकडून पत्राचें उत्तर आलें नाहीं तोंच आपल्या कल्पनेनें वागावयास प्रारंभ केला, तो असा कीं जीचिंनाव मराठ्यांचा राजा असें ठेवून त्याबरोबर आपलें कांहीं सैन्य देऊन शिवाजीचा किल्ला गोपाळगड घ्यावयास त्यास पाठविलें, तेव्हां त्याणें जाऊन तो किल्ला घेतला.

हंबीरराव जो लश्कर सुद्धां विजापूरकरांचे कुमकेस जात होता त्याला वाटेनें मोंगलांचे स्वार नऊ हजार भेटले, तेव्हां तेथें युद्ध प्रसंग होऊन मोंगलांच्या स्वारांचा अगदीं पराभव झाला. त्यानंतर हंबीरराव तेथून पुढें जाऊन दिलीरखानाचे लश्कराजवळ राहिला, आणि त्यास नानाप्रकारें उपद्रव देऊं लागला.

मोरोपंत ज्याम किल्ले घ्यावयाचे काम मागितलें होतें त्याणें आधीं कोंकण किल्ला आणि नव्हावागड हे दोन्ही घेतले, नंतर आपल्या फौजेच्या लहानलहान तांड्या करून अवघ्या खानदेशभर पसरल्या.

आणि त्रलोक जेर केले.

९ दिलीरखान विजापूर घ्यावयाविषयीं फारच यत्न करीतहो ता.परंतु लष्करास अन्नादि सामग्री शिवाजीच्या उपद्रवामुळें कमी येऊं लागली.यास्तव उपायचालेना. तेव्हां निरश होऊन विजापूर चे लभोंवतीं घेरा घातला होता तो उठवून मुलूख लुटूं लागला. तो करनाटक प्रांतांत ही जाऊन उपद्रव करूं लागला .तेथेंजना ईश्वंत होता त्याणें कोणे एके वेळेस त्या दिलीरखानाजवळ फार ही फौज नाहीं अशी संधि पाहून सहाहजारां स्वारांनिशीं जाऊ न छापा घातला , तेणें करून त्याचा फार नाश झाला आणि तो प ळाला .

दक्षिणेंत असें वर्तमान झालेलें ऐकून औरंगजेबानें सुल तानमाजूम माघारा बोलावून नेला, आणि त्याचे जागीं पुनःखा नजहानपाठविला.त्याचवेळेस दुसरी आज्ञा आली कीं,संभाजी कपटकरून दिल्लीस पाठवून द्यावा. परंतु दिलीरखान संभाजीला अनुकूल होता म्हणून ती औरंगजेबाची आज्ञा शेवटास जावयाचे पूर्वीच त्याला पळून जावयास अवकाश सांपडला.मग शिवाजी आणि संभाजी एकचित्त झाले, परंतु संभाजीचा दुष्ट स्वभाव गेल्याची संशयनिवृत्ति होई तों पर्यंत त्याला शिवाजीनें पन्हाळ्या किल्लावर ठेवावयाची आज्ञा दिली .

शिवाजी ज्या समयीं विजापूरकरांस वश झाला, त्या समयीं असा नेम ठरला होता कीं,कोपाळ व बिलारी या दोहों ठिकाणां संबं धें जो मुलूख आहे तो शिवाजीचे स्वाधीन करावा या खेरीज इदिउ दें शांतील जितका मुलूख शिवाजीनें घेतला होता त्या विषयीं विजापू रकरांनीं प्रार्थी नकरावी , आणखी तंजोर वगैरे जितका मुलूख शि-

झाजीचा करनाटकांत जहागीर असेल तिनका तसाच असावा. या प्रमाणें बंदोबस्त झाल्यावर शिवाजी विजापुरीं गेला आणि त्या मसलतीची व त्याची एकांत झाला.

१० त्या शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी त्याला असें वाटलें कीं, विजापूरकर शिवाजीला इतके अनुकूळ झाले, त्यास आतां आपला स्वतंत्रपणारा हिला नाहीं. मग निरिच्छ झाला आणि राज्यकारभार टाकून विरक्तप्रमाणें वागूं लागला. तेसमयीं शिवाजीनें त्याला हितोपदेशार्थ पत्र लिहिलें, त्यावरील अर्थ लिहिला आहे+.

११ यानंतर शिवाजीचा अंतकाळ समीप आला. तो प्रकार असा, शिवाजी रायगडीं असतां त्याला गुडघीं म्हणून रोग झाला, तो प्रतिदिवशीं वृद्धिंगत होत चालला. मग त्याच्याच योगें करून जोफार मोठा ज्वर आला तो सहादिवस सोसून सातव्या दिवशीं तो मृत्यु पावला. तो दिवस संवत्सरांत ऐंशींच्याच वर्षाच्या माहिन्याची पांचवी तारीख. तोनेला त्या वेळेस त्याचें वय त्रेपन्न वर्षांचें होतें.

+ तुला कळून सार दिवस पत्र आलें नाहीं, तेणें करून आमचे चित्तास सुख वाटेनासें जालें. तुला विषयीं आत्मास राघोपंतानें लिहिलें आहे कीं, तुझी निरिच्छ होऊन बसिल्याप्रमाणें आपल्या शरीरास जपत नाहीं आणि मनोत्साहा योग्य दिवस ही मानीत नाहीं. तुमचें लश्कर रगेंच बसलें आणखी तुझी राज्यकारभार टाकून विरक्तप्रमाणें वागूं लागलां, येणें करून मजा मोठी चिंता पाटते. आम्ही असे ऐकतो कीं, आपले बडील किती मात्र होते, आणि तुमचा असा स्वभाव कसा झाला. हें तुम्हास योग्य नव्हे. त्यास आजपासून हें विरक्तपण टाकून स्वस्थपणें प्रजेचें पालन करावें, आणि आपलें सैन्य बांगलें ठेवून उत्तम कामामध्यें मनडवावें. सर्वकारभारी यांजपासून चाकरी घेऊन आपलीप्रतिष्ठा संभाळावी. जो मासाकनिष्ठ बंधू तूं आहेस त्यानुसी स्तुति मी काय मुखें करूं तरी मजा बद्दल आनंद होईल. रघुनाथपंत तुझाजवळ आहे तो त्या मनाणें तुला उपयोगी पडेल. जें करणें तें यासी विचारून करावें. सांगावा

शिवाजी मोठा विलक्षण चमत्कारिक पुरुष होता, त्याची कितीए कहकीं वाईट होतीं, तथापि त्याचे शौर्यादिक गुण या लेखांत अस्तन लेख पूर्णछावा हें उत्तम दिसतें. यास्तव त्याचे गुण पुरते पणें ध्यानामध्यें यावया करितां पहिल्यापासून त्याच्या कृत्यांचा विचार केला पाहिजे. प्रथमतः मावळे लोक अर्धनग्न आणि अरण्यांत रहाणारे अशांची संगत धरून त्या शिवाजीनें आपल्या मोठेपणाचे वृद्धीस आरंभ केला. तो असा, त्याणें शीतउष्णपर्जन्य यांचें सहन करून आपल्याकार्यामार्गीं त्यारानवट लोकांचीं मनेंवश करून घेतलीं. यामर्मीणें च आपले अर्थ सिद्धीस न्यावया करितां ज्या ज्या कल्पना त्याणें केल्या तशा पुढें दुसरा कोणी करील असें दिसतनाहीं. तो युद्ध प्रसंगामध्येंही मजेच्या बंदोबस्तांत अंतर पडूं देतनसे. अणखी प्रजांच्या हितामार्गांत्या णें नवे नवे कायदे केले होते, आणि बहुतवेळ संकटसमयीं त्याणें आपला जीव फार युक्तीनें वांचविला. चोरमार्गानें किल्ला घेणें किंवा मुलखच हस्तगत करणें, आणखी थाकल्या पागांचा बंदोबस्त राखणें, इत्यादि लहान मोठ्या सर्वकामाविषयीं त्याचें चातुर्य मार्मिकें होतें. तो मोठ्या योग्यतेस आला आणि त्याजवळ बहुत द्रव्य झालें तरी, त्याणें आपल्या कायद्या खेरीज खर्च केलाच नाहीं. अर्णाक जें विशेष द्रव्य मिळविलेलें त्यापैकीं शिपाई लोकांस देऊं केले तें लोभेंकरून अप्पणासठेविलें नाहीं. यागुणांवरून असें वाटतें कीं, तो अद्वितीय पुरुष होता. परंतु राज्यकार्यकरण्यांत त्याचे बुद्धीस सरळ मार्गापेक्षा कुटिलमार्ग बांगला वाटे, हा एक त्याचा दोष, आणि त्याणें कितीए

आळवी पणाकरूनये. साक्ष्य बहुलउपयोगाचे आहे यांत वैराग्य कौमाचें नाहीं. आतां तुर्तां साक्षेपपणा घरून मनाला त्याचा प्रत्यय द्यावा.

क देवां आपला क्रूरपणा व घातकपणा प्रसिद्ध करून दाखविला.

त्या शिवाजीची स्तुति करणारे जे मराठे लोक ते म्हणतात की, तो अवतारी पुरुष होता; तो आपल्या कुटुंबांत केवळ मूल वडादिसे आणि भिडस्थपणानें वागत असे; बाहेर तर सर्वांशीं गोड भाषण करी, परंतु कोणाचा बरोबर पणा होऊं देत नसे; त्या चा स्वभाव शीघ्रकोपी असे. परंतु त्याचे सोयरे धायरे व पदरचे लोक यांच्या हिताचें फार अगरबाळगी; त्याची आकृति लहा न होती, आणि बळा पेक्षा चपल्य विशेष होतें; त्याचें मुख सुं रूप होतें, त्यावरूनच तो गुणवान मानवाटे; त्याचे उंची पेक्षां हात लांबीस अधिक होतेत्यानें आपल्या नरबारेचें नाव भवानी ठेविलें होतें, ती तरवार अद्यापि साताऱ्यात त्याचे वंशज पुरुष देवी प्रमाणें पू- जितात.

५२ शिवाजीला चौघी स्त्रिया होत्या, एक सईबाई निंबाळ करांची कन्या, एक सोयराबाई ती शिरके यांची कन्या. एक पुत लाबाई मोहित्यांची कन्या, आणि चवथी एक होती. त्यांत दोघी शि वाजी अगतांच मरण पावल्या आणि सोयराबाई व पुतळाबाई ह्या दोघी होत्या. त्यांत पुतळाबाई शिवाजीच्या मरणानंतर सोळा दोन महिन्यानें सती गेली. सोयराबाईचा पुत्र राजाराम. संभाजीचे आई सईबाई ती अगोदरच मेली होती. शिवाजीचे मरणा पूर्वी अण्णाजी दत्तो व मोरोपंत वगैरे कोणी मोठे मोठे लोकजवळ असतां शिवाजी

---

† दोन महिन्यानें मती जावरा चे कारण असें, कि ज्या कारणा साठीं लाडे चतुर त्यांचे कारभारी यांनी अण्णाजी पंत यांस कठानें दगा दिला त्याचे हातून ते वेळ न झाले तेंच अण्णाजी पंतानें करविलें.

बोलिला कीं . माझ्या मरणानंतर संभाजीच्या दुष्ट स्वभावें करून राज्यास अपाय होईल असें दिसतें . ही गोष्ट सोयराबाईस कळली तेव्हां तिचे मनांत आलें कीं, संभाजी एकीकडेस करून आपला पुत्र राजाराम यास तक्ता धिपति करावा , यास्तव तिणें सर्व प्रधान वश करून घेतले , त्यावरून ते प्रधान ह्मणाले कीं, राजाराम लहान आहे तोंपर्यंत त्याचे नावें आह्मीराज्य कारभार चालवूं, ही मसलत सिद्धीस न्यावया करितां जनार्दनपंत सुमंत यास पन्हाळे किल्ल्यास लष्कर सुद्धां पाठविलें , आणि रायगडास शिबंदी नवी ठेविली; आणि दोन्ही लष्करांचा कांहीं कांहीं बंदोबस्त ठेविला . त्यावेळेस पन्हाळ्यावर संभाजीच्या बंदोबस्तास जो हिराजी फरजंद होता त्यास या सर्व मसलतीचें पत्र पाठविलें, तें जासूद किल्ल्यांतनेऊन देत असतां संभाजीचे हातीं लागलें, तेणे करून त्याला सर्व विदित झालें . तेव्हां त्याजें तेथची शिबंदी वश करून घेतली, आणि जे तेथें मुख्य सरदार होते त्यांस होनेते जिवें मारिले ; आणखी आपण किल्ल्याचें स्वामित्व करूं लागला ; आणि कोणी शत्रु मित्र न जाणतां किल्ल्याचा बंदोबस्त ठेवि ला आला . तेव्हां जनार्दनपंत सैन्यासहित आला त्याणें किल्ल्या सभों वता घेरामात्र घातला, आणि तेथें उगाच महिना दोनमहिने राहून शेवटीं आपण जाऊन कोला पुरांत राहिला . इतक्यांतरायगडीं राजा राम तक्ता धिपति करून राज्यकारभार चालविला , तो सुमार संवत सोळाशें ऐंशीचा सहावा महिना . नंतर थोडक्याच दिवसांनीं पेशवे आणि सचिव यांमध्यें वैमनस्य पडलें .

इकडे पन्हाळ्यावर संभाजी होता त्याणें जनार्दन पंताचे लष्करा तल्ल कितीएक लोक वश केले, आणि आपल्या किल्लेदारीस कितीएक माणसे लोक चढवून घेऊन रात्रीस त्याला ठार मारून कोला पुरांत जाऊन

जनार्दन पंतास धरून पन्हाळ्यावर नेलें . हें वर्तमान मुलखांत समजलें तेव्हां हंबीरराव सेनापति संतुष्ट होऊन बोलिला कीं, हा शिवाजीचा पुत्र खरा . मग तेव्हांपासून त्या सेनापतीनें त्या संभाजीची चाकरी धरिली . तसाच मोरोपंत ही त्यास अनुकूल जाहाला . हंबीरराव संभाजीचे भेटीस गेला तेव्हां तो पन्हाळा सोडून रायगडीं जावयासनि घाला . तो तेथें जाऊन पोंचला नाहीं तोंच तेथील शिलंदीनें त्याचें अगत्य धरिलें , आणि इतर ही लष्करें त्यास राजी झालीं . तो संभाजी सन सोळावें ऐशींच्या सहाव्या महिन्यांत रायगडीं दाखल झाला .

भाग दहावा

सन सोळावें ऐशींपासून सोळाशें एकुणनव्वदपर्यंत झालेलीं वर्तमानें .

१ संभाजी शिवाजीचें मरण कळल्यावर केवळ पराक्रमें करून वागूं लागला . त्यावरून लोक कल्पना करूं लागले कीं , आतां याणें आपलें दुर्गुण टाकिले , आणि त्याप्रमाणें त्याची स्तुतिही करीत होते ; परंतु तो रायगडीं पोंचतांच त्याचें क्रूरपण लोकांत प्रसिद्ध झालें . तें असें , आनाजीदत्तो यास बिडीघालून बंदींत ठेविलें , आणि साची सारी दौलत घेतली ; आणखी आपला सावत्र भाऊ राजाराम यालाही बंदींत ठेविलें ; आणि त्याची आई सोयराबाई ती आपल्या समजूर आणून तिला नानाप्रकारें अमर्याद शब्द बोलून असें ठरविलें कीं , हिणें आपला नवरा विष घालून मारिला , त्यास आतां हिला हालहालकरून मारावें , अशी आज्ञा केली . तेणेंकरून ती मरण पावली .

आणखीजे तिजकडचे सरदार होते त्यांची डोकीं मारिलीं, आणि एक सरदार फारचतिच्या अगत्याचा होता त्याचा कडेलोट केला. अशा क्रूरपणानें तो लोकांच्या मनांतून उतरला, तेव्हां ते लोक याचा प्रारंभच अपशकुनाचा असें म्हणूं लागले मग संभाजी सोळाशें ऐंशीच्या आठव्या महिन्यांत त्याला राज्याभिषेक झाला, त्यापासून मुलखांत लोकांस ही अपशकुन दिसूं लागले.

२ संभाजीस राज्याभिषेक झाल्यावर प्रथम त्याणें जंजीयाच्या शिद्दीशीं युद्ध केलें. तें युद्ध पूर्वी शिवाजी असतांही निरंतर चालत होतें. मुंबईचे जवळ लहान लहान दोन बेटें आहेत, एकाचें नाव उंदेरी आणि एकाचें नाव खांदेरी, त्यांत उंदेरी बेटावर शिवाजीनें आपल्या मरणाचे पूर्वी एक वर्ष किल्ला बांधिला होता, तो शिवाजीपासून घ्यावयास शिद्दी उद्युक्त झाला, परंतु तो अर्थ सिद्धीस गेला नाहीं. नंतर दुसऱ्या खांदेरी बेटावर शिद्दीनें किल्ला बांधिला तो घ्यावयाचा उद्योग शिवाजीनें केला, तोही सिद्धीस गेला नाहीं. असे ते दोघे किल्लेदार लढत होते.

३ संभाजी सोळाशें एक्क्यायशींत संभाजी पन्हाळ्यास जाऊन राहिला, तेथें त्यास असें वर्तमान समजलें कीं, औरंगजेबाचा पुत्र महंमद आकबर हा बंड करून बापाशीं लढणार होता तें त्यास कळलें, तेव्हां पळून आपणाकडे आश्रय मागावयास आला, यास्तव आपला कोणी मोठा मानकरी त्याचे भेटीस पाठवून त्याची दोस्ती गांठावयाची मोठी केली, परंतु आपण कांहीं कामनिमित्तें गेला नाहीं. इतक्यांत आनाजी दत्तो याच्या पक्षपाती लोकांनीं त्या महंमदाशीं राजाराम याच्या हिताविषयीं संभाजीच्या घातांची कांहीं मसलत केली, तें वर्तमान संभाजीस कळलें तेव्हा

त्याणें महंमदास अपराधीजाणले इतक्यांत त्याणेंच संभाजीस कळ लिलें कीं, इकडे या प्रमाणें वर्तमान आहे, तेव्हां संभाजी मोठ्या त्रासानें त्याचे भेटीस गेला. मग त्याणें आनाजीदत्तो व शिर्के कुळांतील जे मुख्य सांपडले ते व परभू बाळाजी आर्जा चिटनीस व त्याचा पुत्र व त्याचा दुसरा कोणी एक भाऊबंद, इनके हत्तीचे पायांदि-के. यानंतर शिर्के कुळांतील जे कोणी मोठे मोठे राहिले ते भयंकर रुन पळाले, आणि कितीएक मोंगलांच्या चाकरीस राहिले. त्याच्या अशा अन्याय कर्मांनीं सारे लोक त्यास कंटाळले. कांकीं, आनाजीदत्तो शिवाजीचे वेळेस बहुत उपयोगीं पडलेला आणि तो जाती-चा ब्राह्मण होता. असें असतां त्याचा जीव घेतला हें चांगले केलें नाहीं.

त्यावेळेस संभाजीचे जवळ हिंदुस्थानांतून आलेला एक ब्राह्मण कलुषा नामें होता, तो गुप्तपणें संभाजीस मसलत देई अन्याप्रमाणें संभाजी वागे. त्याणें शिक दिलें कीं, मोरोपंत पिंगळे व शिवा यास बंदीस घालावें. कांकीं, त्याणें आनाजीदत्तो याच्या मरणा-वरून तुमची फार निंदा केली, आणि आपण ही कंटाळला आहे.

त्यासमयीं रघुनाथ नारायण हणमंते हा आपलें संस्थान दु-मऱ्यास संभाळावयास सांगून कर्नाटकांतून निघून संभाजीचे भे-टीस रायगडीं आला. त्याणें आपल्या बरोबर कांहीं वस्तुलावें द्र-व्य आणिलें होतें म्हणून संभाजी त्याच्या संमानार्थ मोठें दरबार ज-माकरून भेटला. रघुनाथनारायण मोठा धैर्यवान् होता, त्याणें त्या समयीं अनीतिविषयीं संभाजीस निषेधिलें, आणि बोलिला कीं, जर तुमचे पुरातन सेवकांचा असा घातकरावा नरलवकरच नाशपावाल.

[illegible] एवढ्या [illegible] [illegible] त्यागाचें आश्चर्य वाटलें कांकीं, त्याचा भाऊ जनार्दन पंत तोही संभाजीचे वेळीं होता तरीही भ्याला नाहीं; परंतु विचार करून पाहिलें असतां संभाजीस अशी शंका होती कीं, जर याम कांहीं उपद्रव केला तर कर्नाटक प्रांत हातचा जाईल. यास्तव त्याणें जनार्दन पंत व मोरो पंत त्रिंगळे यांस सोडिलें, आणि रघुनाथ नारायणाचा संमान करून त्यास कर्नाटकांत जाऊ दिलें. तो जातांना वाटेनेंच मृत्यु पावला, तर जनार्दन पंताला संभाजीनें त्याचेजागीं स्थापिलें. याशिवाय संभाजीनें त्यावेळचा कर्नाटकचा हरजीराजा, जो रघुनाथ नारायणानें आपल्याजागीं ठेविला होता, तो तसाच रक्षिला. यावरून संभाजीचें आचरण कांहींसें बरें दिसूं लागलें, परंतु ते टिकलें नाहीं, त्या कलुष्याच्या संगतीनें नष्ट झालें.

५ संभाजी आणि महंमद आकबर यांची मैत्री झाली त्यावेळेस लोक कल्पना करूं लागले कीं, हा औरंगजेबाचें राज्य घेऊन मराठ्यांस स्थापील, परंतु त्याणें आपल्यानीचपणा प्रमाणें केवळ कोणत्याही कार्यास अयोग्य होऊन गर्विष्ठपणानें मोठीं मोठीं कामें टाकून शिर्क्यांचा अपमान करावा हेंच मोठें कार्य असें मानून जंजीरा मात्र घ्यावयाविषयीं बरेंच श्रम केले, परंतु तो अर्थसिद्धीस गेला नाहीं. त्यानंतर त्याणें लढाऊ गलबतें जमा करून शिर्क्यांच्या लढाऊ गलबतांशीं युद्धेंकेलीं, त्यांतही आरमाचे खाडीजवळ संभाजी पराभव पावला. तेव्हांतो क्रोधयुक्त होऊन तेथें इंग्रेज व पोर्तुगीस लोक होते, त्यांस बोलूं लागला कीं, तुम्ही माझा पक्ष स्वीकारीत नाहीं, आणि माझ्या शत्रूला आश्रय देतां, यास्तव तुम्हीही शत्रू व आहांत. हें वर्तमान मनसोळाशें त्र्यायशीं घडलें. नंतर पोर्तुगीस लोकांचे गांवांस तो उपद्रव देऊं लागला

गल्या आणि मुंबईच्या गोकुलदास नागपुरी नामें [illegible] आहे त्यें मुंबईस उपद्रव करावया कारणा [illegible] धूला गला; [illegible] वर्तमान समजलें कीं, औरंगजेब मोल्या तयारीनें येत आहे, तेव्हां तें काम तसेंच राहिलें.

५ संभाजीच्या कारकीर्दीत मोरोपंत पिंगळा यांस घालव्या पासून मुख्य कारभारी कलुष्या झाला. पुढें बंदांतून सुटल्यावर मोरो पंत लवकर रुजू मेला. कलुष्या शिवाय संभाजी दुसऱ्याचें ऐकत नसे; आणि त्याचे वर्गी वांचून कोणी मनूर आला असतां त्यावर रागें भरून त्याचें पारिपत्य करी. संभाजी इतका त्या कलुष्याच्या स्वाधीन झाला त्यावरून लोक असें म्हणत कीं, यानें कांहीतरी चेष्टा वशीकरण साधलें आहे. त्या कलुष्यास लोक फार निंदीत होते, परंतु तो मोठा मनमिळाऊ होता, आणि तो कवी असे, परंतु राजकारभारास योग्य होता. त्यास संभाजीनें प्रधानांमध्यें पंडितराव [illegible] पद दिलें. प्रधान असा दुष्ट आणि राजा याप्रकारचा घातकी तेणेकरून शिवाजीचे वेळेस जे बंदोबस्त होते ते सर्व मोडूं लागले. त्यानें प्रथमतः लष्करचा बंदोबस्त बिघडला. तो असा, जे लष्कर चे चाकर शिपाई लोक होते त्यांचेवरीज लोकांत ही ज्याच्या मनास येईल त्यांनी त्यांची शिपाही म्हणजे बरोबर जावें. कोणास कांहीं लूट सांपडली असतां त्यांतें ती संभाजीला कळवूंच नये, आणि लष्करा मध्यें आपल्या बायका ही बरोबर न्याव्या, आणखी लोकांच्या बायका धरून नेऊन विकाव्या. त्यांची माघारी आली म्हणजे लोकांस पैका यावयास भिकेना म्हणून लूट करावयाची आज्ञा देत असे.

६ संभाजी भलत्याच जागीं खर्च करीत होता, यामुळें थोड्क्या च दिवसांत खजीना संपला असतां, त्या कलुष्यानें त्यास बुद्धि शिक

विली कीं, स्वारी केल्यानें द्रव्य मिळत नाहीं, तर रयते पासून वसूलच अधिक घ्यावा. नेझां खाणें नसेंच केलें, परंतु जमाबंदीचें वेळेस असें समजलें कीं, शिवाजीचे वेळेपेक्षां जिनका चढ केला तितका तोटा आला. त्यावरूनतो समजला कीं, यांत सुभेदार व पाटील व जमेदार इत्यादिकांचें कांहीं हस्तिम आहे. यास्तव त्यांस दूर करून सर्व कामें मरवूत्यानें सांगितलीं. तेझां रयतेनें त्रासें करून गांव दाबिले. येणें करून संभाजीच्या राज्यांत नाशाचा संचार झाला. या खेरीज त्या चवेलेस औरंगजेब दक्षिण घ्यावया करितां दिल्ली हून चढाण पूर पावेतों आला होता. तें वर्ष संत मोळाशे व्यायशीं. त्यावेळेस गोवळ कोंडे करांचें वगैरे जा दूर करांचे कारकाय वर्तमान होतें तें समजलें पाहिजे.

हैदराबादेंत अबदुल्लेन दादशाह होता, त्याजवळ द्रव्य बहुत आणि सेना मोठी होती. त्याचा कारभारी फार शहाणा हिंदू ब्राह्मण मादण्णा पंत नामें होता, तोराज्यांत जिनके हिंदूलोक होते त्यांस अत्यंत प्रिय वाटे, परंतु तेथच्या मुसलमानांस तो जातीचा ब्राह्मण आणि डो यजड म्हणून फार च विषम वाटे. या खेरीज औरंगजेबाच्या वकिलां नीं तेथच्या कारभारी लोकांत वैमनस्य पाडिलें. तथापि अबदुल्लेन त्या मादण्णा पंताची योग्यता जाणून त्या वांचून दुसऱ्याचा विश्वास धरीत नसे.

या पूर्वी गोवळ कोंडयाचें राज्य म्हटलें आहे तें हैदराबादेचें असें समजावें.

विजापुरास औरंगजेबाचा वकील होता, त्याचें नाव मुलिस्व बेग खोरदार, त्याणें त्या दरबारचे कितीएक कारभारी व कितीएक सरदार लोक वश केले. त्यामध्यें एक मुसलमान शिरजीखान नांवें सरदार हो

ता तो त्या सर्वांपेक्षा प्रतापी होता, त्याची पूर्वी मसाउदखानाचें सेनेसंबंधें कांहीं वांकडें पडलें होतें, म्हणून त्याणें एक सैय्यद मरवटूम मानकरी यास मसाउदखानाचे जागीं स्थापावयाची योजना केली होती; आणि तो मसाउदखान राज्यकारभार टाकून शिवाजी मेल्यावर एका वर्षानें विजापूर सोडून आंदोणीस जाऊन राहिला होता; तेव्हां तेथचा राज्यकारभार कोणी चालविला नें कळत नाहीं: परंतु इतकें समजतें कीं, औरंगजेबाच्या वकीलानें विजापूरकर व मराठे लोक यांशीं स्नेह नसावा म्हणून शिवाजीनें घेतलेला कृष्णेचे कांठचा मुलूख होता तो त्यांस माघारा घ्यावयास शिकविलें. त्यावरून त्यांणीं फौज पाठवून तो मुलूख घेतला. तेणेंकरून त्यांचे स्नेहांत तूट पडली. असें त्या वकिलाचें हरयशोवदास नजातें तर, हैदराबादचा कारभारी मादण्णापंत याचे बुद्धीस आलें होतें कीं, हे दोघे एकचित्त करूनओरंगजेबावें कांहीं चालूं देऊंनये, ती मसलत उपयोगास पडती,परंतु तें नघडूं यास्वर्गीज विजापुरचे राज्याच्या नाशाचें कारण आपणिक एक झालें; तें असें, शिवाजी असतां त्या मसाउदखानानें कितीएक मुलूख दूर केला, ते शिवाजीकडे जाऊन राहिले, तोनिवर्तल्यावरतं संभाजीजवळ होते, त्याचवेळेस विजापूरचे मनसबदार ही कितीएक संभाजीकडे राहिले होते. असेच मराठे मनसबदारजे निजामशाहीत होते त्यांचे कितीएक भाऊबंद संभाजीच्या लष्करांत चाकरीस राहिले होते. यावरून ते कितीएक लोक आपल्या वतनासाठीं निरंतर भांडत,आणि त्यावाडाकरितांजो सर्वांचा पक्ष असतो तिकडे मिळून वतन घ्यावयाचा अभिमान जो बहुत्यास न्यावा म्हणून कितीएक आपला धर्म ही टाकीत असत.

औरंगजेब बऱ्हाणपुरास येऊन कितीएक महिने मुलखा-च्या बंदोबस्त करीतच हिंदूलोकांवर जिजिया+ नामें कर बसवि लें व दक्षिणेंत लांरी घालणें याची तयारी करीत होता. प्रथम त्या नें सुलतान माजूम यास शाहू आलं असें मोठें पत्र देऊन तो संभाजी च्या मुलखांतील दक्षिणेकडचा मुलूख घ्यावयास पाठविला, आणि त्याचे उत्तरेकडे खानदेशलगत्याचे किले व मुलूख घ्यावयास सुल तान आजीम यास पाठविलें, आणि आपण बऱ्हाणपूर सोडून औं गाबादेस आला. मग सुलतान माजूम औंबेदरा घाटानें कोंकण-पट्टींत जाऊन कालियानी परगण्यांतील रायगडापासून वेंगुर्लें व मालवण पर्यंत मुलूख लुटून जाकून टाकिला. सुलतान् आजीम त्याच्यापेक्षां किल्ला घ्यावयास गेला, त्याचे हातीं तो किल्ला दग्यानें सहज लागला; परंतु पुढें त्याचें काहीं कार्य सिद्धीस गेलें नाहीं तोंच औरंगजेबानें त्यास माघारा बोलावून त्याचे जागीं शाबूदिनखान नामें दुसरा सरदार पाठविला तो फार गर्वानें आला, परंतु जय न पावला, रामशेज किल्ल्याजवळ त्याचा फार नाश होऊन तो मागें हटला.

इतक्यांत सुलतान माजूम आपण मुलूख आम पाडिल्यासु कें, आणि संभाजी विशाळगडीं होता त्याच्या लोकांच्या उपद्रवामुळें उपाशीं मरूं लागला. तेव्हां औरंगजेबानें शाबूदिनखान यास घा टाच्या वाटा मोकळ्या करायास पाठविलें, आणि सुलतानवाजा मुख्यअ धिकारी त्यास आज्ञा केली कीं, गलबतांत दाणा भरून दंडा राजपुरी

+ जिजिया कर म्हणजे, ज्याजवळ दहा हजार रुपये त्यानें वर्षास साडे सातशे रुपये द्यावे.

व वेंगुरलें यास पोंचता करावा. तें निकडीचें काम समजून त्यासु रत पाल्यानें एकेक गलबत भरून पाठविलें; तें वर्तमान संभाजी च्या लढाऊ गलबतांस कळून त्यांनीं तीं गलबतें बऊतेक लुटलीं, त्यांतलीं कांहींशीं गलबतें जाऊन पोंचलीं नितक्यानें साहि त्यपुरेमें झालें नाहीं, म्हणून सुलतान माजूमसेन्य सुद्धां आंबा घाटचढून जाऊन कृष्णेचे कांठीं वळवेगांव येथें पर्जन्य काळीं राहिला. हें वर्तमान संभाजीस कळतांच त्यानें आपला सरदार हंबीरराव मोहिते यास मोठें सैन्य देऊन सुलतानावर पाठविलें. त्यानें जाऊन सुलतानाचे कुमकेस पाठविला, त्याचीव संभाजीची गांठ पडली, तेव्हां त्या दोघांचें कांहीसें युद्ध होऊन शा बूद्दिन जय पावला. हें वर्तमान औरंगजेबास कळून तो मोठा लाभनसतांही शाबूद्दिन त्याचे कृपेंतला म्हणून द त्याजवळ अ- त्यल्प मोंगल होते त्यांचें मन संतुष्ट झालें या करितां त्या शाबूद्दि नाचा मोठा सन्मान करून त्यास गाजीवद्दिन असें नवें नाव दिलें. त्या पुढें दक्षिणेंत जें निजामउल्मुलुख नामें कुळ विख्यात झालें, त्यांचा मोठा शाबूद्दिनखान मूळपुरुष.

७ मग पाऊसकाळ गेल्यानंतर औरंगजेब दक्षिणेंतमो हिमेचा प्रारंभानें चालूलागला. तेव्हां त्यानें आपल्या राज्यांतल्या सर्व प्रांतांतील सैन्य बऊत जमा केलें होतें. त्यांतउत्तरेकडचे लोक यां चीं शरीरें मोठीं आणि अंगांतून चिलखतें चढविलेलीं, तीं जड लो खंडाचीं, व त्यांचे घोडे ही मोठे उंच आणि पुष्ट. असें पाहिलें असतां दक्षणी लोक त्यापुढें केवळ सुकुमार दिसत. तसेच पायदळाम- ध्यें कितीएक चामाचे बंदूकवाले, व कितीएक तोड्याचे बंदूक वाले, व कितीएक तीरकमाणवाले असत. त्याचा सरंजाम बऊत उत्तम होता, आणि खजान व मोठ्या भक्कम तोफा पुष्कळ असत. व

गोलंदाजांमध्यें फिरंगी होते. यारंवेरीज कितीएक ओझीं वहावया चे व कितीएक लढाऊ असे हत्तीही बऊत होते. त्या औरंगजेबाचा दिल्ली मध्यें जसा बेत चालत होता त्यांत किमपि अंतर न पडतां प्रवासांतहीं तसाच चालत असे. त्याचा शिकारखाना ही बरोबर होता. त्याच्या डेऱ्याच्या सभोंवतीं लावायाची कनाथ सोळाशें हात लांब होती. त्याच्या कचेरीच्या डेऱ्यांत व एकांतीं मसलत करावयाच्या डेऱ्यांत, त्याचें बसावयाचें रत्नजडीत सुवर्णाचें अत्यंत सुंदर सिंहासन मांडलेलेंच असे. यारंवेरीज विषयोपभोगार्थ जनानखान्याचे कितीएक डेरे असत. आणि स्नानसंध्ये साठीं त्या लोकांचें कांहीं निमाजवगैरे नित्यकर्म आहे, त्या कामाचे ही कितीएक डेरे वेगळे होते. तसेच पाठिकाणीं ही छिलाय ती सरखलादांच्या व मरखमालेच्या चारदा चंगदयोस्य वगैरे असत, व नानाप्रकारचीं जरीचीं मोठीं मोठीं उंच चस्त्रें पुष्कळ होतीं, जांचा तोटाच नाहीं.

त्यानजावयाचे वाटेवर दोहीं बाजूंनें तोफा ओळीनें चऊ-या केलेल्या असत, त्यांमधून आंत जातांना पहिला डेरा नगारखान्याचा लागावा; त्याहून पुढें गेलें म्हणजे खासगीच्या चवकीच्या लोकांची पहारा करावयाची जागा. त्या कामावर नित्य नवा उमराव जात असे.

त्याचे भोजनसंबंधीं डेरे वेगळे असत, व मेवामिठाई खावयाचा व पाणी गार करून ठेवावयाचा व विडे खावयाचा या सर्व प्रकरणीं निरनिराळे डेरे असत. याप्रमाणें त्याचा थाटेनें सरंजाम होता म्हणून आश्चर्य वाटेल, परंतु असें समजावें कीं, अल्पव्ययाचे लहान गोठ सर्वसरंजाम दुहेरी होते. तेणें करून त्याची भारी

कधीं मुकाम सोडून दुसरे मुकामीं गेली असतां कोण त्याही गोष्टी ची त्यास न्यूनता नसे. स्वारी मुकामीं येऊन पोंचली म्हणजे पन्नास नोफा सोडाव्या असा नेम होता. या रेदरोज नो आपल्या राजधानींत असतां त्याच्या ज्याज्या रीति चालत होत्या त्या मागतिनें ही सर्व तऱ्हाच चालत असत.

त्यास अशी संपत्ति असून तो स्वयें सर्व विषयांचाउपभोग लौकिकार्थ गरिबा प्रमाणें करी, तेणें करून त्याची प्रजा त्यास फार मानीत असे. या प्रमाणें खटले त्याणें प्रधानांत ही बरोबर चालविले, यावरून त्याचे सरदार ही आप आपले खटले वाढविते झाले. त्या योगानें लश्कराचा पसारा भारी होऊन खर्च फार लागूं लागला, यास्तव थोडक्याच काळानें इच्याचा तोटा आला, आणि लश्करची कोणतीही मसलत तडीनें होईना ही झाली.

८ सुलतान माजूम वऱ्हाडच्या मध्यें राहिला असतां त्या गांवाचे जवळचा आसमंतात मुलूख त्याचे हातीं लागला-नितका त्याणें घेतला. त्या दिवसा पासून विजापूरकरांनी दिलेल्या वतन वगैरे या मनदांत त्याणें आपलें नावमात्र घातलें आणि पूर्वीच्या नेमा प्रमाणें तें सर्व चालविलें. नेंहा काळ मर्याद चालत आलें.

त्या सुलतान माजूमाचे लश्करांत पर्जन्यकाळाचे दोन चार महीने गेंगें करून लोक बहुत मेले तेणें करून लश्कर कमी झालें. असे असतां ही बादशाहाची अशी आज्ञा आली की, विजापूरकराचा शिवाजीनें घेतलेला निर्कती दिलेला मुलूख संभाजी कडे आहे तो सर्व घ्या षा. असें लिहिलें येतांच तोंच थून निघून गेला. त्याणें गोफाक वगैरे वाड वडबडी हीं निघून [illegible]. अणीकही मुलूख घ्यावा, परंतु

रोगामुळें माणसांचा तोटा पडला; आणि थेलेल्या मुल्खांत जागा जागरक्षणार्थ माणसें ठेवून त्यास आपलेच संरक्षण करावया वें कठीण पडलें; यास्तव कंटाळून तो माघारा अहंमदनगरास आला. हें वर्तमान सन सोळाशें पंचायशींत घडलें.

त्याच वर्षी संभाजीचा हंबीरराव कोंकणांत लश्कर सहित होता. त्यास वर्तमान कळलें कीं, खानदेशांत कोणी रक्षक नाहीं. त्यावरून त्याणें लश्कराच्या लहान लहान टोळ्या करून उत्तरेकडे नाऊन ते सर्व लोक बऱ्हाणपुरावर एकेजागीं मिळविले आणि तें शहर लुटलें; तेथें त्यास बहुत द्रव्य मिळालें. नंतर तो तेथून माघारां येतांना त्याणें बऱ्हाणपुरापासून नाशिकापर्यंत मुल्ख लुटून जाळून टाकिला. तेव्हां औरंगाबादेहून खानजहान नामें सरदार आला तो त्याचे पाठीस लागला, परंतु त्याची व याची गांठ पडली नाहीं.

त्या पुढें कांहीं एक महिने गेल्यानंतर औरंगजेब लश्कर सुद्धां मोंगलापुरास गेला, आणि जुन्नरास जें लश्कर मोंगलांचें होतें तेंही औरंगाबादेस पाठविलें. तेणें करून उत्तरेची वाट मोकळी सांपडली. त्यामुळें मराठे लोकांनीं मोठ्या खुषीनें तापी व नर्मदा उतरून जाऊन भडोंच लुटली. त्यावेळेस ही तेथलें द्रव्य तेस्वस्थपणें आपल्या मुलखीं घेऊन गेले; आणि त्यांबरोबर जो महंमद आकबर होता, त्याला बादशाहाचें पदरें करून, छत्रपति बादशाह, औरंगजेब बादशाह नष्ट. असें लोकांत प्रसिद्ध केलें.

बऱ्हाणपूर व भडोंच ही दोन्हीं औरंगजेबाच्या अमलाखालमुळें

+ तें मोंगलाचें पूर्वी मुलखांत आजिमाचें पंचवीस हजार होतें.

लुटली गेली. कांकीं, तो दुसरीं राज्यें घ्यावयाचा उद्योग करीत असतां त्याणें आपल्या राज्याचा बंदोबस्त चांगला ठेविला नाहीं.

९ औरंगजेबाचे मनांत पूर्वीपासून फार दिवस होतें कीं, विजापूर करांचें राज्य बुडवावें. यासाठीं त्याणें सन सोळाचें सालचे प्रारंभीं आपला पुत्र आजिमशाह याचे बरोबर सन्य देऊन विजापुरावर पाठविला. त्याचे आदले वर्षीं तेथें पर्जन्य कमी पडला, तेणेंकरून त्यामुळचीं पीक थोडें झालें होतें, तेंही त्यांणीं जमा करून किल्ल्यांत नेलें, त्यणून आजिमशाह याचे लष्करास अन्न मिळेनासें झालें. तेव्हां बादशाह त्याणें सोलापुराहून पाठवावें, परंतु तें घडेना; कांकीं, निकडही नोढा पडला होता. यास्तव विजापूरकरांचे लष्करी लोक आजिमशाहाच्या लष्करावर सांप्या घालीत, त्यामुळ त्या लष्करचा फार नाश झाला. असें पाहून बादशाहानें अहंमदनगरास गाजिबद्दिन सरदार होता, त्यास आज्ञा केली कीं, वीस हजार बैल गोण्या भरून त्यांबरोबर खुद्द तुल्ली सैन्य घेऊन जाऊन विजापुरावर सुलतान आजिमास पोंचत्या करावया. अशी आज्ञा पोंचतांच तो नेथून धान्य घेऊन निघाला. नें वर्तमान विजापूरकर यांस कळलें. तेव्हां त्यांणीं तो बैल मिद्दीस गेला असतां आपणास बाधक होईल असें जाणून त्यांवर सैन्य पाठविलें. त्यादोघीं लष्करांची गांठ पडतांच मोठें युद्ध होऊन विजापूरकर पराभव पावले, तेणेंकरून आजिमशाह याजवर चें मोठें अरिष्ट टळलें. त्याची बायको जानी बेगम नामें होती, ती त्या लष्करा बरोबर न्याकडे जात होती, ती त्या लढाईंत हत्तीवर बसून मध्यें शिरून आपल्या नाकांस धीर देत असे हा एक त्या युद्धांत मोठा चमत्कार झाला.

यानंतर औरंगजेब ही विजापुरास येऊन पोचला; नें शहर मोठें विस्तीर्ण यास्तव सर्व सैन्यानें त्याचा तट वेष्टिला. नंतर त्या यें तो कोट ढांसळावया करितां जागोजाग मोर्चे लाबून रिवें डारें पाडिलीं, परंतु हल्ला नकेला; कांकीं, त्यास असें पक्कें समजलें होतें कीं, या लोकांस अन्न मिळेनासें झालें म्हणजे, थोडके च दिवसांनीं कंटाळून आपल्या आपण किल्ला देतील. शेवटीं त्याच वर्षाच्या दहाव्या महिन्यांत त्यांणीं आपल्या संतोषानें किल्ला दिला. औरंगजेबानें शिरजीखान नामें एक विजापूर करांचा मोठा सरदार होता, त्याला मोठी मनसब देऊन रुस्तुम खान असें त्याचें नवेंच नांव करून तो आपल्या चाकरीस ठेविला. त्या खेरीज त्यांचे दुसरे जे कोणी मोठे मोठे सरदार होते तेही ठेविले.

यानंतर असे तें राज्य बुडतांच तेथचे रहाणारे लोक लागलेच निघून गेले, आणि शहर ओस पडलें. त्या नगराचा तट चिरेबंदी आहे, तो अद्यापि नवा केल्या सारिखा दिसतो. आणखी त्यांत मोठे मोठे मनोरे व उंच उंच घुमट आहेत. ते फार दुरून दिसतात. तेथें जाणारांस तें शहर बाहेरून पाहूनअसें वाटतें कीं, एथें वस्ती मोठी दाट आहे, मग आंत जाऊन पाहिलें असतां जिकडे तिकडे कोस कोस पर्यंत ओसाडी आणि मोठ मोठ्या इमारती मोडक्या, त्यांतून रानें वाढलेलीं दृष्टीस पडतात, तेणेंकरून चित्त उदास होतें. तेथें रहाणारे लोक केवळ गरीब, आणि नीचवर्मी अगदीं थोडी. त्या शहराचा घेरा पंधरा कोसांचा, त्याच्या मध्य भागीं किल्ला आहे. त्याला दुहेरी तट आणि त्यास भोवतीं खंदक आहे. त्या किल्ल्यांत मुख्य बादशाहा रहावयाची जागा [illegible]

बांधलेली अतिसुंदर आहे. ती आतां मोडलेली दिसते + शहरास-भोंवता एकेरी कोट, त्याचे बाहेरून खंदक आहे.

१० असा विजापूरचा नाश करून औरंगजेबानें गोवळकोंड्याच्या नाशा विषयीं उद्योग केला. त्यापूर्वी तुक्का नुल्तानमा जुनानें त्यांशीं सला केला होता, तो नमानितां त्याणें अयोग्य केलें तें असें, त्याचा वकील नेथें होता त्यास लिहिलें कीं, अबदुल्लसेनास कांहीं भयप्रदर्शन करून त्या पासून कांहीं द्रव्य व अलंकारादिक आत्मासाठीं घ्यावें. त्यावरून त्याणें त्याप्रमाणें केलें. तेव्हां त्याणेंभि ऊन आपल्या बायकांच्या आंगावरच्या दागीन्यां सुध्धां जामदार खान्यांतले सर्व अलंकार व द्रव्य आपणास बादशाह प्रसन्न होईल अशा आशेनें दिलें. तथापि औरंगजेबानें तें सर्व घेऊन युद्धाची तयारी केली; आणि मुलखांत असें प्रसिद्ध केलें कीं, अबदुल्लसेन बादशाहाचे पदवीस केवळ अयोग्य, ज्याणें आपल्या जाती खेरीज ब्राह्मण मुख्य प्रधान केला, आणि आमचा धर्म मानीत नाहीं असा जो संभाजी त्याशीं सख्य केलें, वास्तव आत्मीयार्थी युद्ध करणार हें वर्तमान सन सोळाशें सत्त्यायशींत घडलें. त्या समयीं अबदुल्लसेनाजवळचे कितीएक लोक त्यास सोडून गेले, आणि कोणी दुमानी चाकर होते ते मात्र थोडके से त्याजवळ राहिले

+ . तें शहर बाजिरावाचें राज्य गेल्यापासून सातव्याच्या राजाचे स्वाधीन झालें, त्यापासून त्याणे आपल्या मातबरी प्रमाणें तेथचा कांहीं खंडणीचा मक्ता करून त्यांतील उत्तम स्थलांची दागदुजी केली. त्यांत महंमद आरिफखान याची कबर आहे तिचा एकेक खणीम दालानेंही. आणि एक्या खणीं दालानेंद घुमट आहे.

मग तो अबूहुसेन त्या राहिलेल्या लोकांसह वर्तमान गो-
वळकोंड्यांत गडून सात महिने पर्यंत मोठ्या शौर्यें करून ल
ढला. शेवटीं तो किल्ला मोंगलांनीं दगा करून घेतला, आ
णि तो अबूहुसेन धरून दौलताबादेच्या किल्ल्यामध्यें औरंग-
जेबानें बंदींत ठेविला. तो मेल्यावर प्रौढप्रतापी, सदय, नाना-
शास्त्रें त्यानें नांव पडलें. त्याचें मूळकाय तें आतां समजत
नाहीं, परंतु असें वाटतें कीं, कोणी एक हुसेनाचा अत्यंत हि
न करतो त्या नावाचा त्याचा गुरु असेल.

पूर्वी औरंगजेब गोवळकोंड्यास घेरा घालूं लागला, त्यासमयीं विजापुरास त्यानें आपला एक फौजदार† ठेविला होता; आणि दुसरा फौजदार कारीमखान नामें कृष्णेचे दक्षि
णेस पाठविला; आणीक विजापूरकरांचा पहिला चाकर शिरजीखान नामें होता, तो संभाजीला जिंकावयास नेमिला; दुसरा एक गाजीबदिन होता तो विजापूरचे आग्नेयी दिशेस योजिला. अशाप्रकारें विजापूर व गोवळकोंडें यां संबंधें मु
ख्यत्व आपल्या हातीं लागावा म्हणून औरंगजेबानें यत्नके
ला त्याच्या फौजदारांनीं कायकाय केलें तें वर्तमान आधीं लि
हून मराठी लोकांचें वर्तमान पुढें लिहिण्यांत येईल.

मोंगलांचा सरदार गाजीबदिन यास आंदोणी किल्ल्यांत वि
जापूरकरांचा पुरातन मुख्य कारभारी मसाउदखान होता त्यानें, युद्ध करून परिणाम नीट होणार नाहीं म्हणून, तो कि
ल्ला दिला, परंतु औरंगजेबाचे चाकरीस राहिला नाहीं. विजा

---

† फौजदार म्हणजे ज्याला लश्करांत चाकरी असून पातशा-
हाकडून कांहीं तरी जाहागीर होत असावी.

पूर व कलबुरगा याद्दांमध्यें सगर नामें किल्ला आहे, तेथें एक बाराहजार बेरडांचा नाईक पाळेगार होता, तो किल्ला मोठा बळकट असे, आणि त्याचे सभोंवती झाडी व दाट रान असून होतें. असें असतांही त्या नाइकानें मोंगलांचें नाव ऐकतां च भिऊन किल्ला दिला. त्या औरंगजेबाची रीति अशी होतीकी, कोणीं आपल्या संतोषें करून संस्थान दिलेंतर त्याचा मोठा संमान करावा. म्हणून त्याणें मोठेमोठे लोक व मनसबदार हां सतील हेंमनांत न आणितां त्यास मनसबदारांचे पदवीस चढविलें. नंतर तो बेरड थोडकेच दिवसांनीं कांहीं अजार होऊन मृत्युपावला. त्याचा पुत्र फेमनाईक त्यास मोठ मोठ्या माणसांत वागणें ठीक पडेनायास्तव तो त्यांतून निघून वांकीण-केरागांवीं राहून पाळेगार पणा करूं लागला. त्या पुढें विसां वर्षांनीं असें झालें कीं, एवढा मोठा औरंगजेब, परंतु त्यास ही त्याच्या पारिपत्या करितां स्वारी करावी लागली. ती त्याची शेवटची मोहीम.

गोंवळ कोंडें घेतल्यानंतर बादशाहाचें लश्कर विजापुराकडे येऊन उतरलें. मग तेथून चहूंकडे राज्याच्या संपूर्ण बंदोबस्तास निरनिराळ्या स्वांऱ्या नेमिल्या, या योगें करून व पूर्वी ज्या स्वांऱ्या पाठविल्या होत्या, त्यामुळें गोंवळ कोंड्याचे पूर्वेचा मुलूख व राजमंडीर राहूर व बंदर मासुली पट्टन व बंदर गोजाम हीं त्याचे स्वाधीन झालीं. आणि खडपा व खोनजे बेराम व पुनामाळी यांचे कारभारी येऊन मिळाले. या खेरीज विजापूर व गोंवळ कोंडें यांसंबंधी जो मुलूख करनाट कांत होता, तो ही बादशाहाचे हातीं आला.

मोंगल लोक यांणीं जेव्हां नवा प्रांत हस्तगत केला, तेव्हां कोणें प्रकारें तांणी प्रजा पालन केलें, तो प्रकार असा. फौजदारयाणें लश्करचें काम संभाळावें, आणि शहरामध्यें चोरादिकांचा उपद्रव होऊं देऊं नये. त्यास सरकारचे वसुलापैकीं चवथाई देत असत. दुसरा खालसा दिवाण नामें एक कारभारी होता, त्याणें सर्वजमाबंदीची चौकशी करावी. त्याकडे लश्कर संबंधीं काम नाहीं.

औरंगजेब असा मुलूख घेत असतां संभाजीनें स्वतांकां हींचउद्योग केला नाहीं, त्यावरून त्यादेशचे लोक कल्पनाकरूं लागले कीं, कलुष्याचे जादुगिरी मुळें तो उगाच राहिला; परंतु असें नव्हे, तो संभाजी आपले दुष्ट स्वभावें करून आणि मद्यपानाच्याव्यसनें करून अप्रयोजक झाला होता, तो एखादे देशेंत सावध होई. त्यासमयीं त्याच्या वडिलांचे वेळेचे शाहाणे मनुष्य त्याचे चाकरी वांचून ही त्याजपाशींच राहिले ले होते, परंतु त्या कलुष्याचे भयानें आणि याचे अव्यवस्थितपणें करून ते आप आपले ठिकाणीं उगीच राहिले.

११ जेव्हां औरंगजेबानें विजापूर घेतलें, तेव्हां तेथचे सर्व मराठे मनसबदार यांणीं त्यास पत्र लिहिलें कीं, आम्ही तुमचे चाकरींस रहावयास सिद्ध आहों, तेव्हां औरंगजेबानें त्यांस आज्ञा दिली कीं, संभाजीला जिंकावयास जो शिरजी खान पाठविला आहे, त्यास जाई पावीं जाऊन मिळावें. शिरजी खान आला तो घांटीम पोंचला, परंतु ते लोक संकेताप्रमाणें आले नाहीं म्हणोन संभाजीचा हंबीरराव याणें त्यास जिंकिलें, परंतु त्याचे बुद्धीस [illegible] पावला. या प्रमाणें मनसब्यांचा [illegible]

र स्वांणीं स्वांच्या पाठवून विजापूर संबंधें किंवा एक मुलूख घेतला, आणि स्वांतील कांहीं स्वार औरंगजेब गोवळ कोंड्या स घेरा घालीत होता तेथें जाऊन पोंचले, परंतु युद्ध न करितां मागें फिरले. या खेरीज संभाजीनें मोरो त्रिंमळ पिंगळे या चा भाऊ केसोपंत पिंगळा पेशवा मुख्य सरदार याच्या हाता खालीं संताजी घोरपडा देऊन करनाटकांत पाठविला. नंतर त्याणें हरजी राजा महाडीक यास मिळून शाहाजीच्या जहागिर संबंधें करनाटकांतील व्यंकोजी भोंसले याजकडे मुलुख आहे तो घ्यावा अशी आज्ञा दिली होती त्यणून तें लढकर जिंजीपर्यंत पोंचलें.

१२ तिकडे व्यंकोजी पूर्वीच समजला कीं, आपणास वडिलांची जहागीर संभाजी जिरू देणार नाहीं त्यणून, तेंलढकर आलें नाहीं तोंच त्याणें म्हैसूरचा चिकूदेवनामें राजा यास तीनलक्ष रुपयांना बंगलोर शहर विकत देऊं केलें. तें वर्तमान जिंजीस पोंचलें तेव्हां ते लोक अशी इच्छा करूं लागले कीं, तो अर्थ सिद्धीस गेलाना हीं तोंच आपण जाऊन शहर घ्यावें. असें च मोंगल लोक इच्छीत होते. अशासमयीं केसोपंत व त्याचा सुत पुत्र निळोपंत यादो पांचा कांहीं कज्जा होऊन मराठे लोक लव कर पोंचले नाहींत. इतक्यांत मोंगल जाऊन पोंचलें, त्याणीं शहर घेऊन त्याराजाला तीनलक्षांस विकलें. तेव्हां मराठे लोक नें बंगलोर हातीं लागत नाहीं सें समजून म्हैसुर मांतीं जाऊन तेथची खंडणी घेत कांहीं महिने राहिले. नंतर मोंगलांनीं गोवळ कोंडें घेतलें, असें त्यांचें प्राबल्य आणून ते माघारे जिंजीस गेले.

नंतर संनसोड्या शे अठ्याय्शींत हरजी राजायास कळ लें कीं, मोंगलास मोठे मोठे जहागिरदार व मनसबदार मिळा ले, त्यावरून तो भ्याला, आणि केसोपंनाशीं त्याणें सख्य केलं. मग त्या दोघांनीं जाऊन कांहीं मुलूख घेतला; परंतु मोंगल येतात, आणि आपल्या मंडळींत वैमनस्यें पडलीं आहेत, अ सें समजून तो घेतलेला मुलूख सोडून पालिया नदीचे कांठीं कितीएक महाडिकाचे किल्ले होते तेथें जाऊन राहिले.

यानंतर त्याचवर्षी करनाटकचा बऊतां दिवसांचा उम कटा परगणा होता, तो म्हैसूरच्या राजानें व्यंकोजी पासून घे तला तेव्हेळेस संभाजीचें लश्कर जवळच होतें परंतु त्यांणें व्यंकोजीला कुमक केली नाहीं; कांकीं, मराठे लोक भाऊचं द्वकी संबंधें भांडत असले म्हणजे हे वास्तव ते आपला ना श जरी झाला तरी होऊं देतात, ह्या त्यांचा जातिस्वभाव आहे. अशा हेवा मुळें करनाटकांत गेलेले जे मराठे लोक ते बळ हीन होऊं लागले. इकडे देशामध्येंही ते लोक एकचित्तन सतां तें राज्य दुसऱ्या कांहीं कारणानें राहिलें, नाहींतर ते ह्मांच राज्य बुडून औरंगजेबाची मसलत सिद्धीस जाती, आ णि ते पूर्वी प्रमाणें अप्रसिद्ध झाले असते.

१३ संभाजीनें राज्यकारभारांत चित्त ठेविलें नव्हतें. तो विशाळगडास अथवा पन्हाळ्यावर किंवा संगमेश्वरीं एक वाग होता तेथें राहून काळक्रमणा करी; आणि त्याचा वजी र कलूषा राज्यकारभारापेक्षां संभाजीची मर्जी संभाळावयास काबूजपत असे. आणखी. जो याचा आश्रय करून राहेला होता, आणि ज्याणें समयविशेषीं यास कांहीं वर्तमान कळ

वून यांचें मोठें हित केलें, तो महंमद आकबर यास सभा वास कंटाळून त्याणें याला सोडिलें; आणि राजापुराजवळ एका इंग्रेजाचे जहाजावर बसून फारशी लोकांचें एक इस्पहान नामें शहर आहे, तेथें जाऊन त्या बादशाहाचा आश्रय करून वीस वर्षे त्यापाशीं राहून मनसबाचें महांत तेथेंच मृत्यु पावला.

१४ शिवाजीच्या मरणा पासून लश्कराचा बंदोबस्त बिघडून अव्यवस्था झाली तो प्रकार उत्तरोत्तर वृद्धिंगत झाला, तेणें करून संभाजीचें राज्य बुडूं लागलें. नें संभाजीस हित कारक नव्हतें, परंतु मुलखांत बंडें उत्पन्न व्हावयास मोठें उपयोगीं झालें. कांकीं, ज्याजवळ भाला व घोडा असे, तो त्या मराठी लोकांत शिरून एकाच दिवसाचे लुटीनें द्रव्यवंत होई. या प्रमाणें जिकडे तिकडे बहुत दिवस युद्धप्रसंग पडल्या मुळें अशी फौजजमा झाली कीं, मुलखाचा सर्वस्व सूल रोजमुऱ्यास पुरेना; यास्तव त्यांस रजा द्यावी लागली. ते लोक बहुत करून मराठे होते, त्यांस शिवाजीच्या पराक्रमें करून व राज्यांत किल्ले पुष्कळ या योगें करून व आपले जातीचे मराठे नामांकित फार आणि त्यांस बुद्धि शिकविणारे ब्राह्मण या स्तव ते गर्वास चढले असत. आणखी एक वर्तमान असें होतें कीं, हिंदूंच्या मनुष्यमात्रीं मोंगल आपला कर बसविणार म्हणून मराठे मोंगलांशीं वांकडे होते. त्या सर्व गोष्टीचा उपाय करावयास औरंगजेबाला सामर्थ्य होतें; कांकीं, त्याजवळ द्रव्य बहुत व फौज मोठी आणि सर्व मुलूखांतील वर्तमान त्यास विदित होत असे; आणि कोणासंही पदास चढवावया

ची शक्ति त्यास होती, परंतु तो स्वजातीचा व स्वधर्माचा अभिमानी, आणि मोठा गर्विष्ठ होता, म्हणून त्याचीसी शक्ति हितोपयोगी झाली नाहीं. त्यास बंडांच्या बळाचा सुमार सांपडला नव्हता. तीं बंडें आपण स्थापिलेल्या राजांचे हातूनच त्याणें मोडवावीं, तें न करितां बऱ्हुतां दिवसांचीं संस्थानें बुडूं दिलीं, आणि त्यांचे जागीं दुसरे कोणी नस्था पितां गर्वैक रून असें मानिलें कीं, आपणच सर्व संभाळूं; आणि त्याणें आपले जवळचे कितीएक लोकांस ही रजा दिली; तेव्हां ते तारकाळ जाऊन बंडाला मिळून त्याचे शत्रु झाले. या खेरीज कितीएक अंमलांवर ब्राह्मण ठेवावयाचे त्या जागीं त्याणें आपल्या जातीचे मुसलमान ठेविले, तेणें करून जी अव्यवस्था झाली, ती त्याला आटोपेना. जे त्याचे जातीचे आर्जवी होते ते त्याची कीर्ति वर्णीत, परंतु ब्राह्मण व मराठे लोकांतील जे श्रेष्ठ होते ते समजले कीं, आतां मोंगल लवकरच बल हीन होतील. तेव्हां मोठे मोठे मानकरी, डफळे, व घाड्गे, व माने, व निंबाळकर, वगैरे सर्व मिळून आपल्या शिबंदीस हवर्तमान बंडास अनुसरले. ते समयविशेषीं मोंगलांस अनुकूळ किंवा प्रतिकूळ होत असत. ते बंड करणारे सर्व लोक संभाजी यमा नकरीयांचे पदरचे होते, यास्तव तेवेळेस पेंढार बऱ्हुत नव्हते. तेवेळेस मोंगलांच्या फौजदारांची शिबंदी जागोजाग होती ती फुटकळ लुटारूंचा उपाय चालूं देत नव्हती. जे फुटकळ लुटारू तेच पेंढारी.

ते समयीं असें म्हणें कीं, मराठे मानकरी लोकांनी औरंग जे बादशहा दकाल पाठवून त्याम असें समजाविलें कीं, तुम्हीं

जन्मभर तुमचे सेवे विषयीं तत्पर असूं; परंतु त्याच्या मुक्त
खांत लोक पाठवून तेसुलूख लुटीत असतां. नंकदाचित्
प्रकट झालें असतां वकिलां कडून तेथच्या कोणा मोठ्या रा
णासास लांच देऊन छपवीत. बादशाहानें फौजदारांस
आज्ञा केली होती कीं, मराठे मानकरी चाकरीत वागत असतां
त्यांचा मानरक्षावा. इकडे मानकरी फौजदारांशीं सेवाच्च
गोष्टी सांगत, आणि तिकडे वकीलतर बादशाहाचे दरबारीं
त्यांणीं केलेलीं कृत्यें छपवीत, तेणें करून त्यांचे मुलूख
निरुपद्रव असत; आणि जेव्हां ते मोंगलांच्या मुलखांत
ऊन लूट करीत तेव्हां त्यांस समजे कीं, हे मराठे आहेत.
परंतु कोणा कडचे तें समजत नसे.

या शिवाय औरंगजेबानें दक्षिणेंत कितीएक अंमल
रांस फौजेच्या खर्चास मुलूख आपलें स्वामित्व ठेवून दिल
होता, तेथचा वसूल पुरेसा येईनासा झाला म्हणून ते लोक लूं
चलूट इत्यादि दुष्टकर्मे करून पैका जमा करूं लागले, तेणें
करून देशाची दुर्दशा झाली.

मोंगलांच्या राज्यांत अशीरीति होती कीं, एखादी व्यक्ति
जहागीर निकामी झाली असतां त्याचा अधिपति दुसऱ्या के-
लातर, त्याला त्याचे उपभोगार्थ सनद पत्र दिल्याचे पूर्वी त्या
पासून साडेसाहा वर्षांचें उत्पन्न अगोदर घ्यावें, त्यांत चौथाई
प्रथम घेऊन बाकी ऐवज हप्तेबंदीनें घेत जावा. या प्रमाणें
रक्कम संपत्त्यावें लागे, खेरीज दस्तुरी दरबार खर्च वगैरेच्या निमि
त्तें करून कारभारी लोकांपेक्षा फार घेत होते. अशा अनीती मु
ळें हा अनर्थ झाला कीं, निरंतर वतनासजा सी इत्यादि उपद्व

होऊं लागले, तेणें करून लोक चिडार झाले. बादशाह वृद्ध दशेनें अशक्त झाला होता, त्याला पहिल्या प्रमाणें चपळशी राखवेना. त्याणें एकादी आज्ञा केली असतां लिहिणारांनीं त्या कामामध्ही वर्ष वर्ष लावावें. अशी बंडाळी विजापूर व गोवळ कोंडें घेतल्यापासून बारावर्षे पर्यंत होती. नंतर तीं सर्व अनार्थाचीं कारणें वृद्धिंगत होऊन मोंगलांचें ज्य नाश पावूं लागलें. जसें उत्तम प्रकारें बांधलेलें मोठें उंच घर प्राचीन अमलेंतरी बाहेरून चांगलें दिसतें, परंतु आंतून जीर्ण दशेस पावलें असतें. त्याला दागदुजी करून उपयोग नाहीं; कां कीं, तें आपल्या जीर्णतेनेंच पुढें थोडक्याच दिवसांनीं पडावयाचें. असें तें राज्य जहालें होतें.

औरंगजेब विजापुरीं एक वर्षभर शकर सुद्धां राहिला होता, त्याणें ज्या फौजा तेथून बडूंकडे पाठविल्या होत्या त्या जय पावल्या. त्यांत संभाजीच्या मुलखांत मात्र बळकट बळकट किती एक किल्ले राहिले होते, तेही घ्यावयास औरंगजेब कांहीं सिद्धता करीत होता, कीं जेणेंकरून ते किल्ले निश्चयें हातीं लागावे. इतक्यांत त्याचे फौजेंत कांहीं मोठा रोग उत्पन्न होऊन फार लोक मेले, तेव्हां तो बेत राहून अकलूज नामें शहर निरेचे कांठीं आहे तेथें जाऊन राहिल्यावर तो रोग गेला. असें सहा सात वर्षांत एकुण नवद्यांत घडलें.

१५ त्याच सुमारें समुद्रांत इंग्रेजलोक उपद्रव करीत होते म्हणून औरंगजेबानें निकडे मन लाविलें, आणि त्यांच्या व्यापारावीं किती एक स्थानें त्याच्या मुलखवीं होतीं तींजप्त केलीं, व जंजिऱ्याचा शिद्दी याकूतखान त्यास आज्ञा केली कीं.

घुमवून इंग्रेजांस घालवून दे. त्याणें जाऊन माजगांव व शिवनेरी किल्ला व माही म घेतले; आणि मुंबई किल्ला घ्यावयास नऊ दहा महिने खटला, परंतु कांहीं उपाय चालेना. तेवढीं इंग्रेजलोकांचें व औरंगजेबाचें कांहीं बोलणें होऊन तो निघून गेला.

१६ औरंगजेब अकलुजेम जाऊन राहिल्या वर बऱ्हुत दिवसां मराठी लोकांचे उपद्रवाचें वर्तमान त्याला कळलें. त्यांत नाशिका जवळ मोठा जमाव जमला होता, त्याच्या पारिपत्यास तिकडे फौज होती ती पुरेना, तेव्हां औरंगजेबानें त्या बंदोबस्ता करितां आपला पुत्र आदिलशाह याजबरोबर फौज देऊन रवाना केला; आणि वजिराचा पुत्र आसदखान याजबरोबर दुसरी फौज देऊन कोंकण घ्यावयास पाठविला; आणखी कोलापूर परगणा घ्यावयास अबदुल्लसेनाचा नकरीबरखानना में कोणीएक मोठा सरदार होता तो त्यास तेथची फौज दारी द्यावयाचा करार करून पाठविला. त्या पूर्वीच्चि कोलापूरसंबंधेंजो सोपा मुलूख तो मोंगलांनीं घेतला होता, परंतु पन्हाळा आदि करून अवघड जागी मराठे लोक होते, तो हस्तगत झाला नव्हता.

नकरीबरखान तेथें जाऊन तो सर्व ठिकाणांची बातमी घेत असतां असें त्याला समजलें कीं, संभाजी थोडकेसे लोक बरोबर घेऊन केवळ असावधपणें संगमेश्वरीं राहिला आहे. त्या वरून त्याणें त्यास धरून आणावें असा बेत केला. नंतर तो आपला पुत्र इरवला मरवान व मोठे मोठे अत्यंत विश्वासू असे थोडकेच स्वार व वाटाडे बरोबर घेऊन कोलापुरा हून मोठ्या

धैर्य करून निघाला, तो संभाजीच्या लोकांस वाटलें कीं हे नंदतां संग. नेम्बराजवळ पोंचला, तेव्हां संभाजीच्या जासुदांनीं त्यास वर्तमान कळविलें कीं. मोंगल जवळ आला, ते समयीं तो मद्य पानें करून उन्मत्त जाहला होता, यास्तव तो त्यांस ओरडून बोलिला कीं, मूर्खहो, अशी वेडेपणानें कांबड बडबड करितां, मुसलमान काय येणार आहेत, असें फिरून बोलिलांतर मी तुमचीं नाकें कापीन. इतकें म्हाल्यावर थोड्याच वेळांत तकरीबखानाचा पुत्र कांहीं स्वारांसहित मोठ्या त्वरेनें बापाच्या पुढें घोडे पिटाळीत संभाजीच्या वाड्यांत जाऊन पोंचला, तेवढ्यांत जे लोक तेथें सांपडले तेमारून टाकिले. इतक्यांत मागून तकरीबखान ही आला, तेव्हां उरलेले लोक बहुतेक पळाले, परंतु कलूषाजवळ कांहीं होते, ते संभाजीच्या रक्षणार्थ लढूं लागले, मग कलुषाच्या निराची जरब मलाग तांच तेही पळाले, ते समयीं संभाजी सावध होऊन आपलावे षबदरून तेथून निघावयास सिद्ध झाला, परंतु त्याच्या अंगावर मोठे उंचउंच अलंकार होते ते त्याला टाकवेनात, सा हुकूं हाच संभाजी असें समजून त्यास धरिलें. त्याबरोबर कलुषा आणि दुसरे चोवीस असामी धरले.

मग तकरीबखानानें त्यास कोलापुरीं नेऊन औरंगजे बास केलें, नंतर तेथून आज्ञा झाली कीं, त्यांस बहुतबंदोबस्तानें इकडे आणावें. तेव्हां बादशाह अकलुजेहून निघून इंद्रायणी व भीमा यांच्या संगमाजवळ तुळापुरीं जाऊन

+ तुळापुरास पहिलें नागर गांव असें नाव होतें, मग शाहाजीच्या मनांत आलें कीं, हें नांव बदलून कितीं असावें, त्याचें

उतरला होता, तिकडे तक्रीबखानानें त्यांस नेलें. ते लश्करा जवळ पोंचल्यावर तेसारे बंदिवान मुस्क्या बांधून उंटावर बसवून बरोबर वाद्यें वाजवीत लश्करांतून बादशाहाचे हुजूर नेले. ते पाहून औरंगजेबानें आज्ञा केलीकीं, एकां कैदेंतच असूं द्यावे, मग विचार करून यांच्या अन्यायानुरूप पारिपत्य केलें जाईल. नंतर ते तसेच कैदेंत ठेविले.

१७ त्या पुढें मोंगलांत जे श्रेष्ठ मनुष्य होते त्यांणीं बादशाहास असें समजाविलेंकीं, संभाजीचाजीव रक्षावा, तेणेंकरून त्याच्या राज्यांतले अवघड किल्लेसर्व आपल्याहातीं येतील. ही मसलत औरंगजेबाच्या ही मनास येऊन त्याणें संभाजीला निरोप पाठविला कीं, तूं मुसलमान हो म्हणजे तुझा जीव वांचेल. त्यावर त्याणें उत्तर दिलें कीं, बादशाहाला मांगा, जर तूं आपली कन्या देशील तर बाटेन. असे दुष्ट जे तुझी मुसलमान लोक त्यातुमच्या पेगंबराम धिक्कार असो. मग तो आपलीअन्याय कर्मे स्मरून पश्चात्ताप पावून जेजवळ बंदोबस्तास मांगल होते त्यांस नाना प्रकारें शिव्या देऊं लागला, त्या अशाकीं, ज्या योगें त्यांतला एखादा क्रोधें करून मारील व.

तें उत्तर औरंगजेबाला समजतांच त्याला बहुत राग येऊन त्याणें अशी आज्ञा केली कीं, त्याला लश्कराच्या बाजारांतनेऊन प्रथम त्याचे डोळे लोखंडाचे डागणीनें भाजावे, नंतर

न तेथें नदी मध्यें नावेंत हत्ती घालून त्याच्या भारानें जितकें नावेच्या अंगाला पाणी लागलें तितकी खूण करून हत्ती काढून त्या खुणे बरोबर पाणी येई तों पर्यंत दगड घालून त्या दगडांचें वजन केलें, ती हत्तीची तुळा झाली. त्या दिवसापासून त्या गांवाचें नाव तुळापूर ठेविलें.

जी भक्कम पायी, मग डोकें मागवें. अशी भीति होण्याचें कारण केवळ बादशाहाचा रागच नव्हे, असें केल्यें असतां हिंदुलोकांत दहशत पडेल असेंही त्याचे मनांत होतें. त्या वरून त्याला तुळापुरींच लष्करच्या बाजारांत नेऊन आधीं प्रमाणें च मारून टाकिलें. त्याचा वजीर कलुषा तोही त्याबरोबरच मारिला. हें वर्तमान संभाजीची गोष्ट लिहिली आहे त्यावरून असें दिसतें कीं, त्या मध्यें कांहीसें शौर्य होतें, आणि चातुर्य नेमस्तच असेल.पण रंतु हे त्याचे गुण क्रूरपणानें आणि व्यसनें करून व्यर्थ गेले. असें वाटतें कीं, तो जर आणीक कांही काल वांचता, तर आणखी ही पापच करता. तो मेल्याचे पूर्वीचि तीन वर्षें त्याच्या जातीचे मराठे लोक त्याला कंटाळले होते, परंतु ज्या समयीं त्याच्या मरणाचा प्रकार समजला, ते समयीं तो शिवाजीचा पुत्र या सर्व सर्वांस वाईट वाटून क्रोध आला. औरंगजेबास चिंता न होता कीं, हिंदून दहशत पडावी, परंतु नें सिद्ध न होतां केवळ द्वेषमात्र वाढला.

भाग अकरावा

संभाजीपासून एकुणनवदांपासून सत्याशीं सात पर्यंत झालेली वर्तमानें.

१ शिवाजीची स्त्री सोयराबाई मेल्यापासून तिचा पुत्र

राजाराम या वेळेस आपणास कैदीं विघ्नबुद्धीनें संभाजीनें रायगडीं कैदेंत घालून ठेविलें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं त्याची स्त्री मृत्यु पावली, नंतर आणखी दोन करून दिल्या. पहिली तागबाई मोहित्यांची कन्या, दुसरी राजसबाई कागलकर घाटगे यांची मुलगी. राजाराम बंदींत होता त्याच किल्ल्यावर संभाजीची स्त्री येसूबाई व पुत्र शिवाजी असत. त्या उभयतांशीं तो राजाराम पूर्वीपासूनच स्नेहकरीत होता. पुढें संभाजी मेल्यावर मराठ्यांचे मुख्य मानकरी होते त्यांसमवेतीं मिळून येसूबाईच्या विद्यमानें रायगडीं मसलत करावी कीं, शिवाजी प्रौढ होईतों पर्यंत राजाराम धणी करावा. तेसमयीं मुलाचें वयसा ह वर्षांचें होतें. त्याचेंच पुढें शाहू असें नाव पडलें. त्याम मसलतींत मानकरी होते त्यांचीं नावें. जनार्दनपंत हणमंते, प्रल्हादनीराजी तो न्यायाधीशाचा पुत्र, रामचंद्रपंत बहुलकर, खंडोबल्लाळ चिटनीस, महादाजी नाईक पानसंबळ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, आणि खंडेराव दाभाडे.

असें आहे कीं, संकटसमयीं थोरलोक एकत्र मिळून विचारकरीतात, त्यांत जो उत्तम बुद्धिमान् असतो तो सर्वांचीं चित्तें स्वाधीन करून घेतो, मग ते सर्व त्याचे आज्ञेप्रमाणें वागूं लागतात. तसेंच या आठांमध्यें प्रल्हादनीराजीची बुद्धि विशाळ होती. तीअशी कीं, तेथें नानाप्रकारचीं संकटें असतां, त्याणें स्वस्थचित्तेंकरून संपूर्ण बंदोबस्त केला. तीं संकटें अशीं कीं, जामदारखान्यांत द्रव्य नव्हतें, आणि कोठींतलें धान्यही सरलें होतें, व लष्कराचा बंदोबस्त नाहींसा झालाहो

ता, आणखी शत्रूचें प्राबल्य, या प्रमाणें अडचणी असूनत्या णें प्रथम किल्लांत शिबंदी ठेवून शिवाजीच्यारीती प्रमाणें बंदोबस्त केला, आणि कोठींत दाणा भरला.

त्यानंतर असा नेमठरविला कीं, शत्रूंच्या बातमी दारांस ठिकाणा नलागावा म्हणून राजारामानें सर्वदा एके ठिकाणीं राहूंनये. रायगडापासून विशाळगड पर्यंत जे शिवाजी चे बांधलेले किल्ले आहेत, तेथें चालून पालून रहावें. अशी मसलत झाल्यावर येसूबाई पुत्रासुद्धां रायगडींच राहिली, आणि राजाराम कुटुंबसुद्धां विशाळ गडास गेला. त्त समयीं लष्करच्या सरदारांस आज्ञा जाहली कीं, काळानुरूप साधपणानें वर्तावें, आणखी स्वार लोक यांणीं बहुत करून राजाराम या पासून दूर राहूं नये.

२ हे समयीं मोंगलांचें लष्कर औरंगजेबानें कोंकण घ्यावयास पाठविलें होतें, त्याणें पर्जन्यकाळ गेल्यावर रायगडास येसूबाई व तिचा पुत्र शिवाजीआहेत अशीबातमी घेऊन किल्ल्यास घेरा घातला. तेव्हां त्यांचे कुमकेस जंजिऱ्याचा शिद्दीही आला होता. त्यांणीं तेथें किती एक महिने श्रम केले, परंतु कांहीं उपाय चालेना. शेवटीं कोणी एक मराठा शिवाजीचे वेळेचा जुनाचाकर होता, त्याला बाईंच्या देशमुखी संबंधें कांहीं खटल्या निमित्त राग येऊन त्याणें कितीएक निवडक मावळे लोक हाताखालीं घेऊन मोंगलांशीं सख्य करून बाईच्या देशमुखी विषयीं करार करून घेऊन, त्यास मदत दिला. नंतर त्याचे मदतीनें तो किल्ला थोडक्याच दिवसांनीं मोंगलांचे हातीं लागला. असें सन सोळाशें नव्वदांत

घडलें.

तेव्हांतेथें संभाजीचीस्त्री येसूबाई व पुत्र शिवाजी दोघे भयतां मोंगललोकांचे हातीं सांपडलीं. तीं त्याणीं औरंगजेबाच्या लष्करांत नेलीं. यावरून औरंगजेबानें त्यास्त्रियांचा संमान केला; आणि त्यासंभाजीच्या पुत्राचे टिकाणीं शिवाजी ठेवून त्यांचें शाहु असें नाव चालविलें. येसूबाई व औरंगजेबाची कन्या बेगमसाहेब यांचा स्नेह झाला.

३ यानंतर मोंगलांनीं मिरज व पन्हाळा घेतला, तेव्हां मराठे लोकांत असें ठरलें कीं, राजारामानें जिंजीस जावें. यावरून राजाराम याणें प्रल्हादनिराजीव संताजी घोरपडे व खंडेराव दाभाडे व धनाजी जाधव व खंडोबल्लाळ व दुसरीं कवळ विश्वासू अशीं एकवीस माणसें बरोबर घेतलीं, आणि वाण्याचे वेषानें निघाला. तो निर्विघ्नपणानें तेथें जाऊन पोंहचावा असा त्याणीं शहाणपणानें बंदोबस्त केला होता, तथापि औरंगजेबास नें कांहीं वर्तमान कळलें तेस मयीं, त्याचा फौजदार कर नाटकांत होता त्यास व दुसरेत्या वेसरदारजे निकडे होते त्यांना त्याणें आज्ञापाठविली कीं, राजाराम तुमचे मुलखीं गेला आहे त्यास धरून आणा. त्याचरू न ते शोधात होते. इकडे बंगलोर शहराजवळ राजाराम उतरला, आणि तो आपले पायमाप मांकडून धुववीत होता, तेव्हां लोकांनीं बघितला कीं, हा कोणी मोठा माणूस आहे; मग त्याणीं तेथचा सरदारास खबर कळविली. इतक्यात खंडोबल्लाळ हा समजला कीं, आपला मोंगल येऊन पोंचेल. यास्तव ते समयींच राजारामाबरोबर संताजी घोरपडे व धनाजीजा-

न देऊन तेथून तो पळविला; व आपण मंडळी सुद्धां तेथंच स्वैपाक करीत बसून विचार केला कीं, जर कोणी आपल्यास धरून नेऊन विचारूं लागेल तर सर्वांचें उत्तर द्यावें कीं, आत्माराम कांहीं ठाऊक नाहीं. असा निश्चय ठरतो तोंच मोंगल आले, आणि त्यांस धरून मार झोड करून पुसूं लागले, परंतु ते सर्व एकचित्त यास्तव त्यांस कांही ठिकाणा लागूं दिला नाहीं, तेव्हां त्यांणीं त्यांस सोडिलें. नंतर ते सर्व संकेता प्रमाणें जिंजींत एके जागीं जमले.

राजाराम मुल्हर सोडून गेल्याचे पूर्वी प्रह्लादनिराजी चे मसलतीनें असा बंदोबस्त केला होता कीं, मोरोत्रिंबळा चा पुत्र निळोपंत यास पेशवा करून रामचंद्रपंत बकुरक र यास हुकमतपणाचें पद देऊन त्याजकडे विशाळगड व रांगणा व इतर जे मराठ्यांचे किल्ले व मुल्हर यांच्या बंदोबस्ताचें काम सांगितलें. शिधोजी गुजर व काम्होजी आंग्रे या दोघांस लढाऊ गलबतांचें काम सांगितलें; आणि एक सातारा महादाजी नाईक पानसंबळ नामें शिलेदार मराठी लोकांत मोठा विख्यात होता तो सेनापति केला; मग थोडके च दिवसांनीं तो मरण पावला. नंतर पुढें संताजी घोरपडे यास तो अधिकार दिला.

राजाराम जिंजीस पोंचल्यावर थोडकेच दिवसांत तो अल्पवय असूनही त्याणें आपलें महत्व वाढावें म्हणून शिवाजी प्रमाणें आपल्या जवळ मोठे मोठे अष्टप्रधानादि असावे असें जाणून त्यांणें नवे अष्टप्रधान केले. ते असे, जनार्दन पंत हणमंते अमात्य, शंकराजीमल्हार सचिव, रामचंद्रत्रिंब

क पुंडे मंत्री, महादाजी गदाधर सुमंत, निराजी रावजी न्याया धीश, श्रीकृष्णाचार्य पंडितराव; पेशवा व सेनापति हे पूर्वी च केलेले होते, ते च हे मिळून आठ झाले. यांत प्रल्हादनि राजी मोठा चतुर असे, आणि राजाच्या उपयोगी बहुत पडला होता, यास्तव त्याला पेशवेपणाचें पद असावें, परंतु तें रिकामें नव्हतें, त्यापूर्वी प्रतिनिधि असें नवें च पद करून त्या ला सर्वप्रधानावरती स्थापिला. संताजी घोरपडे सेनापति यास नवें हिंदुराव नमलकत् महार असें नाव ठेवून नगारा व जरीपटक्याचें निशाण दिलें. धनाजी जाधव यास जयसिंगरा व असें नवें नाव ठेवून, तो आणि संताजी घोरपडे या दोघांस माघारें महाराष्ट्र मुलखी फौज ठेवून मोंगलांचा मुलूख लुटाव या करितां पाठविलें

असा बंदोबस्त झाल्यावर त्या प्रधानांनी जिंजीमध्यें राजा राम तक्ताधिपति करून ते आप आपल्या कामांत मोठ्या साव धपणें करून वागूं लागले; आणि गुप्त रूपें करून आपल्याजा तीचे मगठे मानकरी लोक यांस मोन्याचीं कडीं व मोठे मोठे शेला क वगैरे पाठवून त्यांस राजाराम तक्ताधिपति केला हेंआ नंदाचें वर्तमान कळविते झाले. याखेरीज जो आपला मुलूख मोंगलांनीं घेतला होता. त्यांतील व जो मोंगलांचाच मुलूखहो ता त्यांतील कितीएक ठिकाणें जहागीर व इनामें करून त्यां च्या सनदा ही कितीएक मानकरी यांस त्यांणीं पाठविल्या. ने देणें ते वेळेस लोकांचे उपयोगीं पडलें नाहीं, परंतु राजाराम स उपयोग झाला. तो असा, ते लोक संतुष्ट होऊन आपणास या समाणेंच पुढें मिळाल या भरोनें त्यांचे व कोल्हापूर, [illegible]

एक जिंजीस गेले आले असें होऊं लागलें, तेणें करून तो महत्त्वास चढला.

४ हे वर्तमान औरंगजेबास कळून त्याणें जुलफिकार-खान सरदार करनाटकांत अशा अभिप्रायानें पाठविला कीं, एक जिंजीवाहर घेतलें त्यणजे सारे मराठे एके जागीं सांपडतील, परंतु ती त्याची कल्पना व्यर्थ गेली. कां कीं, तेसमयीं विजापूरकरांचे व गोवळकोंडेकरांचे कित्येक लोक मराठे लोकांच्या नावानें नाशीक वऱ्हाड व भीर यांसंबंधीं संपूर्ण मुलखीं एकसमयावच्छेदें करून उपद्रव करीत होते. या शिवाय जे स्वार शिवाजीचे पहिले चाकर होते तेही येऊन संताजी व धनाजी यांस मिळाले.

औरंगजेबाचा सरदार जुल्फिकारखान जिंजीस गेला, तो तें मोठें शहर पाहून समजला कीं, याच्या वेढ्यास आपले इतके लश्कर पुरणार नाहीं, म्हणून त्याणें औरंगजेबा मल्लिहिलें कीं. सैन्य अणीक पाहिजे. तें येईतों पर्यंत आपण जिंजीजवळ थोडकीशी फौज ठेवून दक्षिणेंत त्वां या घालून न खंडणी घ्यावयास निघून जंजीर व विचनापाळीचे गंजेगं पासून खंडणी घेतली

५. या समयीं करनाटकांचें वर्तमान असलें महाराष्ट्र देशांत रामचंद्रपंत किल्ल्याचा व मुलखाचा व वसुलाचा बंदोबस्त उत्तम प्रकारें करीत होता, त्याणें मोंगलांच्या लश्कराच्या कित्येक जागीं दाणा होत्या त्या खराब केल्या. नंतर जिंजीहून संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे मो- ठाले. तेव्हा त्याणें विचार केला की, मोंगलांचा फौजदार जो

ईस आहे तो धरून आणावा. त्या वरून ते संतुष्ट होऊन ता
काळ तें काम त्या सरदारांनीं शेवटास नेलें. तें असें कीं, तोफो
जदार व त्याचे सर्व लोक ही छापा घालून धरून आणिले. नं
तर रामचंद्रपंत व संताजी व धनाजी यांनिघांनीं आपले
किंतीएक लोक मोंगलांचे मुलखांत चौथ व सरदेशमुखी यां
चा हिस्सा घ्यावयास पाठविले. ते त्यांच्या आज्ञेप्रमाणें घेऊ
न आपणास घांसदाण्याच्या निमित्तेंकरून सरकार आज्ञेवे
रीज स्वतंत्रपणें कोंढाणा घेऊं लागले. असे वाटणारे जे त्यांत मुख्य
तीन होते, पंवार व थोरात व आठवले. त्यांस राजाराम ऊंच
वस्त्रें वगैरे कोंढाणा स्वारींत कामानुरूप पाठवीत असे. त्यांणें प
वाराचें विश्वासराव असें नांव ठेवून थोरातास रोहनकरा
व असें नांव ठेवले, व आठवले यांस समशेर बहादर असें नां
व दिलें.

रामचंद्रपंतानें आपल्या लश्करांत धनगर लोकांवर बहु
त प्रीति ठेविली होती. त्यांत कितीएक त्याच्या आश्रयें करून
नव मोठ्या पदवीस चढले. त्याचा कारकून संकाजी नारायण
नामें मोठा शहाणा होता. त्याणें त्याच वर्षी मंनसोक्ताचे व्या-
ण्यांत मोंगलांपासून राजगड घेतला, म्हणून रामचंद्रपंता
नें त्यास वाई परगण्याची मामलत सांगितली. त्याच सुमारें
परशुरामत्रिंबक यांणें मोंगल असावध पाहून त्यांपासून प
न्हाळा किल्ला घेतला. ते समयीं संताजी ही निरुद्योग बसलाना
हीं, त्याणें जाऊन मिरज घेतली. तेव्हां रामचंद्रपंत समजला
कीं, याला तेथची देशमुखी द्यावयाजोगा धण्यानें आपणास अधि
कार दिला आहे, आणि यात स्वामीचें हित होईल, म्हणून तो अ-

धेकार त्यास दिला मग संताजी व धनाजी यांणीं आपली पूर्ण ता होई असें मैन्य जमा करून आपला धणी राजाराम यास हिनावद्ध झाचया करितां गोदातीरी मोंगलांचा मुलूखवद्दा ता तेथें उपद्रव करावयास गेले. तो मुलूख स्वस्थ होता, आणि तेथें काय मिळण अघत, त्यामाणें इनर मुलखी कां हीं कारणामुळें मिळत नव्हते. ते तेथें जाऊन प्रकट होतां च औरंगजेबानें त्यांवर सैन्य पाठविलें, परंतु त्यालोकांनी पहिल्या प्रमाणें नभिनां युद्धास उभें राहून तीनचवकां मोंगलां चा पराभव करून प्रतियुद्धांत त्यांचे मोठे मोठे सरदार धरिले, आणि त्यां पासून बहुत द्रव्य घेऊन सोडिले. त्याव रून औरंगजेब समजला कीं, हे पूर्वीचे अल्पबळ असून होतां होतां मोठे प्रबळ झाले. त्या मराठी लोकांमध्यें संताजी मोठा योग्य सरदार असे, तो नाना नम्या व्यवस्था यांचा ज्ञाता होता; आणि कांहींमा रागीट होता. तसाच धनाजी जाधवही मोठा योग्य असून कांहींमा सौम्यक असे, यास्तव तो संताजी पेक्षां कठिन योग्यतेचा असतांही त्यावर लोक मोठी प्रीति करीत हो ते.

असे मराठ्यांचे सरदार उत्तरेकडे उपद्रव करीत असतां औरंगजेब आतां काय करावें असा चिंताक्रांत होऊन लश्कर सहित मीमातीरचि दुसरे जागीं जाऊन उतरला. मग त्याणें अ सा निश्चय केला कीं, अगोदर जिंजी घ्यावी. तेथें कामबक्ष नामें आपला पुत्र याजबरोबर फौज देऊन त्यास आसदखान वजीर यानें आजे प्रमाणें पाठवयास सांगून त्या दोघांस जिंजीवर पा ठविलें, त्याणीं तेथें जाऊन शहागम वेढा घातला. असें संनभाव

ग्रा श्राणवांत घडले

जुल्फिकारखान बादशाहानें जिंजीवर चढिला नेमला असतां त्यावर आपला पुत्र मुख्य करून पाठविला, तो त्या- स अपमान वाटून त्यानें चित्त उदास आलें. अर्थी चजीरजा पाठविला तो त्याचा पक्षपाती होता, तो समजला कीं, ही युक्ती अनीति बादशाहाची प्रियजी बायको तिजकडून झाली.

जुल्फिकारखान उदास चित्त झाला असें वर्तमान ऐकून राजाराम राजाच्या प्रधानांनीं मोठ्या हर्षानें चांतच आपला अर्थ साधून घ्यावा म्हणून उद्योग केला. शेवटीं जुल्फिकार खान व राजाराम याचा आंतून गुप्तपणें तह ठरला कीं, काम चक्षु जी मसलत करूं लागेल ती युक्तीनें मोडावी. तेनसाधले तर त्याणें राजाराम ती बातमी कळवावी. असें संनसोळाशें चौऱ्याण्णवांत घडलें. त्या चवर्षी औरंगजेब भीमेचा कांठसो डून गलगल्यास गेला त्या जाण्यांत मसलत अशी अमेल कीं, आपण दक्षिणेंत शिरलो म्हणजे मराठे लोक तिकडे येतील, परं तु तसें न झालें. घोरपडा सैन्यसहित उत्तरेस च होता. रामचंद्रपंत सेने सुद्धां पूर्वकडे सोलापूर पर्यंत मुलूख लुटीत गाहिला. मग औरंगजेब ती कल्पना सिद्धीस गेली नाहीं म्हणून पुनः भीमानदीं ब्रह्मपुरीस जाऊन उतरला. तो तेथें लष्कराचे उपयोगीं पडतील अशीं कितीएक मोठीं मोठीं घरें बाधून कांहीं वर्षे राहिला. तेव्हां त्या औरंगजेबानें तेथूनच आपला सर्व राज्यकारभार चालविला होता.

६ त्या पुढें दोन वर्षे पर्यंत महाराष्ट्रमुलखी कांहीं विशेष व र्तमान झालें नाहीं. पोर्तुगीस लोकांवर औरंगजेबाचा राग होऊ

न त्याणें कोंकणात माल त्यांचे कितीएक गांवलुटले. तेसमयीं त्यांचे कितीएक लोक समुद्रतीरीं दमन व वसई यादोहों कि ल्ल्यांत गहून वाचले. त्याचवेळेस औरंगजेब समुद्रतीरच्या उपद्रवा मुळें इंग्रज लोकांसही कोंधंकरून मुंबईतून हांकून द्यावयास इच्छीत होता, परंतु मुंबईचें स्थान घ्यावयास अति शय अवघड याकरितां औरंगजेबानें तो उद्योग केला नाहीं.

७ नंतर महाराष्ट्र मुलखांत संभाजी घोरपडा याने फार उपद्रव केला, आणि जे मोंगल त्याचे पाठीस लागले होते त्यां मस समय विशेषें जिंकून त्यांपुढें उपाय न चाले अशा समयीं प ळून त्याणें आपल्या सामर्थ्यप्रमाणें त्यांचा नाश केला. शंभरवीं सहजार स्वारबरोबर घेऊन औरंगजेबाचें थारलें लष्कर पू र्वेकडे टाकून माघारा वरून करनाटकांत शिरला. मग जिं जीजवळ गेला तेव्हां त्याच्या एकराचा तिसरा वांटा धनाजी जाध वा चरोबर देऊन जिंजीस भोंवता ज्याचें घेरा घातला होता त्यालष्क रावर छापा घालावया करितां जलद पुढें पाठविला. तो जातांच प्रथम जिंजीजवळचें एक मोंगलांचें ठाणें त्याणें मारिलें. तेणें करूनच मोंगल समजले कीं, मराठे जवळ आले. त्यावेळेसच्या वाटेत जे गजाराचे लोक होते तेही बाहेर निघून मोंग ल्यांस मार्गूलागले. तेव्हां आममंत्रान त्यांचीं ठाणीं होतीं तीं एकत्र करून बंदोबस्त करावयास त्यांना अवकाश सापड ला नाहीं, त्यायोगें करून त्यांचा फार नाश झाला. इतक्यात स ताजी घोरपडा जिंजीकडे हळूहळू येत होता तो खोवर प्रांतापर्यंत पोंचला तेव्हां अलीमर्दनामें मोंगलांचा फौजदार होता तो हें मन्यजमाकरून त्याजवरी लोटला. परंतु त्याचा अगदी मोड हो ऊ

न तो संताजीनें धरून नेऊन त्यापासून द्रव्य घेऊन सोडिला. मग जिंजीच्या सभोंवतीं दूर दूर जिलकी मोंगलांचीं ठाणीं होतीं तिकीं संताजी व धनाजी या दोघांनीं मिळून मारून मागें हटविलीं, तीं जिंजीजवळ गेलीं. तेव्हां कामबक्षयाचे जवळचे जे स्वार होते ते कांहीं दैवनस्यामुळें रहिले नाहींत, आणि त्यास बाहेरचें वर्तमान मराठे लोक कळूं देईनात. आणखी वदंता अशी उठविली कीं, औरंगजेब मेला, त्यावरून त्या लोकांच्या मनांत भय आणि संशय एकदांच उत्पन्न झाला. त्या समयीं जिंजीतले मराठे लोकही त्यांवर स्वांच्या चालून मारूं लागले. तेव्हां जसे जिंजीस भोंवता वेढा घालून मराठे लोक मोंगलांपूर्वी कोंडले होते, तसेच तेही मराठ्यांच्या वेढ्यांत सांपडले. यास्तव उदास चित्त होऊन त्यांणीं शाहूस भोंवते मोरचे देणें ते मोडून त्या तोफा लढाईच्या उपयोगीं नाहींत असें करून त्या हाचें बोलणें लाविलें. तेव्हां असें ठरलें कीं, मोंगलांनीं अडिवतां वांदिवाशी गांवा पावे तों जाऊं द्यावें. आणि तेथें औरंगजेबाचें लिहिलें येई तों पर्यंत त्यांनीं त्याच जागीं राहूं द्यावें.

तो तर औरंगजेबाच्या मनांत आलें नाहीं. त्याणें कानबक्ष नामें आपला पुत्र व आमदखान वजीर यांस मागारें बोलाऊन पुनः जुल्फिकारखानास जिंजी घ्यावयाचे काम सांगितलें. आणि आपण भीमा तीर सोडून लश्कर सुद्धां विजापुरास गेला.

नेमस्यां संताजी घोरपडा कर्नाटकांत स्वांच्या घालून विजापूरसंबंधें मुलूख उद्ध्वस्त करीत होता. त्याच्या शासनार्थ बादशाहानें विजापूरहून गाठेगोन्य पाठविलें. त्या शिवाय त्या मुलखीं

[illegible] खान नामें मोगलाचा सरदार होता. त्याला आज्ञा दि
ली की. तूं त्या संभाजीला शोधून लागलेंच अमलांत तो त्याल
ष्करावर अकस्मात येऊन पडला. आणि बरेच लोक मारिले.
ह्या पुढें मोगल लोकांचे लष्करांत मोठे मोठे सरदार फार हो-
ते. त्यामुळें सर्व एकचित्तें वागणें होईना. हें मराठ्यांस समज
ताच तें अ[illegible]य मोठें हितावह असें जाणून मराठे लोक
ल्ष्करा[illegible]र दिवसा छापा घालीत, आणि रात्रीं बाणांनीं भा
जीत. असा त्यांचा उपद्रव त्या लोकांनीं तीन दिवस सोसला, नं
तर दादोरीनामें एक लहानसा किल्ला आहे तेथें जाऊन त्या आ
श्रयानें त्यांचे आमसंभाल् राहिले. मग थोडकेच दिवसांनीं
त्यास अन्नादिकाचा तोटा पडला, तेव्हां त्या किल्ल्यांत कांहीं धान्या
दिकाचें नें एकदांच लुटलें जाईल म्हणून त्या किल्लेकऱ्यांनीं दर
वाजा बंद केला असतां, तेथल्या बाण्यांनीं भिंतीवरून चोरून
फार महाग विकलें, तरी नें सरलें. त्या लष्कराचे कुमकेस औ
रंगजेबानें दुसरें लष्कर पाठविलें, तें त्यास जाऊन मिळालें ना
हीं तोंच संभाजीनें वाटेंतच त्यांशीं लढाई करून जिंकिलें, नें
वर्तमानही मोंगलांस कळूं दिलें नाहीं. नंतर ते लोक अगदीं
निराश होऊन मराठ्यांस शरण गेले. त्यांत काशीमखान प्रामा
णिकपणें मोठ्या योग्यतेनें स्वामिसेवा केलेला होता, त्याला तें
शरण जाणें फार वाईट वाटलें, त्यामुळें तो विषखाऊन मेला.
इतर जे मोठे मोठे सरदार होते त्यांपासून खंडणी घेऊन त्यांचें
सोरंबुडून घेऊन सोडिले. ते औरंगजेबाकडे गेले असतां त्यां
चर त्याची इतराजी होऊन त्याणें नें परत्युप करून तेथून दूर

८ इतक्यांत जुल्फिकारखान जिंजीस जाऊन त्याणें राजाराम वेढा घालावयाचें काम आरंभ करीत होता, त्यावरून औरंगजेब समजला कीं, त्याचा राजाराम याचीं कांहीं स्नेह असेल. हें वर्तमान जुल्फिकारखानास कळलें, तेव्हां त्याणें राजाराम याला सांगितलें कीं, आतां मला या शहरास घेरा अवश्य घातला पाहिजे. त्यास तुम्हीं पळा, मी तुम्हाला अनुकूळ आहें. तेव्हां राजाराम आपले सोयरे शिरके बरोबर घेऊन विशाळगडीं गेला. ते समयीं जुल्फिकारखान व राजाराम यांचा असा करार ठरला होता कीं, शहर घेतल्यावर राजारामाचीं मुलें व स्त्रिया कांहीं निमित्तें करून शिरक्यांचे स्वाधीन करावीं. असें संन सोळाशें सत्याण्णवांत झालें. मग संन सोळाशें अ-
त्याण्णवांचे पहिल्या महिन्यांत जुल्फिकारखानानें जिंजीवर भिंतीला शिड्या लावून घेतलें. त्यांत राजारामाचीं चार कामुलें व मोठे मोठे सरदार सांपडले, त्यांतील तीं मुलें आणि चार यका नेर्थे कोणी शिरके कुळाचे गृहस्थ होते त्यांचे स्वाधीन केलीं. तीं त्यांणीं राजाराम जवळ पोंचविलीं. आणखी जे उरले थोर सरदार माणूस त्यांत कितीएक जन्मभरचे कैदेंत ठेविले, व कितीएक जिवें मारिले. कांकीं, आपणाविषयीं बादशाहाचे मनांत कित्येकांचा संशय आंलला गेला पाहिजे म्हणून. जे मारिले त्यांत प्रह्लाद निराजीचा पुत्र नागोप्रह्लाद होता. प्रह्लाद निराजी प्रतिनिधि तोसर आगोदरच मरण पावला होता.

९ राजाराम जिंजीहून गेल्यावे आगोदर पासूनच संताजी व धनाजी यांचें परस्परें वांकडें पडलें होतें. परंतु तें प्रकट सालें

राहीं. कार्की. पद्माद्दनिराजी होता तावत्काल पर्यंत त्याच्याम
नसलीत राजाराम कोणाचाही पक्षपात करीत नसे. मग तो
प्रतिनिधि मेल्यावर जे संताजीचे शत्रु होते त्यांच्या बुद्धीस ला-
गून राजारामानें धनाजीचा पक्ष धरिला. त्यावेळेस औरंगजे
बानें ही मराठे लोकांत वैमनस्य पडलेलें ऐकून आपल्या वकि
लांकडून त्यावैमनस्याची वृद्धि करविली. अशा निमित्तकरू
न संताजीच्या लश्करचे लोकही त्या संताजीवर प्रीति करीना-
त असे झाले. ते कोणे एके समयीं धनाजीच्या लोकांस मिळून
संताजीला धरून केदकरावें अशी मसलत करूं लागले, तेंसे
ताजीस कळलें, तेव्हां तो आपले विश्वासू लोक थोडके से ब-
रोबर घेऊन पळाला. तेवेळेस मराठ्यांच्या लश्कराचे दोनभा
ग झाले. त्यांतील एकभाग करनाटकांत जुल्फिकारखानाव
र गेला. आणि दुसरा साताऱ्यास गेला. तेथें राजाराम विशाल
गडावरून आला होता, त्याला रामचंद्रपंतानें मसलत दिली दो
नी कीं, साताऱ्याची राजधानी करावी. संताजी पळाला हें राजा
रामास समजलें, तेव्हां राजारामानें कांहीं लोक त्याचे पाठीस
लाविले.

१० अष्टप्रधानांतला अमात्य जनार्दनपंत हणमंत्या मे-
ला, तेव्हां त्याची पदवी रामचंद्रपंतास देऊन त्याचा मुख्य का
रभारी संकाजी नारायण होता त्याला सचिवपद दिलें. पहि
ला सचिव नानाजी मोंगलांनीं पहिल्यानें जिंजीस वेढा घातला
तेव्हांच आपला अधिकार टाकून काढीस गेला.

जनार्दनपंत हणमंत्या पहिला अमात्य, त्याचा पुत्र ति
माजी हणमंत्या तो जिंजीस मोंगलांचे केदेंत सांपडला हो

ता. तथापि कांही चातुर्यकर्मे युक्तीने पळाल्या ना राजरामास येऊन भेटला त्याच्या बापाच्या अगत्यास्तव आणि हाकोठाच तुरुंग होईल असें कल्पनेस आलें त्यामुळे ना त्यांनि धि केला.

११ मराठ्यांच्या लढाऊ गलबतांचा सरदार सिद्दी गुजर तो त्याच संधीस मरण पावला, तो जंजिऱ्याच्या सिद्दीचा नरनर लढत असे. त्याचा सावत्री कान्होजी आंग्रे त्याच्या हिंदुत्वामें गलबतदार कोणी लोक यांची कितीएक माठी मार्ग लाजेचे तली होती; आणखी मुंबई पासून मलबार लगत जाऊन कारवार पर्यंत गांवें लुटून बहुत द्रव्य मिळविलें तात्काळ सुवर्ण दुर्ग आणि विजयदुर्ग या दोहों ठिकाणी गडी, परंतु त्यांचें शिवाजीचे बळचें रहावयाचें मुख्य ठिकाण कुलाबा. त्याचें देशमुख सावंत ने समयविशेषें मोंगलांचा पक्ष स्वीकारून परंतु आंतून राजारामाकडेच असत कारवारचा देसाई, तो त्याचा पक्ष न धरितां स्वतंत्रपणें आपण राजा असें समजून होता

१२ संताजी घोरपड्याचे पाठीस लोक लागले असतां तो फा दिवस कोणाच्या हातीं सांपडला नाही. तेव्हां बहुतेक लोक दोघांचे ठायीं त्या यत्नाचा ओढ मग करूं लागले, परंतु एक नाना जीमा न्या नामें असत्व दुचा दगमृत्यु होता. तो आपल्याच हातें मुळें त्याची पाठ सोडीना. तेव्हां त्या संताजी कोणे एके दिवशीं एकतां पळतां फारशन पावून गाफील असेल अशा अटकळ करून एका ओढ्यांमध्यें स्नानास उतरला, ते समयीं नागो त्याने तो घातपात असतां गांठून त्याचे डोकें कापून आंग्रेजाच्या लष्करांत नेऊन बादशाही इनाम घेविलें तेव्हा आंग्रेजा बाई त्याची प्रशंसा करून सन्मान केला. याणि दा भा

पल्या चाकरीस ठेविला. संताजी अशा दुर्मरणानें मेल्याबरं कि तीएक जे त्याचे जुने चाकर पहिले त्याला सोडून राहिलेले होते ते पराक्रमाच्या योगानें क्रोधाविष्ट होऊन सर्व एकत्र मिळून त्याचे होते पुत्र रणोजी व पिराजी यांस घेऊन संताजीच्या कुळाचा झेंडा लाविला, आणि स्वतंत्रपणेंच मोंगलांच्या मुलखीं उपद्व करूं लागले.

१३ सन सोळाशें नव्याण्णवांत गजाराम साताऱ्यातून लष्कर घेऊन उत्तरेकडे जावया करितां निघाला. त्याला वाटेनें च खानदेश व गंगथडी व वराड या मुलखांतून उपद्व करीत राहिलेले जे मराठे सरदार लोक होते ते सर्व येऊन मिळाले. त्यांचीं नांवें, परसाजी भोंसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजीशिंदा, आदवले समशेरबहादर, वगैरे तेसारे जमून शिवाजीच्या वेळेचे सांगजाग माचें लष्कर मोठें झालें. मग ते गंगथडींत शिरून चौथ व सरदेशमुखी यांच्या अधिकारसंबंधें व मूल धरूं लागले. तेव्हां ज्या रयतेनें मान्य केलें त्या रयतेशीं व जे मोंगलाचे ताण करी शिबंदीवाले होते त्यांत ज्यांणीं तें मान्य केलें त्यांशीं त्यांणीं द्वेष केला नाही. वरकड जे कोणी मानीनात ते मारून टाकिले. त्या वेळेस त्या वसुलाचा बंदोबस्त शिवाजी प्रमाणें देविला होता तो असा. जेथें वसूल उगवला तेथें उगवून घेतला, जेथें दाम लागेना तेथचा करार नामा करून घेतला. या प्रमाणें नांदेर व वराड व खानदेश इतक्या जागीं केलें तें काम थोडकेंसें राहिलें असतां गजाराम तेथून माघारा पतला. तो वाटेनें येतांना त्यानें खानदेश मुलखींची खाकीरा हिलेली घ्यावया सरंजामी दाभाडा ठेविला. खानदेशांतली

बाकी घ्यावयास नेमाजी शिंदा, आणि वराडचे बाकी कांहीं परमाजी भोंसला, आणि गंगथंडीचेवाकी सार्दी हैबतराव निंबाळकर, असे ठेविले. त्यांत परसाजी भोंसल्याचें सेनासाहेब सुभा असें नांव ठेविलें. आणि हैबतराव निंबाळकर याचें मरलश्कर असें नांव ठेवून त्या दोघांस जरीपटक्याचीं निशाणें दिलीं. मग तेथून माघारें येत असतां वाटेनें जालनाशहरलु टूं लागला होता, इतक्यांत जुलफिकारखान करनाटकांतून अकस्मात् येऊन त्यावर पडला, त्याणें मोठ्या शौर्यें करून मराठे पिटून लाविले.

राजारामाच्या लश्करावर जुलफिकारखान अकस्मात् येऊन पडण्याचें मूळ असें, धनाजी जाधव करनाटकांत शिरून उपद्रव करूं लागला असतां त्यावर औरंगजेबानें मोठा सरदार ज्यास मराठ्यांचा फार भीत होते असा जुलफिकार-खान पाठविला, त्याणें कितीएकवेळां धनाजीचा पराभव केला. इतक्यांत खानदेशामध्यें राजारामानें बहुत उपद्रव केला असें वर्तमान औरंगजेबास कळलें तेव्हां त्याणें आपणाजवळ असलपुरीं जुलफिकारखानाला बोलाविलें. आणि आपला नातू आजिमशाहाचा पुत्र व तो जुलफिकारखान यांजबरोबर सैन्य देऊन मुलखान मराठ्यांच्या सांभाज्या फिरत होत्या त्यांच्या बंदोबस्तास पाठविले; आणि आपण किल्ले घ्यावयाचें काम भीकारलें. अशीं दोन लश्करें दोहींकडे निघालीं तेव्हां जुलफिकारखान जालन्यास जाऊन राजारामाशीं लढला, आणि औरंगजेबानें जाऊन वसंतगडास वेढा घातला. तेथें मोठे मोठे मोरचे लावून तिहीं दिवसांत किल्ला हस्तगत करू

न मोठ्या हर्षाने नेथून माताऱ्यास आला त्या किल्ल्यावर जे मराठे होते त्यांची अटकळ अशी होती की, बादशाह आपीं पन्हाळा किल्ला घ्यावयास जाईल, म्हणून नेथें अन्नाची मात्रा न महिन्याची बेगमी केली होती.

१५ ते समयीं औरंगजेबाने माताऱ्यास घेरा घातला. तो असा, उत्तरेचे आंगीं आपण उतरला. त्या जागीं आतांक जें गांव आहे, आजिमशाह पश्चिमेस उतरला, नेथें एक लहानसा गांव आहे त्याचें नांव तेथून शाहापूर असें पडलें; दक्षिणेस शिरजीरखान उतरला होता; आणि पूर्वेस नरसीयतूखान सरदार उतरला; अशी चहूं दिशांसि चार ठाणीं बसवून त्यांच्या मधून कोणाचेंही जाणें येणें नव्हतें म्हणून दुसऱ्या लहान लहान टोळ्या मध्यें मध्यें जागोजाग बसविल्या. नेसमयीं त्या किल्ल्यावर प्रयागजी नामें शिवाजीच्या पक्षाचा एक परभू असे. त्या किल्ल्याच्या डोंगराची उंची नेमकच आहे, परंतु वरून संभोंवता तीस तीस हात कडेचा एकसारिखा काळा दगड आहे. त्यावर तट्याचे बांधकाम उंच नाहीं. त्या किल्ल्याचा एक ईशानी दिशेचा कोंपरा सांबीस आणि उंचीस अंमळसा अधिक आहे, त्याचा आकार बुरुजासारिखा दिसतो, आणि सभोंवता तुटलेल्या कड्यापेक्षां त्या जागचा कडा ही अधिक तुटलेला दिसतो, त्या टोंकावर बुरुज बांधला आहे. तेंठिकाण किल्ल्याच्या साऱ्या बाजूंपेक्षां मोठें अवघड, असें असून नरसीयतूखानानें मनांत आणिलें की, हा कोंपरा सुरुंगाने उडवून पाडून वाट करीन. अशी त्याची योजना झाल्यावर गुढ्या उभारण्यास आरंभ होऊन साडेचार म

हिनें लोटले. तो प्रयागजी परभृ असा पराक्रमी होता की, मोगलांस एक पाऊल भर जागा आट पावाला महा प्रयास पडे, ज्या पुढें उपाय चालेना. कदाचित् मोंगल हल्ला करूं लाग लेनर तो आपले सारे लोक जमा करून मोठ मोठाले दगड किल्ल्याचे भिंतींवरून खालीं टाकी, त्या दगडांनीं तोफांपेक्षां त्यांचें काम अधिक होई. तो असा पराक्रमें करून लढत असतां ही आंतली बेगमी सरली, त्यणून किल्ला घावयास सिद्ध झाला, परंतु तेथून जवळच परली किल्ल्यावर परशुराम त्रिंबक होता, त्याणें आजिम शाहास कांहीं युक्तीनें वश करून त्या किल्ल्यावर अन्नादिक साहित्य पोंहचतें केलें. हें वर्तमान संनमत्रांच्या अरदरीस घडलें. तेसमयीं राजाराम सिंहगडीं दुर्वण्यांत पडला होता

तरचीय तूखान याणें नेमकेल्या प्रमाणें साडेचार महिन्यांत त्याईशानीच्या कोंपऱ्यावालीं दोन सुरुंग तयार केले, तेणें करून मोंगलांस असें वाटलें कीं, आतां निःसंशय कार्य सिद्धीस जाईल तो दमत्कार पहावयास औरंगजेब ही बसला होता, आणि त्या वेळा प्रमाणें तो कोंपरा उडाला त्रण जे त्वरित हल्ला करावया करितां लोक तयार करून डोंगरा च्या एकाबाजूस उभे करून बसविले होते. याशिवाय अशीकांहीं युक्ति केली होती कीं, त्या किल्ल्यावरचे लढून करून लोक औरंगजेबाची स्वारी पहावया करितां त्या बुरुजावर जमावे. त्या प्रमाणें तेही तसेच त्याठिकाणीं जमले. सात प्रयागजी ही आला होता. तेसमयीं मोंगलांनीं त्यांतल्या एका धाकट्या सुरुंगाला आग लावली, तो धमाका दारूच्या जोरानें त्याजागीं डोंगराएवढा गेला,

आणि त्या धक्क्यानें त्या आंगची वरली भिंत वरच आंतल्या आ
गीं पडून तिजखालीं सांपडून वरची माणसें चऊत मेलीं. इत
क्यांत ते हल्ला करून वर जावयास सिद्ध केलेले लोक कांहींसे
जवळ गेले, तों दुसऱ्या मोठ्या सुरुंगास आग घातली, तो सुरु
ग तयार करतांना कांहीं चेत चुकला होता. यास्तव त्याचा त
टवरचे आंगीं बुरजाकडे पोंहचला नाहीं, आणि मोठा भयंक
र शब्द होऊन बाहेरच्या आंगीं तो सुरुग मोंगलांकडे उडाला,
तेणेंकरून मोंगल दोन हजारां वर ही अधिक मेले गेले.

पहिल्यानें सुरुंगानें वरची भिंत पडली त्या वेळीं तो प्रयागजी
तेथेंच देवीच्या देवळा जवळ त्या भिंतीखालीं सांपडला, तेव्हां
त्याला तेथून खणून बाहेर काढिलें, त्याच्या आंगास कांहीं ला
गलें नव्हतें. आणि देवी जवळ होती म्हणून त्या सर्व मगल्या
नीं तो उत्तम शकुन मानून निश्चय केला कीं, आपणास दैव
अनुकूळ आहे, यास्तव मोंगलांस किल्ला द्यावयाचा नाहीं
इतकें झाल्यावर आजिमशाह पुनः सैन्य धान्यादि पोंचतें होऊं
देईना म्हणजे झाला. तेव्हां त्या आजिमशाहाचेच द्वारें किल्ला घ्या
असा मराठे लोकांचा विचार होऊन त्याच वर्षाच्या चवथ्या महि
न्यांत त्यांणीं मोंगलांस किल्ला दिला. तेव्हां औरंगजेब समजला
कीं, आजिमशाहाचे योगें किल्ला हस्तगत झाला, म्हणून बहुत
संतुष्ट होऊन त्याचा कांहीं मान केला, आणि किल्ल्याचें नाव आ
जिमतारा असें ठेविलें.

सातारा हस्तगत झाल्यावर औरंगजेबानें परळी किल्ल्या
स वेढा घातला. तेथेंच किल्लेकरी मोठ्या शौर्यानें दीड महिना लढ
दून शेवटीं किल्ला शत्रूकामा टाकून पळाले. ते समयीं पर्जन्यान

बद्दल उपद्रव केला नेहमीं मोंगलांनीं तात्काळ तोडोगगंचा मुलूख सोडिला, आणि ते माननदीच्या कांठीं कवासयुगमध्यें जाऊन राहिले.

१६ पूर्वी लिहिलें कीं, राजाराम सिंहगडीं दुखण्यास पडला, त्या दुखण्याचे कारण असें कीं, जालन्याहून जुल्फिकारखानाचे पाठीस लागला होता त्यामुळें त्याला गर्वदिवस पक्षावें लागलें, तेणेंकरून त्यास बहुत श्रम होऊन तो उरीं भरला होता, त्या विकारानें तेथेंच तो एका महिन्यानें मरण पावला. त्यानंतर एका महिन्यानें सातारा मोंगलांचे स्वाधीन झाला.

१७ राजाराम कांहीं सा शूर होता, त्यास मुलखी कारभारांत चातुर्य नव्हतें. त्याणें प्रल्हाद निराजीच्या साह्याणपणानें राज्य केलें. आणि संनाजीचा नाश केला हामात्र त्यापासून अधर्म घडला. एरवीं तो दयाळू आणि उदार होता. त्याच्या मरणाचें वर्तमान औरंगजेबाच्या लश्करांत कळलें तेव्हां त्या लोकांस असें वाटलें कीं, आतां मराठे सहज जिंकले जातील म्हणून त्यानें मोठा आनंद पावले, परंतु त्या आनंदाप्रमाणें तें त्यांस उपयोगीं झालें नाहीं. राजारामाचे दोन पुत्र होते, सांतवर्षांचा शिवाजी, तो राजाराम मेला तेव्हां दहा वर्षांचा होता. त्याची मातृश्री ताराबाई ती मोहित्यांची कन्या: धाकटा संभाजी, तो तीन वर्षांचा, त्याची माता राजसबाई, ती घाटगे यांची कन्या. रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण व धनाजी जाधव यांच्या विचारानें ताराबाईनें आपला पुत्र गादीवर बसवून राजसबाई बंदींत ठेविली.

शिवाजी हणमंत्या मोगलाच्या निगलखणून राजारामानें

तो प्रतिनिधि केला होता, परंतु तो तसा झाला नाही, म्हणून ताराबाईने तें पद परशुरामत्रिंबकास दिलें. त्यापुढें ताराबाई एकाच किल्ल्यांत निरंतर रहात नसे; असाच धनाजी जाधवही कधीं एकेजागीं राहिला नाहीं, आणि चोहींकडे स्वार पाठवून मुलखांत स्वाऱ्या घालीत असे. यास्तेरीज निंबाळकर व भोंसले वगैरे मोठे मोठे सरदार सर्वत्र चौथ व सरदेशमुखी व फौजेस घांस दाणा अशीं निमित्तें करून खंडणी घेत होते.

अशा रीतेनें प्रबळ होऊन दक्षिणेचा वसूल फार थोडा होऊं लागला, तो औरंगजेबाच्या लष्करास पुरेना, तेव्हां त्याणें कधीं कधीं फौजा पाठवून हिंदुस्थानांतून आपलें खासगी द्रव्य आणविलें, तेही कित्येक वेळां मराठ्यांनीं छापा घालून नेलें. तेव्हां मोंगल लोक आपल्या पहिल्या चालीप्रमाणें लढत नव्हते.

९८ यापुढें औरंगजेब वारल्यामुळें राज्याचे उपयोगीं नाहींसा झाला. त्याचा पुत्र तोही राज्यकारभारास योग्य नव्हता, त्यामुळें बादशाह निवर्तल्यावर राज्यकारणीं तत्पर असा नायनासे झाले. अशानें त्यांची आंतून शक्ति कमी झाली, व मराठे लोक पग नव पावतां पावतां युद्धांत निपुण झाले. यानिमित्तांनीही तें राज्य बुडूं लागलें होतें. त्यावेळेस जर मराठे लोक एकचित्त होऊन उत्तम प्रकारें प्रजा संरक्षणाचा विचार करते तर सर्वत्र त्यांचीच सत्ता झाली असती, परंतु ते तसे नाहीं. ते लोक लढाया लुटीच्या कामास मात्र

एकत्र मिळून मसलत करीत; आणखी त्यामध्यें मोंगलांस मिळावें यांत आपलें हित आहे, तो तिकडचा पक्ष स्वीकारी, त्यायोगें करून माव त्या लोकांचें कांहीं सें महत्व राहिलें होतें.

त्या काळीं मराठ्यांत कोणी स्वहिताविांचून प्रजेचें किंवा स्वामीचें हित पाहिलेंच नाहीं. तो प्रकार असा, मोंगलाचे पक्षाचे मराठे व ताराबाईच्या पक्षाचे मराठे या उभयतांची मार्गानें जात असतां जर कधीं गांठ पडली तर परस्परें मोठा सत्कार होऊन एकत्र भोजनें होत. आणखी इतकें जातीजातींत यद्दनें मुसलमान लोकांप्रमाणें (अल्हम्दिल्लाहे) असें म्हणत, आणि देवासही प्रार्थीत कीं, असा उपयोग जो औरंगजेब बादशाह तो बहुत दिवस वांचो

१९ औरंगजेबानें बहुतेक मोठे मोठे किल्ले घेतल्यावर तो किती एक महिने जुन्नरास राहिला होता. मग पूर्वीस मराठ्यांनीं अनादंगा केला कीं, ज्याचा कर्नाटकापर्यंत उपद्रव लागेल म्हणून त्यांच्या निवारणार्थ तो लष्कर सुद्धां तेथून निघून विजापुरीं गेला. तेसमयीं साजबंगबर त्याचा आवडता कामबक्ष नामा पुत्र होता त्यानें इच्छा अशी होती कीं, आपण स्वतंत्रपणें दिल्लीपुरचें राज्य करावें. याद्दनमुळें त्याणें औरंगजेबास मसलत दिली कीं, मराठ्यांचा मुलूख असावा. मग धनाजी जाधवाच्या द्वारें तें सल्ल्याचें बोलणें लाविलें, त्यायोगें बेस दक्षिणेच्या सहा सुभ्यांतील वसुलापैकीं दहावा भाग चौथ व सरदेशमुखी या संबंधें मराठ्यांस औरंगजेब देणार होता, परंतु तेसमयीं धनाजी जवळ मराठे लोक फार जमले अ

सत. [illegible] प्रबळ असें जाणून बादशाहा पाशीं त्याचे हीज आणखी कांहीं मागूं लागले, तेव्हां त्यांनें जाणलें कीं, मराठ्यांची मसलत दगा करावयाची असेल, म्हणून पहिलें मनुष्याचें बोलणें करावयास पाठविलेले जे वकील ते मायाने बोलावून नेले, मग तें मुर्दकाम तसेंच राहिलें.

इकडे करनाटकांत लुटालूट करून शहाजी प्रबळ, आणि त्याचा मराठे लोकांशीं अत्यंत स्नेह असे, यास्तव औरंगजेबानें विजापूर सोडून लष्कर घेऊन तिकडे स्वारी केली. तो जरी विशेष मजबूद नव्हता, त्यास भुईकोट मात्र होता, तथापि त्या नाईकानें औरंगजेबाचा कांहीं उपाय चालूं दिला नाहीं. बाहेरून धनाजी जाधव लोंगलोंस चैन पडूं देईना सा झाला, तेव्हां औरंगजेब बादशा हयांनें जुलफिकारखान वगैरे आपले मोठे मोठे सरदार बोलावून नव्हे तयास मोडिला, ते समयीं तो नाईक किल्लारिकामा टाकून पळाला.

२० इतक्यांत नगरयांनीं देशामध्यें बरीच उपद्रव केला, तो अमात्य रामचंद्रपंतानें पन्हाळा किल्ला व पवनगड घेतला, आणि परशुराम त्रिंबक यानें जसंतगड व सातारा घेतला ते कांतागबाई पन्हाळ्यावर आपणास रहावयाची जागा करून देत नाहीं, त्यामुळे रामचंद्रपंता विषयीं सु

+ त्या वेळेस मोंगल लोक आपल्या नशेंत कधीं घोडा पाणी यावयास नेला असतां तो पाणी न पिईतर थेट नेतां त्यास लाथ मारीत कीं, तूं पाणी कांपी तना ही मम, तुला धनाजी पाण्यांत दिसला किंकाय? ते लोक इतके धनाजीचें भय बाळगीत होते.

समजल्यानें [illegible] किल्ले मराठ्यांनीं घेतले म्हणजे त्यांत त्यांचा फायदा झाला, पहिला मावळ लोकांची कारकुनीकेली आनाजी पंतनामें एक ब्राह्मण होता, तो मोंगलांनीं जिंजी घेतली तेव्हां तेथें बंदींत सांपडला असतां कांहीं युक्तीनें तेथून पळाला. त्याला वाटेनें मोंगलांचे लोक सांपडण्याचे वगैरे संकट न होतां तो भेटले. त्यांत त्यांणें कांहीं गोष्टी मात्र न कांहीं गाणें गाऊन लोकांचीं मनें वश केलीं. तेणेंकरून त्यांणीं त्याला आपल्या बरोबर नेऊन त्यास राहायाला जागा सांपडण्यावर दिली, तो तेथें राहिला [illegible] मोक्या युक्तीनें मावळे लोक वर घेऊन मग तेथले सर्व मोंगल मारून टाकिले.

या पुढें सिंहगड वगैरे जंजीरा वगैरे कितीएक किल्ले मराठ्यांनीं मोंगलांकडून घेतले, तो दिलेर विरोध लिहावा असा नाहीं. त्या समयीं औरंगजेब मरण पावला हें जाणें मोठें मरण झालें.

२१ तो औरंगजेब फारच वृद्ध झाला आणि त्याचा मुलगा मुअज्जम याच्या हातीं किल्ले लागले तेणेंकरून मराठे मनस्वी झाले. यास व बादशाह मनांत धरून खिन्न होऊन मनसबदारांसुद्धां तो माघारा अहंमदनगरीं आला, आणि पूर्वी वीस वर्षांचे पाठीमागें मोठ्या थाटानें ज्या जागीं उतरला होता त्याच जागीं डेरा दिला, परंतु ते समयीं तें माहात्म्य नव्हतें. तो तेथें त्या डेऱ्यामध्ये दहा

+ औरंगजेब लष्कर सुद्धां अहंमदनगरीं आला तेव्हां मराठ्यांनीं त्याच्या वाटेस गांठलें, तेव्हां त्यांचें व याचें युद्ध झालें. ते समयीं मोंगलांस युद्ध करतां करतां दम धरवेनासा झाला, तेव्हां ते लढतां लढतांच तेथून पळ काढून अहंमदनगरीं गेले. तेव्हां मराठे अगदी थकले होते.

च आपल्या जवळच्या लोकांशीं बोलिला कीं, या भूतळावर माझें जें हिंडणें होतें तें आज संपलें, याच जागीं माझा मृत्यु जगदीशानें नेमिला आहे. मग पुढें थोडकेच दिवसांनीं सनसत्रावीं सालाच्या दुसऱ्या महिन्याचे एकविसावे तारिखेस तो तेथेंच मृत्यु पावला. जर कोणी म्हणेल कीं, औरंगजेबाचे गुण व स्वभाव कसे होते तर त्याणें समजावें कीं, तो मोठा चतुर असून पापास भीत नसे. ज्याचें अर्थीचि लक्ष्य होतें, ज्याणें परमार्थी चित्त ठेविलेंच नाहीं. ज्याणें आपला लोभीपणा साधण्या योगानें छुपविला. अमाजो तो प्रथम राज्य करूं लागला तेव्हां त्याची राज्यकारभारा विषयीं दक्षता व त्याची विद्या व ज्ञान व परिपूर्ण संपत्ति असून ज्याचें स्वयें निरिक्षण असतें वा गणें इत्यादि त्याचे गुण पाहून त्या वेळचे लोक त्याला बहुत मानीत होते पुढें त्याणें नीतवर्तणूक टाकिली तरी त्याच्या पहिल्या आचरणाचें स्मरण लोकांस होते त्यामुळून त्याचा शेवट पर्यंत लोकांत मान राहिला. त्याणें शहाणपणें करून विजापूरकर व गोवळकोंडेकर या दोघांचे बळानें दक्षीतली बंडें मोडादीं तेणेकरून हिंदुस्थानचें राज्य बुडविलीं, तेणें करून बंडें प्रबळ झालीं. हा त्या पासून राजनीती विषयीं मोठा प्रमाद घडला

औरंगजेब निवर्तला तेसमयीं त्याचे पुत्र तिघे होते. एक सुलतान माजूम, एक आजिमुशाह, एक कामबक्ष, त्यांतला सुलतान माजूम उत्तरेकडे काबुल मुलखीं अधिकार करीत होता; आजिमुशाह बापानें त्याचे पूर्वी त्या जवळ येऊन राहिला होता; आणि तेसमयीं कामबक्ष बादशाहानें विजापुरीं पाठविला होता. मग बादशाह मरणपावला त्या समयीं आजिमशा-

.....नं.....
.....

हजर व्हा होता. यास्तव बादशाहाचें तें सारें सैन्य त्याचे स्वाधीन
जहालें. जुलफिकारखानानर मुलखांत उपद्रव करणारे जे ध-
नाजी वगैरे मराठे त्यांच्या पाठीस लागला असे. तो औरंगजेब
मेल्या वर्तमान एकनांद तत्काळ त्यांस सोडून आजिमशाहा
मजाऊन मिळाला

भागबाराबा

संनसत्राशें लागापासून संनसत्राशें चौऱ्यांसपर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ पूर्वी मोंगलांनीं रायगड घेतला तेसमयीं तेथें संभाजी
चा पुत्र व स्त्री सांपडलीं नीं त्यांणीं बादशाहाकडे नेलीं, असें मा
गं लिहिलें. तीं उभयतां औरंगजेबानें आपल्या कुटुंबाच्या मा
णसांन ठेविलीं. सांवर बादशाहाची कन्या बेगम साहेब अत्यं
त प्रीति करूं लागली, आणि त्या पुत्राला मारावेळ आपल्याज
वळ बाळगीत असे. तेणें औरंगजेब येई तेव्हां त्या मुलास
पाहून बहुत संतुष्ट होत्साता त्याच्या बापाचा वैरभाव मनां
त आणून त्याला सादाच्या नांवें शाहू म्हणून हांक मारी.
मग तो मोठा झाला तरी त्याणें आपलें तेंच नांव चालविलें. पु-
ढें औरंगजेबानें त्या मुलाची दोन लग्नें केलीं. तो एक संबं
धिंदेकरच्या जाधवाचे कन्येशीं, दुसरा कणेरखेडचे पाटील
घिंदेयांची कन्या निशीं. मग बादशाहानें उभयतां जाधव व
पाटील यांचा संमान करून नवदीस चढविले. शाहू यास

अक्कलकोट व इंदापूर व नेवासें व सुपें हीं जहागीर कन्या दिल्ीं. या शिवाय आपल्याकमरेची एक तरवार व दुसऱ्या दोन तरवारा दिल्या; त्यांत एक शिवाजी जवळ भवानी नामें पहिली तरवार होती ती,व दुसरी आपसुलखानाची शिवाजी नें त्यास द्ग्यानें मारून घेतलेली, या दोन्ही रायगडीं सांपडल्या होत्या, अशा तीन झाल्या, त्या अद्यापि साताऱ्याच्या राजा जवळ आहेत. पुढें औरंगजेब बादशाह मरण पावल्यावर त्याचा पुत्र आज़िमशाह, सुलतानमाजूम नामा आपला भाऊ याचीं युद्ध करावयास जात होता तेव्हां त्या आजिमशाहानें त्या शाहूला आपल्या बरोबर नर्मदेच्या उत्तरेस नेलें.

मोंगलांचें लश्कर देशांतून उठून गेलें तें ताराबाई व तिचे अष्टप्रधान यांस मोठें हितावह झालें. तें असें, पुण्याचा फौजदार दाऊदखान त्यास धनाजी जाधवानें जिंकून त्या पासून चाकण किल्ला घेतला, आणि जे इतर मराठे सरदार होते ते मोंगलांच्या मुलखीं उपद्रव करीतच होते. हें वर्तमान आजिमशाहास कळलें, तेव्हां त्यानें ज़ुलफिकारखानाच्या मसलतीनें दंगा न व्हावा अशा बेतानें शाहूची आई व भाऊ व बायका यांस जामिनकीस ठेऊन घेऊन शाहूस सोडिलें. त्या वेळेस त्यानें बादशाहा जवळ कबूल केलें कीं, जर मी राज्यपदवी पावलों तर तुमच्या आज्ञेंत वागेन, यावरून आजिमशाह ही बोलिला कीं, तूं जर तमा बागलास तर तुझ्या बापानें घेतलेला विजापुर चा मुलूख तो व भीमा आणि गोदावरी या दोहोंमध्यें जितका मुलूख आहे त्यांतील कांहीं तुला देईन, असा नेम ठरवून आजिमशाहानें शाहूला निरोप दिला.

२ तो शाहू नेपून मुक्त झाला, नतर त्याने सात मराठे सरदार बराड व खानदेश यांत अधिकारी होते त्यांस निरोप पाठविला कीं, मी तुमाकडे येतों,तुमी मला अनुकूळ व्हावें. असें त्याचें सांगणें जातांच ते येऊन शाहूला भेटले, तेव्हां त्या णें ते बडा करून घेतले. यानंतर हैबतराव निंबाळकर व ने-माजी शिंदा वगैरे कितीएक मराठे सरदार त्यास नसेच अनुकूळ झाले. मग शाहूनें ताराबाईला पत्र लिहिलें कीं, मी आपल्या जागीं येतों, माझें पद माझे स्वाधीन करावें. तेव्हां ताराबाईच्या मनांत त्यास तें पद द्यावेंसें नव्हतें, म्हणून ती म्हणे कीं, हा शाहू नव्हे, हा कोणी तोतया असेल; आणि तिणें आपले अष्टप्रधान मिळवून त्यां पासून शपथ करविली कीं, आम्ही तुम्हा पुत्राचा पक्ष स्वीकारूं. इकडे शाहूच्या मनांत अगोदरअसें होतें कीं,ताराबाईनें हा शाहू नव्हे असेंजें ठरविलें आहे तेंलोकांच्या मनांतील जावया करितां कांहीं दिवस गोदावरीच्या कांठीं राहून आपण शाहू खरा असें लोकांस कळवावें,परंतु त्याजवळ पंधरा हजार फौज जमली यास्तव तो युद्धासच निघाला. तिकडून ताराबाईकडचे प्रतिनिधि व धनाजी जाधव दोघेजण सैन्य घेऊन निघाले, तेवेळस रयतेचें चित्त ताराबाईकडेसच होतें. या करितां शाहूचें लश्कर वाटेनें येत असतां कोणे एके गांवींत्या वर नेथचे गांवकरी यांणीं तोफांचे बार केले, तेव्हां तो गांव त्याणें लढून घेतला. तें युद्ध होत असतां त्या गांवांतून कोणीएक बायको आपला मूल कडेवर घेऊन बाहेर निघाली ती शाहूचे समोर जाऊन त्यापुढें मूल वेवून बोलिली कीं, मी हा आपला मूल तुमच्या सेवेस अर्पिला. तो शाहूनें घेऊन त्या जागीं आपणास प्रथम जय मास

झाला म्हणून त्यांमुलाचें नाव फत्तेसिंग ठेविलें, आणि त्या स भोंसले असें आपलें उपनाव दिलें. नंतर सोय अक्कलकोटचा राजा केला. तो फत्तेसिंग अक्कलकोटकर भोंसले यांचा मूळ पुरुष होय.

२. शाहूचें व ताराबाईचें लढकर यांची एकत्र गाठ पडतांच शाहूचें व धनाजीचें कांहीं बोलणें होऊन असा निश्चय ठरला कीं, समय विशेषीं धनाजी शाहूचा पक्ष स्वीकारील. मग त्या दोहोंसैन्यांची पुण्याचे उत्तरेकडे पंधरा कोसांवर लढाई झाली. त्यांत प्रतिनिधि होता त्याणें पाहिलें कीं, धनाजी तलक्षी झाला, तेव्हां तो आपले लोक एकीकडे निराळे जमवून साताऱ्याकडे पळाला. मग शाहू व धनाजी मिळून त्यांनीं चंदन व वंदन हे दोघे किल्ले घेतले. तेथें ताराबाईकडच्या कितीएकां सरदारांचीं मुलें माणसें सांपडलीं तीं त्याणें बंदींत ठेविलीं. नंतर पुढें जाऊन सातारा किल्ला घेतला. तो असा, तेथें एक मुसलमान सरदार होता त्याणें युद्ध न करितां तेथचा अधिकारी ब्राह्मण असे त्यास केद करून किल्ला त्यास दिला हें वर्तमान समजतांच आठांन घडलें. तो शाहू सातारा ज्यास पांचवतांच त्याणें आपली गादी स्वीकारिली, आणि आपणास मराठ्यांचा राजा म्हणवूं लागला. आणखी त्याणें गंगाधर प्रल्हाद यास प्रतिनिधि करून बाळाजी पंत पिंगळा पेशवा केला. सेनापति धनाजी जाधव होताच, त्याला मोंतीतील वसूल जमा करावयाचें काम सांगितलें. त्यावेळस दंग्या मुळें मुलखाची लावणी

---

† या मुलाचें पहिलें नांव काय होतें हें

नीट झाली नव्हती ऐकून जेथें सांपडे तेथें कांहीं पैत, भ
रवसूल उत्पन्न होईना. त्याकामावर धनाजीनें दोन कार
कून ठेविले, एक आबाजी पुरंद्या सासवडचा कुळकरर्णी,
दुसरा श्रीवर्धनचा कुळकरर्णी त्याचें नाव बाळाजी विश्वना
थ भट, तोच पुढें पेशवा झाला. तें श्रीवर्धन चौल प्रांतीं आ
हे.

४ इकडे मोंगलांकडे काय काय वर्तमान झालें ते प्रक
रण असें, सुलतान माजूम व आजिमशाह हे दोघे आग्र्याज-
वळ लढले, त्या युद्धांत सुलतान माजूम जय पावला, आणि
आजीमशाह व त्याचे दोन पुत्र व कितीएक मोठे मोठे सरदा
र मरण पावले. कामबक्षतर बादशाह मेल्यावर आपणा
स आपणच बादशाह ह्मणवूं लागला. तेव्हां मोंगल व कि
तीएक मराठे लोक ही त्यास अनुकूल होते, परंतु त्याची वृ
त्ति ठीक नाहीं असें पाहून त्या लोकांनी पुढें त्याचा पक्ष सोडि
ला. सुलतान माजूम तर जय पावला असतांही उत्साहवंत
न होतां मोठ्या भित्रेपणानें दक्षिण जिंकावयास निघाला. तो
आपला भाऊ कामबक्ष यास विजापूर व हैदराबाद या दोहों
संस्थानाची बादशाही देणार होता, परंतु तो तें कांहीं ऐकेना.
आणि युद्धास सिद्ध झाला. तेव्हां सुलतानानें त्यावर जुल्फिका
रखान पाठविला. तो व कामबक्ष उभयतां हैदराबादेजवळ
लढले, त्या युद्धांत कामबक्ष मेला.

तो जुल्फिकारखान आग्र्याजवळचे लढाईंत आजीम
शाह याच्या लष्करांत होता, त्याणें त्या वेळेस मोठें शौर्य केलें.
शेवटीं आजीमशाहाचा अगदीं नाश झाला तेव्हां तो युद्ध या

न मिळून गेला, त्यावरून नग सुलतानमाजुमानें त्याला बोला
वून आणून सर्वदक्षिणेचा अधिकार त्यास दिला, आणि
मीर उल् अमराव असें त्याचें नवें नाव केलें. असा त्यास सु
लतान प्रसन्न झाला त्रणून तो सुलतान माजुमा कडचा झा
ला, तो जुलफिकारखान हैदरा बादचे लढाईस गेला तेसम
यीं शाहु राजानें त्याचे कुमकेस फौज पाठविली. तो ही शाहू
चें इष्ट चिंतीत असे. त्याणें बादशाहास असें समजाविलें कीं,
जर तुळी शाहूला अनुकूळ झालतर तो आपल्या प्रजे मध्यें
मान्य होईल, तेणें करून आपलें हितच घडेल. त्यावरून
बादशाह शाहूला दक्षिणेच्या सरदेशमुखीची सनद द्यावयास
सिद्ध झाला. मराठे पहिले सरदेशमुखी बळेंच करीत होते,
परंतु जुलफिकारखानाच्या बोलण्यावरून बादशाह शाहू-
ला त्या अधिकाराची सनद देत होता, तेव्हां ताराबाईच्या वकि
लांनीं बादशाहाच्या वजिरास समजाविलें कीं, ताराबाईचा
पुत्र मुख्य धणी, यास्तव सुलतानानें ताराबाईचा पुत्र शिवा-
जी याचे नावें सनद तयार मात्र केली, आणि असा नेम केला
कीं, दूर्त सनद द्यावयाची नाहीं, उभयतां लढून जो मुख्य ठरेल
त्यास देऊं.

त्याच वर्षी पर्जन्यकाळीं शाहूनें ताराबाईशीं युद्ध कराव
यास चंदन व वंदन येथें लश्कर तयार करून ठेविलें. मग द
सरा झाल्यावर लढाईची सिद्धता केली, तोंच प्रथम पन्हाळा व
विशाळगड हे दोन्ही किल्ले शाहूच्या स्वाधीन झाले. मग तो रं
गणा किल्ला घ्यावयास गेला, तेथें ताराबाई होती ती शाहू जवळ
आला असें समजून तेथून पळून मालवणास गेली. तिच्या

पाठीं जाणें अथवा किल्ले करी रांगणा किल्ला देईना, यगून युद्धाचा उद्योग मांडिला तोही सिद्धीस जाईना. कांकीं, तो किल्ले करी मोठा शूर होता आणि पर्जन्यकाळ ही पुढें समीप आला होता या करितां शाहू तेथून निघून कोल्हापुरीं गेला. त्यावर पांऊस काळ गेल्यानंतर पुनः तो उपक्रम निघाला होता, परंतु मोंगलांच्या कांहीं सांगण्यावरून त्याला ताराबाईस जिंकणें आवश्यक नव्हतें. त्या बोलण्याचा प्रकार असा, त्या समयीं सुलतानमाजूम माघारा हिंदुस्थानांत गेला व त्याजबरोबर जुलफिकारखान ही जावयास निघाला, त्या समयीं त्याणें आपल्या अधिकारावर दाउदखान पनी नामें दुसरा एक मुसलमान ठेवून त्याला दक्षिणेचा सर्व अधिकार देऊन त्या खेरीज बहाणपुरचा ही अधिकार दिला. आणि शाहूच्या पक्षीचे जे मराठे त्यांस सांगितले कीं, तुह्मास दाउदखान प्रतिवर्षी वसुला पैकी चतुर्थांश देत जाईल. त्यावरून अर्थात् ताराबाईचें स्वामित्वना हीं असें सिद्ध झालें म्हणून शाहू समजला.

५ नंतर संवत्सरांनवांच्या समाप्तीस शाहू कोल्हापूर सोडून माघारा साताऱ्यास आला. मग त्याणें आपणास दोन बायका केल्या, एक शिरके यांच्या कुळाची व दुसरी मोहित्यांची. त्याच्या पहिल्या दोघी स्त्रिया दिल्लींतच होत्या. मग पुढें थोड्या दिवसांत त्यांतली एक शिंद्यांची कन्या होती ती मेली. पेशवा नाजीजाधव यास फार दिवस बरें वाटेनासें होऊन कोल्हापुरा हून माघारा साताऱ्यास येत होता तो वाटेनें वारणेचे कांठीं त्याच वेळेसच मृत्यु पावला. त्याजबरोबर बाळाजी विश्वनाथ श्री वर्धनकर होता, तो त्याच्या शरीरास बरें नाहीं में होतांच त्या

चा सर्व अधिकार आपण सभाळू लागला. नेक्को धनाजीचा पु त्र चंद्रसेन जाधव व कितीएक त्याचे पदरचे ब्राह्मण ते न्या विषयीं द्वेष करूं लागले.

६, तो शाहू कोल्हापूर सोडून साताऱ्यास येतांच पन्हा- व्याच्या हवालदाराशीं व ताराबाईकडील मनुष्याशीं कांहीं बोलणें झालें त्यावरून आणि पुंडे सावंत याच्या साहाय्यें करू न ताराबाई मालवणाहून निघून पन्ह्यास आली. ती तेथंये ऊन पोंहचतांच त्या हवालदारानें किल्ला तिच्या स्वाधीन केला मग ती माघारी मालवणास न जातां कोल्हापूरच आपलें संस्थान करून तेथें राहिली. ते समयीं रामचंद्रपंत व शंक राजी नारायण हे दोघे तिच्या पक्षाचे होते. त्यांन शंकराजी ना रायण कासचिव, त्याच्या मुलखांत शिवाजी प्रथम राज्य करूं लागला म्हणून मराठेलोक यांस अरेंवाटे कीं, हें आपल्या रा ज्याच्या आरंभाचें मूळ ठिकाण होय. यास्तव शाहूला ही ना मुलूख घ्यावयाचें काम आधीं करावें लागलें. या करितां त्या नें पुण्याहून लश्कर पाठवून पहिल्यानें राजगड घेतला. त्याशि वाय जे त्यांचे दुसरे किल्ले राहिले होते त्यांतून सामान फार भरलेलें होतें, आणि शिबंदी ही मावळे लोक बहुत असत, म्हणून ते असाध्यसे समजून नें काम टाकिलें. असें असतांशा हूला कोणी वर्तमान कळविलें कीं, सचिवपंतानें ताराबाईचा प क्ष स्वीकारून म्हणून शपत वाहिली, तेणें करून सचिवपंता स मोठा पश्चात्ताप होऊन त्यानें संन्यास करून जलसमाधि घे तली. हें वर्तमान संनसबाशें दोनशेंच्या पहिल्या महिन्यांत घड लें. त्याच महिन्यांत ताराबाईचा पुत्र शिवाजी यास देवी येऊन

तो मेला. तेव्हां रामचंद्रपंत ताराबाईला राज्यकारभारांतून काढून राजसबाईचा पुत्र संभाजी यास शिवाजीचे जागीं स्थापून मोठ्या दक्षतेनें आपण कारभार करूं लागला

सचिवपंत मेला तें शाहूस हर्षास्पद होऊन करवीरचा तील ताराबाई वगैरे यास विघ्न झालें. शाहूनें चतुरपणा नें आपला भलेपणा व धनीपणा लोकांत प्रकट करावा करितां तेवेळेस नारोशंकर नामें त्यासचिवाचा पुत्र देऊन वर्ष चा असतां त्याच्या नावें सचिवपणाची वस्त्रे पाठवून कारभाऱ्याचे हातून तें काम घेऊं लागला.

त्याच्या अशा आचरणानें सचिव आजेंत वागूं ला, परंतु प्रतिनिधि वागेना. तो वश झाला पाहिजे म्हणून ह्यानें उद्योग केला तो असा, त्याणें अगोदर परशुराम त्रिंब प्रतिनिधि याला कैदेंतून सोडिलें ,नंतर आपला प्रतिनिधि गदाधरपंडित यास दूर करून त्याचे जागीं त्या परशुरामत्रिंबकास नेमीत असतां त्याणें त्या अधिकारीं आपला पुत्र दे जिला. त्याणें विशाळगडीं जाऊन त्याचा मागमुलाजा चे हातीं लागतांच ताराबाईचा पक्ष स्वीकारिला. तेव्हां त्रिं णें तो कोल्हापुरचा प्रतिनिधि केला. असें होतांच शाहूनें मजल्याकीं, हें कृत्रिम परशुरामत्रिंबकाचेंच असेल. याकरितां त्यासपुनः कैदेंतठेवून जिवानिशीं मारावे असें शाहूच्या मनांत होतें, परंतु त्याजवळचे कारभारी यांणीं त्यास असें न जाविलें कीं, जर तुम्हीं यास मारालतर लोकांचें मन तुमच्यावरून उतरेल, त्यासजरी त्याचा अन्याय अमलातरी नमारावे इत्यर्थ शाहूच्या विचारास येऊन त्यास कैदेंत ठेविलें

७ दिल्लीच्या दरबारांत कांहीं प्रकरणीं व्यलय आला म्हणून गाउदखानाला दक्षिणेचा अधिकार ठाकून गुजराथेंत पाठविलें. यास्तव मोंगल व मराठे यांचा तह होऊन मोगल मराठ्यांस चौथ व सरदेशमुखी या संबंधें जें दृत होते त्यांतही कांहीं अंतर पडलें, म्हणून शाहूनें चंद्रसेन जाधवसे नापतिपास मोंगलांच्या मुलखांतून तो चौथ व सरदेशमुखी व घांदणा संबंधें ऐवज जमा करून आणावया करितां फौ ज देऊन पाठविलें. त्याबरोबर त्याच्या बापाचा कारकून बा ळाजी विश्वनाथ तो देखरेख करावयास दिला. त्या दोघांचेंही मनस्वी बुद्धीनांजीला समाधान नाहींसें झालें तेव्हांपासूनच पडलें होतें, मग या चौकशीच्या निमित्तें करून फारच द्वेष वाढला. नंतर कांहीं एके दिवशीं बाळाजी विश्वनाथाचे स्वा र हरण्याचे पाठीस लागले असतां त्यांशीं जाधवाच्या स्वारांचा कांहीं कलह उत्पन्न होऊन जो त्यांचा द्वेष गुप्त होता तो प्रकट झाला. तेव्हां बाळाजी विश्वनाथ आपला जीव रक्षावया क [illegible] नासवडांत सचिवाचा कारभारी होता त्याज [illegible] त्याचें बहुत आर्जव करून पुरंदर किल्ल्यावर आ [illegible] आश्रय मागूं लागला, त्यानें जाधवाच्या भयेंकरून त्यास किल्ल्यावर चढूं दिलें नाहीं. त्यावेळेस त्याचे पाठीस लागलेले जा धवाचे स्वार ही त्याचे दृष्टीस पडले. तेव्हां तो बाळाजी विश्वना थ व त्याचे दोघे पुत्र बाजीराव आणि चिमणाजी व थोडकेसे लोक त्याबरोबर होते ते समूरच्या खोऱ्यांत पांडवगड आहे त्या ठिकाणीं जावयाचा विचार करून कांहींसे तिकडे गेले, तेथेंही जाधवाचे लोक त्याचा शोध करीत होते तेव्हां त्यास उमग

ले. मग थोड्के दिवस कुठेंतरी दडून राहिले. त्यांत एक गो जी जाधव, एक दुमाल नामा असे दोघे मराठे होते, त्यांणीं कबूल केलें कीं, आम्ही आपल्या भावा बंदांकडे कांहीं शिपाई जमा करून आणून तुम्हाला पांडव गडास पोंहचवून देऊं, आणि प्रसंग पडल्यास या कार्यी करितां मरून जाऊं, अशी शपथ दिली. नंतर त्यांणीं त्या प्रमाणें लोक मिळविले, आणि बाळाजी विश्वनाथास घोड्यावर नीट बसतां येतनव्हतें असें असतां ही त्यास घोड्यावर बसवून दोहीं बाजूनें माणसां करून. रवून जाधवांच्या लोकांशीं वाटेनें लढत लढत त्याला पांडव गडीं पोंहचविलें. तेथें किल्लेकरी होता त्याणें शाहूचे आज्ञेस्त व तो संरक्षिला. तेव्हां चंद्रसेन जाधव याणें त्या किल्लेकऱ्यास कार निकडुलाविली कीं, याला लवकर माझे स्वाधीन करा, नाहींतर मी शाहूचा पक्ष धरीन. तेव्हां शाहूनें हैबतराव निंबाळकर सरलश्कर अहंमदनगरीं होता त्याला साताऱ्यास बोलाविलें, आणि पांडवगडास लिहून पाठविलें कीं, बाळाजी विश्वनाथाला जाधवाचे हातीं देऊं नये. नंतर जाधवास कळलेकीं, हैबतरावफलटनास येऊन पोंहचला, तेव्हां तो पांडवगड सोडून देउरास गेला. तेथें हैबतराव निंबाळकर आणि चंद्रसेन जाधव या उभयतांच्या लश्करांची गांठ पडून मोठें युद्ध झालें, त्यांत जाधव पराभव पावला, तो कोल्हापुरास गेला. त्याजबरोबर सरजेराव घाटगा होता, त्याचे वडिलांचे वेळेचें कांहीं वतन कागल मांतीं होतें त्या विषयीं सनद गजसबाईचा पुत्र संभाजी याणें त्या वेळेस दिली. त्यामुळें घाटगे व जाधव उभयतां मिळून चेनकुलिचरवान नामें दक्षिणेचा

न वा अधिकारी झाला होता त्याचे भेटीस निघून गेले. त्या णें जाधवाचा मान केला, आणि आपल्या चाकरीस राहाव यास सांगितलें. तें त्याणें मान्य केलें म्हणून त्याचे जवळ च्या लोकांच्या पोषणार्थ वाळकी शहर संबंधें मोठा मु ल्यवान जहागीर करून दिला. या प्रमाणें संनसवाशें तेरा न घडलें.

८ ते वेळेस मोंगलांतजें वर्तमान झालें त्याचा प्रकार असा. सुलतान माजूम संनसवाशें बारांत मेला तेव्हां त्या त्काच्या आधिपत्याविषयीं त्याचे पुत्र भांडूं लागले. त्यांत को णाच्ही तें प्राप्त न होतां नयें दोघे सैयद होते ते मोठे शूरअ मत, एकाचें नाव आबदुल्रखान, एकाचें कुमेन अल्लीखान,त्यां पैकीं सुलतान माजुमाचा नातू (पुत्राचापुत्र) फरुकशेर होता तो तक्काधिपति केला. त्याच कलहांत जुल्फिकारखान याचें डोकें मारलें गेलें. नंतर दक्षिणेचा अधिकारी दाउदखा न याची बदली होऊन त्या जागीं चेनकुलिचखान याची यो जना झाली. त्यांत विशेष हाच कीं, तो चेनकुलिचखान दक्षि णेच्या अधिकारीं मोठाविख्यात झाला. तोच हैदराबादचा त क्काधिपतींचा मूलपुरुष. तो मोठ्या पदवीस चढला तो असा, त्याचा बाप गाजीवर्दीन नामा, त्याचे पूर्वीचें नाव मीरकम र अर्दान, तो नरुण होता तेव्हांच औरंगजेबानें चेनकुलिचखान असें त्याचें नवें नाव ठेवून त्याला पांचां हजारी स्वारांची मनसब, आणि विजापूरची सुभेदारी दिली. पुढें औरंगजेब मेल्यावर फ रुकशेरच्या स्थापनाविषयीं त्या सैयदांची कुलिचखानानें मद त केली. त्याचा आणि जुल्फिकारखानाचा द्वेष होता, त्यणून

फेरु कृशोर याणें हा आपला हितकर्ता असें जाणून त्याला जुल्फिकारखानाचा अधिकार दिला, आणि त्याच्या नावा स निजामउल मुलुख असें पद जोडिलें. याचरून असें दि सतें कीं, एकाचा द्वेष करणारे असे जे दोघे ते परस्परें एकमें काचे मित्र होतात. याप्रमाणें गरीब व संपन्न यांची रीति न्या रिवीच आहे.

९ जाधव सेनापति व घाटगे उभयतां चेनकुलिचखा नाकडे गेले, त्यांचे बरोबर रंभाजी निंबाळकर नामें तिस- रा एक मराठा गेला होता, तो थोडक्या दिवसांन मोठा दिल्या त होऊन रावरंभा असें नाव पावला.

दक्षिणेचा अधिकारी निजामउल्मुलुख औरंगाबादे स जाऊन पोंहचला, त्याणें त्यासमयीं शाहूचा हैबतराव नि बाळकरसरलश्कर याच्याउपद्रवाचे नाशासाठीं फौज पा ठविली. तें वर्तमान ऐकून हैबतराव सरलश्कर गोदावरी चा कांठ सोडून भीमातीरीं गेला. त्याच्या मदतीस शाहूनें बाळाजी विश्वनाथ याजबरोबर सैन्य देऊन त्याच्या नावान्न सेनाकृत असें नवें पद जोडून पाठविला तो हैबतराव सर लश्करास भेटतांच उभयतांचा विचार ठरला कीं, पुरंदर कि ल्ल्या जवळ जाऊन मोंगलांच्या लश्कराची वाट पहात रहावें. नंतर त्याप्रमाणें केलें असतां पुरंदराजवळ युद्धप्रसंग होऊन मराठे आपला जय झाला असें म्हणूं लागले, परंतु त्यांचें लक्ष रतेथून मागें हटून सालप्याच्या घाटा जवळ गेलें. तेसमयीं मोंगलांच्या लश्करांत रंभाजी निंबाळकर मराठा व त्यांचे लोक होते त्यांनी चढाई झाल्यावर पुंढे [illegible] घातला. त्यावरून हैं

जामउल्ह मुलुखानें त्यास पुण्याजवळच जप्तीगीर दिली. या नंतर शाहूचा आणि मोंगलांचा कांहीं तह होऊन मोंगल माघारे औरंगाबादेस गेले.

१० त्यावेळेस दक्षिणेच्या राज्याची फार अव्यवस्था झाली. ती अशी, कोणी सरदार शाहूकडचे, आणि कोणी संभाजीकडचे, असे दोन पक्ष होऊन आणखी जो कोणी बलाढ्य मराठा असे तोही स्वतंत्रपणेंच वागे. असा स्वसत्तेनें वागणारा एक दमाजी थोरात नामें सरदार रामचंद्रपंताचे पदरचा होता तो पाटसेजवळच्या हिंगणगांवची गढी नीट करून त्याच्या आसमंतात वीसकोस पर्यंत सत्ता करीत असे. त्याचा स्वभाव द्वाड होता. अद्यापि मराठी लोकांत त्याची कथा अशी आहे कीं, त्याणें कोणे एकसमयीं बाळाजी विश्वनाथाशीं बेलभंडार करून अभयवचन दिलें असतां पुढें प्रसंगीं असेंउत्तर केलें कीं, भंडार म्हणजे हळद, ती आम्ही नित्य खात नाहीं? आमचा बेल म्हणजे झाडाची पानें, तीं माझें काय करतील?

दुसरा एक स्वतंत्रपणा करणारा उदाजी चव्हाण नामें बलवीर शिराव्याच्या गढींत असे. त्याणें असा उपद्व्याप केला कीं, शाहूला त्याच्या नाशासाठीं शिराळें वडगाड यांची चवथाई द्यावी लागली. त्या दोघांखेरीज दुसरे ही कितीएक लहान मोठे मराठे होते ते आपणास संभाजीचे पक्षी म्हणवीत. त्यांत कान्होजी आंग्रेही होता. त्याचे हातीं सांवतवाडी पासून मुंबईपर्यंत मुलूख असतां ही तो कल्याण परगणा घेतल्याचा उद्योग करीत होता. त्या संकटसमयीं बाळाजी विश्वनाथानें शाहूशीं मसलत केली कीं, यांचे कैसे मोठाप

राक्रम केला पाहिजे, नाहींतर राज्य बुडेल. त्यास आधीं माजी थोरात जिंकावा, असा बेत होऊन तो सैन्य घेऊन निघाला. त्यास थोरातानें कांहीं तरी हाचें बोलणें करावयाचें सुणून बोलाविलें, मग दोघ्यानें तो बाळाजी विश्वनाथ व त्याचे दोघे पुत्र एक बाजीराव व एक चिमणाजी व त्याचा मित्र आबाजी पुरंदऱ्या इतके धरून बंदींत ठेविले. नंतर त्यास सोडावया करितां बहुत द्रव्य मागूं लागला, आणि फार छळ केला, तो त्यांणीं सोशिला; तेव्हां शाहूनें त्यांच्या मुक्ततेसाठीं भुंईंड भरल्या प्रमाणें द्रव्य देऊन त्यांची सुटका केली. उपरांत सचिवपंतास आज्ञा दिली कीं, तुम्हीं थोरातास जिंकावें, त्याणें तेथें जाऊन युद्ध केलें तेव्हां थोरातानें सचिव व त्याचा मुतालीक हे उभयतां धरून हिंगणगांवच्या किल्ल्यांत कैद केले.

इकडे साताऱ्यास शाहूनें फौजेच्या दोन टोळ्या तयार केल्या, त्यांत एकीकडे बहिरोपंत पिंगळा पेशवा नेमला, त्याणेंकोंकणांत जाऊन कल्याण परगणा रक्षावा; दुसरा बाळाजी विश्वनाथ याणें शंभुमहादेवाच्या डोंगराकडे उपद्रव करणाराजो कृष्णराव खटांव कर त्यावर जावें, असा हुकूम दिला. तो ब्राह्मण असाधीट झाला होता कीं, जो शाहूच्या लष्करावर ओंसपावेतों चालून आला. त्याचा बाळाजी विश्वनाथानें अगदीं पराभव केला असतां शाहूनें तो शरण आला सा पाहून त्याच्या अपराधाची क्षमा केली, आणि खटांव गांव त्यास इनाम करून दिला; तो अद्यापि त्याचे वंशींचे पुरुष अनुभवितात. त्या दरम्यान बाळाजी विश्वनाथ जय पावला, त्याचें मुख्य कारण परशुरामपंत

दक्षाचा दुसरा पुत्र श्रीपतराव त्याणें मोठें शौर्य केलें. तो ज्या वेळेस निघाला त्या वेळेस त्याच्या बापानें त्याला साताऱ्यातच सांगितलें कीं, तुझ्या वडील भावानें दगा करून ताराबाईचा पक्ष स्वीकारिला, तेणें करून हा एवढा अनर्थ प्राप्त झाला, त्यास जर तूं या वेळेस मोठें शौर्य करिशील, तरच माझी येथून सुटका होईल. असें त्यास पित्याचें सांगणें होतें, म्हणून तो मनापासून लढला. त्यावरून शाहू प्रसन्न होऊन त्याच्या बापाला सोडून त्याची प्रतिनिधीपणाची पदवी पुनः त्यास दिली.

११ बहिरोपंत पिंगळा आंग्र्यावर गेला होता, त्याची व आंग्र्याची लढाई कोंकणांत झाली. त्या युद्धांत आंग्र्यानें तो बहिरोपंत धरून कैदेंत ठेविला, आणि शाहूचे किल्ले लोहगड व राजमाची हे दोन्ही घेतले. आणखी लोकांत वर्तमान उठविलें कीं, आतां सातारा घ्यावयास जाणार. तेव्हां शाहूनें आपले सर्व लोक साताऱ्याज वळ जमा केले, त्यांत मुख्य बाळाजी विश्वनाथ केला. तो आंग्र्याचा पराक्रम जाणत होता, म्हणून युद्धा पेक्षां तह करावा हेंच चांगलें असें समजून त्याणें आंग्र्याशीं तह केला. तो प्रकार असा, शाहूनें मोठे अवघड असे[1] राहा किल्ले आणि अंमळसे सवघड असे सोळा किल्ले व त्यां संबंधें गांवें दिलीं. या खेरीज त्यास जे दाऊ गलबतांचें मुख्यत्व ही दिलें, आणि त्याचें पूर्वींचें नाव सरखेल असें होतें तें नरेंच स्था-

---

[1] खांदेरी, कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, जयगड, देवदुर्ग, [illegible] दुर्ग, रत्नागड, अनिलगड आणि यशवंतगड.

पिले. आंगे मागीं बहिरोपंत पेशवा मोडावा, आणि राजेनाची खेरीज जे शाहूचे किल्ले घेतले ते परत द्यावे. आणि शाहूचा पक्ष धरावा, संभाजीचा धरूनये असें ठरलें.

१२ या प्रमाणें शाहूचा व आंग्र्याचा तह होऊन शाहूचा मुलूख आंग्र्यानें मापाग दिला. त्यांत आंग्र्या वरोवर कांहीं मुलूख शिद्दीनें घेतला होता तोही शाहूकडे गेला. त्यावरून शिद्दी आंग्र्याशीं लढूं लागला, तेव्हां आंग्र्याचे कुमकेस बाळाजीविश्वनाथ गेला. मग ते शिद्दीच्या मुलखांत शिरले तेव्हांता लवकरच शरण आला.

अनें उत्कृष्ट कार्य करून बाळाजीविश्वनाथ मापागशा हूकडे सातार्‍यास संनसत्राशें चवदा न गेला. तेव्हां शाहूनें त्याचा मोठा मान करून त्याला पेशवाई दिली; आणि त्याचा जीचा मित्र आबाजी पुरंदर्‍या तो त्याचा मुतालीक केला, आणि स्वी रामचंद्रपंत भानू यास पेशवा याची फडणिशी दिली; पहिला पेशवा बहिरोपंत पिंगळा तो दूर केला.

१३ चंद्रसेन जाधव सेनापति याणें शाहूचा पक्ष टाकिल्या पासून तें पद मानाजी मोर्‍यास दिलें, परंतु तो तादृश शूर नव्हता म्हणून बाळाजी विश्वनाथ पेशवे व हैबतराव निंबाळकर हे उभयतां पुनः थोरातास जिंकावया करितां नेमिले. ते समयीं बाळाजी विश्वनाथास विचार पडला कीं, जर आपण युद्ध प्रसंग केला तर तो योगात सचिव पंताला मारून टाकील, हें एक भय व सचिवाची मातुश्री येसूबाई इणें बाळाजीवीपार

रामचंद्रपंत भानू मानाजी मोर्‍याचा मुख्य पुरुष होय

प्रार्थना केली होती, यास्तव त्याणें थोरातांशीं कांहीं युक्तीचें बोलणें करून आधीं सचिव सोडिवला, नंतर युद्ध केलें. तेव्हां थोरातास तें लश्कर मोठें म्हणून मैदानांत लढवेना या करितां तो किल्ल्यांत जाऊन लढूं लागला. मग ते तोफा लावून किल्ल्याचा तट पाडून आंत शिरले; आणि थोरातास कैद करून किल्ला पाडून अगदीं नाहींसा करिते झाले. येसूबाईनें आपला पुत्र सुखी आला असें पाहून बहुत उपकारी होऊन पुणे परगण्यांत जितके सचिव पंताचे हक्क होते तितके सारे बाळाजीविश्वनाथास दिले. तेव्हेपासून बाळाजीच्या कुटुंबाचीं माणसें सरसवडांत होतीं. या देण्या खेरीज जो संकट समयीं फार उपयोगीं पडणारा अत्यंत सुदृढ असा जो पुरंदर किल्ला तो समय विशेषीं मुलां माणसांच्या संरक्षणासाठीं दिला. तो शाहूचे आज्ञेवांचून देववेना, म्हणून बाळाजीनें ही शाहूला हेंच निमित्त सुचाविलें कीं, समयीं हा किल्ला आमच्या माणसाच्या रक्षणास द्यावा म्हणोन कळावा, त्यावरून शाहूनें किल्ला पेशव्यास द्यावा म्हणून आज्ञा दिली. तो शाहू इतका वश झाला, आणि पेशव्यास पुरंदर दिला, ही आपल्या वंशाच्या बंधाचे सांखळीची पहिली कडी त्याणें आपल्या हातें घडली.

१४ संनसत्राशें पंधरांत सरलइकर राजानें आपणास सेनासचिव दिलेनाहीं म्हणून राजाशीं कलह करून निघाला, तो गोदावरीतीरीं जाऊन राहिला, त्यावर पुनः त्याचें मन्य झालें नाहीं. त्यावेळेस पुणे परगण्यांत मोंगलांकडचा बाजीकदम नामें मुख्य अधिकारी होता, तो पेशव्यांनीं आपली रंभाजी निंबाळकर याचा उपद्रव करणार नाहीं असें कबूल करून वश केला. नंत

रसा अधिकार्‍यानें पेशव्यांचा पक्षपात धरिला, तेव्हां तो पर्गणा पेशव्याच्या हातीं लागला. त्या पासून पेशवे उत्तम प्रकारें प्रजापालन करूं लागले, त्यांत चोरांचें पारिपत्य प्रथमतः केलें.

बाळाजी विश्वनाथ पेशवा यांचें वय त्या दिवसा पासून वाढलें, आणि कोणतेंही मोठें कार्य त्यांचे मसलतीं वांचून न होईना असें झालें; व शाहूराज्य कारभारांत मनांतून कोणाशीं चक्कर नसें, त्यावरून बाळाजी विश्वनाथ ही तमाच वागे. त्याणें शिवाजीचे कायदे मनांत उत्तम रीतीनें होते, परंतु संभाजी पासून अशी चाल पडली होती कीं, कोणी मोठ्या सरदारानें पराक्रमें करून एखादा मुलूख घेतला असता तो त्यास द्यावा, त्या प्रमाणें निरुपाय होऊन हाही कोणास मनसदा देई, पण अशानें राज्य बळहीन असतें.

त्यावेळेचा प्रतिनिधि व अष्टप्रधान यांचीं नावें.

प्रतिनिधि, परशुराम त्रिंबक.

पेशवा, बाळाजी विश्वनाथ.

अमात्य, अंबाराम बापूराव हणमंते.

सचिव, नारोशंकर.

मंत्री, नारोराम गोणवी.

सेनापति, मानसिंग मोरे.

सुमंत, आनंदराव.

न्यायाधीश, होनाजी अनंत.

पंडितराव, मुद्गल भट्ट उपाध्याय.

त्याच वर्षी परसाजी भोंसले व दैवतराव निंबाळकर मे

ले, तेव्हां शाहूनें परमाजीच्या पुत्रास त्याचा मुलूख देऊन त्या
चें सेनासाहेब सुभा असें पद होतें तेंही दिलें. त्या प्रमाणें हैबत
राव निंबाळकराच्या पुत्रास दिलेंनाहीं. त्याचें पद व मुलूखवगै
रे चन्द्रसेन सोमवंशी यास दिला. यास्तव मनांतल्यामनांत खिन्न होऊन त्या
णें शाहूचा पक्ष टाकिला, आणि मोंगलांचा सरदार दाऊदखान जा
धव याचा पक्ष धरिला. त्या पुढें तो हैदराबादेच्या निजामउ-
ल्मुलुखापासून वारणी आदिकरून मुलूख जहागीर पाव
ला.

१५. त्यावेळेस शाहू राज्यकार आपल्या कारभाऱ्यांकडे सोंपवून आपण स्वस्थपणें महालांत असे, किंवा शिकारीस हिंडे. तो बालपणीं औरंगजेबाचे घरीं नाठ्या मिजाजींत होता. त्यावरून जी संशय त्याला लागली ती त्याचे मोठेपणीं ही जाईना, त्यणून तो स्वसंतोषें वागण्यांत प्रीति ठेवी. त्याला शिवाजी प्रमाणें घाटमाथ्यावर किंवा कोंकणांत आंगेच संचार करणें आवडतनसे, आणि त्याचे वकील व मानकरी लोक व कारभारी आप आपल्या कामासाठीं फार नम्रतेनें आर्जवी गोष्टी बोलत त्यानांसत्यमानून सर्व कामें त्यांचे हातून करवी. तो असें नसमजला कीं, सर्वकामें दुसऱ्याचे हातीं दिलीं असतां नांनाव प्रबल होऊन आपल्या महत्वाची हानि होईल.
या प्रमाणें वर्तनान असतांही मराठेलोक त्यावेळेस प्रबल होऊं लागले. शाहू चातुर्यी विषयीं तरी न्यून होता, परंतु मोठा धार्मिक असे, आणि ब्राह्मणांचें फार पालन करी; आणखी मोंगललोक त्या शाहूचा बहुत मानराखीत तेणेंकरून मराठ्यांचें विजय प्राबल्य झालें, आणि त्याची प्रजा त्याम बहुत

मानूं लागली. याच्या पूर्वी शिवाजी पासून जितके तक्काधि पति झाले तितके स्वतंत्र पणानें वागत, परंतु याच आपण हिंदू चा तक्काधि पति असून आपणास दिल्लीच्या बादशाहाचा आश्रि त म्हणवी.

१६ त्या समयीं मोंगलांचा फेरुकशेर बादशाह यानें ज्या दो सैयदांच्या आश्रयानें पृथ्वीतक्त प्राप्त झालें ते आपणास डोयज ड होतील अशा शंकेनें त्याच्या मनांत आलें कीं, दोघ बंधूंक रुन बळहीन करावे. यास्तव त्यांत धाकटा जो सैयद हुसेन अल्लीखान नामें होता, तो दक्षिणेचा अधिकारी करूनें र वाना केला, आणि पहिला दक्षिणेचा अधिकारी दाउदखान हो ता तो मोठा शहाणा, त्यानें मराठी लोकांशीं स्नेह ठेविला अ से. तो आपण गुजराथेचा अधिकारी केला होता म्हणून त्यास गुप्तपणें लिहिलें कीं, मी एथून सैयद पाठविला आहे तर तुम्ही दक्षिणेचे अधिष्ठान त्याचे हातीं लागूं देऊं नये, म्ह णजे सहा सुभे दक्षिण तुम्हास मिळेल. त्याबरून दाउदखा नानें कुमकेस मराठे सरदारांस बोलावून युद्धाची तयारी केली. तेव्हां मराठे सरदारांपैकीं नेमाजी शिंदा नांच दाउदखा नास मिळाला, त्याला बरोबर घेऊन तो सैयदाशीं लढला. ने बेळेस शिंदा एकीकडे उभारा हिला. लढला नाहीं कोकीं, त्याच्या मनात जो सबळ पक्ष दिसेल तिकडे मिळावें असें हो तें. नंतर युद्ध होऊन दाउदखान पडला, तेव्हां तो शिंदा सैयदा प भेटून त्याजबरोबर राहिला. हें वर्तमान संभाजीस समजतांच सोळांत घ डलें.

सैयदहुसेन अल्ली यानें दक्षिण सुभा घेतल्यावर प्रथम

खंडेराव दाभाडे याच्या पारिपत्यास फौज नेमिली कारण कीं, त्याणें सुरते पासून अहमदाबाद पर्यंत बादशहाकडील लोकांस बहुत दिवस उपद्रव केला होता. तो असा कीं, त्याणें जागोजाग आपल्या लोकांच्या टोळ्या करून ठेविल्या असत, ते लोक कोणी वाटेनें जाई त्या पासून खंडणी घेऊन त्यास पुढें जाण्याचें दस्तक देत. तें न झाल्यास लुटीत. त्यांच्या पारिपत्यास फौज पाठविली ती आठ हजार होती. ती जवळ आली हें वर्तमान कळतांच दाभाड्याचे लोक त्यांचे तोंडावर जाऊन भ्याल्या सारिखा आकार दाखवून पळाले, आणि त्यांस आंगावर घेऊन त्यांचा बंदोबस्त विस्कळीत झाला असा पाहून मागें उलटले, आणि एकाएकीं हल्ला करून त्यांचा असा पराभव केला कीं, त्या शिपायांची वस्त्रें हत्यारें सोडून घेतलीं. त्या पुढें ही दाभाड्याची मोगलांशीं लढाई अहंमदनगराजवळ झाली, तेथें ही तो जय पावून मग सालाच्यास जाऊन त्याचा भेटला. तेव्हांशा हूनें त्याचा मोठा मान करून त्यास सेनापतित्व दिलें. व पहिला सेनापति मानसिंग मोठा होता तो योग्य नव्हे म्हणून दूर केला.

फेरुकशेर सैयदाच्या अनिष्ट विषयीं दाउदखान मेल्या वर मराठ्यांस ही गुप्तपणें लिहीत असे. या प्रमाणें बादशाहा चें कृत्रिम आणि दाभाड्याचा जय या दोहों कारणांनीं मराठे प्रबळ होऊन सरदेशमुखी चौथ करूं लागले. पूर्वी दाउदखानानें त्यांस चौथाई मात्र दिली होती.

१७ या प्रमाणें बादशाह कृत्रिमी आणि मराठी लोकांचा मोठा उपद्रव या दोहों अडचणीमुळें सैयदहुसेनाच्या मनांत आले कीं. शाहूशीं सलह करावा. त्यावेळेस त्याजवळ शंकराजी मल्हा

र गाने कार कून द्यो ना तो पहिला शिवाजी जवळ असे, त्याला रा जारामाचे बेळेस सचिव पद प्राप्त झालें होतें, परंतु तो संकट स मयीं राजाराम सिंजीन सोडून आपण वाराणशीस गेला. त्या नंतर त्यास तेथें उगेंच रहावेना, म्हणून सैयद हुसेन दक्षिणेस येऊं लागला तेव्हां त्यास मिळून मानक्यान दक्षिणेस आला. त्याचे सेही सानागांत चकृत होते, यास्तव हुसेन अल्ली नेंत्या ला शाहूजीं तव्हां बोलणें करावया करितां पाठविलें. तेव्हां म हासुभे दक्षिणेची चौथ व सरदेशमुखी व हैदराबाद व त्रिचा पूर या संबंधें आणि कर्नाटक व म्हैसूर व तृचनापल्ली व तंजोर या संबंधें मुलूख व खानदेश खेरीज करून दक्षिणेंत शि वाजीनें जो मुलूख घेतला होता तो, इतक्याची सनद शाहू मागूं लागला, या शिवाय गोंडवण व वऱ्हाड यांतील मुलूख सेनासा हेब सुभा व काकोजी मोंसला यांणीं घेतलेला तोही मागितला; आणि आपली मुलें माणसें ओलीत होतीं तीं लवकर आत्या जव ळ पोंहचतीं करावी असें सांगितलें; आणखी आपण कबूल केलें कीं या प्रमाणें सारीं कामें झालीं असतां मोंगलांस मुलूख संबं धें वर्षासि दहा लक्ष रुपये खंडणी देऊं, आणि सरदेशमुखी चाच द मुलखांत चोरीच्या उपद्रवाचा बंदोबस्त ठेवूं. कदाचित् चो री झालीतर ते नुकसान भरून देऊं. या शिवाय सरदेशमुखी- च्या उत्पन्नापैकीं शेंकडा सहाशें एकावन्नांच्या मानें करून नजर देऊं. चौथेचाबद्दल पंधराहजार फौजनिशीं बादशाहाची

+ मोंगललोकांची रीति अशी होती कीं, कोणास अधिकार दिला म्हणजे त्या पासून या प्रमाणें नजर घ्यावी

चाकरी करू. या शिवाय कोल्हापूरकर संभाजी राजाराणाचा पुत्र - ने लेक विजापूर सुभा व हैदरगबाद या दोहों जागीं इस्व करितांहेत ते हांकून देऊं, हें न खंडतर तत्संबंधें जें नुकसा न अमल नें भरून देऊं, त्रिणून कगर केला. हें सर्व शाहूचें बो- लणें सैयद हुसेन अल्लीखानानें प्रायः मान्य केलें. असें मनसबा दें मंत्रांत दर्तलें.

' १८ असा तह झाल्यावर सैयद अल्ली हुसेनाकडे शाहूनें म गठे स्वार दहा हजार पाठविले. त्यांजबरोबर सरदार संताजी व परसाजी भोंसले व उदाजीपंवार व विश्वासराव वगैरे होते. हा तह दिल्लीचा बादशाह फेरुकशेर यास कळल्यावर सैयदा- च्या द्वेषास्तव त्याला ही कबाटलें नाहीं. त्यावरून सैयदास समज ले कीं, बादशाह आपला पुर्तपणें द्वेष करितो; यास्तव त्यांणें न केला कीं, हा बादशाह पदच्युत करीन. म्हणून शाहूला कुमक मागितली. शाहूनें ही तें आपणास मोठें हितावह असें समजून खंडेराव दाभाडे व बाळाजी विश्वनाथ हे दोघे सरदार बरोबर मोठी सेना देऊन त्याचे कुमकेस योजिले. ते निघते समयी शाहू ने बाळाजी विश्वनाथास सांगितलें, दौलताबाद व चांदा किल्ला ह कमें ही करून हस्तगत होतील असें करावें, व बऱ्हाणपूर मां गठे गुजराथ व माळवा या दोहों जागची खंडणी वर्षासि कांहीं एक प्रकारें होतांच त्याचीही सनद मिळवावी.

सैयद हुसेन मराठा फौज बरोबर घेऊन दिल्लीस चालिला दिल्लींत फेरुकशेर बादशाह होता त्यास छत्रिमाचें शहाणपण होतें, परंतु संकट समयीं त्याची बुद्धि स्थिर नसे. यास्तव जेणें करून आपणास उपयोग होईल तें त्याला समजेना. आणि

कोणाचा विश्वासही वाटेना, यास्तव त्याणें सारे हिंदकर्ते लोक दूर केले. मग दोघे सैयद मिळून त्यांणीं बादशाहास धरून नासून टाकिलें. त्या नंतर सातां महिन्यांत दिल्ली मध्यें दोन बादशाह होऊन मृत्यु पावले.

त्यानंतर सतरासशें एकोणिसांत रफीउद्दरजात नामें नुलतान माजुमाचा नातू (पुत्राचा पुत्र) त्याचें महंमदशाह अर्से नवें नांव ठेवून दोघां सैयदांनीं तो बादशाह केला; परंतु त्या दोघांवांचून कांहीं एक कार्य होत नसे. ते उभयतां प्रायः दुर्व्यसनें बुद्धीनें चालत नसत. इतकें मात्र असेकीं, मोठे मोठे सरदार यांस आपलें अगत्य असावें हें त्यांचे मनांत होतें, या करितां निजामउल्मुलुख मोठा नामांकित होऊन त्यास वश करावयाचा उद्योग केला, परंतु तो त्यांस मनापासून वश न झाला. यांच कारण असें कीं, तो दक्षिणेंत अधिकारी असतां बादशाहांनी त्याच्या अधिकारावर सैयद नेमिला आणि त्याला मुरादाबादेस पाठविलें.

तो निजामउल्मुलुख मुरादाबादेस राहून त्या प्रांताचे कितीएक बंडावा करणारे जमेदार यांचीं पारिपत्यें करून मोठ्या यात्नेंस चढला. मगंफरुकशेर याणें त्यास दिल्लीत आपल्या जवळ बोलावून नेलें, तो तेथें कितीएक दिवस बेरोजगार होता. नंतर त्याला बादशाहानें माळवे प्रांतीची सुभेदारी देऊन तो निकडे पाठविला. तो मोठा शहाणा आणि धैर्यवान् असे. त्याला अधिक यत्नेंस चढावयाची आशा होती, परंतु त्याचे आटकळींत आलें कीं, थोड्याच दिवसांनीं नवी मुदा होईल. म्हणून तो नेथें कांही गडबड न करितां तो राजश्री बाजीरावाची वाटपाहात उगाच राहिला होता.

१९ बाळाजी विश्वनाथ फौजेसहित महंमदशाह बादशाह होईतों पर्यंत दिल्लींत राहिला. नंतर तेथून निघावयाची आज्ञा घेतली, आणि फौजेचा खर्च सैयदापासून घेऊन शाहूचीं मुलें मागसें तेथें होतीं तीं बरोबर घेऊन निघाला. तेसमयीं ठरीव केल्याप्रमाणें चौथ व सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा घेतल्या; आणि वराड संबंधीं मुलूख व गुजराथ व माळवा यांचे खंडणीच्या सनदा विषयीं आपला वकील तेथें ठेविला, परंतु त्यास त्या प्राप्त जाल्या असतील असें दिसत नाहीं.

बाळाजी विश्वनाथ दिल्लीस गेला तेसमयीं त्याणें आपला दिवाण आबाजी पुरंदऱ्या तो मुतालिक[1] केला, तथापि त्या मुतालिकानें सर्वकारभार बाळाजी विश्वनाथाच्या नावेंच चालविला. नंतर पेशवा दिल्लीहून सनदा घेऊन मातब्बर आल्यावर वसुलाच्या बंदोबस्ता विषयीं कांहीं कांहीं नवे कायदे करूं लागला. तो प्रकार ध्यानांत आणिला असतां अप्राप्त दिसतो कीं, जेलेखन विद्वान निपुण ब्राह्मण असतील त्यांस श्रेष्ठ द्यावे, आणि ती विद्या ज्यांस नाहीं असे शिपाईपणाचें कामकरणारे शूद्रादिक त्यांणीं त्यांचे स्वाधीन पणें वर्तावें, व समय विशेषीं हिंदूंनीं मोंगलांसही उलट गोष्टी सांगावी.

२० त्या वसुलाच्या कायद्यांचा विस्तार असा, प्रथम दक्षिणसहा सुभ्यांचीजी सरदेशमुखी[2] नं. राजाचें वेतन केलें. तेणें-

---

1 मुतालिक म्हणजे जो मोठा अधिकारी याणें आपल्या कामावर, सरकारास बदल दिला तो.

---

2 सरदेशमुखी म्हणजे जो ऐवज वसूल त्यांपैकी दहाफरे शेकडास

कम्न राजा बऱ्हुत संतुष्ट झाला. आणि दुसरेही मराठे राजे यावे वशांत होतील ते प्रसन्न झाले म्हणून असें केलें. कां कीं, मराठे लोक वेतना विषयीं अत्यंत लुब्ध असें बाळाजी विश्वनाथास ठाऊक होतें.

त्या समयीं उत्पन्न पूर्वीच्या ठरलेल्या नेमाची व्यवस्था ई ज मा झाल्यास अवघड पडे, परंतु मराठे लोक दरोबस्त जमेचा ठराव प्रमाणें आम्हाला आमची वांथाई द्यावी असें बोलत, आणि जितका ऐवज देत तितका घेऊन बाकी ऐवज आमचा सरकाराकडे येणें राहिला म्हणून सांगत, तेणें करून मराठ्यांनीं मोंगलांस समयविशेषीं आर्जवें करून किंवा बलात्कारें करून मागावें असा मार्ग नीट जाला. या प्रमाणें चतुर्थांश जाऊन बाकी तीन भाग राहिले त्यापैकीं एक फौजदाराच्या हक्कास जाई. मग दोन भाग उरत तो ऐवज कोणी एक टिकाणच्या बादशाहाचे खजिन्याकडे सर्व जाई. कांहीं एक जागींच्या जहागीरदारांचे देण्यासच ना खर्चे कां कीं, बादशाहानें यांस तो खर्चास लाऊन दिलाअसे. त्याच निमित्त करून पेशवे व निजामउल्मुलुख यांचे राज्यांत जहागीर संबंधें मुलूखज स करणें किंवा माघारा देणें याचीरीति अशी पडली होती कीं, कोणी एक मुलखीं जहागीरदारच तें सर्व घेई, कोणे एके जागी बादशाहच घेई. पुढें काळें करून पेशव्यांचा मुलूख सरकार इंग्रेज बहादुर यांणीं घेतला, तेव्हां कोणे एकेगांवीं कुळकरणी यांस बोलावून मागले लेख काढविले, त्यांत दोन भाग जहागीर असें लिहिले होतें, परंतु यांचे कोणाच्च व त्यांचें निमित्तकाय तें त्यालेखांत नाहीं, म्हणून कुळकरणीयांस विचारिलें कीं, हे

दोन भाग दादे कोणास व देण्याचें निमित्त काय? त्या वरून त्यांणीं उत्तर केलें कीं, आम्हास दें कांहीं ठाऊक नाहीं, आमचे वडिलांनी लिहिलें आहे इतकें मात्र जाणतों. यावरून असें वाटतें कीं, जे दोन भाग राहिले ते सर्व कोणी एक ठिकाणीं पूर्वीज द्यागीरदारच घेत असेल. मग कांहीं निमित्तें करून बादशा हयाणें तो मुलूख घेतला तरी तो लेख नसाच राहिला.

जिनका मुलूख स्वराज्य त्याच्या वसुलाची जी चौथ निला राजाची बापूली असें नवें नाव ठेवून तो राजाचा हक्क ठरविला. आणि तीन हिस्से राहिले त्यास मोकासा नाव ठेविलें. या शिवा य नोहोचा व नीरगोंड या नामें दोन हक्क राजाचे होते ते स्वरा ज्याचे हरोवस्त जमेवर असत. त्यापैकीं साहोत्रा चा हक्क नें पं त सचिवास दिला, आणि नारगोंड दुसऱ्या कोणास दिला.

त्या देशचे प्रधान व प्रतिनिधि यांचीं वेतनें राजा आपल्या खजिन्यांतून देई. यारेवरीज त्यांस कांहीं गांव इनाम होते.

+ साहोचा म्हणजे शेंकडा साहा रुपये.

---

* नारगोंड म्हणजे शेंकडा तीन रुपये.

भाग तेरावा

सनसत्राशें विसांपासून सनसत्राशेंसत्तावीसपर्यंत जाल्लेलीं वर्तमानें.

१ सनसत्राशें विसांत दिल्लीमध्यें जे दोघे सैयद फकीर

च जागीं दुसरा बादशाह करून आपण मुख्यत्वें करून राजकारभार करीत होते, यांवर मानकरी लोक व बादशाह्यांची मनापासून प्रीति नव्हती. का कीं, त्यांचा स्वतंत्रपणें वागण्याचा उद्योग होता. ते दुसऱ्याचें मन वरा करण्याविषयीं तत्पर नव्हते, यास्तव मानकरी लोक व बादशाह हे त्याचा वाल्या लकारें मान करीत, परंतु त्यांस मनापासून मानीत असे. तेव्हां माळव्याचा मुख्य अधिकारी निजामउल्मुलुख यानें तें सर्व वर्तमान जाणून असा नेम केला कीं, आपण सैन्यादेचे अधीन न राहतां स्वतंत्रपणें वागावें. असा निश्चय करून त्यानें आपल्या नावास आसीफजा असें पद जोडून व रोबर बाराहजार सैन्य घेऊन नर्मदा उतरून आर्शीरगडचे किल्लेदारास कांहीं द्रव्य देऊन तो किल्ला घेतला. त्यानंतर बऱ्हाणपूर व खानदेश मुलाही त्याचे हातीं लागलीं; आणि शाहूचे कितीएक सरदार बिथरलेले होते ते व कोल्हापूरकर संभाजी याजकडचे ही कितीएक सरदार जाऊन त्या निजामउल्मुलुखास मिळाले.

२ त्या समयीं दोघां सैयदांची दोन लष्करें वेगळीं वेगळीं होतीं तीं थोड्या अंतरानें असत. त्यांत एक लष्कर माळव्या लगत होतें, त्याचा मुख्य सरदार दिलावरखान असे. दुसरें औरंगाबादेस होतें, त्याचा मुख्य सरदार अलेअलीरखान तीं दोन्हीं लष्करें एकत्र मिळालीं असतां तर निजामउल्मुलुख

+ शाहूचे जे सरदार निजामास मिळाले त्यांत चंद्रसेन जाधवनें बाळकर हैबतराव सरलष्करानापुढे वगैरेंनीं निंबाळकर हे होते मुख्य

मराठी जाणीं असतीं, परंतु तो दिल्लावर स्वार अभिमानें करून औरंगाबादच्या अलंअल्लीखानास न मिळतां एकदाच निजाम उलमुल्खावर चढाण पुरीं चालून गेला, त्याचा युद्धात जय नहो तां तो मृत्यु पावला.

हेंवर्तमान औरंगाबादेस कळलें तेसमयीं अलं अल्लीखा-ने आपलें लश्कर तयार करून चढाण पुरावर चालिला. त्याज बरोबर शाहूचें मराठी लश्कर शंकराजी मल्हार जो शाहूकडचा औरंगाबादेस वकील होता त्याणें जमा करून पाठविलें. याखेरी ज सातारच्याहून खंडोजी हाभाडया बरोबर लश्कर देऊन पाठविला.

निजामउल्मुल्खबरास मोंगलाचें लश्कर येतेंसें कळतांच तो लश्कर मुद्दां तेथून लिघून यांच्या लश्करावर चालून आला, तेव्हां त्या लश्करगंचा युद्धप्रसंग वरा़डच्या वैनघाट संबंधी बाळा पुरा जाहला. तों तो निजामउलमुल्खानें कांहीं युक्ती करू न त्याचें लश्कर अडचणीच्या जाग्यांत नेऊन मग उलटून मारू न जिंकलें. तेसमयीं अलंअल्लीखानानें मोठें शौर्य केलें, परं तु त्याचे बहुतेक लोक मेलाले, व कितीएक दावूस मिळाले, व त्याचे थोडके आलेले परम विश्वासू मराठे लोक होते, तेव्हां त्यांनीं अडून लढून मरून गेले, तेव्हां तो मृत्यु पावला. त्याल दर्जेन मराठे उत्तम प्रकारें लढले, त्यांत कोणी मोठा सरदार नव्हता. एक शंकराजी मल्हार मात्र फार जखमी होऊन केवळ मरणो मुख होत्साता शत्रूच्या हातीं लागला.

+ त्यावेळेस सेनासाहेब सुभा कान्होजी भोंसला, वंद्य तेवेळेस निंबाळकर हे मोठे सरदार.

३ हें वर्तमान दिल्लीस गेल्यावर दोघां सैयदांस [illegible] ले, परंतु बादशाह अंतःकरणीं आनंद पावला. नंतर त्या सैयदांचा चक्रांत विचार होऊन असें ठरलें कीं, सैयद हुसेन अली खान धाकटा भाऊ यानें बरोबर सेना घेऊन निजामउल्मुलु खाच्या पारिपत्यास बादशाहासहित निघावें. नंतर तो त्या मा णें सिद्धता करून वडील भाऊ सैयद आबदुल्लाखान याच्या गायीं पडून धणी बादशाह यास घेऊन निघाला. तो कांहीं मजला चालून पुढें गेला, तेव्हां निजामउल्मुलुखाचे कोणी मित्र व त्याचे मुलखीं राहाणारे मोठे मोठे लोक एकत्र मिळून त्यांणीं ममलत करून सैयद हुसेनास मारेकरी घालून मारून टाकिलें. नंतर ममलत करणारांनीं तें सर्व लष्कर वश करून घेतलें, आणि त्यांतील लष्करी लोकांस असें समजाविलें कीं, बादशाह धणी यास प्रतिबंध करणारा जो चाकर तो मारावा हेंच उचित; कांकीं, स्वामीच्या स्वतंत्रपणास व्यत्यय न लावा. त्यास थोरला सैयद आबदुल्लाखान यास ही मारिलें असतां बादशाह सुख पावेल. अशी ममलत देऊन ते लोक त्या लष्करांत मिळून सैयद आबदुल्लास मारावया करिता बादशाहाबरोबर दिल्लीस जाऊं लागले.

४ तेव्हां त्या सैयदाजवळ बहुत दवलत होती, त्यासहें वर्तमानकाळचा च त्यांणें पुष्कळ खर्च करून थोड्या दिवसां त मोठें सैन्य जमा केलें, आणि महंमदशाह बादशाह नदी ऊतरून करून तो सैयद ज्यांणीं धाकट्या सैयदास मारिलें त्या च्या पारिपत्यासाठीं दिल्लीहून निघाला. त्याची व या लोकांची वाटाण पुरानवळ गांठ पडली, तेथें मोठ्या निकराचे युद्ध जा

लं. नें असें कीं, ज्यांत जय कोणाचा होईल तो सुनार करू
ना. शेवटीं आदिलखानाच्या लश्कराचा पराभव झाला,
आणि तो घायाळ होऊन शत्रूंच्या हातीं लागला. तेसमयीं बादशाह निर्भय होत्साता परम हर्ष पावून त्या मारे करी
मंडळांत एकमहंमद आमीनखान नामें होता तो वजीर के
ला. आणखी दुसरेही त्या मंडळांतील कितीएक पदवी न
चढविले. नंतर बादशाह मोठ्या उत्साहें करून आपल्या
राजधानीस गेला, तेथें तेथच्या रयत लोकांनीं बादशाहचें
संतोषार्थ कितीएक दिवस मोठा उत्साह केला तो असा कीं,
ज्या मध्यें आनंद वांचून दुसरा शब्द कानीं पडेना. याप्रमाणें
कितीएक मुलखांच्या मोठ्या मोठ्या लोकांनीं उत्साह पूर्वक आ
पलीं सेवेंत तत्पर आहों अशा अर्थाचीं पत्रें बादशाहास पाठ
विलीं. त्यांत निजामउल्मुलुखाचें ही पत्र होतें, आणि त्या
तूचा दक्षिण ही स्वामीचें कल्याण चिंतीत होता त्यानंतर त्या
सर्व लोकांच्या पत्रानुरूप उत्तरें बादशाहाचे दरबारी लोकां
नीं महंमदशाह यांचे नावें लिहून पाठविलीं.

ते समयीं तो नवा केलेला वजीर अकस्मात मेला, त्यास
अधिकार बादशाहानें निजामउल्मुलुखास दिला. त्याणें
पूर्वीचें इत्यन्न केलें नें बादशाहाचे उपयोगीं पडलें. तेणें
जामउल्मुलुख यास वजिरी प्राप्त जाली तरी तो आपल्या जा
गिरीच्या बंदोबस्ताकरितां मंनसबाशें बेचाळीस पर्यंत दक्षिणेंत
राहिला.

त्या मारे करी मंडळींत एक हैदर कुलीखान होता, त्यास
गुजराथेचा अधिकार दिला. दुसरा महंमदखान त्यांत आधी

आपले शहर दिले, मग बगाल्या संबंधी ऊर घातला. त्याचे घांत सादटखान पुढें मोठा विख्यात जाला, तो ऊदच्या वादशा हाचा मूळ पुरुष, त्याची संतति आद्यापि आहे.

५ मोंगलांकडचें वर्तमान असें असतां मराठ्यांचे मुख्य प्रधान परशुरामत्रिंबक व खंडेराव दाभाडे व बाळाजीविश्वनाथ यांत हे मृत्युपावले, त्यामुळें त्या दरबारचे व्यवस्थेंत कांहीं अंतर पडले तो प्रकार असा, प्रतिनिधीचा दुसरा पुत्र दीपसिंग तो बापाचे जागीं स्थापिला बाळाजी विश्वनाथाचा दुसरा पुत्र बाजीराव त्यास ती पेशवेपणाची पदवी बाळाजीच्या पंढरीगें सातां महिन्यांनीं प्राप्त जाली, बाळाजीविश्वनाथ मनसब शें देदिसांचे दहावे महिन्यांत कारभाराचा शीण होऊन मरण पावला.

६ खंडेराव दाभाडा मेल्यावर त्याचा पुत्र त्रिंबकराव त्या स संनसचाशें एकविसांचे पांचव्या महिन्यांत बापाचा अधिकार मिळाला खंडेराव दाभाडेपेन्याचे अगोदर त्याचा सरदार दमाजीगाइकवाड होता, त्यानें मोठें शौर्य केलें म्हणून खंडेरा वयानें त्यास मांगिनलें, यास्तव त्यानें त्यास खंडेरावाच्या हातारवाचीं दुसरा अधिकार देऊन समशेर बहादर असें ना- व ठेविलें. तो दमाजी गाइकवाड हा मूळ पुरुष, अद्यापि त्याचे वंशी बडोद्याचे अधिकारी आहेत. तो दमाजी खंडेराव दा भाडा मेला त्याच सुमारें मृत्यु पावला, त्याचे जागीं त्याचा पुत्र पिलाजी गाइकवाड बसविला.

मनसबदारीं बेचिलोन निजामउलमुल्क आपला जकाग्र ी मुलखाचा बंदोबस्त करून दिल्लीस जे वजिरीचा अधिकार

वर गेला. तो स्वभावें करून तिरसट होता, त्याला हास्यविनोदादिकाची प्रीति नसे; आणि बादशाह व त्याचे दरबारीलोक यांस विनोदादि प्रकार प्रिय होते, त्यामुळें तो त्यांस आवडेना. पुढें त्याणें ती बादशाहाची चाल मोडावयाचा उद्योग आरंभिला, तेव्हां ते दरबारीलोक व बादशाह यांचे मनांत आलें कीं, तो दूर करावा. यास्तव मसलत केली, तो प्रकार असा, त्यावेळेस कुलीखान गुजराथेमध्यें अमदाबादेस अधिकार करीत होता, त्यापासून कांहींचूक जाली यास्तव बादशाहा व दरबारी लोकांनीं त्यास असें भय दाखविलें कीं, वजीर निजामउल मुलुख तुझें पारिपत्य करील. तुकडे निजामउल मुलुखास त्याच्या कांहीं चाहाड्या सांगितल्या. या प्रकारें त्या उभयतांदें वांकडें पाडून ते लोक व बादशाह मिळून निजामउल्मुलुखास आज्ञा दाखविली कीं, तुला गुजराथचा अधिकार देऊं, त्यावरून तो फौज घेऊन कुलीखानाच्या पारिपत्यास निघाला. त्या युद्धास बहुत दिवस लागतील किंवा त्यांत निजामुउलमुलुख मेलाजाईल अशी बादशाहाची व त्या मुलखी लोकांची अटकळ होती. तेवेळेस हैदर कुलीखानाजवळ फौज व सरंजाम चांगला होता, परंतु त्याचे कित्येक विश्वासू लोक निजामउलमुलुखानें वश करून घेतले; तेव्हां तो वेड्याचें सोंग घेऊन दिल्लीस पळून गेला. हें वर्तमान निजामउल्मुलुख समजून तो उज्जनीस राहिला, तेथें त्याचे भेटीस कित्येक गुजराथचे मोठे मोठे मानकरी लोक आले; ते समयीं त्याणें त्यामुलखाच्या बंदोबस्तास ज्यामध्यें धान्यादिउत्पन्न पुष्कळ असे त्यांतील च पांच परगणे आपल्याकडे खासगत

जहागीर करून ठेविले; त्यांत एक दोकल्हा, दुसरा भडोज, तिसरा जंबूसर, चवथा मरवबुलाचाद, पांचवा बलसाड, या प्रमाणें केलें; आणि अमदाबाद देस आपलें काम चालवावया करितां आपला हस्तक पुतण्या ठेवून आपण संनसवाशें तेविसांत माघारा दिल्लीस गेला. तेथें त्याच्या व बादशाहयाच्या स्वभावास पडेना म्हणून तो तें वजिरीचें काम टाकून वकील मुतलखनामें दुसरा अधिकार स्वीकारून राहिला. तथापि त्याचे चित्तास तेथें राहाणें आवडेना तें जालें म्हणून पुढें थोडकेच दिवसांनीं कोणे एके समयीं शिकारीचें निमित्त करून दिल्लीबाहेर निघाला, आणि दक्षिणेंत आपले मुलखीं जाऊन राहिला. त्यानंतर तो आपणास बादशाहाचा चाकर म्हणवी, परंतु तेव्हांपासून स्वतंत्रपणें वागूं लागला, व त्या पुढें पुनः दिल्लीस गेला नाहीं. ते समयीं नर्मदेचे उत्तरेकडचा जितका मुलूख पूर्वी मोंगलांनीं यलें करून घेतला होता तो सर्व निजामउल्मुलुखाचे हातीं लागला.

८ असें हिंदुस्थानचें वर्तमान असतां बाजीराव पेशवेपण पावला. नंतर कांहीं अवकाशानें तो लश्कर घेऊन दक्षिणेंतून खानदेशीं जाऊन तेथचा मोकासेपणाचा वसूल घेत होता. त्याचे मनांत होतें कीं, माळवा मुलूख आपले हस्तगत व्हावा, परंतु त्यास प्रतिवर्षी साताऱ्यास एकवेळ जावें लागत होतें, त्याचे अडचणीमुळें तो त्याचा मनसोबा अकरा वर्षे शेवटास गेला नाहीं. त्याणें पूर्वी संनसवाशें चौविसांचे सुमारें कित्येक वेळां बडोदा प्रांतचा सुभेदार व माळव्यांतून आलेले मोंगलांचे मोठे सरदार यांचा पराभव केला. त्यानंतर्या एकोणतिसाव्या

बाजीच्या पाठीचे दोघे सरदार पुढें सरून मोठ्या शौर्यें करूनलढले तेव्हां दिवसानीं पुढें विख्यात जाले, त्यात एक मल्हारजी होळकर, दुसरा राणोजी शिंदा. त्या वेळेस मल्हारजी होळकर शिलेदारी करीत होता, तो जातीचा धनगर असून त्याचा बाप निगनदीचे कांठचा होळ गांवचा चौगुला. राणोजी शिंदा याचे पूर्वज सातारा जवळ कण्हेर खेडीं रहात होते. तो शिंदा पूर्वी मोंगलांची चाकरी विश्वासपूर्वक करूनमोठ्या पदवीस चढला असतांही पुढें दरिद्रदशा आलीजाली ते ह्मणे तो बाळाजी विश्वनाथाजवळ राहून बारगिरी करीत होता. त्यानंतर बाजिरायाजवळ त्याची ओळाउचला त्याची चाकरी स्वीकारून दिला, मग त्याची दर्दणूक चांगली पाहून त्याणेंत्या मोठ्या पदवीस चढविले. त्याच सुमारें धारचे पवारांचे राज्यहि चढले. त्यांचा मूळपुरुष उदाजीपवार, विश्वासराव त्याचा बाप तो रामचंद्रपंत अमात्यानें योग्यतेस चढविला होता ती धारह्मणजे माळव्यांतून पुरातन मोठा किल्ला आहे

१ बाजीराव फारदिवस असें इच्छीत होता कीं, हिंदुस्थानांतजाऊन मोंगल जिंकावे, परंतु त्यास अवसर सांपडला नाही. मग जेव्हां पिलाजी गाइकवाड गुजराथेंत स्वतंत्र पणें चालूलागला, व उदाजीपवार माळवा मुलूख आणि गुजराथ यात लुडूलागला, व दिल्लीच्या दरबारांत बादशाहाशीं आणि निजामउल मुलुखाशीं बिघाड जाला, तेव्हां तो असें समजला कीं,

---

+ 'त्यांचीं कुळें दोन आहेत, एकाचें नाव कण्हेर खेडकर, दुसऱ्याचें नाव रणदिवे.

हा समज आपल्या कार्यसाधनास योग्य आहे, परंतु त्यास कोणी बाहेरचा मानपत्री नसता प्रतिनिधीच त्या दिवशी कैद्दीस बरकपणा करीत असे. बाजीराव शूर होता, आणि त्याचे बरकपणा पाहून आपणें त्यास राज्यकारभारात बाहेर पाठवून नोकरास असता आपले बरोबर दिल्लीस नेलें. ते समयी कांही मसलत संबंधें बाळाजीविश्वनाथ व जयसिंग राजा जयसिंग या उभयतांची गाठ पडली. त्या योगें बाजिरायाचा व जयसिंगयाचा परिचय जाला होता. असा बाजीराव राज्यकारभार व मसलत व शौर्य यांविषयीं प्रसिद्ध अस्से. तो जातीचा कोकणस्थ ब्राह्मण स्वभावें गोड बोलणें हा त्याचा स्वभाव सिद्ध गुण होता. आणि शिवाई पर्यंत नंतर मराठ्यां सरदारांप्रमाणें प्रवीण असे, परंतु यासाठीं त्यास जें कार्य तें साधून मोठ्या आचारांसंबंध आणि ज्यांत लाभमोठा असे जें कार्य त्यास करावें असा त्याची बुद्धि होती. त्याणें एखादी मसलत केली तर ती दीर्घदृष्टि नेपथ्यि घर्यांतो मोठा अभिमान धरीत असे. त्यासारिखा मसलत देत असे, परंतु प्रतिनिधि राजास त्याणें कीं, असे करणें तें केवळ वेडे पणाचें काम होय. शिवाजीने करनाटकांतील घेतलेला जो मुलूख

आपल्या बापाला गेला तो आधीं घेऊन मग या उद्योगास लागावें. या प्रकारें त्याचें बोलणें पडून अलनां शाहूजवळ कोणे एके दिवशी ते दोघे आपापल्या प्रकारें बोलतांना बाजीरावानें शाहूच्या वडिलांचें शौर्य बहुत वर्णिलें, आणि बोलला कीं, शिवाजीची बुद्धि प्रतिनिधी सारिखी असती तर त्याणें करनाटक घेतल्याची दुर्वी त्याचे मनांत येते कीं, आधीं विजापूर व गोवळकोंडें व्यावें मग हळूच युक्तीनें करनाटकांत प्रवेश करावा, परंतु तें न झालें. तो थोर बुद्धीचा, त्याणें एकदांच करनाटक सर केलें. त्यास जसा पुरातन आणि मोठा विस्तारवंत वृक्ष असतो तो तो बुडाचीं तोडिला म्हणजे त्याचा सर्व विस्तार पानां फुलांसहित हातीं लागतो तसें हें राज्य प्राप्त होईल; त्यास जर मला आज्ञा द्याल तर कृष्णेपासून अटक नदीपर्यंत तुमचा झेंडा मी लावीन. हें बोलणें ऐकून शाहू फार संतुष्ट होऊन लाभाच्या आशेनें युक्त होत्साता बोलिला कीं, तुमचे वडील मोठे कुलीन, आणि तुम्ही ही त्यांचे पुत्र योग्यच आहांत त्या तुम्हाला अटकेच्या पलिकडे ही कदली खंडापर्यंत झेंडा लावावया मी माझी आज्ञा आहे.

१० इकडे मुसलमानांत निजामउल्मुलुख बाहेर गेल्यानें दिल्लीचे दरबारी लोक व बादशाह यांच्या मनां घाताची शंका उत्पन्न होऊन हैदराबादचा सुभेदार मबारीजखान होता त्यास लिहिलें कीं तुम्हीं फौजठेवून निजामउल्मुलुखास त्याचे स्थानीं जाऊं देऊं नका. हें काम तुमचे हातून शेवटास गेलें तरं तुम्हास महासुभे दक्षिणेचा अधिकार मिळेल. असें पत्र व त्या अधिकाराची सनद बरोबर पाठविली.

नार मबारीज खानानें फौज तयार केली, तेव्हां निजाम उल्मुलुखानें त्याशीं तह करावया विषयीं फार उद्योग केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. शेवटीं सन सत्राशें चोविसांचे आठव्या महिन्यांत शाकरखेड्या जवळ उभयतांची लढाई जाली, ते समयीं मबारीज खानानें मोठें शौर्य केलें, परंतु त्याचा जय जाला नाहीं. तो लढतां लढतां मेला. आणि त्याचे दोघे पुत्र मेले व दोघे फार जखमी जाले. तो पडला तेव्हां निजाम उल्मुलुखानें त्याचें शिर कापून दिल्लीस पाठविलें आणि पत्र लिहिलें कीं, स्वामीच्या देवयोगें करून आम्ही हा बंडवाला मारिला.

११ यानंतर निजाम उल्मुलुख हैदराबादेस गेला. तेथे खबाजा आहद या नामें एक मबारीज खानाचा पुत्र होता त्या शीं सल्ला करून गोंवळकोंडा व सर्व इतर किल्ले हस्तगत केले. हें वर्तमान ऐकून दिल्लीच्या बादशाहानें निजामउल्मुलुखाचे दोहों जागचे अधिकार माघारे घेतले. एक गुजराथचा व एक माळव्याचा. त्या दोन जागीं दोघे नवे अधिकारी पाठविले. गुजराथेस सरबुलंदरखान व माळव्यांत राजा गिरधर ने जाऊन त्या स्थानीं पोंहोंचले. त्यांत राजागिरधर यास माळवा घ्यावयाचें अवघड न पडलें; कांकीं, तेथेंको जनकुनी, परंतु गुजराथेंत निजामउल्मुलुखाचा पुतण्या आमेदखान होता, त्याला तें स्थान सुद्धां चून देववेना; आणि आपलें बळ कमी यास्तव तो ती अमदाबाद राजधानी टाकून दोंदमगेला. तेथें कांताजी कदम बांडे नामे एक साहूचा सरदार होता त्यास गुजराथचे चवथाईची आज्ञा हो-

रवबून नो आपल्या कुमकेस घेतला, आणि माघारा उलटून अम
दाबादेजवळ येऊन सरबुलंदखानाचे लश्करा वरोबर लढून
त्याचा पराभव केला; व मजायतखान नामें अमदाबादेंत स
रबुलंदखानानें आपला हल्लक टेविला होता तो मारून टाकि
ला. त्यानंतर त्या मजायतखानाचा भाऊ सुरतेमध्यें फौजदा
री करीत होता, त्याणें पिलाजी गाइकवाड तसमयीं सुरतेज
वळ होता त्याशीं सख्य करून निश्चय केला कीं, आपण उ-
मरचता मिळून आमेदखानास मारूं. याबेतमजकूर पिलाजी
गाइकवाड यास निजामउलमुलुखाचें सांगणें आल
ला पुनरपी आमेदखान यांचें साहाय्य करावें
नें ऐकून घेऊन मनांत विचार ठरविला कीं, आपण फौज
सबळ पक्ष दिलेल तिकडे निकूं मनसुबा त्याच्या बरोबर
निघून नार्यानदीचे पलीकडे आराससावीं पोहोंचला, तो
आमेदखानाच्या लश्करचीं व त्याची गाठ पडली; तेसमयीं मु
रतवाल्या जवळ तोफा फार होत्या त्यामुळें आमेदखानाचा प
राभव होऊं लागला, तेसमयीं पिलाजीनें त्यास सांगितलें कीं,
तुझी त्याचे पाठीस लागावीं तोफा मजजवळ दिंग, म्हणजे त्याचे
पाठीस लागलेले झांकीं तोफांचे गाडे उलटे फिरवून आमें
दखानाचा पक्ष धरिला. तेव्हां सुरतवाल्यांचा पक्ष दोहोंकडू
न पडला नदी त्याणें मोठें शौर्य केलें, परंतु त्याचें लोक फार म
ले गेले, आणि थोडके सैन्य राहिले त्यांस हा वर्तमान ऐकाव
यास अवसर नाही असें पाहून तो आपणास तोडून घेऊन
गेला.

१२ त्या पुढें संवत्सरांत पातशहाचा कोकणी पिलाजी

दोघे मिळून गुजराथची चवथाई घेऊं लागले, परंतु त्या दोघां त मुख्यत्वें कोणी वागावें या विषयीं निरंतर कलह असे. दो वर्षीं खंबायतचे जवळ दोघे लढले, त्या युद्धांत पिलाजी पराभव पावला. तेसमयीं आमेदखानानें विचार केला कीं, एखा दे वेळेस या दोघांतून कोणीतरी माझा पक्ष सोडील, यास्तव त्या णें असा ठराव केला कीं, माही नदीचे आग्नेयी दिशेच्या विभागाची चवथाई पिलाजीनें घ्यावी, व वायव्येच्या विभागाची कांताजीनें घ्यावी. या प्रमाणें नेम जाल्यावर पिलाजी सुरतेकडे निघाला, आणि कांताजी खानदेशामध्यें आपले जहागिरीचे जागीं गेला.

१३ असें आमेदखानाचें प्राबल्य पाहून दिल्लीच्या बादशाहानें तें बंड मोडावयास सरबुलंदखान बरोबर लश्कर देऊन पाठविला. तो मोठा समर्थ होता, आणि आमेदखानानें आपल्या कुमकेस मराठे सरदार बोलाविले ते येऊन पोहंचले नव्हते म्हणून आमेदखान अमदाबादेंत थोडकीशीफौज ठेवून आपण तें ठिकाण सोडून मागें हटला. तो कांहींसा दूर गेल्यावर त्याला वर्तमान कळलें कीं, मराठे माही नदी उतरून आलीकडे आले, मग ते व आपण मिळून पुनः माघा रा उलटून अमदाबादेवर आला, तो शहाजवळ शाहाबागें त जाऊन उतरला. त्याच दिवशीं सरबुलंदखानाच्या लश्करची बिनी आदालच गांवीं येऊन पोहोंचली. मग ते आमेदखान जवळ आहेसा समजून आपल्या भोंवता चर रवणूं लागले, त्यावरून मराठे सरदार समजले कीं, ते आमच्या भया नें हें काम करितात. नंतर आमेदखानानें मराठे सरदारां

[illegible] याहल्यांत याचे लोक व मराठे बहुत मेले, त्यावरून मराठे हल्ला करावयास त्याला पुनः अनुकूल होईनात से जाले. मग आमेदखान पेंढारी लोकां प्रमाणें वागूं लाग ला, त्यावरोबर कांताजी व पिलाजी ही पर्जन्यकाळपर्यंत सुटीत होते, मग पांढऱ्या कावळ्यां कडे गेले.

१४ या प्रमाणें गुजराथचें वर्तमान असतां व मोंगल लोकांत कलह असतांना बाजिरायानें दोनवेळां माऊज्यां-न त्यांच्या घातल्या. तेथे राजागिरधर होता त्याणें कांहीं अड चण केली ती न मानितां दोन्ही वेळां बहुत द्रव्य लुटून नेलें.

भाग चौदावा.

सन सत्राशें सत्रा विलायासून सन सवाशें चाळीस पर्यंत झालेलें वर्तमानें.

१ निजामउल्मुलुखास दिल्लीच्या बादशाहाचें भय ना हीसें न करितां, परंतु मराठे लोक प्रबल्ल होऊन मुलुखांतून मन मानी वसूल घेऊं लागले, त्यामुळें त्याच्या मनांत भीति उत्पन्न झाली, तिच्या निवारणार्थ अंतःकरणांत विचार करूं लागला की, कोणें प्रकारें मराठे लोकांनी वे मनस्वें पडतील, आणि आपल्या राज्याचा बंदोबस्त बांगला होईल, अशी योजना

करीन असतां प्रथमतः त्याच्या कल्पनेस आलें कीं, केल्या बद्दल दुसरें कांहीं द्रव्यादि पुराजवळ कांहीं मुलूख जहागीर करून द्यावा. या शिवाय त्याणें प्रतिनिधीलाही वराड मुलखीं कांहीं जहागीर करून दिली.

२ हें वर्तमान ऐकून बाजिरायास मोठा राग आला. त्या च्या मनांत होतें कीं, निजामउल्मुलुखाच्या राज्यांत आपला प्रवेश आहे तो नाहींसा न झाला, तें प्रतिनिधीनें उलटें केलें, त्यामुळें त्याचें व प्रतिनिधीचें वैमनस्य पडलें.

४ तें वर्तमान निजामउल्मुलुखाला कळतांच त्याणें मनात विचार केला कीं, आपणास या समयीं चंद्रसेनजाधव व गवरंभा निंबाळकर व दाभाडे व पिलाजी गाइकवाड हे सरदार अनुकूळ आहेत, व कोलापुरचा मुख्य संभाजी तो ही वश आहे, त्यास शाहू व संभाजी यांमध्यें पुनः कलह उत्पन्न करावयास हाउत्तम समय प्राप्त झाला आहे. यास्तव त्याणें संभाजीला निमेवसूल मागावयास शिकवून तो कज्जा मोडा वयाच्या मिषेंकरून निढाईतपणें आपण मध्यें शिरून उभय तांस सांगितलें कीं, मला तुमीं दोघे सारिखे, त्यास वसूल तूर्त मजकडे जप्त असूंद्या, मगमी तुमचा न्याय करीन. या प्रमाणें बोलून [illegible]

ण्यांचे दूर केले.

५ असें निजामउल्मुल्कखांचें क्षत्रिय वाजिनचापुढें चालेना. त्याणें शाहूला समजाविलें कीं, हा पक्का ठक आहे, न्याय करणार नव्हे. तुमच्या कलहांत आपला लाभ समजून आपण च हें काम उत्पन्न करून युक्तीनें आंत शिरला आणि तुमचा मुल्कखही घातला. त्यावरून शाहूस बहुत राग येऊन त्याच्या मनांत आलें की. निजामाशीं युद्ध करावयास आपण आंगें जावें. यास्तव बाजिरावास बोलिला की, मी करितों या कामास अंतःकरणपूर्वक तुमचें अनुमोदन असावें. त्यावर त्याणें उत्तर केलें की, आपण हिंदूंचे राजे, त्यास आपल्यासारिख्यांनीं भलभलत पडल्यास बादशाहाशीं लढावें हें योग्य आहे. या कामाविषयीं आज्ञा केल्यास मीसर्व बंदोबस्त करीन. तेव्हां शाहूनें त्या युद्धाविषयीं त्यास मुख्यत्व दिलें. याप्रकरणावरून असें दिसतें की, बाजिरावाची मसलत हीच की, निमित्तमात्र राजा असून राज्यसुख आपणास असावें. झालर ब्राह्मणजातीचा स्वभावच आहे की, आपण चाकर ब्राह्मण चून मुख्यत्व चर्तावें.

यानंतर तिकडे निजामउल्मुल्कखांची तयारी होत असतां बाजीराव त्याच्या अगोदर तयार झाला. मग निजामाच्या लष्करांची गांठ पडल्यावर बाजिरावानें त्याशीं थोडकीशी लढाई करून पळकाढला, आणि असें हारवितेंकीं ब्राह्मण पूर लुटावयास जातो. तो रवाना होऊन शांत शिरल्यानंतर आपले पाठीमागें निजामउल्मुल्कखच आहे,

सा समजून कांहीं सैन्य घेऊन बऱ्हाणपुरच्या वाटेकडे त्याला ढकलावयास पाठविले; आणि आपण अतित्वरेने सैन्यासहित गुजराथेंत शिरून तो मुल्हरखा अगदीं लुटला. आणि नेथचा अधिकारी सरबुलंदखान यास समजाविलें कीं, आली निजामउल्मुलुखाचे मसलतीनेंच हें काम करितों. ६ इकडे बऱ्हाणपुरच्या वाटेवर निजामउल्मुलुखाचे दिवस किमपि यत्न सिद्धि न होतां व्यर्थ गेले. मग तो जलाकीं, आपणास मराठ्यांनीं ठकविलें. नंतर काय करावें न निश्चय केला कीं, आतां दक्षिणेंत जाऊन पुणें जाळून टाकावें. तो आहंमदनरास येऊन पोहंचला नाहीं तों त्याचे वर्तमान कळलें कीं, बाजिरावानें लश्कर सहित कोंकणा रीच्या घाटानें येऊन मुल्हरखा उद्ध्वस्त केला. तेव्हां निजामउल्मुलुख माघारा फिरून गोदावरी उतरून पलिकडे गेला. तेथें बाजिरावानें त्याशीं हलकी हलकी लढाई करून त्यास आपल्या ओंगावर घेऊन अशा जागीं नेलें कीं, ज्या स्थळीं अगदीं पाणी नाहीं त्याठिकाणावर त्याच्या लश्करास घेरा घालून त्याचे लोक जे धान्य तृणादि सामग्री आणावयास जाणारे यांस हरएक रस्त्यांत लागला; मग निजामउल्मुलुखाला तह करणें प्राप्त जालें तो प्रकार असा. बाजीराव त्यास म्हणूं लागला कीं, जो मुलूख पूर्वी संभाजी आमचे हातीं द्यावा व आमचे मराठे वसूल जमा करणारे यांस कोणतीही अडचण पडावी या करितां त्या मुलखांतील किल्ले आमचे स्वाधीन असावे. नंतर निजामानें संभाजी सेरीज करून वरकड कबूल केलें. तेव्हां

जिऱ्याने त्यास सांगितलें कीं, संभाजी आमच्या स्वाधीन असल्यास कांहीं चिंता नाहीं. कांकीं, तो आमच्या धण्याचा भाऊ, त्यास तो आत्मजवळ धण्याच्या मानानेंच असेल. तेव्हां निजामानें कबूल केलें कीं, आलीस पऱ्हाड्यावर पोहंचवून देऊं, नंतर शाहू व संभाजी हे उभयतां एकचित्त होऊन कलहमिटावा. हें वर्तमान संनसत्राशें अठ्ठाविसांत घडलें. त्या पुढें बाजीराव व निजामउल्मुलुख एकमेकास भेटले, तें त्या उभयतांचें परस्परें प्रथमदर्शन.

७ गुजराथेचा सरबुलंदखान याणें दिल्लीच्या बादशा हास बऱ्हत प्रकारें विनंती करून बोलणें लाविलें कीं माझे मुलखाची हेराणगत जाली यामुळें वसूल जमा होत नाहीं, त्यास स्वामींनीं इव्यदेऊन यासमयीं माझें रक्षण करावें. प रंतु बादशाहानें त्या मागण्याचें कांहींउत्तर दिलें नाहीं; आ णि बाजिराव्याचा भाऊ चिमणाजीआपा याणें लश्कर सहित पि टलादेस येऊन त्या शाहराची खंडणी घेतली, व ढोळका परगणा लुटला; व आपल्या भावाचें मागणें आणविलें कीं, आम्हास गुजराथेची चौथ व सरदेशमुखी घाल तर माझा भाऊ तुमच्या मुलखाचें संरक्षण करील, त्यावरून सरबुलंदखानास तें क बूल करणें प्राप्त जालें. मग त्याणें सुरत खेरीज करून सर्वमु लखी काळीचा वसूल व जखातीचावसूल याची चौथ व सरदे शमुखीदिली. आणि अमदाबादशहर संबंधे कांहीं दिलें व कांहीं न दिलें असें संनसत्राशें एकुणपंचासांत झालें. ते समयीं चौथीचा नेम पेनजमेच्या ठरावा प्रमाणें नव्हता. जे वर्षीजें उत्पन्न होई त्याची चौ थाई देत असत. या कलहत मल्हारबांनें आईन हजार रुपे

न मुलखाचा बंदोबस्त राखावा असें कबूल केलें.

८ मग बाजीराव चिमणाजीच्या मदतीसाठीं उत्तरेकडे गेला, तेसमयीं कोला घूर करसंभाजीयाला बाहेर निघावयास सांपडली. तो बरोबर लश्कर घेऊन आपल्या परिवारास हिंदवारणा नदीच्या उत्तर तीरीं उतरला, आणि मुलूख लुटूं लागला. तेसमयीं शाहूजवळ प्रतिनिधि पूर्वी निजामउलमुलुखाशीं मसलत केल्या मुळें आपल्या किमतींतून उतरलेला होता, त्यास असें वाटलें कीं, या समयीं आपण संभाजीचा पराभव केला तर आपली योग्यता कमी झालेली पुनः वाढेल. यास्तव तो जाऊन संभाजीच्या छावणीवर पडला, आणि संभाजी व उदाजी यांस पन्हाळ्याकडे पिटून लाविलें, व त्यांचीं कुटुंबाचीं माणसें धरून आणिलीं. त्यांत ताराबाई व तिचीसून राजसबाई ह्या सांपडल्या त्या साताऱ्यावर नेऊन ठेविल्या. नंतर शाहू व संभाजी यांचा तह झाला त्यांत त्या पैं कितीएक मुलूख शाहूला दिला, शाहूनें ही त्यास दिला. तो प्रकार असा, तुंगभद्रेजवळचें कोपाळ शहर शाहूनें संभाजीस दिलें, त्याबदल आपणास कोंकणचा रत्नागिरी किल्ला घेतला; मग साळशीपासून आंकोलें पर्यंत कोंकण पट्टी कोलापुराकडे लाऊन दिली, आणि संभाजीनें मिरज व तासगांव व आथणी व इतर ही कृष्णेचे उत्तरेकडचे गांव व विजापुराच्या रवालच्या कितीएक गदया शाहूस दिल्या. हें वर्तमान संनस त्राशें निसांत घडलें.

९ नंतर संनमत्राशें एकतिसांत असें झालें कीं, निजाम उल मुलुख पूर्वी बाजिरायास भेटला असतां ही त्याला यापें

नाश केल्याचें स्मरण होतें यास्तव तो आपले आप्तकारकीदितां दुसऱ्याकडून तो सूड उगवावयाविषयीं विचार करूं लागला असतां त्यास खंडेराव दाभाडा त्या कामाचे उपयोगीसा वाटला. त्याचें व बाजिरायाचें पहिलेंच वांकडें पडलें होतें. बाजीराव चौथाईची व सरदेशमुखीची सनद पावला त्या दिवसापासून दाभाडा फौज ठेवावयास लागला होता. त्याणें पस्तीस हजार फौज जमविली, आणि निजामउल्मुलुखाच्या अनुकूलतेनें करून पुढें कुमक मिळेल असें समजून तो दक्षिणेकडे निघावयास सिद्ध झाला. त्याणें लोकांत [illegible] प्रसिद्ध केलें कीं, आमचा धणी मराठ्यांचें राज्य बाजिरायानें घेतलें तें स्वामीचें स्वामीस देववायास जातों; याविषयीं पिलाजी गाइकवाड व कांताजी व रघुजी कदम बांडे व उदाजी व आनंदराव पवार व चिमणाजी* पंडित वगैरे कित्येक लोक मला सहाय आहेत.

या प्रमाणें सेनापति दाभाडे यांकडील वर्तमान असतां बाजिरायानें लोकांस जाहीर केलें कीं, सेनापति निजामउल्मुलुखास मिळून मराठ्यांच्या राज्याचे दोन विभाग करूं इच्छितो हें कर्म केवळ हिंदु धर्मासविरुद्ध आहे. त्यास यासमयीं मा-

---

+ त्या पूर्वी पिलाजी व पंवार यांचीं युद्धें होतीं, परंतु ते या कामाकरितां त्या समयीं एकत्र झाले.

---

* चिमणाजी पंडित हा मोठा उत्पाती असे, त्याणें गुजराथेंत लुटालूट केली, त्यास चिमणाजी हासोदर ही त्याणत.

कोहीं अवकाशानें तो राजा मेला, तेसमयीं त्याचे पुत्र दोघेहो ने त्यांच्या प्रमाणेंच बाजिरावाला त्याणें आपल्या राज्याचा नि मग वांटा दिला.

१४ माळव्या मध्यें महंमदखान बंगष मेल्यावर माळवा व आग्रें या दोहों अधिकारांवर बादशाहानें राजा जयसिंग संनसत्तारों चवतिसांत पाठविला. त्याचा व बाजिरावाचा पूर्वी पासून स्नेह होता, म्हणून तो जागा त्याम मिळाल्यानें मराठे हर्ष पावले; परंतु तो बादशाहाचा हस्तक म्हणून मराठ्यांचे बोलणें सारें स्वीकारीना. नतर त्याच्या पुढचे वर्षी बाजिरावाचें व त्याचें कांहीं बोलणें होऊन त्याणें माळव्याचें राज्य बाजिरायास दिलें, आणि बादशाहास समजाऊन तोही हुकूम

ला.

भागपंधरावा

संनसत्तारों चवतिसां पासून संनसत्तारों चाळीस पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ एथपर्यंत मराठे लोक यांणीं गुजराथेंत कोण कोण न्या प्रकारें प्रवेश केला तें व माळव्यांत आपल्या आधिपत्याचा पाया घातला तें सांगितलें. आतां वराड व कोंकण यांमध्यें न्यांणीं कस कसा संचार केला तो प्रकार थोडक्यांत नंतर सांगतों. तुलजी मराठ्यांनीं मोठी मोठी कर

घेंकेली तीं लिहिली जातील.

२ पेशवा शाहूच्या जवळ नसतां सेनासाहेब सुभा का होजी भोंसला याणें त्याची कांहीं एक आज्ञा मानिली नाहीं, यास्तव शाहूनें त्यास साताऱ्यामध्यें केद केलें, आणि त्याचा नातू रघुजी भोंसला यास तीं पदवी दिली. त्या रघुजी नें पूर्वी गोंडवणांत कोणी एका मुसलमानाजवळ कांहीं दिवस घोडक्या लोकांनिशीं चाकरी केली होती, तो अधिकार लक्षांत घेऊन तो पुरुष प्रसिद्धीस आला नाहीं; परंतु त्यास कांहीं काम संपविलें असतां तो तें काम चांगलें करीत असे; आणि तो शिकारीच्या कामाविषयीं मोठा धीटअसे, यास्तव शाहूनें त्याला आपल्या बरोबर शिकारीस नेई. त्या वरून त्याची फार दीनि झाली, नंतर त्याणें आपल्या चाकरीची बहीण शिक्क्यांची कन्या त्यास देविली; आणि वऱ्हाडची सुभेदारी सांगितली. त्याबद्दल त्याकडून कबूल करविलें कीं, नेहेमीं पांच हजार स्वारांनिशीं चाकरी करावी, व दरमि नऊ लक्ष रुपये सरकार पोत्यास पोहोंचवावे; याशिवाय कधीं पेशवा मोहिमेस निघेल तेसमयीं त्याबरोबर दहा हजार स्वारांसहित जावें, या प्रमाणें त्याणें कबूल केलें. त्या वेळेस त्याचा परम मित्र श्रीपतराव प्रतिनिधि नोगजानें कोंकणांत पाठविला होता, तोजर त्यासमयीं जवळ असता तर आपल्या लेहास्तव रघुजीला इतकें कबूल करूं नदेता.

३ कान्होजी आंग्याचे दोघेपुत्र कोंकणांत असत, त्यांत वडील सरखाजी तो कुलाब्यांत होता, धाकटा संभाजी तो सुवर्णदुर्गीरहात असे. कान्होजी आंग्या जिवंत असतां मुंबई

ईच्या इंग्रजांनीं त्यास जिंकावयाचा मोठा उद्योग केला, परंतु सिद्धीस गेला नाहीं. मग काँक्कोजी मेल्यानंतर त्याचा थोरला पुत्र सरखाजी तो ही मेला. त्यामागें धाकटा संभाजी यानें त्याचे सावत्र भाऊ निघे होते त्यांतल्या वडील आपल्या पक्षी ठेविला आणि त्या पक्षाचा धाकटे दोघे येसाजी व मानाजी यांनी कुलाब्यास पाठविले; त्यांत येसाजीला मुलखाचा बंदोबस्त मागितला, आणि मानाजी किल्याच्या व फौजेच्या बंदोबस्ता मनेमिला. मग त्याउभयतांमध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन मानाजीनें कपटें करून पोर्तुगीस लोकांस किल्यांत आणून येसाजीचे डोळे काढवून त्यास बंदींत ठेविलें. नंतर संभाजी मानाजीच्या पारिपत्यास गेला, तेव्हां त्याणें पेशव्यांचा आश्रय केला, यास्तव संभाजीला माघारें जावें लागलें पेशव्यानें मानाजीची कुमक केली त्या बद्दल त्याणें त्यास कुलाब्या व राजमाची हे दोन किल्ले दिले.

त्या वेळेस जंजिऱ्यामध्यें शिद्दीचा अंमल वसला होता, त्या शिद्दीस मोंगलांनीं शिद्दीयाकुट असें नवें नाव दिलें होतें. त्याशीं व मराठ्यांशीं निरंतर युद्ध प्रसंग होई, परंतु त्या याकुटानें कधीहीं औरंगजेबानें दिलेला आपला मुलूख मराठ्यांच्या हातीं लागूं दिला नाहीं; आणि तो कधीं कधीं शाहूच्या मुलखांतून त्यांच्या घालून खंडणी घेत असे. त्याला जिंकावया विषयीं शाहू व त्याचे दरबारी लोक फार इच्छीत होते, परंतु त्या पुढें कांहीं बन्ध चालेना. तेव्हां कांहीं कपटें करून जिं

---

* काँक्कोजी आंग्रे यांनी संभाजीचा अव्हेरिमोंत मानाजी भोंसले यास पाचवला.

काचा अशी प्रतिनिधीनें मसलत केली. तो प्रकार अमा, त्याशि
दीजदच त्याचा परम विश्वास्, याकुबखान नामें मुसलमान
असे, तो मसुद्दांत चांचेपणा करून मोठा विख्यात जाला होता.
त्याचे वडील व तो युहागरचे पाटील, ते जातीचे कोळी. त्याचे
लहानपणीं त्याला मुसलमानांनीं स्वारीं घालून धरून नेलें,
आणि आपला धर्म शिकविला. तो प्रतिनिधीनें वश केला,
मन त्यास सांगितलें कीं, शिद्दीचें आधिपत्य नाहींसें जालें
अशा यांनले कांहीं किल्ले आत्यास देऊन बहुतेक राज्य
हस्तगत करावेंस. ही मसलत सिद्दीस न्यावयाकरितां प्रति
निधीबरोबर लश्कर देऊन नेनसत्राशें तेहतिसांमध्यें कोंक
णांत पाठविला. तेव्हां शिद्दीच्या मुलखांत गरीबगुरीबर
वर लोकांसमाचउपद्रव जाला, परंतु किल्ला त्याचे हातीं
लागला नाहीं. त्या शिद्दीपुढें प्रतिनिधीचें बळ कांहींच चा
लेनासें जालें. तेव्हां तो तेथून चिपोळणास जाऊन उतरला,
आणि गोवळकोट किल्ल्यामध्यें आपले लोक ठेविले; तेथें
ही शिद्दीनें छापा घालून तो गोवळकोट घेतला. अशी
त्याणें प्रतिनिधीची दुर्दशा केली. हें वर्तमान समजून शाहूनें
त्याचे कुमकेविषयीं चिमणाजी आपास आज्ञा केली, परंतु तो
एकसा दोघटीं प्रतिनिधि रुष्ट होऊन माघारा सातान्यास आ
ला.

४ त्याच सुमारें जंजीऱ्याचा शिद्दी मेला. त्याचे पुत्र पुष्क
ळ होते, त्यांत वडील शिद्दी आबदुलखान नामें होता, त्याचे भा
कंट नाऊमारे एक शिद्दी रहिमान खेरीज करून मिळून त्याणीं

शिद्दी रहिमान त्याचे ऐस जंजीऱ्यांत मरतां.

त्यास जिवें मारून टाकिलें. हें वर्तमान याकुबास कळल्यावर त्याणें शिद्दीरहिमानाचा पक्ष धरून शाहूला सेन सत्राशें पस्तिसांत कुमक मागितली, त्यास शाहू अनुकूळ जाला. यावेळेस बाजीराव माळव्याहून येत होता त्यास आज्ञा केली कीं, दंडाराजपुरीं जावें; या शिवाय दुसरे जे रिकामे लश्करी लोक होते त्यांस सांगितलें कीं, तुम्ही जाऊन बाजिरावास मिळावें. तो बाजीराव कोंकणांत गेल्यावर शिद्दीरहिमान व याकूब हे त्यास मिळाले. मग तळें व घोंसाळें हे दोन किल्ले घेतले. इतक्यामध्यें प्रतिनिधीही मागून येऊन पोहोंचला, त्याणें येतांच रायगड घेतला. कां कीं, तेथच्या किल्लेदारास याकुबा नें अगोदरच किल्ला द्यावयास सांगितलें होतें.

त्यानंतर ज्यांनीं आबदुलरवान मारिला त्यांतील एक भाऊ शिद्दीरत्यान नामें येऊन बाजिरावाशीं लढला तो मेला गेला. नंतर पेशव्यानें जाऊन जंजीऱ्यास खुसकी करून मोरचे लावून तोफांचा मार चालविला, ते समयीं मानाजीआंग्याही येऊन समुद्रांतून किल्ल्यास तोफा मारूं लागला. असें असतांही बाजिरावानें सुमार पाहिला कीं, हा किल्ला लवकर सर्वथा हातीं लागणार नाहीं, आणि आपण फारदिवस कोंकणांत राहिलों असतां मोठ्या मोठ्या मोहिमांचीं कामें रहातील. यास्तव त्याणें तेथचे शिद्दी सल्ला करावयास सिद्द आलेसे पाहून सल्ला केला. तो प्रकार असा, तेथें शिद्दीरहिमानाचें मुख्यत्व असावें, व त्याणें अकरा महालांचें उत्पन्न अर्धें घावें, व मराठ्यांस रायगड व तळें व घोंसाळें व उंचितगड व विशाळगड हे किल्ले असावे. बाजीराव तें युद्ध असें शेवटास

नेऊन मोठा विख्यात होऊन सातार्‍यास गेला. तेथें शाहूनें ला बाजिरावानें घेतलेल्या रायगड इत्यादि ठिकाणांची सुभेदारी त्यास दिली.

* माळव्याहून बाजीराव निघाल्यावर त्याचा सरदार मल्हारराव होळकर लश्करसहित नेर्‍यें होता तो आपल्याचे पलिकडे ही त्यांच्या घालून लुटीत गेला. तेसमयीं दिल्लीचे बादशाहाचा वजीर खानडौरान नामें होता, त्याच्या मनांत आलें कीं, सल्लाकरून मल्हारराव यास मागें फिरवावें; परंतु तो हें नसमजला कीं, बंडाचें पारिपत्य केल्यावांचून आपीं लहकरणें ठीक नव्हें. मग त्याच्या मनांत विचार होऊन त्यानें आपला भाऊ बरोबर फौज देऊन मोठा भयंकर आकार दाखवून शत्रूस नर्मदेच्या पार करावयास पाठविला. तो निघाला तेसमयीं दिल्लीच्या सर्वलोकांस हाजय पावेल असा भरंवसा होता, परंतु त्याचा तो खटाटोप व्यर्थ जाला. तें लश्कर सरोंज पर्यंत जाऊन मागें फिरलें, आणि दिल्लीच्या लोकांस दाखविलें कीं, आपण मोठा पराक्रम केला. इकडे मल्हारराव त्या बरोबर सहज हलकें हलकें लढावयास थोडकेसे लोक पाठवी, ते दिवसास त्याशीं कांहींसे लढत आणि पळत. मग रात्रीस जाऊन त्याच्या डेर्‍यावर बाण टाकीत. त्या मल्हारराव्यानें आपणतर सैन्याच्या मोठ्या समुदायासुद्धां उद्योग करून त्या मुलखाच्या वसुलाची जमा आपला धनी बाजीराव याजकडे पाठवावयाचें कामचालविलेंच होतें. माळवे मुलखीं व चंबळा नदीचे दक्षिणेस मोंगलांचे हातीं किल्लेएक कि ल्ले होते, तथापि मुलखाच्या नाशाचा बंदोबस्त त्यांचानें कर

वेना. मराठयां खेरीज गोट्टिले लोकही त्यासुलत्वीं त्यांच्या घालीन होते. या शिवाय गुजराथेंतही मल्हारजी एकाएकीं त्यांच्या घालून आमदाबादेचे उत्तरेकडचे कितीएक गांव लुटून माघारा फिरला.

६ बाजिरावानें फौज फार ठेविली यास्तव तो बऊतांलो कांचा कर्ज भरू जाला. मग ज्या सावकारांनीं पहिल्यानें पुष्कळ कर्ज दिलें होतें ते अर्णिक देईनातसे जाले; व त्याच्या लष्करी लोकांचा रोजमुरा फार थकला, तेणें करून ते लोक त्याच्या आज्ञेंत अंतर पांडूं लागले, असें संनसत्तावीसों छत्तिसां त घडलें. नंतर त्याणें माळव्याची चौथ व सरदेशमुखी यांचा ऐवज जमा करून राजा जयसिंग याचे योगें बादशा हापासून माळवा मुलूख आपणास पृथक् मागितला. या खेरीज सरबुलंदखानानें गुजराथची सरदेशमुखी देऊंके ली होती तिची आज्ञा झाली असें मागितलें. तेव्हां बादशा ह व वजीर या उभयतांच्या मनांत आलें कीं, या प्रमाणें द्यावें, परंतु त्याचे सरदार तुराणी मोंगल यांच्या मनांस येईना, स्तव्हा णून खानडौरानानें आपला वकील कांहीं बोलणें करावया स बाजिरावाकडे पाठविला, त्याचे हातीं चौथ व सरदेशमुखी यांची सनद गुप्त देऊन सांगितलें कीं, तसा समय पाहून सासही

+ त्यावेळेस त्याणें कोणा एका महापुरुषास पत्र लिहिलें कीं, हाचीं मी अडचणींचा देणेदार होऊन माझी कुलर ओढजाली, हीच मला नरक यातनाही वाटते, आणि सावकार व शिलेदार यांच्या पायां पडतां पडतां माझ्या कपाळाचे कांतडें गेलें.

सनद द्यावी. असें असतां खानडौरानाजवळ बाजीराव याचा वकील होता त्यास तें वर्तमान कळलें, त्याणें पेशव्यास ती बात मी पोहंचविली, तें समजतांच बाजिरावाच्या मनांत आलें कीं, ते आपणास भितात, त्यास आणखी काहीं मागावें. हा तर ब्राह्मण जातीचा स्वभाव आहे कीं, कोणी प्रथम कांहीं द्या वयास सिद्ध जाला म्हणजे अणीक अणीक मागत असावें. त्यावर बाजीराव त्यापाशीं फारच मागूं लागला, तो प्रकार असा, प्रथम संपूर्ण माळवा जहागीर द्यावा, व किल्ला मांडू व किल्ला धार व किल्ला रेभीन; व चंबळा नदीचे दक्षिणेचा मुलूखवया ची जहागीर व फौजदारी द्यावी; व पन्नास लक्ष रुपये बादशा हानें आपल्या खजिन्यांतून द्यावे. या शिवाय दक्षिण सहा सुभ्यांची सरदेशपांडेपणाची सनद द्यावी, असें मागितलें.

६ यानंतर बादशाहानें सांतून सहासुभे दक्षिणेचें सरदे शपांडेपणमात्र दिलें, आणि याबाबद सहालक्ष रुपये नजर घेतली. केवळ सहासुभ्यांचें देशपांडेपणच पेशव्यास मिळालें हें तरी निजामउलमुलुखाच्या द्वेषास्तव खानडौरान यानें देवविलें. कांकीं, सहासुभे दक्षिणेंत निजामउलमुलुखा ची सत्ता होती. मग निजामास फार वाईट वाटलें तेसमयीं त्या-ला बादशाह च मोंगल यांणीं लिहिलें कीं, तूं दिल्लीस लवकर ये, न आलास तर मुसलमानाचें राज्य बुडेल. तेव्हां निजामउ लमुलुखानें विचार केला कीं, आपणास बऱ्हाणपुरावर सहा

+ सरदेशपांडेपणाचा हक्क सरदेशमुखी सारिखाच आहे, परंतु त्यांत प्रभेदेशीं कडा पांच रुपये.

यजे मराठे लोक त्यांचीं लढावें असें जालें, अमी काय होईल तें होऊ, इतके होऊन तो दिल्लीस गेला. तेथें अनेक प्रकारें त्याचें मनवश करावया विषयीं बादशाहानें उद्योग केला. तो असा, त्याचा वडील पुत्र गाजिवदिन त्यास गुजराथचा व माळव्याचा अधिकार दिला, त्या शिवाय सर्व मांडलिकांनीं त्याच्या हातारवालीं वागावें असें सांगितलें. याप्रमाणें होऊन निजामउलमुलुखाजवळ फौज चवतीस हजार जमली, त्यावेरीज तोफखानाही फार चांगला होता.

इकडे बाजीराव ही आपली फौज जमा करून निघाला तो नर्मदेसजाऊन पोहंचला, तोपर्यंत त्याजवळ ऐशी हजार फौज जमली. तरी त्यांत रघुजी भोंसला व दाभाडे व यशवंतराव व सेनापतीचा कोणी सरदार हे नव्हते.

बाजिरायानें बादशाहापाशीं अभयपद मागणें केलें, त्यावरून त्यादरबारीं असें ठरलें कीं, फार मोठें लश्कर तयार करून त्यास भय दाखवावें. नंतर त्यांणीं दिल्लीच्या सभोवतें पुष्कळ लश्कर जमा केलें, तें ऐकून बाजिरावानें आपल्या लश्करचें जडजुड सामान आपला मित्र जगतराजा नामा बुंदेलखंडचा राजा त्याजवळ ठेवून बरोबर हलकें सामान घेऊन आग्र्या पासून विसां कोसांवर दक्षिण दिशेस यमुनेचे कांठीं जाऊन उतरला. ते समयीं त्याचा सरदार मल्हारराव होळकर व दुसरेही मराठे सरदार यमुने पलीकडे दुवाब येथें उपद्रव करूं लागले; तेथें अकस्मात् मोंगलांचें लश्कर येऊन त्यांस यमुना पार केलें. त्यावेळेस बाजीराव ही तीजागा ठीक नाहींजी समजून तेथून निघून ईशान्य दिशेस चालिला. तेव्हां ते मोंगलांचे

सरदारांशी बादशाहास लिहिलें कीं, आम्ही सर्व मराठे चंबळा नदीपार केले, ते आपल्या मुलखीं गेले, तेव्हां दिल्लीमध्यें लो कांस मोठा आनंद जाला; आणि खानडौरा नजवळ बाजि रावाचा वकील होता त्यास निघून जा अशी आज्ञा जाली. त्याणें जाऊन तें वर्तमान बाजिरावास कळविलें, तेव्हां तो बोलिला कीं, पाहा आतां आमचे मराठे लोक दिल्लीच्या दरवा ज्या जवळचीं घरें जाळितील, तें पाहून बादशाहास कळेल कीं, अद्यापि मराठे हिंदुस्थानांत आहेत.

२ मग तसाच निश्चय करून रोज वीस वीस कोस म जल करीत आडवाटेनें एका एकीं दिल्लीचे दरवाज्या जवळ लश्कर सहित जाऊन डेरा दिला. तेव्हां कितीएक हत्तीव कितीएक उंट शहरा बाहेर आले होते ते धरले, व कितीएक हिंदु लोक ही दिल्लींतून बाहेर देवदर्शनास जात होते ते धरून लुटले; परंतु कोणाची घरें जाळिलीं नाहींत, कांकीं, असें केल्यास बादशाहाचा राग होऊन पुढें तह करावयास अडथळा पडेल; आणि लूट जमा केल्यानें पळून जातां येणार नाही. यास्तव बादशाहास पत्र पाठवून सल्ल्याचा प्रकार द र्शिवला. अशी त्याची सुशीलता पाहून दिल्लीचे कितीएक मानकरी लोक धैर्य करून आठ हजार लश्कर बरोबर घेऊ न युद्धास निघाले, त्या युद्धांत मोंगलांचा पराभव जाला, म राठ्यांचा इझाजीकदम नामें एक सरदार व थोडके से लोक प डले. या प्रमाणें बाजिरावाचा जय जाला तरी तो असें स मजला कीं, मोंगलांचे लोक चहूंकडून लवकर जमा होतील, या-स्तव रात्रीसच निघून गेला. तो ग्वाल्हेरचे वाटेनें रेवारी च मं

दावरा करून चालिला. त्याचे पाठीमागें मोंगलांचे कोणी सर शर लागले नाहींत. मग त्यास कळलें कीं, यावेळेस आपण दक्षिणेंत अवश्य जावें. त्यावेळेस खानडोराननें बाजिराव स सांगून पाठविलें कीं, माळव्याचा अधिकार व तेरा लाख रुपये कबूल आहेत. तेव्हां पेशव्यानें त्याजवळ आपला वकील फिरून पाठविला. मग आपण साताऱ्यास जाऊन रा जाची भेट घेतली, आणि तत्काळ तेथून निघून कोंकणांत गेला.

१० तेथें संनसवाशें सदतिसांत कुलाबा घ्यावया करितां मानाजीला पोर्टुगीस लोक अनुकूळ होऊन कुलाबा त्याच्या हातीं लागला; परंतु त्याणें त्यांस घ्यावया करितां जो मुलुख कबूल केला होता तो देईना, यास्तव पोर्टुगीस लोक संभाजी आंग्र्यास मिळून मानाजीपासून कुलाबा घ्यावयास सिद्ध जाले. त्यांच्या निवारणार्थ पेशवा गेला, त्याणें तें कार्य सिद्धीस नेऊन त्यांपासून सात हजार रुपये रोख व तीन हजार रुपयां चें सामान, कांहीं विलायती व कांहीं चिनायी, प्रतिवर्षीं घ्यावें अ सा करार ठरविला.

११ संनसवाशें अडतिसांत बाजीराव नर्मदा पार गेला, त्यावेळेस निजामउल्मुलुख सरोंजेस होता. त्याणें तेव्हां समर्थी शत्रूवर चालून जावें हें योग्य होतें, परंतु तसें न करितां तो चांग ला जागा पाहून भोपाळा जवळ बाजीरावाची वाट पाहात राहि ला. तेथें त्याच्या लश्कराला पुढचे आंगीं ओढा होता व पाठी मागें मोठें नळें होतें, या प्रमाणें आश्रय पाहून राहिल्यामुळेंच तो पराभव पावला असें दिसतें. कांकीं, मराठे लोक तेथें जाऊ

न पोहंचतांच सांस घाटलें कीं, याणें बडबकट स्थळ धरिलें, तस्मात् याच्या मनांत भय आहे. त्यावरून त्यांहीं त्याच वेळे स हल्ला केला, तेव्हां निजामाकडचे रजपूतलोक पांचशों पडले, व घोडे सातशों मेले; मराठ्यां कडील शंभर पडले, व तीनशों जखमी जाले. ते समयीं बाजीराव तेथून जवळच दोन बाणांच्या टप्यांवर उभाराहून संधि पहात होता, ती अशी कीं, निजामउल्मुलुख आपली जागा सोडून निघाला त्रण जे त्यावर लष्करासुद्धां एकाएकीं पडून त्याचा अगदीं पराभव करावा, अशी आशा धरून राहिला असे, परंतु त्याणें ती जागा सोडिली नाहीं. मग याच्या हातून इतकें मात्र जालें कीं, याणें आपल्या लष्कराच्या टोळ्या सभोंवत्या बसवून निजामा च्या लष्करास धान्य तृणइत्यादि मिळेनासें केलें. असें निजाम मात्र संकट प्राप्तजालें, तें वर्तमान दिल्लीस कळल्यावर त्याचे मुक्ते विषयीं तेथें तयारी होऊं लागली, परंतु बाजिरावास वि दित होतें कीं, तेथचा मुख्य कारभारी खानडौरान तो निजा माचा द्वेषी यास्तव तेथून धांवणें लवकर येणार नाहीं, कदाचित् हैदराबाद व औरंगाबाद यांतून कोणी मदत येतील. तरत्यांचे निवारणार्थ मात्र बाजिरावानें रघुजी भोंसल्यास बहुत आर्जवें करून लिहिलें कीं, सोनगडीं सेनापति आहे त्याला माझे मद तीस लवकर पाठवावें. असेंच शाहूनें ही बाजिरावाच्या साहा य्यार्थ आज्ञापत्र आपल्या हातचें भोंसल्यास पाठविलें, परंतु त्याणें ऐकिलें नाहीं. बाजिरावाचा भाऊ चिमणाजी आपा तें मात्र लोक जमा करून तापीच्या कांठीं राहिला होता, त्यास बाजिरावानें लिहिले कीं, त्वा समयीं तुला फौज मिळेल तित

की जमाकर व दक्षिणेंत बोलावणीं पाठवून फत्तसिंग भोंस
ले व संभूसिंगजाधव व सरलश्कर यांस आण, बांडे व दा
भाडे व गाइकवाड हे गुजकडे येत नसल्यास तूं आपल्याज
वळ ठेवून दे, आणि तापीवर ऐस; जर या वेळेस सर्व मराठे
एकचित्त होऊन मला अनुकूळ झाले तर मुसलमान लोकां
स दक्षिणेंतून हांकून द्यावयाची संधि हीच आहे.

निजामउलमुलुख अशा अडचणींत पडला तेव्हां तीजा
गा सोडून कांहींसा दूर गेला, परंतु त्याजवळ तोफखाना
वगैरे बरोबर असून सरंजाम होता त्यामुळें निघून जावयास ठीक
पडेना, म्हणून तो माघारा फिरून भोपाळ किल्ल्याचे कोटांत
गेला; ती जागा पुरेशी नव्हती म्हणून कांहीं लोक बाहेर रा
हिले. तेसमयीं बाजिरावाजवळ तट पाडावयाजोग्या तो
फा नव्हत्या, तथापि त्याणें बाण टाकून व बंदुकांचा भडिमार
करून त्यास अमें बेजार केलें कीं, आपण कोणत्यातरी प्र
कारें निघून जावेंसें त्यास झालें. तेव्हां त्याणें आपलें जड
सामान भोपाळ व इस्लामगड येथें ठेवून आपणा बरोबर
कांहीं तोफा व उंटावरच्या जेजाला घेऊन बाहेर निघाला. ते
वेळेस मराठ्यांनीं त्याचा तोफखाना हल्ला करून घ्यावयाचा उ
द्योग केला, परंतु तो सिद्धीस न जातां त्या तोफा व जेजाला यां
च्या आश्रयेंकरून ते मोंगल लोक रोज दोन कोस असे धिमे
धिमे चालीनें जातांजातां दोराई सगई गांवा पावेतों पोहंच
ले. तेथें मोंगल व बाजिराव यांचा सामना झाला, त्यांत असें
ठरलें कीं, बाजिरावास चंबळ व नर्मदा या दोहों नद्यांमध्यें
जो मुलुख आहे त्याचें आधिपत्य प्राप्त व्हावयास बादशाहास अनुकूलक

रावें, याशिवाय पन्नास लक्ष रुपये दंडा बाजिरावास द्यावे.

१२. यानंतर बाजीराव चंबळा नदीचे दक्षिणेस मुलखा ची खंडणी घेत राहिला; इतक्यांत व्यंकटराव घोरपडा कोंकणामध्यें पोर्टुगीस लोक यांचें पारिपत्य करावयास किती एक स्वार घेऊन गोंव्याकडे चालिला, दुसरा खंडोजी मानकर कोंकणचे उत्तरेस लढकर सुध्धां साळोकांचे किल्ले घ्यावया स निघाला, त्यांशीं त्या पोर्टुगीस लोकांनीं कारशोर्यें करून युद्ध केलें; परंतु मराठ्यांचे कितीएक मुख्य सरदार चिमणा जी आपा व होळकर व शिंदे वगैरे सरंजाम घेऊन कोंकणांत गेले होते, त्यांशीं युद्ध करतां करतां पोर्टुगीस लोक बऱ्हुतेक मेले गेले. तेसमयीं प्रायः त्यांचे किल्ले मराठे लोकयांणीं घेतले.

त्यावेळेस मुंबई शहर हें लहानसें गांव होतें, त्यांत इंग्रेज लोक असत, त्यांशीं व पोर्टुगीस लोकांशीं कांहीं वैमनस्य पडलें, यास्तव त्यांस दुसपणें मराठ्यांचा पक्ष होता; त्यावैमनस्याचें कारण असें, सोळाशें एकसष्टांत इंग्रेजांचा बादशाह याणें पोर्टुगाल मुलखाच्या बादशाहाचे कन्येशीं विवाह केला, तेव्हां याणें त्या जांवयास मुंबई व त्या संबंधें मुलूख व आंदणा मध्यें दिला. त्यानंतर दुसरे वर्षी इंग्रेज लोक पांचशें मुंबईस आले, आणि पोर्टुगीस लोकांपाशीं साष्टी मागूं लागले, तेव्हां ते म्हणाले कीं, साष्टीशीं आणि मुंबईशीं संबंध नाहीं, हें वेटन्च निराळें आहे, असें बोलून साष्टी देईना न. शेवटीं त्यांपासून मराठे साष्टी घेऊं लागले तेव्हां इंग्रेजकांहींसा दुर्भ पावले. कांकीं, ते असें समजले कीं, मराठ्यां पासून

पुढें कधीं तरी हें स्थान आपणास प्राप्त होईल, आणि हाली याचें पारिपत्य ही जालें.

१३ या प्रमाणें कोंकणांत पोर्टुगीस लोकांशीं आणि मराठ्यांशीं युद्ध होत असतां सेनासाहेबसुभा याच्या पुतण्यानें कोणाची आज्ञा न घेतां हिंदुस्थानांत अलाहाबाद पर्यंत स्वाऱ्या घालून मुलूख लुटला, तेणें करून बाजिरावा सरकार राग येऊन त्याणें त्याच्या पारिपत्यास औंजी कावरे नामें सरदार पाठविला, त्याला रघूजी भोंसल्यानें जिंकिलें, मग बाजीराव त्यांचा सूड घ्यावयास निघाला.

१४ तेसमयीं त्याला वर्तमान कळलें कीं, ढाराशी लोकांचा नादरशाह नामा बादशाह दिल्लीस येऊन मोंगलांचा पराभव करून दिल्लीबादशाहाची खंडणी बादशाहाकडे मागूं लागला, व खानडौरान मृत्यु पावला. मग तेथून पुढें गेला तों दुसरें वर्तमान समजलें कीं, त्या नादरशाहानें दिल्लीच्या बादशाहास कैद करून तेथंच राहाणारे लोक आठ दहा हजार सुमारें मारिलें, आणि शहर लुटलें. हें ऐकून बाजिरावास मोठा विचार पडला, आणि त्यास असें वाटूं लागलें कीं, हाजो कोण मोठा शत्रू उद्भवला आहे, या पुढें मेनासाहेबसुभ्याचा पुतण्या व रघुजी भोंसला यांचें पारिपत्य करावयास जाणें हें केवळ कनिष्ठ कार्य, व पोर्टुगीस लोकांशीं युद्ध करणें तेंही अल्पक्षय; कदाचित् तो बादशाहास मारून आपणच गादीचा अधिकारी होईल. त्या पुढें तिसरें वर्तमान आलें कीं, एक लक्ष ढाराशी जमा होऊन दक्षिणेस येत आहेत. तरी तो कि मपि नभितां पुढें गेला, तेसमयीं त्याणें आपला भाऊ चिमणा

जी आपाही कोंकणांतून बोलावून घरोघर घेतला; आणि सर्व लोकांत विदित केलें कीं, जे कोणी हिंदु व मुसलमान असतील त्या सर्वांनीं येऊन माझें साह्य केलें असतां शत्रूस घालवून देतां येईल. मीतर आपले मराठे लोक या कार्या करितां नर्मदा नदीपासून चंबळा नदीपर्यंत पसरणार. अशी बाजिरायानें तयारी केली, तों होळकर व शिंदा हे दोघेही त्यास येऊन मिळाले. तेव्हां असें वर्तमान आलें कीं, तो नादरशाह आपल्या संतोषानें दिल्लीचें तख्त बादशाहास माघारें देऊन लश्कर सुद्धां निघून आपले मुलखीं गेला. तेसमयीं त्याणें बाजीराव व शाहू व दुसरे जे कोणी हिंदूंचे मांडलिक संस्थानी होते त्यांस पत्रें पाठविलीं कीं, मी हा बादशाह पुनः तख्ताधिपति केला, इतःपर हा मला बंधूसमान याला व तुम्हीं सर्वांनीं याचे आज्ञेत वागावें; जर कोणीं याची आज्ञा मान्य न करील तर पुनः मी माघारा येऊन त्याचें पारिपत्य करीन.

१५ पोर्टुगीस लोकांचीं व मराठ्यांचीं कोंकणांत युद्धें जालीं त्यांत मराठ्यांनीं वसई किल्ला घेतला. त्या युद्धांत परस्परें लढण्याचे कसबाची पराकाष्ठा जाली, त्यानंतर तसा यत्न मराठ्यांनीं केलाच नाहीं. सन सत्राशें एकुणचाळिसांच्या दुसऱ्या महिन्याचे सतरावे तारिखेस चिमणाजीआपा पाचा चिनीवाला शंकाजीनारायण याणें वसई किल्ल्यास खुमकीवरून घेरा घातला, व त्या किल्ल्यास ज्या आंगीं पाणी आहे तेथें मानाजी आंग्रे येऊन त्याणें तो घेरा पुरा केला. तेव्हां तेथला किल्लेदारानें आपणें होऊन विनंती केली कीं,

तुल्ही जंजिऱ्याच्या शिद्दीशीं जसा करार केला तसाच आह्मा-शीं कराल तर किल्ला देतों, परंतु चिमणाजीच्या मनास ती गोष्ट येईना; कां कीं, त्यास असें वाटलें कीं, असलें चळकट स्थळ यांचे हातीं असलें तर आह्मीं घेतलेला जो मुल्हरख आहे तो हे आमचे मागें माघारा घेतील; आणि पर्जन्य काळाच्या पू-र्वी हें काम शेवटास न गेलें तर हा सर्व उद्योग व्यर्थ जाईल, या करितां अनेक प्रकारें यत्न चालविला; तो असा, मैदाना मध्यें जागोजाग मोर्चे बांधून एका मोर्च्याहून दुसऱ्या मोर्चा स किल्लेकऱ्यांच्या तोफांचा मार चुकवून जावया करितां ज मीन खणून मोठे मोठे चर पाडून वाटा केल्या; तेव्हां किल्ले कऱ्यांनीं गरनाळांतून कुलपी गोळे व दगड वगैरे भरून त्या चरांच्या वाटेवर टाकून रोज रोज ते लोक बहुत मारिले; व त्या किल्ल्यांत तोफा बहुत होत्या, परंतु मराठ्यांनीं फार तो फांचा भरणा आणून त्यांच्या तोफांचा उपाय चालेनासा के ला. मग किल्ल्याच्या तटाला भोंक पाडिलें, परंतु त्यांतून आंत शिरतां येईना, तेव्हां किल्ल्यांत जावयास पुरेशी वाट व्हावी ह्मणून त्या कोटा खालीं सुरुंग पाडूं लागले.. तेव्हां कि ल्ले कऱ्यांनीं त्या सुरुंगाच्या सुमारें आंतून सुरुंग पाडून त्यांचा यत्न व्यर्थ केला. असें बहुत वेळा जालें; शेवटीं मराठ्यांनीं म सलत केली कीं, एकदांच पांच सुरुंग उडवून तटास मोठें खें-डार पाडावें ह्मणजे मार्ग मोठा होईल.

नंतर पांच सुरुंग तयार केले, त्यांत तीन जवळ आणि दोन दूर. त्या दोहोंतल्या एकाला पहिल्यानें आग घातली, तो चांग-ला उडाला नाहीं, मग जे सरसे मरसे तीन होते त्यांस एकदां

च आग घातली, तेव्हां त्यांतील दोन उडाले नेणें करून खें-
डार मोठें पडलें. तेसमयीं मराठे किल्लांत शिरावया करि
तां जवळ गेले, तों तिसरा सुरुंग उडाला, त्यांत ते सांपडून
फार मेले गेले. दरम्यान किल्ले कऱ्यांनीं गरनाळांच्या गोळ्यां
नीं व बंदुकांच्या मारानें फार हैराण केले, त्या वेळेस ते सर्व
मराठे मागें हटले. तेव्हां किल्ले कऱ्यांनीं त्या खंडारांतून च
ढून आंत जावयाचा उपाय चालूं नये असा बंदोबस्त केला
त्या नंतर पांचां सुरुंगां पैकीं एक राहिला होता त्याचें काम म
ल्हारराव होळकरानें पक्कें केलें होतें, त्यास आग घातली,
तेव्हां तो चांगला उडाला, त्याणें अर्धा बुरूज कोसळला. ते
समयीं मराठ्यांनीं मानक्यान हल्ला केला, तेव्हां पोर्टुगीस लो
कांनीं मातीच्या दोपल्या भिंती सारख्या रचून तेथून तोफा लागू
करून आपला जीव बांचविला, व मराठ्यांस जवळ येऊंच
दिलें नाहीं. मग त्यांस खाण्या पिण्याचा तोटा पडून ते वकून. अ
नी जाले, व त्या युद्धास आरंभ होऊन तिसरा महिना भरला.
अशासमयीं त्यांहीं मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें; त्यांत
असें ठरलें कीं. आठां दिवसांत पोर्टुगीस लोक आपलीं मुलें
माणसें काढून किल्ला रिकामा करून देतात. त्या किल्ल्याच्या
युद्धामध्यें मराठ्यांचे लोक पांच हजारांवर मेले, पोर्टुगी
सलोकांचे मेलेले व जखमी मिळून आठशें जाले. या यु
द्धाशिवाय कोंकणांत मराठे व पोर्टुगीस लोक यांचीं युद्धें
जाली त्यांतदेखील मराठ्यांचें माणूस बारा चौदा हजार सु
मारें मेलें.

१६ फारशी लोकांचा बादशाह याणें दिल्ली सोडल्यानं

नर बाजिरावानें दिल्लीच्या बादशाहाचे प्रसन्नते विषयीं मो
क्या गारवाचें पत्र लिहिलें व शंभर मोहरा नजर पाठविल्या,
नंतर बादशाहाकडून बाजिरावास बऊमानाचें उत्तर व व
स्त्रालंकारादि उत्तम प्रकारचें प्राप्त जालें; परंतु निजामाच्या
बोलण्याप्रमाणें माळव्याची सनद मिळाली नाहीं, त्यावरून
पेशवा याणें निजामास घातकी जाणून मनांत विचार केला
कीं, सर्व दक्षिणेंत निजामाची सत्ताच नाहींशी करावी. या
वेळेस निजाम आणि त्याचे बऊते क लोक हिंदुस्थानांत
होते, यास्तव त्या कार्यास ती संधि उत्तम होती, परंतु तेस
मयीं बाजिरावाचे मोठे मोठे सरदार लश्करांसहित कोंकणां
तून आले नऊते, म्हणून बाजीराव माळव्याचा बंदोबस्त
करीत राहिला, व त्या मुलखाचे पश्चिमेस चंबळेचे कांठीं
कोटा पासून आलाहाबाद पर्यंत मुलखाचा अधिकारी
रजपूत त्याशीं स्नेह रक्षून होता. त्यांत विशेष इतकाकीं,
बुंदेलखंडच्या राजानें समयीं बाजिरावाच्या मागें मांगलां
स बुंदेलखंड न देतां दोन महिनेपर्यंत बाजिरावाचे कुमके
ची मार्गप्रतीक्षा करीत लढावें, तों पावेतों कुमक न पोहंच
ल्यास नहकरून मग कुमक मिळाल्यावर पुनः लढावें, या
प्रमाणें ठरलें. असा उत्तरेचा बंदोबस्त करून त्याच वर्षा
चे समासीस बाजीरावानें दक्षिणेंत औरंगाबादेजवळ नि
जामउलमुलुखाचा पुत्र नासिरजंग नामा दहा हजार मे-
ल्या सहित होता, तेथें जाऊन त्या सभोंवता घेरा घातला; प
रंतु थोड्याच दिवसांत त्या नासिरजंगाचे कुमकेस दुसरें
एक मोठें सैन्य येऊन पोहंचलें, त्या योगें तो मराठ्यांच्याहा

नचा मुद्दून गोदावरीचे पलीकडे अमदानगरचे वाटेनें मु लखांस उपद्रव देत चालिला. तो अमदानगरी जाऊन पो हंचला नाहीं तोंच बाजिरावाचे मदतीस चिमणाजी आपा चें मोठें लश्कर येऊन पो हंचलें. मग बाजिरावानें त्याशीं युद्ध करून त्यास पुढें जाऊं न देतां माघारा गोदावरीकडे पर्तविला. त्यावर कितीएक महिने त्याउभयतांचें युद्ध तसें च होत असतां त्यांतील एकासही किमपि अर्थलाभ न हो तां दोघांचा तह होऊन ठरलें कीं, इतःपर रयतेस कोणी उ पद्रव करूंनये, व मोंगलांनीं बाजिरावास नर्मदेचे कांठीं जहा गीर द्यावी.

१७ मग बाजीराव मनोदयानुरूप अर्थसिद्धी पावला नाहीं त्यणून फार खिन्न होऊन पुण्यास व साताऱ्यास न जातां एकाएकीं त्या लश्करा सहित हिंदुस्थानांत जावयास निघा ला.

१८ ते समयीं त्याचा पुत्र बाळाजी बाजीराव त्यास नाना साहेब म्हणत, तो कोंकणांत आंग्र्याशीं लढत होता त्याचेकु मकेस चिमणाजी आपा गेला, तेथें ते त्या नानासाहेबाशीं रे वदंडा किल्ला घ्यावयाची मसलत करीत बसले होते, तेवेळस वर्तमान आलें कीं, बाजिरावास नर्मदेचे कांठीं संनसवाशें चा ठिसांदे शें श्या महिन्याचे अष्टाविसावे तारिखेस देव आज्ञा जा ली. असें ऐकतांच शंकाजी नारायण बिनीवाला यास कोंक णची सुभेदारी दिली, आणि रवंडोजी माने कर लश्कर चा मुरब्बर्या र केला. मग चिमणाजी आपा व त्याचा पुतण्या नानासाहेब पे शवा हे उभयतां बाजिरावाचें उत्तर कार्य करून साताऱ्यास आ-

ले.

१९ बाजिरायाचें मरण तें मोठें प्रकरण, यास्तव त्या समयीं मराठ्यांची हकीगत काय काय होती ती समजाया विषयीं तेझांचे हिंदूंतील सर्व अधिकारी कसकसे वागत होते तें प्रथम लिहिलें पाहिजे.

दिल्ली मध्यें तेवेळीं महंमदशाह नामें बादशाह होता, त्यास नादरशाहानें बंदीस घालून त्याराजधानींतले किती एक लोक मारिले व शहर लुटून इव्य नेलें; त्या शहराचे उत्तरेकडील काबूल व तारा व मुलतान हे मुलूख घेऊन त्याणें आपल्या मुलखाकडे लाविले होते; त्यावरून बादशाहाचें तेज कमी होऊन दिल्लीच्या जवळ दुसरीं कितीएक नवीं नवीं गर्ज्यें होऊं लागलीं होतीं तीं प्रबळता पावतीलसें दिसूं लागलें. त्यांत एक रोहिला असे, त्याचा मूळ पुरुष हिंदुस्थानचे अहीर जातीचा होता, जसा मराठ्यां मध्यें धनगर तसा त्यांत तो. त्याचे लहान पणीं कोणी एका आफगाणानें आपल्या जवळ त्यास अलीमहंमद रोहिला असें नाव ठेवून तो बाळगला होता, मग तो मोठा जाल्यावर आफगाणाच्या स्वारांची सरदारी करीत होता. त्यानंतर त्याणें कितीएक मुलखाच्या उत्पन्नाचा चढ पत करून मुलूख आपल्या हाता खालीं घातला, मग पेका द्यावयाच्या समयीं युद्धास सिद्ध जाला; त्याच्या पारिपत्या विषयीं वजिरानें आपला कोणी मुख्य त्यार पाठविला त्याचा त्याणें पराभव केला. हें वर्तमान दिल्लीस पोहोंचून पन्नास पंचावन्न कोसांवर दक्षिणेकडे जातें.

दुसरा शूद्रांमध्यें जाट नामें जातीचा कोणी एक इसम

दिल्या कांडचा गड्डाणारा त्याणें येऊन आग्रें व जयपूर यांचें अधिपत्य औरंगजेबाचें समाप्तीस केलें. पुढें त्याचें मरणानंतर त्या त्याणें त्याच गडबडींत आपलें आधिपत्य चळकट करून मग जे झाले मराठे चंबळा नदी उतरून पलीकडे गेले तेव्हां त्यांचा व आपला एक लाभ पाहून त्यांशीं स्नेह केला.

दक्षिणेंत व करनाटकांत स्वराज्य व जहागिरी सोडून नि जामउल्मुलुख आणि मराठे निमेनिमे वांटून घेत होते. बाजी राव मेल्यानंतर तो निजामउल्मुलुख कितीएक दिवस दि ल्लींत होता, त्याचे नावास बादशाहानें अमीरउलउमरा अ सें पद जोडिलें होतें. त्याला वर्तमान कळलें कीं, आपला पुत्र नासीरजंग दक्षिणेंत आहे तो माझी मना नाहींशी क रून आपण कारभार करणार, हें बंड मोडावयाकरितां नि जाम दक्षिणेस निघाला तेसमयीं त्याणें बादशाहास विनंती केली कीं, मला जें पद दिलें तें माझा वडील पुत्र गाजीउद्दिन घ्यास असावें.

करनाटकांत विजापूर व गोवळकोंडे येथें जे पहिले मुख्य अधिकारी होते त्यांची संतति पुष्कळ झाली होती, त्यांत. स्वतंत्रपणें वागण्याची चाल पडली होती.

इंग्रेज व फ्रांवीसही या मुलखांत असत, परंतु ते आ पल्या पराक्रमानजाणतां किंवा जाणत असूनही स्वार्थसाध नास्तव युद्धादिकें करून सटून नसत, आजमावें अथवा लांच देऊन कार्यकरून घेत. त्यांशीं कोणी चक्र चालावयास त्या युद्धास सिद्ध होत. त्यानेकरून असें असतां पुढें त्यांचा दे व्योग अमा होता कीं, या मुलखीं सर्व घोर मोहरा कामांत

खांद्यीं मर्वाण द्यावें.

पूर्वी मंनमचाशें एकुणचाळिसांत इंग्रेजांनीं आपल्या व्यापारच्या साधनास चिमणाजी आपाच्या मेव्हानें पेशवा अनुकूळ करून घ्यावयास वसई मध्यें चिमणाजीची कांहीं तह केला होता.

पोर्तुगीस लोक मराठे लोकांशीं बहुत वेळां युद्धें करून न केवळ बलहीन झाले होते.

२० बाजीराव रुपानें फार चांगला होता. त्याची बोलण्याची किंवा कोणत्याही कार्यकरण्याची ढब शिपाया प्रमाणें दिसे, आणि तो लश्करा बरोबर असतां ऐश्वर्याच्या उपभोगासाठीं आपल्या सेवेंत बहुत माणसें बाळगीत नसे, जें त्याच्या शिपायास दुःख नें तो आंगें अनुभवीत असे. या विषयीं कथा आहे कीं, पूर्वी त्याची आणि निजामउल्मुलखाची भेट झाली नंतरी तेव्हां निजाम यानें कोणा एका सोळया चित्राच्यास सांगितलें कीं, तूं जाऊन बाजीराव पेशवा यास पाहा आणि तो तुझ्या दृष्टीस जें काम करतांना जसा पडेल तसें त्याचें चित्र काढून मला आणून दे. मग त्या चित्ता त्यानें तसें चित्र काढून आणिलें, तें असें होतें कीं, बाजीराव घोडयावर बसून भाला आंगाशीं धरून जो धक्यांचा कणसें हातावर घेऊन खात खात चालिला आहे. व त्याच्या घोडयाचे पायबंध व मेखा तोबऱ्यांत भरून तोबरा घोड्यावर बांधून घेतलेला आहे. त्याच्या जातीचें ब्राह्मण म्हणतात कीं, तो द्रव्यलोभी असे, आणि आपल्या कितीएका जातिधर्मास ही नीत नसे, व तो शिवाईपणाचा विरोध मोडून दुसरी राज्य

कारभाराचीं कामें तुच्छ मानी, हें या लोकांचें बोलणें सत्यज रीं असलें तरीं त्याकडे दोष नाहीं, कांकीं, त्यावर बऊन वेळां संकट पडलें होतें. तो राज्य मिळवण्या विषयीं लोभीस्वरा, परंतु मराठे एकचित्त वागविणें व निजामाचा मनसोबा समजून त्याचें निवारण करणें या कामांत दक्ष होता, यास्तव त्याणें आपल्या मराठ्या लोकांचें फार हित केलें. त्याचे मरणानंतर त्याचे जागीं बाळाजी बाजीराव नामें त्याचा वडील पुत्र तो स्थापिला; दुसरा रघुनाथराव तो इंग्रेजांचीं कार्यें करून नामांकित झाला; तिसरा जनार्दन बाबा तो लढाईत पणींच मेला; चौथा यवनीचा ठायीं झाला तो समशेर बहादूर.

भागसोळावा.

सनसत्राशें चाळिसांपासून सनसत्राशें एकुणवन्नास पर्यंत झालेली वर्तमानें.

१ रघूजीभोंसले व पेशवे या मध्यें कलह उत्पन्न झाला तो झारसी लोकांचा नादरशाह नामा बादशाह हिंदुस्थास आल्या मुळें कांहीं शिवम राहिला होता, पुढें त्याउभयतांनी गांठ पडली तेव्हां तो कज्जा अगदीं मांडला. त्या समयीं या दोघांची काय मसलत झाली तो पूर्ण रीतें समजत नाहीं, परंतु असें

वाटतें कीं, बाजिरावाच्या मनांत हिंदुस्थान घ्यावें व करनाट क आणि बंगाला आपल्या मर्जीत आणावा. अशीं मोठालीं कार्यें करावयाचीं होतीं, त्या मसलतींत त्यास घेतल्ह असल्. त्यानंतर करनाटकांत लश्कर मुद्दां रघुजी भोंसला शिरला त्याचें कारण तेंच दिसतें.

त्या लश्करांत राजा व पेशवे व प्रतिनिधि व फर्जंद, भोंसला व इतर मराठे सरदार यांचे शिपाई होते त्यांत संताजी घोरपड्याच्या बंडांतील मुरारराव घोरपडा असे. त्याचे राजाचा पक्ष तें समयीं नव्यानें स्वीकारिला, पूर्वीं राजानें त्याच्या दंडिलांस चिटविलें होतें. तो योग मिळाला नव्हेता आपलें सेनापतित्व मागूं लागला, तें न देतां सुंगभंडुजचे कांहीं परगणे देऊन बंडा केला. मग तें लश्कर चालत जार जमून करनाटकांत गेलें, तें दोम अल्लीनवाब जेथें श्रीरंगपट्टणच्या वेशीचे आडवाटेनें जाऊन एकाएकीं दोम अल्ली नवाब जेथें श्रीरंगपट्टणसहित होता तेथें प्रकट झालें. नंतर त्यांनीं युद्ध करून दोम अल्ली मेला, आणि त्याचा दिवाण मीर आसद खान होता तो धरला गेला. त्यानंतर मराठे त्या मुलखांत तिकडे पसरले आणि खंडणी घेऊं लागले, शेवटीं दोस्त अल्लीचा वडीलपुत्र सफदर अल्ली यानें दंड देऊन मराठे जाऊन

+. दोम अल्ली सादटउल्ला खानाचा पुतण्या पूर्वी संतलकाईंत होता. तो करनाटक पैनघाट मुलखीं दाउदखानानें आपल्या अधिकाराखाली दाउद खान कारभारी यास ठेविलें, नंतर तो सादटखान मेल्यावर दोस्त अल्ली दिल्लीचा बादशाह याचे व निजामउलमुलुख याचे आंत्रे सांडून आपल्या चुलत्याची जागा पावला.

निघाले असें केलें. तेव्हां सफदर अलीचें व भोंसल्याचें बोलणें झालें होतें करार ठरला कीं, तूंच पळीचा अधिकारी चंदासाहेब यास मराठ्यांनीं मातब्बर गोऊन जिंकावें, या चंदासाहेबा विषयीं सफदर अलीच्या मनांत पूर्वी पासून कांहीं शंका होती. त्यानंतर मराठे करणाटकांत सफदर अलीचा मुलूख सोडून माघारे महाराष्ट्रांत गेल्याची खबर जाऊन शिवनेरीचे कांहीं उलटले, परंतु त्याचा मनसोबा होता कीं, आपण येथें कांहीं दिवस राहून तों चंदासाहेब कर्नाटकांत अलाबध आहे असा जाणून एकाएकीं जाऊन जिंकूं.

२ इतक्यांत रघुजी भोंसला लेथून लिहून साताऱ्यास आला आणि बाळाजी बाजीराव यास पेशवे पदवी नदेऊंदेतां रघुजी नार्वेकर बावानदीकर हा पेशवा करावा असा राजा जबर उद्योग करूं लागला. आणि शाहूस मन जाविलें कीं, नाबूजीनाईक देशाई करितो द्रव्य चुकतें देईल, परंतु त्यास पचिनिधि अनुकूल नकला व चिमणाजी आपा आपल्या चुलत्याचें हित करणारा होता, म्हणून इतक्या खल केला तोंच दलम न जाऊन मंत्रलत्रांशी चाचिमांच्या ... ठव्या महिन्यांत शाहूनें बाजिरावाचे जागीं बाळाजी बाजीराव स्थापिला. बाबूजी नाईक बारामतीकर आपल्या मनोदयानुरूप कार्य सिद्ध न झाले यास्तव बाळाजीस बाजिराव कडच्या कजीवि

---

१ बाबूजीनाईकाशीं आणि बाजिरावाशीं कांहीं वैमनस्य पडलें होतें, याचे कारण असें बाबूजीनाईक मोका : ... ध्यान होता यापासून बाजिरावाचे कार्यांत पेशव्यांचे मनांत ... होत.

यथीं फार नगादा करूं लागला, त्यामुळें त्याचा मुकुंद संकटा
त झालें तेव्हां त्याचा दिवाण महादाजीपंत पुरंदऱ्या यानें त्या
संकटापासून बाळाजीची मुक्तता केली. यास्तव तो त्याचा नो
ठा उपकार मानून त्याचेठायीं अत्यंत प्रीति करूं लागला.

रघुजी भोंसला यानें योजिलेलें कार्य सिद्धीस नगेलें स
मजून तो बाबूजीनाईक वारामतीकर यास आपले बरोबर घे
ऊन तूचनापल्लीचे मोहिमे संबंधें लाभ साधावयास पुनः क
र्नाटकास चालिला. त्याबरोबर प्रतिनिधिश्रीपतराव व क
ऱ्हाडे भोंसला हेही गेले. नें लष्कर तंजोरास पोहंचलें ने
व्हां त्या मुलखीं मराठे होते ते आपल्या मनांतील वैमनस्यें
टाकून दक्षिणदेशींचे मराठे आपले भाऊबंद यांस मिळाले.
त्यानंतर कर्नाटकीं काय काय युद्धें झालीं तें समजत नाहीं,
परंतु इतकें खाऊक आहे कीं, संनसवाशें एकेचाळिसांच्या
तिसऱ्या महिन्यांत तूचनापल्ली नराव्यांचे हातीं लागली. ते
व्हां तेथचा धणी चंदासाहेब होता तो रघुजीभोंसल्यानें के
द करून साताऱ्यास पाठविला, आणि मुरारराव घोरपडा
स्या किल्ल्याचा मुख्त्यार करून ठेविला. त्याजवळचे शिबंदी
स हरमहा खर्चास शाहूकडून पोहंचत असे, परंतु ते लोक
पेशव्याचे होते. कर्नाटकचे खंडणी पैकीं प्रतिवर्षी तीनलक्ष
र रुपये बाळाजीबाजिरावास देत जावे असें ठरलें हा एक पेश

+ त्यावेळेस तिरुचिरापल्ली प्रांतांचा धणी शिवाजीचाभाऊ बं
कोजी त्याचा नातू (पुत्राचापुत्र) होता परंतु मुख्यतें मुसलमान असे. तो
यंकोजी याचा धाकटा पुत्र तुकाजी याच्या वेळेपासून तंजोरांत शिलेदारी
करीत होता असें समजावें..

[illegible] सरदेसाई लाभ झाला.

३ त्याच वर्षाच्या पहिल्या महिन्यांत दिनणाजी आपा मृत्यु पावला. तो मराठे सरदारांत मोठा मान्य असे; कांकीं, त्याणें पोर्टुगीस लोकांचा पराभव करून आपल्या जातीस लौकिक मिळविला होता, परंतु एवढी त्याची योग्यता असेलच असें म्हणतां येत नाहीं. त्याणें जाणिलेंकीं, पायदळ व तोफा यांचा बंदोबस्त चांगला असल्या वांचून युद्धाचें साहित्य ठीक नाहीं, ती कल्पना बहुधा बरी दिसते, परंतु तीस मान्यता योग्य नव्हे; कांकीं, ते आंगधटाईनें मारामारी विषयीं [illegible] होते. चिमणाजीचा बंधु सदाशिव चिमणाजी भाऊ [illegible] ही बाबाची कल्पना उत्तम मानून पुढें विसाव वर्षांनीं [illegible] नेटपणीं त्या प्रमाणें सिद्धता करून पानपतचे ल[illegible] [illegible] च चुकीनें तो लश्कर सहित नाश पावला असें दि[illegible]. चिमणाजी आपा मेल्याचे आगोदर खंडोजी माणकर [illegible] त्याचे आज्ञेवरून पोर्टुगीस लोकांचा रेवदंडा किल्ला राहिला होता तो घेतला. तेणेंकरून दमान व गोवें यामध्यें [illegible] लोकांची सत्ता किंमपि राहिली नाहीं

४ बाळाजी बाजीराव आपल्या चुलत्याच्या मरणानंतर एकवर्ष सुमारें मुलखाचा बंदोबस्त करीत सातारा व पुणें येथें राहिला होता. त्याणें शाहूस आपली गरिबाई दाखवून पोर्टुगीस लोकांस जिंकून घेतलेला मुलुख होता त्याची सनद मिळविली. व गुजराथ खेरीज करून नर्मदेच्या उत्तर कडच्या

+ सदाशिवचिमणाजीस भाऊसाहेब म्हणत.

मुलखाची खंडणी जी द्यावयाची ती व वसूल जमा करून
याचा तो त्याच्या हातून द्यावा असेही शाहूनें केलें.

५ शाहूनें त्याच समयीं एवढें दिलें तेणेंकरून पेश
व्याच्या मदतीस फार उपयोग झाला, तो ध्यानांत घ्या
वया करितां आधीं बंगाल्यांतील वर्तमान कांहीं लिहिलें
पाहिजे तें असें. मनसबदारांचा चाळिसांत बंगाल्याचा नबा
ब सुजाउद्दीन खान नामें होता, त्याणें बाहार सुभ्या मध्यें को
णीएक आपला हस्तक अल्ली बेरदीखान नामें ठेविला.
तो सुजाउद्दीन मेल्यावर त्याचा पुत्र तक्काधिपति झाला, परं
तु अल्लीबेरदीखान त्यास मानीना. पुढें त्या उभयतांचें युद्ध
होऊन नक्काधिपति मरण पावला, आणि अल्लीबेरदीखा
न यास तें आधिपत्य प्राप्त झालें. त्या वेळेस उरसा सुभ्या मध्ये
कोणी एक पहिल्या नबाबाचा हस्तक मुरशेदकुली नामें अ
से त्याचा दिवाण मीरहबीब नामें होता, त्यानीं अल्लीबेरदीखा
नानें युद्ध करून तोसुभ्याचे पार घालविला, तो तेवेळेस पळून
जाऊन मग थोडकेच दिवसांनीं पुनः येऊन अल्लीबेरदीखा
नाजवळच चाकरीस राहिला. त्या पुढें बंगाल्यांत मराठे को
कांची सत्ता व्हावयास तो उपयोगीं पडला. त्याचा प्रकार असा,
मुरशेदकुली अल्लीबेरदीखानानें मुलखांतून पारकेल्यावर मी
रहबीबानें वराडांत रघुजी भोंसल्याचा हस्तक भास्करपंत होता
त्यास मसलत दिलीकीं, कटक सुभा चुटावा; तेव्हां भास्करपंत
नें आपला धणी करनाटकांत गेला, त्याचे आज्ञेचीवाट पाहि
ली, इतक्यांत अल्ली बेरदीखानानें नेमलेले अमलदार सुभे
घेतला. मीरहबीब जाऊन [illegible]

ऊस बंगाल्याच्या हद्दींत शिरणें राहिलें. परंतु भास्करपंता च्या मनांत ती इच्छा होऊन थोडक्या वेळानें तो लश्कर घेऊ न कांहीं एक निमित्तें करून पूर्वेकडे चालिला; तो निघून गेला तेव्हां पेशवा हिंदुस्थान आपल्यासत्तेंत आणावयाची वा टपड्यात होता तो त्याच समयास उत्तम मानून निघाला, आणि गरा व मंदेला किल्ला हस्तगत केला. तेव्हां पाउस काळ जवळ आला म्हणून नर्मदेच्या कांठीं छावणी केली.

६ मग दसरा झाल्यावर आला हाबादेस स्वारी घाला वी अशी मसलत होती, इतक्यांत दमाजी गाइकवाड व बाबूराव सदाशिव माळव्यामध्यें पेशव्याचे मुलखीं लुटूं लागले, यास्तव पेशवा आला हाबादेची मोहीम टाकून मा ळव्याकडे गेला. ला समयीं पेशवा पूर्वेस न जातां माळव्यांत गेला, तें रघुजी भोंसल्याचें चातुर्य. कांकीं, पेशवा पूर्वेस न जावा आणि तो सर्व लाभ आपणच घ्यावा अशी त्याची म सलत होती.

इकडे भास्करपंत बंगाल्याकडे जात असतां बाहा र परगणा या मध्यें स्वारी प्रथम घातली, त्यावेळेस अल्ली. वेरदीखानाच्या पुतण्याचापुत्र कटा प्रांता मध्यें कांहीं बंड करीत होता, तें बंड मोडावयास अल्लीवेरदीखान बाहारांतू न कांहीं सैन्य घेऊन कटा प्रांताकडे गेला. मग तें बंड मोडू न तो मोरशेदाबादेस जाणार होता, परंतु मराठे बाहारांत शिरल्याचें वर्तमान ऐकून त्यांच्या पारिपत्याकरितां खरेनें आला. तें समयीं मराठी लश्कर सुमारें दहा बारा हजार होतें, परंतु लोकांमध्यें पन्नास हजार लश्कर आलें अशी

आवाई असे.

अल्लीवेरदीखान यापाशीं तीन सोडतीन हजार सुमारे स्वार व चार हजार सुमारें पायदळ असे, तरी त्याणें मराठ्यांवर चालून जावयाविषयीं विलंब बकेला, परंतु त्याचा जय झाला नाहीं. त्याच्या लश्करासभोवता मराठ्यांचा वेढा पडून त्यावें सर्वसामान लुटलें गेलें, तेणें करून ते लोक बहुत कष्टपाव ले, आणि कितीएक मेले गेले, व कितीएक पळाले. शेवटीं स्वार व पायदळ मिळून त्यापाशीं तीन हजार उरले, तेव्हां त्याणें विचार केला कीं, मराठ्यांचे हातीं लागावें त्यापेक्षां युद्ध करून मरावें अथवा त्यांस मारून वाट धरावी यांत उत्तम आहे, असा निश्चय करून मोठ्या निकरानें युद्ध करतां कर तां खटव्या पर्यंत पोहंचला. त्या युद्धांत अल्लीवेरदीखाना-च्या लश्करांत मीरहबीब होता तो पहिले दिवशींच युद्धाचे आरंभीं धरिला गेला. त्यानंतर त्याणें मराठ्यांचा पक्ष स्वीका रून अशीं उत्तम कामें केलीं कीं, भास्करपंतनामें त्या लोकांत मोठा सरदार होता त्याचा तो परम विश्वासू जाहला. अल्ली वेरदीखान खटव्यास पोहंचला त्या समयींच मीरहबीब त्या पंतापासून कांहीं शिपाई मागून घेऊन मोरशेदाबादेसचा लिला. तेथेंजाऊनत्याचा भाऊकैदेंत होतात्यासं सोडऊन त्या शहरचा राहणारा जगत्शेट अलंचंद नामें मोठा सावकार हो ता त्यावें घर लुटून पंचवीसलक्ष रुपये काढून घेऊन भास्करपं तास जाऊन मिळाला, त्यास द्व्याचा लोभ दाखवून बंगाल्यांत राहून पेतला.

७ तेव्हां त्याच्या मसलती प्रमाणें भास्करपंतानें माघार फि

रून कांहीं युक्तीनें ढुगळी बाहर हस्तगत केलें. त्या पुढें रव
ळ्या पासून मिदनापूर पर्यंत बऊतेक मुलूख त्यांचे हातीं
लागला. त्यावेळेस ढुगळीचे नदींत पाणी भरून आलें,
यास्तव नदी उतरून पार जातां येना, तेणें करून मारठ्यांचा
ह पराक्रमाध्यें प्रवेश झाला नाहीं. असें असतां दिल्लीहू
न बादशाहत्वा कोणी कारभारी बंगाल्याची खंडणी मा
गावयास अल्लीबेरदीखानाकडे आला, तेव्हां त्याणें उत्त
र केलें कीं, जों पर्यंत मला मराठ्यांचा उपद्रव असेल तों का
ळ पर्यंत खंडणी देण्याची अनुकूलता नाहीं; यावेळेस हेंच
योग्य कीं, स्वामींनीं माझ्या मदतीस लश्कर पाठवून रक्ष
ण द्यावें. असें त्यास बोलून बराड प्रांतांतील रघूजी भोंस
ल्याचा मुलूख लुटावया करितां पेशव्यांस सुचना केली,
आणि त्या कामाकरितां कांहीं द्रव्य पाठविलें तें त्यांस न पो
हंचतां ऊद प्रांताच्या नवाबानें मध्येंच नें लुटून नेलें.

अल्लीबेरदीखान यानें पेशव्यास आणि बादशाहासकु
मक मागितली, तथापि तो आपल्या कामांत अत्यंत सावधप
णें वागला. तो असा, आपले मुलखांचे शिपाई आजेंत वाग
णार असे सारे जमा करून पाऊसकाळ जातांच खटव्यांम
ध्यें जाऊन पंताच्या लश्करावर एकाएकीं जाऊन पडावया
ची तयारी सर्वप्रकारें केली; आणि नदींचें पाणी उतरलें
नसतां ही ढुगळीची नदी व आजीनदी यांमध्यें होड्यांचे
पूल बांधून दोघी नद्या उतरून पलिकडे गेला. जातांना
आजीनदीचा पूल कांहींसा तुटला तेणेंकरून पंधरा दों माण
[illegible] नद्यां, एवढें विघ्न झालें तरी त्याणें राहीमात्र भास्कर

पंताच्या लश्करावर अकस्मात छापा घालून मराठ्यांस असें भय घडविलें कीं, ते लोक लढाई न करितां पूर्वेकडे रानांत पळून गेले. त्यांचा कांहींच अल्लीवेरदीखानास ठिकाणा लागला नाहीं, मग तो तेथून माघारा गेल्यावर ते मराठे मिदनापूर परगण्यांत शिरले. मग अल्लीवेरदीखान आपल्या पाठीस लागला असें पाहून ते त्याहीं विरोध युद्ध न करितां आपल्या स्थानीं वराडांत माघारे गेले. ते ठिकाणीं पोहंचल्यावे पूर्वीचि रघूजी भोंसला आपल्या लश्करासुद्धां करनाटकांतून येऊन वराडास पोहंचला होता. त्याचा दिवाण भास्करपंत याणें बंगाल्यांत मक्ता केली नी हट करावी असा निश्चय करून तो ज्या वाटेनें पूर्वी बंगाल्यांत गेला होता त्याच वाटेनें भोंसला हीं जाऊं लागला

८ हें वर्तमान दिल्लीच्या बादशाहास कळलें, त्याणें त्याचा नवाब मफूदर जंग यास आज्ञा केली कीं, मराठ्यांस आपली मर्यादा सोडून बाहेर जाऊं देऊं नये. या शिवाय त्या कामास पेशव्यानें अनुकूळ व्हावें या विषयीं बोलणें लाविलें; व तो वश व्हावा म्हणून अल्लीवेरदीखानाकडील आजिमाचा देश खंडवसूल व्हावयाचा होता त्यापैकीं चवथाई एदजा या विषयीं बाळाजी बाजीराव यास पत्र पाठविलें, त्या देशीज माळव्याची सनद देऊं असें वचन दिलें. या आशेनें पेशवा माळवा मुलूख सोडून संनसवाशीं नेवाळिमांत आला हा बादेदरून मारवोदा बादेस पोहंचला. तो तेथें असतां त्याणें अल्लीवेरदीखानास बादशाहानें आपणास देवविलेल्या पैक्याची निकड लावली, व [illegible] त्यास ठाऊक होतें कीं, राजाराम जें

काहीं मागणें तें संकट समयीं मागितलें असतां तो उदार पणें देतो; दुसरें रघुजी भोंसला मोठया सैन्यासहित मोरशे दावा देवर युद्धास येणार हें ही त्यास कळलें होतें. तेव्हां अ लीवेरदीखानानें हिशेब चुकवून देतों असें कबूल केलें, ती बातमी रघुजीस कळली, तेव्हां रघूजी भोंसला मोरशेदा-बादेकडे येत होता तो डोंगराकडे पळून माघारा गेला. ते समयीं अलीवेरदीखान मोठ्या खरेनें त्याचे पाठीस लागला, त्यावरून बाळाजी बाजिरावानें कल्पना केली कीं, मराठे यां चें लश्कर बंगाली लोकांचे हातीं लागणार नाहीं, म्हणून आप णलश्कर सुद्धां निराळ्या वाटेनें बंगाल्यांच्या लश्कराचुढें जाऊन रघूजीच्या पाठीस लागला, नंतर त्यास गांठून त्या शीं युद्ध केलें त्यांत रघूजी पराभव पावला.

९ त्यानंतर बाळाजी आपणास बादशाहानें माळ व्याचा अधिकार देऊं केला होता ती सत्ता सुदृढ करावयास सन सत्राशें चाळिसांत गेला. तो माळव्यास जाऊन पोहं चला तेव्हां महंमदशाह बादशाह यास बाळाजीला तोअ धिकार द्यावयाचें अगत्य मोठें पडलें. कांकीं, बाळाजीनें त्याचे सेवेंत अंतर किमपि केलें नव्हतें; तथापि त्यास एं वढा मुलूख दिल्यानें आपला मान ढिला का होईल म्हणून आमद्‌नामें आपला पुत्र तो त्या अधिकारी नावाचा मात्र मुख्यलें कल्पून माळव्याची सनद बाळाजीस दिली. त्यानंत र बाळाजी पेशवा मातब्बरास येऊन त्यानें आपल्या मर्यादेप्र माणें राजाम हिशेब दिला, तेवेळीं तर आपण राजाचा मुख्य सरदार अशा अर्थें सन्मान दिलें, परंतु पुढें ही त्या राजाची ताबेदारास

सा नाहींसा झाली तरी मनिवर्गी स्वयं जाऊन या प्रमाणें हिंवा बसमजावीत असे.

१० पेशव्यानें रघूजी भोंसल्याचा पराभव केला तेव्हां रघूजीनें पेशव्या कडे वकील पाठवून स्नेह करण्याचें बोल णें लाविलें कीं, तुमी राजनीती प्रमाणें जो कांहीं वर्तणूक करितां ती माझ्या व सर्व मराठे लोक यांच्या हितास फार उपयोगी आहे असें मला आतां समजलें. या प्रमाणें बो लण्यांत अंतःकरणाची निर्मळता दारवविली असतांही तो भोंसला पुण्यावर लश्कर सहित येत होता. अशा समयीं प्रतिनिधि शरीर प्रकृतीनें असावध झाला असे, त्याचा मुतालीक यमाजी शिवदेव तो रघूजीस अनुकूळ न होतां दाभाड्यास अनुसरून पेशव्याशीं वांकडा झाला असे, आ णि तो दाभाडाही पुण्यावर येणार होता. तेव्हां पेशव्यानें हा सर्व प्रकार ध्यानांत आणून विचार करूं लागला कीं, रघूजीला यासमयीं बंगाला द्यावा किंवा सर्व मोठे मोठे मान करी मराठे सरदार लोक यांशीं लढावें, असें मनन करून न या दोहों मध्यें रघूजीस बंगाला द्यावा हेंच बरें पडेल. या प्रमाणें निश्चय ठरून रघूजी आणि पेशवा यांचा तह राजा मध्यस्थ होऊन झाला. त्यांत पेशव्यानें आपला पूर्वीचा संपादिलेला जो मोकासा तो व आपण मिळविले ली जहागीर आणि वडिलांनीसंपादिलेल्या ज्या जहागिरी त्या व कोंकणचें आणि माळव्याचें आधिपत्य, या शिवाय आलाहाबाद व आग्रें व आजमीर यांची सुभेदारी आ णि पाटणा प्रांतांतील तीन तालूके व अकोट परगणा यांची

ल जमेंपैकीं चौसष्ट हजार रुपये, यारवेरीज रघूजीचे सत्तेंती ल कितीएक गावें, हें सर्व पेशाव्यानें अनुभवावें अशी राजा नें सनद दिली. रघूजीस सनददिली कीं, लखनाऊ व पाट णें व बंगाला यांचा वसूल व खंडणी त्याणें घ्यावी, या खेरीज वराडापासून कटाक पर्यंत खंडणी जमाकरावया चें काम रघूजी भोंसल्यानें करावें. या प्रमाणें राजानें उ भयतांस दोनसनदा दिल्या. त्यावेळेस असें ठरलें कीं, दमा जी गाइकवाडानें माळव्यांतील खंड घेतल्याचा हिशेब पेशवायास दाखवून तो ऐवज त्याचे हवालीं करावा. अ सेंच दाभाड्याकडे हीरा जावें देणें थुकळ होतें, परंतु त्यावे ळेस नी चोकशी झाली नाहीं.

११ मराठ्यांमध्यें असें वर्तमान असतां निजामउल मुलुखाच्या पुत्रानें बंड केलें तें मोडावया करितां तो नि जाम दिल्लीहून निघून औरंगाबादेस गेला, तेथें युद्धप्र संगें करून मोंग्यापाशानें पुत्र स्वाधीन करून घेतला. नंतर असें पाहिलें कीं, कृष्णेचे दक्षिणेस मोंगलांचे सत्तेंती ल मुलखीं अव्यवस्था झाली, व करनाटक प्रांतांत अर्का टचा नवाब सफदर अली होता तो त्याचा मेहुणा मोर्तिजा खान याणें घातंकरून मारिला. हें सर्व ध्यानीं आणून अ में समजला कीं, यासमयीं आपलें आधिपत्य स्थापावया स संधि ठीक हाच आहे, म्हणून सनसत्राशें त्रेचाळिसांत हैद राबादेहून मोठें लष्कर जमा करून करनाटकांत चालि ला. तो तेथें कितीएक मुलुख घेऊन एकावर्षानंतर त्याणें

[illegible] जमा [illegible] भर्मे जाणें.

नेक्षां त्याच्या मनांत कांहीं शंका उत्पन्न झाली, यास्तव तो तेथून माघारा फिरून हैदराबादेस जावयास निघाला, तेसमयीं त्याणें आपला हस्तक अनवारुद्दीन तो कर्नाटक पैन घाटीं ठेविला, आणि आपला नातू हीदायतमोयदीनखान, त्यासच मुजाफरजंग झणत, त्यानावानें तो मोठा विख्यात होना, त्याला कर्नाटक चा उंचप्रदेश ज्यास बालाघाट झणतात, तेथें स्थापून त्यास आंदोणी परगणा जहागीर देऊन त्याचें रहावयाचें मुख्य स्थान विजापूर केलें. मग तो हैदराबादच्या वाटेनें जात असतां त्यास असें वाटलेंकीं, आपल्याकर मराठे यांची मसलत नाहीं, झणून आपल्या राज्याचा बंदोबस्त करीत तेथंच राहिला. तेव्हां निजामउल्मुलु ख आपली मर्यादा सोडून दूर आहे असें समजून मराठ्यांहीं त्या मुलखीं जाऊन कांहीं स्वार्थ साधावा, परंतु तें न झालें, कांकीं, रघूजी भोसला याणें आपल्या मसलत आणिलेला जो बंगाल्यासंबंधी मुद्दूख होता तो त्याचे हातून गेला असे, त्यास तो मानक्या न हस्तगत करावा विषयीं उद्युक्त झाला. पेशव्यान शंका उत्पन्न झाली कीं, आपण कबूल केल्याप्रमाणें रघूजीचें निवारण नझालें, यास्तव आपणास

---

[1] अनवारुद्दीन याचें पहिलें राहायाचें ठिकाण राजस्थान मनेवायते नामें यवनजातीचा नवाब याचे पेढे पासून झाले ही अर्काट प्रांतीं सुभ्याचा राजधानी होती तीस तो राहत असे मुख्य-मागा होता.

बादशाहाचा शब्द लागेल, याकरितां दक्षिणेंत कांहीं बहूत आहेत असें मिषकरून उत्तरेस गेला नाहीं.

१२. रघूजी भोंसला वराडांत पाऊस काळीं पोहंचला, मग पर्जन्यकाळ गेल्यावर त्याणें अपला प्रधान भास्करपंत व कितीएक नामांकित सरदार यांजबरोबर वीस हजार स्वार देऊन ते उरसा प्रांतांतून बंगाल देशांत पाठविले. तेथें अलीवेरदीखानानें त्यांशीं युद्धाविषयीं आपल्या लश्कराची तयारीकेली, परंतु कपटानें आपलें कार्य साधावयाकरितां त्यांस तुमचा आमचा तह असें समजावून भास्करपंत व त्याचे बरोबरचे मोठे मोठे सरदार वीस आसामी मेजवानीस बोलावून त्यांवर मारेकरी घालून ते एकवीसही मारून टाकिले. तेणेंकरून मराठ्यांचें लश्कर युद्धनकरितां ज्यावाटेनें आलें त्यावाटेनें माघारें गेलें. तें जातांना त्यांतील कितीएक लोक वाटेच्या निराळे सांपडले ते गांवकरी लोकांनीं त्रासास्तव मारिले.

त्यासमयीं मराठे यांचे कार्य सिद्धीस नगेले, तथापि ते आपला समय पाहात बसले होते. मग पुढें थोड्याच वेळानें त्यांस तसाच समय आढळला. तो असा, अलीवेरदीखानाच्या लश्करांत आफूगाण लोक होते ते कांहींसा दंगा करूं लागले त्याच्या पारपत्यास अलीवेरदीखान उरसाप्रांतीं बंदोबस्तास ठेविलेल्या शिपायांतील कांहीं लोक बरोबर घेऊन तेथें हिंदू अधिकारी देवून आपण त्यांवर गेला. हें

वर्तमान रघूजीला जासुदांनीं कळवितांच त्याणें उ
रमाप्रांतीं स्वारी घालून कितीएक परगणे हस्तगत
केले; आणि बाकीच्या मुलखाची रवंडणी तीस कोट रु
पये तो मागूं लागला. तेवेळेस अल्लीवेरदीखान याणें
कांहीं युक्तीनें त्यास मुलवून पैका नदेतां कितीएकदिवसघालवि
ले. मग आफ्गाण लोक स्वाधीन जाहाल्यावर त्या
स असें उलट उत्तर दिलें कीं, जेणेंकरून उभयतां
चा तह राहिला नाहीं. मग दोघांच्या युद्धास प्रारंभ
होऊन कितीएका वेळानें मराठे लोकांचा कांहींसा मो
ड होऊनतेंयुद्ध राहिलें; कांकीं, त्यावेळेस रघूजीस आ
पल्या मुलखीं जावें लागलें. त्याचें कारण असें कीं, गों
डवणांतील देवगडच्या तक्ताविषयीं तेथच्या राजाचे
पुत्र भांडूं लागले, त्यासमयीं तो राजा मेला होता त्या
चें नाव बरखतबुलंद, तो पूर्वी औरंगजेबानें बाटवि
लेला होता, त्याच्या पुत्रांत एक वलीशाह नामें हो
ता त्याणें आपले दोघे भाऊ कैद केले, आणि दुस
रा एक चांडाचा राजा नीळकंठशाह होता तोही
औरंगजेबानें बाटविलेला होता त्याला आपल्या स्ने
हांत घेऊन मराठे यांस चौथ व सरदेशमुखी न
द्यावी असें केलें. याप्रमाणें ते दोघे स्वतंत्रपणें वा
गूं इच्छीत असतां त्याचा शेवट असा झाला कीं, र
घूजी भोंसला याणें उभयतांचा सुलूख घेतला. ते
व्हां वलीशाहानें आपले दोघे भाऊ बंदींत ठेविलेले
होते, त्यांनीलष्कास रतनपूर दिलें, आणि त्याच्या

खर्चा प्रमाणें कांहीं पैका आपल्या खजिन्यांतून द्याव याचा कबूल केला. असें सन सत्राशें चवेताळिसांत जालें. अद्यापि त्याचे बंधू नागपुरांत आहेत त्यांस जाजून त्या देण्या पेकीं कांहीं मिळतें, दुसरा भाऊ अकबर शाह तो निजामाच्या आश्रयानें कांहीं वर्षें सुख पावून मेला.

१२ त्यापुढें सन सत्राशें सत्तेचाळिसांत आफ्गाण लोकांचा बादशाह अहमदशाह अबदाली* तो प्रथम हिंदुस्थानांत स्यांच्या घालूं लागला, त्याला पूर्वी नादरशाह नामा खारशी लोकांचा बादशाह याचा आश्रय असे, मग कालेंकरून तो आफ्गाण लोकांचा बादशाह झाला. त्यानंतर त्याणें सन सत्राशें अठ्ठेचाळिसांत दिल्लीवर स्वारी केली, तेव्हां दिल्लीच्या बादशाहानें आपल्यापुत्राबरोबर फौज देऊन त्यास काबूल पर्यंत मागें हटविलें, भाणि तो माघारा दिल्लीस येई तों पर्यंत त्या बादशाहाचा काळ झाला. नंतर तो अहमदशाह पुन्हा येऊन त्याच वर्षाच्या एप्रेल महिन्याच समाप्तीस लक्काधिपति झाला. त्याणें निजामउलमुलुखास वजिरीच्या अधिकाराविषयीं बहूत आग्रह केला, परंतु तो स्वीकारीना; कांकीं, त्याचें वय फार होतें, यास्तव तो म्हणे कीं, मी फार वृद्ध

---

* हा अफ्गाण लोक यांचीं नावें हिंदु लोकांमध्यें नीच जातीचीं आहेत, एक म्हणजे हा आबदाली, दुसरा गिल्जी.

झालों आतो या कामास कसा योग्य होईन. तेव्हां आ मेदशाहानें ती पदवी सफ्दरजंगनामा ऊदचा[1] नवा ब यास दिली. त्यानंतर दीडमहिन्यानें जून महिन्याचे एकुणतिसावे तारिखेस निजामउल्मुल्क बव्हाणपुरीं मृत्यु पावला. तेवेळेस त्याच्या वयाला एकशें चार वर्षें होतीं. त्यामागें त्याचे पुत्र सहा होते, त्यांत एकाचें नाव गाजीवदिन, दुसरा नाशिरजंग, तिसरा सलाबतजंग, चवथा निजामअली, पांचवा महंमदसरीफ, सहावा मीर मोंगल. त्यांत प्रथम दोघे एकाआईचे, दुसरे चार त्याच्या आया निरनिराळ्या होत्या. निजामउल्मुल्क मरण पावला त्यावेळेस गाजीवदिन दिल्लीस होता ह्मणून दुसरा नाशिरजंग तोच तक्ताधिपतीपणाक रूं लागला.

१४ त्यानंतर दोन तीन महिन्यांनीं दिल्लीच्या बादशा हानें आपल्या हातचें मानपुरःसर पत्र नाशिरजंगा ला पाठविलें कीं, तुह्मी भेटीस यांवें, तेव्हां नाशिरजंग नर्मदे पावेतों पोहंचला, तों त्यास बादशाहाचें मनाई पत्र आलें, त्याचें कारण कायतें समजत नाहीं. तेंपत्र त्याला पावलें असतांही तो नाशिरजंग उदास झाला नाहीं. कांकीं, त्याचा पुतण्या मुजाफरजंग याणें चंदा साहेबाचे साहाय्यानें व फ्रांशीस लोकांच्या आश्रयें क रून दंगा आरंभिला होता, तें वर्तमान त्यास कळलें.

---

[1] ऊद प्रांतास अयोध्या ह्मणतात.

त्यानंतर त्यास दुसरें वर्तमान कळलें कीं, निजाम उलमुलुखानें आपला हस्तक अनवार उदीन करनाटक पैन घाटीं ठेविला होता तो मृत्यु पावला. त्यानंतर नासिरजंगानें रघूजी भोंसल्यास पत्र लिहिलें कीं, यासमयीं तुम्हीं लश्कर पाठवून जर माझी मदत कराल, तर मी तुम्हाला कांहीं मुलूक देईन. याखेरीज जे कोणी मोंगलांचे संबंधाचे लोक होते त्यांस लिहिलें कीं, मी तिकडे येतों त्यास तुम्हीं मला येऊन मिळावयास सिद्ध असा. मग तो दक्षिणेस करनाटकाकडे चालिला, तेव्हां ते जाऊन मिळाले. त्यांत मुरारराव घोरपडा असे, त्यास निजामउलमुलुखानें घुटीची जहागीर दिली होती म्हणून त्याला त्याकडे जाणे अवश्य पडलें. दुसरा म्हैसूरचा राजा व आणखी किती एक नवाब होते व अनवारउदीनाचा दुसरा पुत्र महंमद अली तोही होता.

हे सर्व लोक स्वतां आंगें किंवा लस्कर पाठवून त्याचें साहाय्य करीत असत. महंमद अलीच्या स्नेहा स्तव मद्रासचे इंग्रेज लोकही त्या नासिरजंगाचेउपयोगीं पडले.

१५ याप्रमाणें निजामाचें लस्कर करनाटकीं गेलें तेव्हां पेशव्यास आपलें कार्यसाधन करावयाची संधी बरी होती, परंतु मातोश्यांत कांहीं विशेष वर्तमान झाल्या मुळें त्याला अवकाश सांपडला नाहीं. तोपर्यंत कार्य असा. इकडे राजा कितीएक वर्षें भ्रांतिस्थ झाला

होता, मग त्याच्या शरीरीं समाधान नाहींसें होऊन ती भ्रांति गेली, तेसमयीं त्याजवळ कोणी लोक होते त्यां हीं मसलत केली कीं, राजानें दत्तपुत्र घ्यावा. त्याणें त र भ्रांत कावयाचे पूर्वीच आपला पुत्र मेला तेवेळेस सांगून ठेविलें होतें कीं, कोल्हापूरकर संभाजीयास ज र संतति होऊं लागलीतर मी त्यास आपल्या गादी चा अधिकारीकरीन. पुढें संभाजीला पुत्र झाला नाहीं म्हणून विचार ठरला कीं, मालोजीचा बंधू शहाजीचा चुलता होता, त्याच्या वंशींचा कोणी घ्यावा. मग त्या चा शोध बहुत केला परंतु तो कोणास सापडेना. त्यावर शाहूने महादाजीपंत पुरंदऱ्या व गोविंदराव चि टणीस यांस सांगितलें कीं, हालीं ताराबाई साताऱ्या स आहे तिणें आपला नातू दुसऱ्या शिवाजीचा पुत्र तो सत्राशें बारांत आपले बापाचे पाठी मागें जन्मला तो कुठेतरी लपवून ठेविला असेल त्याचा शोध करू न आणावा. तेव्हां ताराबाईस विचारिलें, तिणें सांगित लें कीं, शिवाजी मेला तेव्हां त्याची स्त्री भवानी बाई ग रोदर होती, तिला पुत्र झाला मग शिवाजीचे पाठी मागें राजाराम राज्य करीत होता त्याला कळलें त र तो त्या पुत्रास मारून टाकील या भयास्तव मी त्याला पन्हाळ्याहून काढून गुप्तपणें नेऊन तुळजा पुरीं त्याच्या मावशीचे स्वाधीन केला. तिणें तेथून वारशीस नेला, तेंथेही तो अप्रसिद्धपणेंच राहिला, तो अद्यापि तिकडे आहे.

१६ हेंवर्तमान शाहूची थोरली बायको शिरक्यांची कन्या सकूवार बाई नामें होती तिला कळलें, तेव्हां ती फार रुष्ट झाली. कांकीं, तिची वासना अशी होती कीं, कोणी एखादा लहानसा मूल तक्काचा अधिकारी निमित्त मात्र करून आपण सर्व कारभार चालवा वा. तिणें ताराबाईची गोष्ट ऐकून तो बेत मोडण्या सा ठीं मंडळीस पत्र लिहीलेंकीं, हाली ताराबाईचा नातू निघाला हा खोटा. त्यास तुह्मी त्याच्या निवारणास अ नुकूळ काल तर मी तुमचें साहित्य होईल तितकें क रीन. अतांच मला यमाजी शिवदेव व श्रीपतरावाचा पुत्र जगजीवनराव प्रतिनिधि व दमाजी गाइकवाड हे अनुकूळ आहेत; याशिवाय घाट माथा व कोकणा त शिबंदी ठेवावयास कारभारी लोक पाठविले आ हेत. याप्रमाणें सकूवारबाईनें बंदोबस्त केला, आणि आपला मनोरथ सिद्धीस जावया करितां त्याची प्र सिद्धी लोकांत न व्हावी म्हणून ती नित्य बोलत असे कीं, मी आपल्या धण्याचे बरोबर सतीजाईन

असें असतां बाळाजी बाजीराव पस्तीस हजार लस्कर बरोबर घेऊन सातान्यास आला, तो सकूवा रबाईचा मनसोबा जाणत असे, आणि ती त्यास मा रेकरी घालून मारणार हेंही त्यास कळलें होतें, तथा पि त्याणें तो द्वेष प्रसिद्ध केला नाहीं. कांकीं, ब्राह्मणांचें साह्यत्व फार वाढलें तें अधिक नकोसें असें मनांत त्यानसंत आहे अशी त्यांचा चित्तांत शंका होती. याव

व तो विचार करी कीं, आपण सर्वसत्ता करावी किंवा ना-
गबाईचा पक्ष स्वीकारावा, मग तसेंच केलें. सकवारबा
ईनर सारावेळ राजाजवळच असे, कदाचित् ती जवळ
नसल्यास तिच्या पक्षाचे लोक कोणीतरी जवळ असत. त
थापि बाळाजीनें राजाशीं एकांत करून त्यापासून सनद
घेतली कीं, मराठ्यांच्या सर्वराज्याचा कारभार पेशव्यानें
करावा आणि लौकिकांत राजाचा मान मात्र रक्षावा, व ता
रा बाईचा नातू अधिपति करून त्याचा व त्यास पुढें संतति
होईल तिचा उत्तम रीतीनें सांभाळ करावा. याशिवाय
न्यासनदेंत लेख होता कीं, कोलापूर संस्थान संभाजीचें नें ए
थक असावें.

१७ त्यानंतर लवकरच शाहूराजाचा काळ झाला,
तेसमयीं साताऱ्यांत बाळाजीच्या स्वारांची टोळी धांव न
धांवत येऊन प्रतिनिधि व त्याचा मुनाळीक या उभय
तांच्या पायांत बिडया घालून दोघांस दोहों किल्ल्यांवर
दूर दूर ठेविलें. तेवेळेस पेशव्यांची शिबंदी साताऱ्या कि
ल्ल्यावर चढली, आणि रामराग ताराबाईचा नातू तो
कोल्हापुराहून येत होता त्यास आणावया करितां किती
एक लोक सामोरे गेले. असें झालें तेव्हां सकवारबाई
समजली कीं, मी जें मनांत योजिलें तें लोकांत प्रसिद्ध झा
लें, आतां तें कांहीं एक सिद्धीस जावयाचें नाहीं. बाळाजी
नें तर तिणें पहिल्यानें सटलें होतें कीं, मी सती जाईन, ते
व्हां पासूनच मोठया मेहनतीनें तें लोकांत प्रसिद्ध केलें
होतें. कां कीं, तिचें सती जाणें त्यास अत्यंत हितावह होतें. या

[illegible] आवश्य घेउनें याकरितां त्यागें तो उद्योग के
ला. मग शाहू मेल्यावर बाळाजीनें सकवारबाईला कपटा
नें विनंती पूर्वक आग्रहाचा निरोप पाठविला कीं, मी तुमचे
आईंद वागणारा इमानी चाकर असतां तुम्ही कां सतीजा
नां? आपण नजावें. असें तिला सांगून पाठऊन तिचे भा
ऊ शिरके कुवांरजी त्यांस बोलाऊन सांगितले कीं, तुमची
चढ़ीण सती न गेलीतर तुम्ही व तुमचे जातीचे मराठे यां
चा मान रहाणार नाहीं, त्यास तिणें तें अवश्य केलें पाहि
जे; जर तुम्ही करवाल तर तुम्हास कोकणांत जहागीर दे
ऊं. अशा कपिमें करून बाळाजी बाजीराव पेशवा या-
नें आपली मसलत सिद्धीस नेली, ती सकवारबाई
अशा अडचणीउत्पन्न करून सती घालविली त्यापेक्षां
जर तिजकडे कांहीं अन्याय आहे असें मिष करून ति
चा शिरछेद करविता तर लोकांत त्याच्या पराक्रमास ए
वढें दूषण न लागतें. ज्याशास्त्रज्ञान त्यांस हें यावत् व
र्तमान शाऊक आहे ते हा केवळ अधर्मसा जाणून हें कर्म
अश्लाघ्य मानितात.

भागमत्तावा

संनसत्तावीं पन्नासां पासून संनसत्ताशें छपन्न पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ शाहूच्या मृत्यूचे अगोदर पेशव्यानें राजाचें नांवें क

रून यशवंतराव दाभाडे व रघूजी भोंसले व इतर जहागीरदार सरसरसा खास बोलावणें केलें तेसमयीं रघूजी भोंसले आणि जहागीरदार आले, परंतु दाभाडे व त्यांचा मुख्य सरदार दमाजी गाइकवाड हे आले नाहींत. यां सर्वांस बोलाविण्याचें कारण इंच कीं, यांत आपणाविषयीं कोण कोणाचीं मनें कसकशीं आहेत तें समजावें, व आपला जो कर्तव्यार्थ त्यास त्यांनीं अनुकूळ व्हावें. तेंतर रघूजी भोंसला तर आपली वृद्ध दशा व बाळाजीच्या प्रारब्धाची चढती व आपणास प्रतिवर्षी बंगाल्यांत स्वारी करावयाची आवड व नासिरजंगा बरोबर आपला पुत्र दहाहजार फौज घेऊन करनाटकांत गेला त्या योगें आपल्या सामर्थ्याची न्यूनता. या सर्व प्रकारांहीं येशव्यास प्रतिकूळ होणें ठीक नाहीं, असें समजून त्यास वश झाला. परंतु त्यांणें एकदां राजाराम राजा यास दत्तक भोंसल्याचा वंशी नव्हे असें मानिलें होतें, मग ताराबाईचें व त्याचें एकताटीं भोजन झालेलें पाहून खरा असें मानू लागला.

२ नेक्ष्टी बाळाजीबाजीराव पेशवा यांणें आपली मसलत सिद्धीस गेली तें व रघूजी भोंसला आपणास वश झाला तें प्रसिद्ध व्हावया करितां रघूजी सातार्‍यांत ठेविला, आणि आपण पुण्यास गेला. तेसमयीं रघूजीस बोलिला कीं, तूं दुसरे सर्व जहागिरदार घेऊन पुण्यास ये, मग राजानें सांगितलेल्या यादीपैकीं राहिलेलीं सर्व कामें करूं. नंतर तो त्या प्रमाणें सर्वांस जमा करून ते व आपण मिळून पुण्यास खाजवंछ गेले. त्या पासून पुणें मराठे लोक यांचा मा

ची राजधानी झाली. हें वर्तमान संनसवाशें पन्नासांन झाले.

या मनकारें बाळाजी बाजीराव पेशवा आपल्या मनोद यानुरूप सर्व कार्यें झालीं त्याचे आनंदें करून पुढें नारावा ई कांहीं गडबड करील कीं नकरील तें समजलाच नाहीं. नी सत्तर वर्षांची म्हातारी होती तिणें सुज्ञ आणि जाणीवंत अशा स्त्रीचा अपमान करणारा जो तो निःसंशय धोका पावेल असें समजावून त्यास सावध केलें. तो प्रकार असा, सिंहगडीं तिच्या नवऱ्याचें थडें होतें त्याचें दर्शन घ्यावयाचें मिष करून ती तेथें गेली, आणि पंत सचिव यास आपल्या कडे अनुकूळ करून घेऊन आपण स्वतः धनीपणा करावयाची मसलत योजिती झाली. तेव्हां बाळाजीनें त्यास फार आग्रह करून पुण्यास बोलावून नेऊन तुम्हालाच ज्य कारभारांतील बहुत कामें मिळतील असें सांगून महा प्रयासें सचिव वश केला; आणि सांगितलें कीं, माझ्या मसलतीप्रमाणें राजारामाला वागवावें.

त्या समयीं वराड व गोंडवण व बंगाला यांची सनदा. बाजीनें रघूजी भोंसल्यास दिली, यारंबरीज प्रतिनिधीची जहागीर वराड प्रांताहीं लागून होती तीही रघूजीस दि ली. यशवंतराव दाभाडे यांस गुजराथेचा निम भाग दिला, राणोजी शिंदा त्याचेळेस मृत्यु पावला होता त्याचा वडील पु त्र यास बापाचा अधिकार दिला. माळवा मुलूख साठी ज मा दीड कोट रुपये वर्षास होत असे सांवून चोथाई हा नर लष्क रोळकरास दिले, आणि सरदेशमुखी लक्ष शिंद्यास दिले,

बाकी साडेदहालक्ष उरले ते इतर जहागीरदार यांस वांटून दिले. त्यांत मुख्य आनंदराव पंधार. हे सर्व पेशव्यास अनुकूळ होते, त्यांपासून त्यास विपरीत भावाचें भय नसे. म्हणून लष्कर पदवी सोमवंशीचे कुळांत होती ती घेऊन लिंबाजी निंबाळकर यास दिली. हा सर्व बंदोबस्त गजाचेनें झाला, परंतु लोकांत प्रसिद्ध होतेकीं, हें कर्तृत्व पेशव्याचें.

जगजीवनराव प्रतिनिधी पेशव्यानें केद केला होता तो सोडून त्याबरोबर यमाजी शिवदेवही सोडिला. तो सुटका पावल्यानंतर त्याणें पंढरपुराजवळ सांगोळा किल्ला आहे तेथें जाऊन बंड उत्पन्न केलें. मग सदाशिवचिमणाजीनें जाऊन त्यास जिंकिलें. गजाराम सदाशिवचिमणाजी बरोबर गोळ्यास होता तेथें त्याणें असे पत्र दिलें कीं, सर्व राज्याचा कारभार पेशव्यानें करावा, आणि आपणास सातान्याभोवता थोडकासा मुलूख खासगीकडे असावा. तें पेशव्यानें कबूल केलें, परंतु राजाच्या खासगीकडे किमपि नदिलें, तेव्हा विस्तार पुढें लिहिण्यांत येईल. त्यासमयीं राजाराम राजाबरोबर बंदोबस्ताकरितां पुष्कळ सैन्य देऊन सातान्यास पेशवे हुंचविला.

३ इकडे पुण्यास पेशवा व त्याचा चुलत भाऊ सदाशिवराव या उभयतां मध्यें कांहीं कलह उत्पन्न होऊन त्या पेशव्यानें आपल्या हितार्थ सावधपणें जो जो नेमकला तो तो व्यर्थ होईलसा दिसूं लागला. त्याकलहाचें निमित्त असें, कोणी एक मांढनाचे वाडीमधील आरवलीगांवचा कुलकर्णी या

मचट्वावा होणारी. त्याचें पहिलें नाव रामचद्र मल्हार होतें, तो आल्या कुळकरणी पणाच्या हिशेबांत कांहीं चूक पड ल्ीलमून तेथून पळून साताऱ्यास आला. तोच कचेश्वर बाबा अतीतकर याणें आपल्या चाकरीस ठेविला, ने झांलमून त्याणें बाळाजीच्या बापाचा आश्रय संपादिला होता. पुढें तो कारकुनी व शिपाईगिरी या दोंहीं कामांत निपुण असा पाहून तो बाजिरावानें शिंद्याचा दिवाण के ला. मग राणोजी शिंदा मेल्यावर त्याचा पुत्र जयाप्पाशिंदा यांचेंही दिवाणगिरी आपण करावी म्हणून त्याणें सदाशि वराव भाऊ यांस कांहीं लांच दिला, परंतु त्याजयाप्पाचें व त्या चें वैमनस्य असे, आणि मल्हारराव होळकर यांचा रामचंद्र हुजरास प्रतिकूळ म्हणून बाळाजीनें त्यास दूर केलें. इकडे सदाशिवराव रामचंद्रपंतास आपला दिवाण क रून त्याचे मसलतीनें आपल्या बापाची पदवी मागूं ला गला. नें मागणें बाळाजी मान्य करीना, कांकीं, त्याव र मल्हारजिपंत पुरंदऱ्याचा मोठा उपकार होना त्यास दूर करून ती जागा सदाशिवभाऊला द्यावी लागली. अश्ा हलक्या कारणानें पुढें द्वेष मोठा वाढला. मग सदाशिवभा ऊ व होळकर आणि पेशवा व रामचंद्र यांचीं परस्परें वै मनस्यें पडण्याचें कारण तेंच. त्या मुळें तात्काळ युद्ध म संग झाला असता, परंतु महादाजीपंत यान्या उत्तम आच रणानें राहिला. तो प्रकार असा, सांगोळी किल्ला घेतल्यानं तर सदाशिवरावानें त्या वैमनस्या संबंधें कोलापूरकर सं भाजी याचा पक्ष धरिला, त्याणें त्यास आपला पेशवा करून

न्यास पारगड व कलानिधी व चंदगडी हे तीन किल्ले आणि वर्षास पांच हजार रुपये उत्पन्न होत अशी जहागीर दिली. तेव्हां महादाजीपंत पुरंदऱ्यानें आपला अधिकार सोडून जागारि कामा केला, मग तो पेशव्यानें सदाशिवभाऊस दिला. नंतर तो कोलापुर कराची चाकरी सोडून पुण्यास येऊन बाळाजी बाजिरावाजवळ मुख्यत्वें कारभार करूं लागला.

४ शाहूचे मरणाचे पूर्वी नाशिरजंग निजामाचा दुसरा पुत्र यानें बापाचा अधिकार चालविला होता. तो नाशिरजंग करनाटकीं मोठें सैन्य घेऊन चालिला असें पूर्वी लिहिलें आहे. त्यामध्यें गाजीवदिन निजामाचा वडील पुत्र तो मल्हारराव होळकर याच्या द्वारें आपल्यास स्वतः निजामपदवी मात्र द्यावी म्हणून पेशव्यास सहाय मागूं लागला. तेव्हां पेशवा यानें तीगोष्ट मानून त्या विषयीं दिल्लीच्या बादशाहास पत्र लिहिलें, आणि आपणसैन्य बरोबर घेऊन औरंगाबादेकडे गेला. तेव्हां ताराबाईची मर्जी राखावयासाठीं सिंहगड घेऊन त्यावरील तुंग व तिकोना हे दोन किल्ले पंतसचिव यास दिले. त्या खेरीज साताऱ्यांतून आपले लोक काढून जे तेथले पुरातन गडकरी होते त्यांचे स्वाधीन सातारा किल्ला करून त्याही ताराबाईचे आज्ञेंतवागावेंसें केलें. त्यावेळेस गजाराम राजा यांला किल्ल्याचा खर्च खेरीज करून खर्चास सांसष्ट लक्ष रुपये वर्षास देऊं करून गोमोठ्या संमानानें सातारे हा हरांत मोकळेपणें ठेविला होता.

५ त्याचसमयीं नाशिरजंग कर्नाटकांत गेला होता त्याचा आश्रित रामदास नामें एक ब्राह्मण असे त्याचे द्वारें फ्रांशीस लोकांचा डुपळे नामें कोणी एक मुत्सद्दी होता त्याणें त्या नाशिरजंगाच्या लश्करांत दंगा उत्पन्न के ला. त्या दंगा करणाऱ्यांत कोणी एक महंमदरवान नामें पठाण खर्याचा नवाब होता त्याणें गोळी घालून नाशिर जंगास मारून टाकिलें. त्यानंतर फ्रांशीस लोकांनीं त्या चा भाऊ मुजाफरजंग याणें त्या नाशिरजंगाचे जागीं अ सावें असें केलें; आणि त्यास बरोबर घेऊन हैदराबादेक डे चालिले, परंतु त्याणें तें पद बहुत दिवस अनुभवांसें न झालें. कांकीं, नाशिरजंगास मारून जो अर्थ झाला तो झाला नाहीं, म्हणून ते पठाण लोक पुनः कांहीं बंड करूं लागले, त्यांच्या पारिपत्याकरितां मुजाफरजंग युद्ध करूं लागला, त्यांत तो जय पावला, परंतु त्या कामांतच मेला गेला. त्यानंतर त्याचा भाऊ सलाबतजंग यास त्याची जागा मिळाली. असें सन सत्राशें एकावन्नांत झालें.

६ त्यानंतर तो सलाबतजंग फ्रांशीस लोकां सहित हैदराबादेकडे जाऊं लागला, तेव्हां तो पेशव्यानें कृष्णेचे का ठीं गांठला. तेसमयीं युद्धप्रसंग झाला. परंतु त्याच वेळ म मानाच्याकडून अमेंकांहीं वर्तमान आलें कीं, जेणें करून बाळाजी बाजीराव युद्ध नकरितां सलाबतजंग याणें जो तह केला त्यासच मान्य होऊन मांडया त्वरेनें साताऱ्यासि पाला.

तें वर्तमान अमें, पेशवा औरंगाबादेस चालिला तेव्हां

ताराबाईनें असें केलें कीं, राजाराम याचें मन स्वतंत्र पणें चालावयाचें आहे किंवा नाहीं हा शोध केला, त्यांत असें दिसूं लागलें कीं, तो केवळ अयोग्य. मग तिणें त्यास समजाविलें कीं, नीट सहज विचारिलें; आणि त्याच समयीं दमाजी गाइकवाड यास पत्र लिहिलें कीं, सांप्रत तुझ्यासारखा पृथ्वीं प्रतिपक्षी नाहीं, त्यास तुल्यी लवकर येऊन राजा व मराठे यांचें राज्य ब्राह्मणाच्या हातचें सोडवावें. ही गोष्ट दमाजीनें मान्य केली, आणि साताऱ्यास चालिला. तो जवळ आलाला समजून ताराबाईनें राजास शाहूपासून आपल्याजवळ साताऱ्या किल्ल्यावर बोलावून नेलें, आणि त्याची भेट होतांच त्यास अत्यंत निर्भर्त्सना करून बोलिली कीं, अरे तूं शिवाजीचा वंश नव्हेस, मी आपला मूल गाडल्याचे घरीं लपवून ठेविला होता, त्याणें तो ठेवून आपला पुत्र दिला असेल, त्यातुला चौकशी न करितां मी एवढया पदावर बसवून आतां मोठा पश्चात्ताप पावलें कीं, जो गोंधळ्याचा पोर तो शिवाजीचा वंशयसा मी केला, त्या पापाचें प्रायश्चित्त तला कृष्णेचे कांठीं जाऊन केलें पाहिजे. असें भाषण करून म ग त्याला बंदींत ठेवून किल्लेच्या हवालदारास आज्ञा केली कीं जे लोक याजवरोवर आले आहेत त्यांवर बंदुकांचा मार करून घालवून द्या, आणि बहुतांत कोंकणस्थ ब्राह्मणाचे जे पक्षपाती असतील त्यांच्या घरांवर तोफांचा मार चालेसा बेत करून ठेवा. हें वर्तमान चिंचकपंत ज्याम नाना पुरंदरे म्हणत- तो त गोविंदराव चिटणीस यांस च इतर जे पेशव्याचे पक्षी सरदार मुत्सद्यांस होतें त्यांस कळलें, परंतु ते समजले

कीं ही खानारी वेडी झाली, त्यणून तें प्रकरण त्यांही चुकू ना
मिलें. मग जेव्हां असें वर्तमान आलें कीं, दमाजी गाइक
वाड फौजे सहित साताऱ्यास येतो, तेव्हां नें आपले सारे लोक
जमा करून कृष्णेचे कांठीं आरळें गांव आहे तेथें जाऊनउ
तरले. ती सेना वीस हजार मिळाली, मग दमाजी गाइक
वाड पंधरा हजार फौज घेऊन सालप्याच्या घाटानें आर-
ल्या जवळ आला, तेव्हां त्याउभयतां लश्करांची गांठ पड
तांच पेशव्याचे लोक त्यांवर जाऊन पडले, परंतु तें पडणें
हिंमतीनें न झालें, आणि कांहींसें युद्ध करून तेलोकमा
गें हटून लिंबास गेले. दुसरे दिवशीं गाइकवाडाचे लोकां
नीं त्यांवर पडून त्यांचा अगदी मोड केल्यानंतर दमाजी सा
ताऱ्यास जाऊन ताराबाईस भेटला, तेव्हां ताराबाईनें साता
ऱ्या जवळचे कितीएक किल्ले हस्तगत केले. तिला प्रतिनि
धि अनुकूळ होता. हें वर्तमान ऐकून पेशव्याला मोठ्या त्वरे
नें साताऱ्यास यावें लागलें. तो येऊन पोहंचल्याचे पूर्वीचि
नानापुरंद्यानें गाइकवाडाचे फौजेशीं लढून त्यास माताऱ्या
न जोरखोऱ्यापर्यंत घालविलें होतें. मग त्यादमाजी गाइक
वाडानें असें पाहिलें कीं, फौजेसहित पेशवा जवळ आला,
आणि प्रतिमिधीनें बोलिल्याप्रमाणें साहाय्य न केलें; यास्त
व त्याणें पेशव्याशीं तहावें बोलणें लाविलें, तेव्हां तें पेशव्या
नें मान्य केलेसें दाखवून त्या बोलण्याच्या कामानिमित्त द
माजीनें आपल्याजवळ उतरावयास यावें असें केलें. नंत
र तो त्याप्रमाणें त्याच्या जवळ उतरल्यावर मग पेशवा तो
आपले हातीं पुरता सांपडला असें समजून त्याजवळ गुज

राधेब्राव्ह जो पैका यावयाचा होता तोव गुजराथसंबंधी कितीएक मुलूख मागूं लागला. तेसमयीं त्याणें उत्तर के लें कीं, या कामास मी आंगचा धणी नव्हें. त्यानंतर पेशव्या नें गाइकवाडाचीं व दाभाड्याचीं मुलें माणसें नळेगांवीं हो तीं तीं आज्ञा पाठवून कैदकेलीं, आणि तेथून काढून लो हगड किल्ल्यास पाठविलीं. मग दमाजी गाइकवाड याच्या लश्करावर छापा घालून दमाजी कैदकरून पुण्यास पाठ विला. त्यानंतर पेशवा आपणास ताराबाई वश होऊन सातारा किल्ला हस्तगत व्हावा म्हणून उद्योग करूं लागला, परंतु ती ऐकेना; आणि सर्व मराठे लोकही मानीत कीं, स्वतां कारभार संभाळावा हा अधिकार ताराबाईचाच, या शंकेस्तव पेशव्यानें बलात्कारें करून तिला बाहेर न काढि लें. अमें संकट पेशव्यास प्राप्त झालें तथापि राजास प्रथ मच कैद केलें होतें, त्याचा दोष त्याजकडे न आला, हा फ क त्यास लाभच झाला. जसें मोठा अपराधी चोरादिक यास कैदेंत ठेवावें तसेंच राजाराम राजा यास ताराबाईनें प्रतिबंधांत ठेविलें. त्याच्या पायांत बिडीमात्र घातली नव्हती.

७ त्यानंतर बाळाजी गाजीवदिनाशीं कबूलात केल्या प्रमाणें औरंगाबादेस जावयास निघाला, तो पुढें ज्याज्या जा गीं सलाबतजंगाची सत्ता होती त्यात्या जागची खंडणी घेत चालिला. त्यासमयीं फ्रांशिसांचा सरदार मोठा सावध बसी नामा होता, त्याजवळ कांहीं मुलखीं रहाणारे गोरे लोक शिपा ई पांचशें होते, त्याशिवाय हिंदु शिपायी पन्नास लोक ही

पंच हजार असत, त्याचें सलाबतजंग यास बळ असे, यास्तव तो त्याचे मसलतीनें वागे. त्याचरून बाळाजी आपले मुलखीं उपद्रव करितो त्रणून तो आपला मुलूख नरक्षितां मराठ्यां चे मुलखांत जाऊन दंगा करूं लागला, आणि ताराबाई व कोलापूरकर संभाजी यांहीं आपला पक्ष स्वीकारावा सें के लें. हें वर्तमान समजून बाळाजीस कांहीं आश्चर्य वा टलें, मग तो येऊन आपले चाळीस हजार स्वार जमा करू न मोंगलांचे लश्करावर जाऊन आपल्या रीनी प्रमाणें समूर नलढतां त्यांसभोंवता घेरा घालून नाना प्रकारें उपद्रव देऊं लागला, परंतु त्या मोंगलांस फोंशिसांचें ल श्कर व तोफा यांचें बळ चांगलें होतें, त्या योगें ते तो उप द्रव नगणितां वाटेनें गांव जाळीत पुण्याकडे चालिले. शेवटीं मराठे यांणीं मोठ्या निकरानें त्यांवर हल्ला केला, त्या समयीं मोंगलांच्या लश्कराचा नाश बहुत झाला, परंतु फोंशिसांच्या तोफांचे आश्रयें करून ते वांचले. त्यालढाईं त कोन्हेर त्रिंबक एकबुटी नामें मराठ्यांचा एक सरदार होता त्याणें असा पराक्रम केला कीं, त्यादिवसापासून तो पांखरे असें नांव पावला, त्याच्या घोडयाचे पायांत रुप्याचें कडें अ से. या प्रमाणें मराठे जय पावले तरी मोंगलांचें लश्कर भीमे चे कांठीं कोरे गांवा पर्यंत पोंहचलें. तेथें सलाबतजंग या नीं पेशवा तहाचें बोलणें करूं लागला, परंतु सलाबतजंगा च्या मुलखांचें कांहीं नुकसान आल्या मुळें पुरता तह न होतां तो मराठ्यांचा उपद्रव सोसीत माघारा दंडनगरकडे गेला. पेशव्यांच्या मंडळीनें तो पेशव्यानें तहाचे बोलणें लाविलें होतें

नें मान्य करून लष्कर माहिन हैदराबादेस चालिला. इतकें मान संनसचाशें चावन्नांत घडलें.

८ या प्रमाणें हिंदूच्या मुलखाचे पश्चिमेस वर्तमान अस्तां पूर्वेकडे रघूजीनें आपला पुत्र करनाटकीं गेला होता तो माघारा आल्यावर त्यास बंगाल्यांत स्वारी करावयास आणि मीरहबीब याचे साहाय्यास पाठविलें. त्या समयीं अलीवर्दीखान निमराय होऊन त्यानें कटाक प्रांतांतील मुलूख उत्तरेकडे बालासोर पर्यंत मीरहबीबाचे स्वाधीन केला. परंतु लौकिकांत आपल्या मानाच्या संरक्षणार्थ अलीवर्दि लेखीं, मीरहबीब आपला हस्तक आहे. असें सनसचाशें एकावन्नांत झालें. तो मीरहबीब एवढ्या योग्यतेस चढला, परंतु नीच योग्यता त्याच्या नाशास कारण झाली. नाश कार. असा. रघूजीचा पुत्र जानोजी याशीं व त्याशीं परस्परें स्पर्धा उत्पन्न होऊन जानोजीनें त्यावर कांहीं पैका खालल्याचे निमित्त ठेवून त्या मीरहबीबास केदेंत ठेविलें. तेव्हां त्यास तोफ तिबंध सोसेना म्हणून त्याजवळ जितके लोक होते तितक्यां सहित तो त्या चौकीदारांवर पडून मृत्यु पावला. अलीवर्दीखानानें रघूजीस कटाक प्रांतातील मुलूख दिला तेव्हांपासून बंगाला व बहार यांच्या व्यवस्थाई बदल चाळीस रुपये घेत ले. या थोड्क्या पैशाचें कारण असें, पेशवा व मल्हारराव होळ युद्ध करूं लागले त्यांत आपला अर्थ साधावा असें मनांत आणून बंगाल्यांत शिरून त्यांनें किल्ला गांवलगड व नरवाला व माणिकदुर्ग हे तीन किल्ले घेतले. त्यानंतर मोगलांचे लक्ष [illegible] वर्तमान ऐकून [illegible]

री या दोहों नव्यांमधल्या मुलखाची खंडणी घेऊन मोंगलांनी ठाणीं उठवून जागोजागीं आपलीं ठाणीं बसविलीं.

९ आतां आधीं दिल्लीकडे काय काय वर्तमान झालें तो प्रकार ध्यानांत आला पाहिजे. आमेदशाह तेथचा तक्तापति झाल्यावर आफगाणलोकांचा बादशाह पुनः दिल्लीस ये ऊं लागला, त्यास मध्येंच लाहोरच्या अधिकाऱ्यानें आपल्या मुलखाची खंडणी देऊन तो मागें फिरविला. त्यासमयीं दिल्लीमध्यें सफ्दरजंग नामें वजीर होता त्याच्या मनांत आलें कीं; रोहिले लोक मोठ्या योग्यतेस चढून फार उन्मत्त झाले, आणि त्यांमध्यें तक्ताच्या आधिपत्याविषयीं तिघे भाऊ भांडतात तस्मात् हा समय त्यांना जिंकावयास उत्तम आहे असें समजून तोलश्कर सहित तिकडे जाऊन त्याणें तो मुलूख घेतला; आणि तेथें कोणीएक आपला हस्तक नेवल राई नामें कायत जातीचा ठेवून माघारा दिल्लीस गेला. मग रोहिल्यांहीं मिळून त्या कायताला मारून टाकिलें, तेव्हां तो वजीर दुसऱ्यानें त्यांवर गेला, परंतु जय न पावला. अशा अवस्थेंत त्याणें मल्हारराव होळकर व जयापाशिंदा व जाटांचा राजा सुरजमल्ल नामें होता तो या इतक्यांस सहाय करून न घेऊन मानक्यान रोहिले जिंकून तो मुलूख घेतला, आणि त्यासाहाय्या बद्दल होळकर व शिंदे यांस त्याच मुलखाचा बहुतेक भाग दिला. असें कार्य झालें ते समयीं आफगाणांचा बादशाह दिल्लीकडे पुनः आला, आणि लाहोर व मुलतान हे मुलूख घेतले. तेवेळेस दिल्लीच्या बादशाहानें आपला वजीर सफ्दरजंग जवळ नव्हता यास्तव त्याम लवकर

यावें ह्मणून चोला चलें, परंतु त्याचें येणें होई तों पर्यंत दम न धरितां शह्रूम लाहोर व मुलतान मुलुख दिला. मग तो वजीर आल्यावर बादशाहास समजलें कीं, आफगाणां चा बादशाह काढून द्यावया करितां वजिरानें मराठ्यांस बहुत देणगी देण्याची आशा दाखवून अनुकूळ केलें होते. त्यांहीं त्या वजिराच्या कामासाठीं रोहिल्यांपासून पन्नास लक्ष रुपयांच्या कबुलातीचें पत्र घेतलें, आणि त्यांचा मुलूख सोडिला. नंतर जेव्हां समजलें कीं, आपण केलेला प्रयत्न व्यर्थ गेला, तेव्हां तो सफूदरजंग अशा अडचणींत पडला कीं, मराठ्यांनां बक्षीस काय द्यावें, व त्यांस काम कोणतें सांगावें; इतक्यांत पेशव्यांकडून सलाबतजंगाला जिंकावया करितां आपल्या साहाय्यासाठीं शिंदे व होळकर यांस बोलावणें आलें. तेव्हां सफूदरजंगानें पेशवे व गाजिवद्दीन यांच्या तहामध्यें गाजीवदिनास निजामपदवी द्यावयाची कबूल केली होती तें स्मरून त्यां मराठ्यांबरोबरच गाजीवदिनास पाठविलें, आणि त्यांस असें सांगितलें कीं, तुम्ही गाजीवदिनाच्या कार्याविषयीं पेशव्याचें साहाय्य करावें.

१० इकडे औरंगाबादेंत सलाबतजंग होता त्यानें असें पाहिलें कीं, आपला भाऊ गाजीवदिन बळकट्यं झाला, आणि त्यास बक्षीणपुरचा मोंगलही अनुकूळ आहे, ह्मणून त्या सलाबतजंगानें पेशव्याशी तहाचें बोलणें लाविलें. त्यापूर्वी पेशव्यानें गाजीवदिनाशीं बोली केली होती कीं, तुमची पदवी तुम्हास देवविली असतां वराडाचे पश्चिमेस तापीपासून गोदावरीपर्यंत मुलूख तुम्ही आह्मांला द्यावा. त्यावरून त्यासंबंधि आप आपलीं

[illegible]ल्ली कार्ये सिद्धीस जाण्याची लालसा भरपूर होती, परंतु का
क अनुकूल नव्हता; यास्तव गाजीउद्दीन त्याच्याहस्तें निजाम
अल्लीच्या माणुसाकडे भोजनास गेला, तिणें त्याला विष घाल
नें मेणंकरून तो त्याच रात्रीस मरण पावला.

११ यानंतर सलाबतजंग मराठ्यांस गाजीउद्दिनानें पा
त्रयाचें कबूल केलें होतें तें नघावें अशी इच्छा करूं लाग
ला. परंतु त्याच्या सामर्थ्यापुढें निरुपाय होऊन कबूल क
रिता झालाकी, रघूजी भोंसल्यानें पैनगंगेच्या आलीकडेंआ
पलें राज्य उठविलें म्हणजे माझ्या भावानें करार केल्याप्रमाणें
मी पेशाच्यांस देईन. मग तें रघूजीआनें मान्य केलें, नंतर स
लाबतजंग निर्भय पणें निजामपदवी अनुभवूं लागला, आ
णि होळकर व शिंदे लश्कर मुद्धां हिंदुस्थानांत गेले, नंतर
पेशवा पुण्यास आला. याप्रमाणें संनसत्राशें त्रेपन्नांत घड
लें.

१२ पेशवा गाजीउद्दिनाच्या कामाकरितां औरंगाबादे
स गेला असतां ताराबाईनें मराठे व रामोशी मिळून पांच
सहा हजार लोक ठेवून वाई व सातारा हे दोनही परगणे
आपल्या सत्तेंत आणिले. मग पेशवा पुण्यास आला तेव्हां त्या
ने असा निश्चय केला कीं, कर्नाटकी स्वारी जाल्यावी, परंतु
त्यापूर्वी ताराबाईचा बंदोबस्त आधीं करावा हें उत्तम वाटलें.
नंतर त्यानें सातारा यास मोठी फौज पाठविली, आणि तेथच्या
किल्लेदारास बाहेर काढून अन्न न पोहंचेसें करून किल्ला घ्यावा अ
से केले. त्या समयीं त्या किल्ल्याचा हवालदार आनंदराव जा
धव नांवें होता. त्यानें असे पाहिलें कीं, आता युद्ध करून मी

णाम ठीक नाहीं म्हणून विचार करितां झाल्या की, राजा कांहीं न ताराबाईच्या हद्दीबाहेर न्यावा, हें वर्तमान निश्चा कळलें तेव्हां निजेंत तेथल्या शिपायांस आज्ञा देऊन त्या हवालदाराचा शिरच्छेद केला

यानंतर ऐशा ताराबाईकडील बंदोबस्ताचें काम नसेंच ठेवून करनाटकांत गेला. तो तेथें पहिल्या पेक्षां स्थपणें खंडणी घेऊन श्रीरंगपट्टनाचा ही खंड घेता झाला, आणि किल्ला ऊर्फ ओनोर तो त्याणें युद्धेंकरून हस्तगत केला.

१३ मग संनसवाशें त्रेपन्नांत पर्जन्यकाळाच्या सुमारें पेशवा पुण्यास आला.पुढें पाऊसकाळ गेल्यावर तो गुजराथ प्रांतावर जावयास उद्युक्त झाला,तेव्हां त्याणें आपला भाऊ रघुनाथराव याजबरोबर सैन्य देऊन गुजराथेंत पाठविला.

तेचेळेस दमाजीगाइकवाड पुण्यामध्यें बंदींत होता, तो सोडून आपल्या कामांत घ्यावा असा निश्चय करून पेशव्यानें त्याशीं तसा बोलणें लाविलें. त्यांत असा नेम ठरला की, गाइकवाडानें पहिल्या ठरविलेल्या खंडणीबा बद पंधरा लक्ष रुपये पेशव्यास द्यावे. आणि आपला गुजराथेंतील मुलूख ही निमे द्यावा; त्या खेरीज दुसरा कांहीं मुलूख घेतला असतां त्यासंबंधें जाब न होईल तोही अर्धा द्यावा; याशिवाय जेसमयीं स्वारीचें काम पडेल तेसमयीं दहाहजार फौज चाकरीस पाठवावी; यावेगळे दाभाडेसेनापति यांचे मुलांकडील जाबद पांचलक्ष रुपये द्यावे, [illegible] मुलूख [illegible] आपल्या

भागाचा आहे त्यावरुन पंचवीस हजार रुपये द्यावे; या शिवाय गुजराथेंत पेशव्याचे भागीं पेशव्यांस ठाणीं बसवावया विषयीं सहाय्य व्हावें, आणि साताऱ्याच्या राजाला प्रतिवर्षी कांहीं खर्चास द्यावें; असें कबूल करून दमाजी मुक्तता पावला. मग त्याणें गुजराथेंत जाऊन नवें लश्कर उभें केलें. पुढें पेशव्याचा भाऊ रघुनाथराव तिकडे गेला तेव्हां तो त्यास मिळाला, मग ते दोघे स्वस्थचित्तें मुलखाची खंडणी घेत चालिले. ते अमदाबादेस पोहंचले तेव्हां तेथचे कि ल्लेकरी त्यांशीं युद्ध करूं लागले. तेथें मोठी लढाई होऊन शेवटीं त्या मोंगलांहीं किल्ला पेशव्यांस दिला. तथापि त्या किल्ल्यांत जवान मर्द नामें त्या मोंगलांचा मुख्य होता त्याच्या शौर्यें करून त्यास अमदाबादेचे उत्तरेकडे किर्नाएक मुलूख मिळाला, त्यांत पटन व बरनगर व राइनपूर वगैरे कांहीं परगणे होते; परंतु पुढें दहा वर्षांनीं दमाजीनें त्यांतील बहुतेक परगणे माघारे घेतले. त्या युद्धांत पेशव्याकडचा नारोशंकर* होता त्याचे स्वाधीन बहुत आरब असत न, तो त्या वेळेस आपल्या शौर्यें करून मोठी योग्यता पावला. या प्रमाणें संनसत्राशें पंचावन्नांत गुजराथची राजधानी अमदाबाद मराठ्यांचे हातीं पुर्ने पणें लागली. तेथें पेशव्यानें श्रीपतराव नामें आपला हस्तक ठेविला, आणि असा नेम ठरविला की, तो सर्व वसूल पेशवा च गाइकवाड या उभयतांहीं समसमान वांटून घ्यावा, आणि त्या कि-

---

* नारोशंकरानें त्या पूर्वी खानदेशांत माले गांव किल्ला बांधिला होता.

ल्याच्या एका दरवाजावर माधवगाडकवाड्याचे शिरकाई ठेवून व रकड सर्वजागीं पेशव्याचे लोक ठेवावे. असा बंदोबस्त झाल्यानंतर रघुनाथराव व दमाजी बडोद्यास जाऊन एकमेकांचा मोठा सत्कार करून मग ते दोघे परस्परें वियोग पावले. तो प्रकार असा, रघुनाथराव आपल्या बरोबर दत्ताजीशिंदा यास घेऊन हिंदुस्थानांत गेला, आणि दमाजी बडोद्यास च राहिला. पेशवा हिंदुस्थानांत गेल्यावर मल्हारराव होळकराचा पुत्र खंडेराव होळकर त्यास मिळाला, मग ते दोघे मिळून अजमीर प्रांतांत पसरले, आणि तेथें लुटालूट करून चौथ व सरदेशमुखी घेतेझाले, आणि शत्रु व मित्र मान मानून जेथें जेथें सांपडे तेथ तेथची खंडणी घेत चालिले; तेव्हां जाटलोक यांसही खंडणी द्यावी लागली, परंतु ते युद्धावांचून देईनात. त्यांचा किल्ला कुंभेरनामें होता तेथचे लढाईत खंडेराव होळकर मृत्यु पावला. नंतर संनसत्रा शें चौपन्नांत रघुनाथराव पुण्यास आला.

१४ असें पश्चिमेकडे वर्तमान होत असतां पूर्वेकडे संनसत्राशें त्रेपन्नांत रघूजी भोंसला कैलासवासी झाला. त्यास चौघे पुत्र होते, एकाचें नांव जानोजी, एक साबाजी, एक मुधोजी, आणि एक बिंबाजी. त्यांत दोघे वडील जानोजी व साबाजी ते धाकट्या बायकोचे मूल, आणि दुसरे जे मुधोजी व बिंबाजी लहान होते ते थोरल्या बायकोचे. रघूजीनें आपल्या मरणाचे वेळेस त्या चौघां पुत्रांस आपले जवळ जमा करून चौघांस दौलत व मुलूख वांटून देऊन त्यांत वडील जानोजी तो मुख्य करून त्यास सेनासाहेब सुभा पदवी पेशव्यानें

घावी असें केलें, आणि उपदेश केला कीं, तुम्हा चोघांन कलह नसावा, आणि आपल्या मराठ्यांचे जातीन कोणी भांडू लागले तर तो कज्जा तुटेसा उद्योग तुम्ही करावा, व सर्वांहीं एकचित्त असून राज्य करावें हेंच श्रेयस्कर होईल, त्यांत विभाग नव्हावे. असें त्याणें सांगितलें होतें. परंतु सर्वजनास विदित आहे कीं, जसें अनुभवानें प्राणी सावध होतात तसे केवळ उपदेशानें सावध होत नाहींत. यांचें उदाहरण हेंच कीं, रघूजीच्या मरणा नंतर एकाच महिन्या नें जानोजीस कलह सुटे असें अगत्य पडलें कीं, मुधोजी ला बलात्कारें करून आपल्या आज्ञेंत वागवावें.

१५ यानंतर जानोजी पुण्याकडे आपली सेनासाहेब सुभा पदवी संपादन करावयास निघाला. तोजवळ आ ला असें वर्तमान साताऱ्यामध्यें ताराबाईला कळतांच तिणें पेशव्याचें अभयपत्र घेऊन गजाराम गजा यास किल्ल्यांत बाबूराव जाधव यांचे स्वाधीन ठेवून आपण निघून पुण्यास आली. निजवरावर जानोजीचा भाऊ विंवाजी भोंसला हो ता, त्याणें तिचा पक्ष स्वीकारिला असे. आणि तिचें माहेर मोहित कुळ त्यांच्या कानां सोयऱ्या धायऱ्याच्या कन्येशीं विवाह केला होता तीताराबाई पुण्यास येऊन पोहंचली तेव्हां पेशव्यानें तिचा असा सन्मान केलाकीं, त्याणें जेंजें मनजा विलें ते तिणें संतोषें करून मान्य केलें. परंतु प्रथम तिणें जेजो री- च्या खंडोबाजवळ पेशव्यास नेऊन कृत्रिम करणार नाहीं अशी शपथ करविली; ते समयीं पेशव्यानें ही ताराबाईकडून कबूल [illegible] कीं, बाबूराव जाधव यास दूर करावें या

पेशव्यानें ताराबाईला पक्कें जाणलें कीं, ही विपरीत करणारी आहे, त्यानिच्या स्वभावापासून त्याणें आपला अर्थ साधिला. ता अमा, त्याचे मनांत होतें कीं, राजारामराजा वंशी तून सुटूंनये, यास्तव तो पेशवा ताराबाईजवळ त्या राजाराम च्या मुक्ततेविषयीं वारंवार विनंती करीत असे, ती तिनें कधींही अंगीकारिली नाहीं.

जानोजी भोंसला याणें सरकारांत राजाच्या खर्चाकडे नऊलक्ष रुपये प्रतिवर्षी द्यावे, व ज्यासमयीं आज्ञा होईल त्यासमयीं दहाहजार फौज चाकरीस पाठवावी, असें कबूल करून आपली सेनासाहेबसुभा पदवी मिळवून आपण माघारा वराडांत गेला, त्याचा भाऊ बिंबाजी तोहीत्याचे बरोबरच होता. तो जानोजी माघारा जातांना मोंगल व मराठे यांच्या मुलखांतून गांवोगांव घांस दाणा घेत चालिला, तेणें करून सलाबतजंग त्यावर रुष्ट झाला, त्याचरून जानोजी त्याचा मुलूख लुटूं लागला. तेव्हां सलाबतजंगनें आपला एक सरदार बरोबर थोडकीशी फौज देऊन मराठ्यांवर पाठविला, त्याशीं व जानोजीशीं युद्ध होऊन जानोजी भोंसला पराभव पावला. तो मागें हटून नागपुरापर्यंत गेला, आणि त्याचा दिवाण कैदेंत सांपडला. त्या जानोजीनें जी लूट पहिली जमा केली होती ती नागपुरा कडे जातांना सामसडकनेक माघारी यावी लागली. नंतर तो जानोजी भोंसला नागपुरीं आश्रय पावला.

१६ इकडे दिल्लीमध्यें कारभारी लोकांत वैमनस्यें पडल्यामुळें मराठ्यांस मध्यस्थपणें त्यांत शिरावयाची संधि सांप

ल्ली. गाजीवदिन मृत्यु पावल्यावर त्याचा पुत्र मीर शाबूदिन यानें आपणा विषयीं वजिरास मोह उत्पन्न व्हावया साठीं आ पल्या बापाच्या शोकें करून अत्यंत व्याकुळपणा दाखवि ला, तेणेंकरून त्यावजिरास त्याची दया आली, सा योगें तो आपले बापाचें गाजीवदिन नामें पद आणि त्याचा अधिका र अमीरउलउमरा नामें होता तो मिळविला. नंतर तो आ पला मोठा उपकारकर्ता असाजो वजीर त्याच्यां नाशाविष यीं उद्युक्त झाला, आणि त्याची वजिरीही आपल्या आतें चां भर्ती यास देवविली. तेव्हां तो पहिला वजीर व बादशा ह यांशीं युद्ध होऊं लागलें तें सहा महिने पर्यंत दिल्लीच्या आसमंता व्हागीं होत होतें. शेवटीं त्या वजिरास कंटाळा येऊन तो वजीर तें युद्ध टाकून आपलें पहिलें ठिकाण ल वनाऊ तेथें जाऊन राहिला. पूर्वी मीरशाबूदिन बळें च त्या युद्धांत शिरला होता, त्याणें आपल्या कुमकेस म ल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांस बोलाविलें, प रंतु ते आल्याचे पूर्वीच तो वजीर युद्ध सोडून गेला हो ता. मग ते होळकर व शिंदे आल्यावर त्यांना बरोबर घेऊन तो वजिराचा पक्षपाती सुरजमल्ल याच्या पारिप त्यास गेला. तेव्हां सुरजमल्ल आपल्या किल्ल्यांत शिरू न युद्ध करूं लागला, तेवेळेस शाबूदिनानें बादशाहाजें वळ तोफांविषयीं विनंती केली, तेसमयीं बादशाहास त्या नंद्या वजिराचें सांगणें पडलें कीं, हा शाबूदिन सर्वसा मर्थ्य आपणास च असावें असें इच्छितो, अशा पुरुषास अनुकूळ होणें ठीक नव्हे. त्यावरून, बादशाह याणें तोफा

नदिल्या, आणि तेवढ्यासमयीं त्या सुरजमल्लानेंही बादशाहास शरणगेल्या सारिखें विनंती पत्र पाठविलें तेणेंकरून तो बादशाह शाबूदिन व मराठे यांच्या निवारणार्थ फौजेनहित निघाला. हेंवर्तमान मल्हारराव होळकरास कळतांच त्याणें शाबूदिन व जयाप्पा शिंदे हे केवळ अल्पबळसे मानून त्यांस न विचारितां तो एकाएकीं बादशाहाच्या सैन्यावर जाऊन पडला. ते समयीं बादशाह सावध नव्हता. आणि तोतर बोंण टाकूं लागला, तेव्हां ते लोक भयभीत होत्साते पळूं लागले. तेवेळेस होळकराला त्या लश्कराची लूट सांपडली. नंतर तो होळकर दिल्लीसनिकट ला तेसमयीं शाबूदिनानें बादशाहापासून आपणास वजिरी मिळवून आपल्या आतेचा भर्ता जो होता तो पदच्युत केला. त्यानंतर त्याणें तो आमेदशाह बादशाह दीपदभ्रष्ट करून त्याचेजागीं पूर्वीचा जहानदार बादशाह याचा नातू त्याचें दुसरें अलंमगीर असें नाव ठेवून संनसबासों वैपन्नांत मे महिन्याचे पांचवे तारिखेस तो तक्ताधिपति केला. तेच समयीं त्या पहिल्या आमेदशाह बादशाहाचे डोळे काढून त्यांस बंदींत ठेविलें. त्याच संधींत पहिला वजीर सफदरजंग मरण पावला, त्याचा पुत्र सुजाउदवला तो आपल्या बापाचे जागीं ऊदप्रांताचा अधिकारी झाला.

१७ पेशवा स्वभावें करून धिमा असे आणि दुसऱ्यास कामें संपवून आपण स्वस्थ असावें यांत त्याची आवड होती. त्याणें आपला भाऊ रघुनाथराव यास लश्कराचें काम सांगितलें, आणि सदाशिव चिमणाजी आपला चुलत भाऊ

तो मुलखाच्या बंदोबस्तास नेमिला. त्याणे रामचंद्रबाबा शेणवी याणें ठरविलेल्या प्रकारें मुलखाचा बंदोबस्त राखिला. मग तो रामचंद्रबाबा मेल्यावरही सदाशिव चिमणाजीनें त्या शेणव्यानें स्थापिलेले जे मार्ग होते ते राखून आणि दुसरेही कांहीं उत्तम प्रकारचे नवे नवे नेम केले, तेणें करून प्रजा बहुत दिवस पर्यंत लुटालूट किंवा दुसरा कांहीं उपद्रव न होतां सुख पावली.

१८ तो पेशवा कर्नाटकांतून आल्यावर एकवर्ष पर्यंत चुणूक होता, तेव्हां त्याणें आंग्र्याचा मुलूख घ्यावयाविषयीं इंग्रेजांशीं कुमकेसाठीं कांहीं बोलणें लाविलें होतें. मग संनसवाशें पंचावन्नांत पर्जन्यकाळ गेल्यावर तो पेशवा आपले जें कोंकणांत लश्कर होतें तें वाटवून आंग्र्यावर जावया स तयार झाला. इतक्यांत कर्नाटकांत कांहीं बंड उत्पन्न झालें तें मोडावयास त्याला आधीं तिकडे जावें लागलें. त्या बंडाचें मूळ असें; सलाबतजंगाजवळ हिंदी पलटनें होतीं त्यांस त्याणें हैदराबादेंत निरोप दिला, नंतर त्यांचा मुख्य सरदार मुजाफिरखान नामें होता त्याणें ते लोक आणून पेशव्याचे चाकरीस ठेविले. मग तो सरदार कर्नाटकांत गेल्यावर कांहीं रुसव्यामुळें त्याणें पेशव्याचा पक्ष सोडून सावनूरच्या नवाबाची चाकरी धरिली. तेसमयीं पेशव्यानें त्या नवाबास तो आपला सरदार मागितला, त्याला घुटीचेव सोंडपूरचे घोरपडे मराठे लोक यांचें साहाय्य असे. तेणेंकरून तो धीटपणें सरदारास पेशव्याचे स्वाधीन करीना. त्या साठीं पेशवा यांणें आपलें नोठें लश्कर जमा करून जानोजी

भोंसल्याचे दहाहजार स्वार बोलावून आणून कल्लेपल्लि डे जाऊन चागलकोट घेतला. तेथून पुढे साबनुरास जावयाकरितां हैदराबादेस वकील पाठवून त्यांस तुम्हाला व आम्हाला यालावतूर संबंधें धक्का समान बसेल असें समजाऊन त्यातल्याधिपतीचीही कुमक घेतली. मग ती व आपली सेना एकत्र करून पुढें जाऊन साबनुरास घेरा घातला.

१९ इकडे कोंकणचे आंग्रेप्रकरणी पेशव्यांहीं इंग्रेजांशीं कांहीं बोलणें लाविलें होतें, तो प्रकार असा. तुळजी आंग्र्या आपला लावत्र भाऊ संभाजीआंग्र्या तो मरण पावल्यानंतर त्याचा मुलूख वाणकोट व सावंतांची वाडी यांमध्यें होता तो आपण बळिवादीत असे, आणि सनुद्द न स्वतंत्रतेनें चांचेपणाही करीत होता. तो अनर्थ शमवा दयाकरितां संनसत्तावीस पंचावन्नांत बाळाजी बाजीरावू पेशवा व इंग्रेज या दोघांमध्यें जसे ठरलें कीं, पेशव्यांचीं सारीं लढाऊ गलबतें इंग्रेजांहीं आपल्याकडे घेऊन तीन आपलीं जहाजें एकचवेचाळिसां तोफांचें व एकसाठ तोफांचें व दोन गरनाळांचीं इतक्यांसहित जाऊन आंग्र्याचे समुद्रकांठचे किल्ले घ्यावे. असा बेत झाल्यावर मार्चमहिन्याचे सव्विसावे तारिखेस त्याकामाविषयीं इंग्रेजांनी हार्ज निघालीं, परंतु पेशव्यांच्या गलबतांस कांहीं निमित्तें करून यावयास उशीर लागला, त्या योगें आंग्र्याचीं लढाऊ गलबतें सुवर्णदुर्गाजवळ होतीं तीं इंग्रेजांच्या हातीं न लागतीं; ती न पळवावयास अवसर सांपडला. मग इंग्रेजां

चा मुख्य सरदार कामाठी ज्यू जेम्स नामें होता तो जयगड पर्यंत चांचे पाठीस लागला, परंतु त्यास त्यांतून कांहीं सोपडतां तो माघारा आला. नंतर एप्रेलाचे अवथ्या सारिस्वेस त्यानें सुवर्णदुर्ग घ्यावयाचा उद्योग आरंभिला; तो प्रकार असा, किल्ल्याच्या तटाजवळ त्यानें आपली जहाजें नेऊन लागरकी, नंतर चवथे दिवशीं जंजीरा सुवर्णदुर्ग व त्याजवळचे खुसकीवरील किल्ले ते त्याच्या स्वाधीन झाले. पेशव्यांचीं गलबतें मागून आलीं तीं त्या किल्ल्यांतील लोकांचे नजरीस्वालीं पोहंचलींच नाहींत. त्याजहाजांवरील शिबंदीचा मुख्य नारोपंत नामें होता त्यानें किर्तीएक वेळां मोल्याचीं कलम खुसकीवर युद्धें केलीं होतीं, परंतु तो समुद्रांत युद्ध करावयाविषयीं केवळ भिवा असे. ते समयीं पेशव्यांच्या हातुंचें विजयदुर्ग घ्यावयास अवसर होईना. तेव्हां इंग्रजांनीं सुवर्णदुर्ग किल्ला पेशव्यांकडील कोंकणचा सरदुरेदार याच्या स्वाधीन करून आपण आपलीं जहाजें घेऊन माघारे मुंबईस आले. या कामाच्या बोलण्यामध्यें असें ठरलें होतें कीं, वाणकोट किल्ला व त्या वाणकोटच्या खाडीचे कांठचीं पांचगांवें पेशव्यांनीं इंग्रेजास द्यावीं, तींपर्यंत काळ गेल्यानंतर त्यांहीं त्यांचे स्वाधीन केलीं.

:: सन दुसरे वर्षीं विलायतेकून बादशाहाचीं किती एक नवीं मोठीं जहाजें मुंबईस आलीं तींच दुसरीं मुंबईसंबंधीं सहाऊ जहाजें मिळून चौदा जहाजें विजयदुर्ग घ्यावयास रवाना झालीं, त्यांवर आठशें विलायती गोरे लोक, व एक हजार हिंदू पलटनी लोक चढले होते. तीं जहाजें

विजयदुर्गा समुद्र जाल तों पर्यंत मराठ्यांही आंग्र्याचे दुसरे कोंकणचे किल्ले होते ते घेतले, आणि विजयदुर्गासही घेरा घालून इंग्रेजाकडील कुमकेची वाटपहात राहिले. इतक्यांत तीं गलबतें जवळ येतांच त्या किल्ल्यांतून बाजी आंग्र्या होता, तो मराठ्यांच्या लश्करांत जाऊन इंग्रेजा खेरीज मराठ्यांशीं मात्र तहाचें बोलणें करूं लागला. त्यातहास पेशव्याचे लोक अनुकूळ होऊन त्या किल्ल्यांत बऊतद्रव्य होतें तो सर्व लाभ आपणच घ्यावया विषयीं इंग्रेजांचे अनुमत नव्हतां त्यांस युक्तीनें माघारे लावावयास उद्युक्त झाले. हें सर्व वर्तमान इंग्रेजांचा सरदार यास कळलें, त्यानें तात्काळ समुद्रांतून किल्लेकऱ्यांशीं युद्ध आरंभिलें, आणि आपले शिपाई लोक कांठीं उतरून पेशव्यांचेंल श्कर व किल्ला या दोहोंमध्यें आपलें ठाणें बसवून किल्ला खुसकीवरून व समुद्रांतून आपणच वेढिला. मग त्या किल्ल्यावरून रसद येऊन द्रव्य होतें त्यांत आपली कांहीं वांटणी असावी या चेनानें मराठ्यांकडील गमाजी पंत नामें तेथे कोणी मुख्य होता त्यानें आपले थोडके तरी लोक किल्ल्यांत जावे म्हणून फार उद्योग केला. त्यांत इंग्रेजांचा कोणी चौकीपाहऱ्याचा बंदोबस्त राखणारा सरदार होता त्यास युक्तीनें आमचे कांहीं लोक आंत जाऊं दिले असतां तुह्मास मुंबई हून दहा हजार रुपयांची हुंडी देवऊं असें गुप्त सांगितलें, असा लांच देत असतां तो ऐकेना. इतकें होऊन शेवटीं तो किल्ला इंग्रेजांचे स्वाधीन झाला, त्यांत मराठ्यांचें माणूस कोणी ही गेलें नाहीं. त्यावरून इंग्रेजांच्या सरदारांनीं तेथें द्रव्य

दहा लक्ष रुपये होते त्यापैकीं मराठ्यास किमपि नदेतां ल. लोकांहीं आपणांत वांटून घेतलें. असें झाल्यावर मुंबई चा मुख्य इंग्रेज होता त्याणें विजयदुर्ग किल्ला फार सुदृढ मा जाणून तो आपणाकडे घ्यावा, आणि मराठ्यांस जाण कोट घावा असें केलें. याकरितां पेशव्यानें इंग्रेजां चा मुख्य बादशाह याजवर आणि मद्रासचा मुख्य इंग्रेजां चा कारभारी साहेब होता त्याजपाशीं फिर्याद केली, त्याव रून दोहीं कडचें लिहिलें मुंबईच्या मुख्यास आलें, तेव्हां त्याणें मराठेही तहामध्यें जोनेम ठरला त्या प्रमाणें वागले न हींत असें समजावून त्यादेशच्या तें प्रकरण तसेंच राखिलें.

२५ करनाटकांत सलाबतजंगाचें लश्कर व मराठे लो- क मिळून सावनूर किल्ला दहुधा फ्रांशिसांच्या तोफा चालवा याच्या कौशल्यें करून घेतला, आणि दुसराही त्याचा मुलु ख घेऊन त्या नवाबाशीं त्यांहीं स्नेह केला. तेव्हां ज्या निमित्तें इतका कलह झाला तो मुजाफरखान पुनः सलाबतजंगाचे चाकरीस राहिला. असा सलाबतजंगाशीं आणि पेशव्याशीं स्नेह पडला त्याचें कारण हेंच दिसतें कीं, फ्रांशीस लोक मो ठ्या योग्यतेस आले ते सर्व कांहीं आपल्या सत्तेंत घेतील अ शाबद्दलचें त्रास काढून घावेसें त्यांच्या मनांत होतें. त्यावरून तें सावनूरचें संस्थान त्यांचें होतीं येतांच फ्रांशिसांचा मुख्य बसी नामें साहेब होता त्याला सलाबतजंगानें सांगितलें कीं, आतां आपणास तुमचें प्रयोजन नाहीं तुम्ही आपले देशीं हैदर जेथें आम्ही तुम्हास मुलुख दिला आहे तिकडे जावें.

+ मंचनबाईं पुन्नामांत रमीला लश्कर सबबीनें दक्षणेचें ग्रें

असा निरोप झाला त्यावेळेस बसीजदळ त्याच्या जातीचे फांशी
स घोडेस्वार दोनशें व पायदळ सहाशें याशिवाय पांच हजार
पलटणी हिंदूलोक होते, व पोक्त सरंजामाच्या त्याच्या सेने प्र
माणें त्यास युरतशा तोफा होत्या. असें त्याचें सामर्थ्य असतां
तो बसी समजला कीं, हे मला काढून घावयास मिळाले
आहेत, आणि जर मी यावेळेस यांची आज्ञा नमानावी तर
मुजाफरखान यांजकडे आहे. त्याचे व आपले हिंदी पलट
नाचे शिपायी लोक यांचें इष्टल आहे, यास्तव निःशंक युद्ध
होणार नाहीं. त्यास हेंच उत्तम कीं, आपल्या मर्यादेन जावें, आ
णि हैदराबादेस जाऊन तेथें आपला बंदोबस्त चांगला करा-
वा, आणि आपल्या मुख्य ठिकाणची कुमक आणावी, नंत
र मागें उलटावें. असें मनांत आणून तो तें मागणें अव-
श्य मानून मोठ्या त्वरेनें जाऊन हैदराबादेस पोहंचला.
तेथें चांगली बंदोबस्ताची जागा पाहून आपण त्या आप-
ल्या लोकांसहित तेथें राहून युद्धाची तयारी करूं लागला,
आणि तेथें सलाबतजंगाकडचे मुख्य सरदार रामचंद्र जा
धव व जानोजी निंबाळकर होते ते त्यांणें वश केले; इतक्यां
त मासुलीपट्टनाहून त्याची कुमकही येऊन पोहंचली. त्या
नंतर त्याचा असा बंदोबस्त झालेला जाणून सलाबतजंगला
मदत करावयाची मसलत टाकून त्याणीं सैन्य रक्षिना झाला.
मग तो बसी सलाबतजंगाजवळच्या कारभाऱ्यांत पहिल्या

कडे समुद्राचे कांठीं राजमंद्री शहर व शिवेकडील बरेच प्रांत इतका
मुलूख सलाबतजंग याणें दिला होता.

पेक्षां मान्यता पावून त्याणें मुजाफरखानाला मलाबतर्फे गाचे चाकरीतून काढिलें. मग त्या मुजाफरखानानें पुण्या स जाऊन पेशव्यास बहुत आर्जवून कबूल केलें कीं, इतः पर कृत्रिम नकरितां इमानीपणें चाकरी करीन. त्यावरू न तो पेशव्यानें आपणापाशीं राखिला, परंतु सदाशिवचि मणाजी याच्या मनास ती गोष्ट आली नाही.

२२ पेशवा करनाटकांतून जुलाईचे विसावे तारिखे स पुण्यांत आला, नंतर त्याणें मुंबईचा अधिकारी चेंचे र साहेब होता त्याला बहुत स्नेहयुक्त पत्र लिहून त्यांत अ सें समजाविलें कीं, आम्ही पुण्यास आलों, आतां पूर्वीचि का मा पैकीं कांहीं चंदोबस्त राहिला आहे तो आपला कोणी साहेब एथें आला असतां त्याचे विद्यमानें केला जाईल. त्यावरून बैफील नामें व स्पेनसर नामें दोघे साहेब मुंबईहून गेले. ते पुण्यात पेशवा व रघुनाथराव व सदाशिवचिमणाजी यांस भेटले. मग ऑक्टोबराचे बारावे तारिखेस असा निश्चय ठरला कीं. इंग्रेजांनीं विजयदुर्ग पेशव्यांस द्यावा, आणि पेश व्यांनीं इंग्रेजांस वाणकोट व त्याजवळचे खाडीच्या कांठचे दहा गांव द्यावे, यारखेरीज आमचें कांहीं मागणें सरकार कं पनी बहादुरांकडे राहिलें नाहीं असें लिहून द्यावें, या प्रमाणें तीं सर्व कामें उलगडून ते दोघे साहेब नार्घोरे मुंबईस आ ले.


पूर्वार्धसमान